# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०३/ २०१७** **दिनांक २७.०३.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २७.०३.२०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ६३६२/ २०१७, दिनांक १८ मार्च, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक २७.०३.२०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.)
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ॲड मोहन जयकर- सदस्य यांनी दुरध्वनीद्वारे व मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग- सदस्य यांनी ई-मेलद्वारे कळविले आहे.

मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२७.०३.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस मी हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२७.०३.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२७.०३.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. मात्रमुख्यमंत्र्यांनी वचनपुर्ती केली नाही. माननीय शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांना दिलेला शब्द पाळत नसल्याने, आम्हाला बैठकीस हजर राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २५.०२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२३** दिनांक २५.०२.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.०६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार दि.०१/०१/२०१७ पासून सर्वांसाठी मोफत करणेत आलेले असून त्यासाठी प्रस्तावित केलेल्या नियमावली मधील अ.नं.०३, ०४, ०५ व ०६ या मुद्दयास मान्यता देण्यात आली.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकिय सेवा मिळत असल्यामुळे खाजगी वैद्यकिय व्यावसायिक त्यांचेकडील रुग्णांना वैद्यकिय चाचण्या करण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयात पाठवितात, अशा प्रकारच्या चाचण्या करण्यात येऊ नये व याबाबत रुग्णांना कळविण्यासाठी तेथे फलक लावण्यात यावा.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गोर-गरीब रुग्ण उपचार घेत असतात, याकरीता मोफत उपचार करणेसाठी आर्थिक निकष लावणेत येऊ नये. रुग्ण, रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे उपचार घेऊ शकेल व जादा मनुष्यबळ वापरणेऐवजी आवश्यक त्या ठिकाणी नवीन सॉफ्टवेअर विकसीत करणेत यावे. तसेच संस्थान रक्तपेढीमध्ये रक्त अथवा रक्तघटक उपलब्ध नसल्यास इतर रक्तपेढयांकडे रक्ताची मागणी करण्यात यावी, रक्त अथवा रक्तघटकांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ देऊ नये. याकरीता इतर रक्तपेढयांबरोबर MOU करणेत यावा व रक्त दात्यांची यादीही बनविणेत येऊन, दि.०१ मार्च, २०१७ पासुन रुग्णांना रक्त व रक्त घटक मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेत यावी व केसपेपर विभागामध्ये काऊंटरची संख्या वाढविणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार दि.०१/०१/२०१७ पासून सर्वांसाठी मोफत करणेत आलेले असून त्यासाठी प्रस्तावित केलेल्या नियमावली मधील अ.नं.०३, ०४, ०५ व ०६ या मुद्दयास मान्यता देण्यात आली.**

**श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकिय सेवा मिळत असल्यामुळे खाजगी वैद्यकिय व्यावसायिक त्यांचेकडील रुग्णांना वैद्यकिय चाचण्या करण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयात पाठवितात, अशा प्रकारच्या चाचण्या करण्यात येऊ नये व याबाबत रुग्णांना कळविण्यासाठी तेथे फलक लावण्यात यावा.**

**श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गोर-गरीब रुग्ण उपचार घेत असतात, याकरीता मोफत उपचार करणेसाठी आर्थिक निकष लावणेत येऊ नये. रुग्ण, रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे उपचार घेऊ शकेल व जादा मनुष्यबळ वापरणेऐवजी आवश्यक त्या ठिकाणी नवीन सॉफ्टवेअर विकसीत करणेत यावे. तसेच संस्थान रक्तपेढीमध्ये रक्त अथवा रक्तघटक उपलब्ध नसल्यास इतर रक्तपेढयांकडे रक्ताची मागणी करण्यात यावी, रक्त अथवा रक्तघटकांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ देऊ नये. याकरीता इतर रक्तपेढयांबरोबर MOU करणेत यावा व रक्त दात्यांची यादीही बनविणेत येऊन, दि.०१ मार्च, २०१७ पासुन रुग्णांना रक्त व रक्त घटक मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.**

**तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीवगांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविणेत यावी व केसपेपर विभागामध्ये काऊंटरची संख्या वाढविणेत यावी, असे ठरले.**

**याचवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस अशी माहिती दिली की, श्री साईनाथ रुग्णालयांमधील मोफत उपचाराचा गरीब/ गरजू रुग्णांना फायदा होणेकरीता रु.१ लाख पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या रुग्णांनाच मोफत उपचार द्यायला हवेत.**

**परंतु समिती सदस्यांचे असे मत झाले की, श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये रुग्णांना मोफत उपचार घेण्यासाठी रु.१ लाख मात्र उत्पन्नाची अट ठेवल्यास, उत्पन्नाचा दाखला घेण्यासाठी धावपळ होईल व जोपर्यंत उत्पन्नाचा दाखला मिळत नाही, तोपर्यंत वैद्यकिय उपचार घेता येणार नाहीत, याकरीता रु.१ लाख मात्र उत्पन्नाची अट न ठेवता, सर्व रुग्णांना मोफत उपचार देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

---

**(२) निर्णय क्र.१२-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, जनसंपर्क कार्यालयाचे सशुल्क दर्शन/ आरती पास वितरण काऊंटर सध्याचे साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाचे ठिकाणी स्थलांतरीत करुन त्याचे विस्तारीकरण व नुतणीकरण करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर नियोजित कामासाठी विभागांतर्गत इंटेरीअर डिझाईन- ड्राईंग तयार करुन त्यानुसार काम करुन घेण्यात यावे.

**तसेच जनसंपर्क कार्यालयाचे नाव स्वागतकक्ष व जनसंपर्क अधिकारी यांचे पदनाम स्वागताधिकारी असे करणेत यावे. व्ही.व्ही.आय.पी. साईभक्तांसाठी दर्शन पासवर रबरी शिक्के मारुन पुढील (नंदी/ अभिषेक गेट) गेटने दर्शनासाठी प्रवेश दिला जातो. दि.०१ मार्च, २०१७ पासुन सदर रबरी शिक्के बंद करणेत यावे व पुढील गेटसाठी साईटेक प्रकल्पांतर्गत बारकोडचा वापर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सा. प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ बांधकाम/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, जनसंपर्क कार्यालयाचे सशुल्क दर्शन/ आरती पास वितरण काऊंटर सध्याचे साईप्रसाद निवासस्थान कार्यालयाचे ठिकाणी स्थलांतरीत करुन त्याचे विस्तारीकरण व नुतणीकरण करणेस व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर नियोजित कामासाठी विभागांतर्गत इंटेरीअर डिझाईन- ड्राईंग तयार करुन त्यानुसार काम करुन घेण्यात यावे.

**तसेच व्ही.व्ही.आय.पी. साईभक्तांसाठी दर्शन पासवर रबरी शिक्के मारुन पुढील (नंदी/ अभिषेक गेट) गेटने दर्शनासाठी प्रवेश दिला जातो. दि.०१ मार्च, २०१७ पासुन सदर रबरी शिक्के बंद करणेत यावे व पुढील गेटसाठी साईटेक प्रकल्पांतर्गत बारकोडचा वापर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सा. प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ बांधकाम/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**(३) निर्णय क्र.१६८-**

संस्थान शैक्षणिक संकुलाकडील श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी एकच मुख्याध्यापक असून दोन्ही शाळा वेगवेगळया ठिकाणी बऱ्याच अंतरावर असल्यामुळे तसेच तेथील विद्यार्थी व शिक्षक यांचेवर नियंत्रण रहाणेसाठी दोन्ही शाळा वेगळया करणेत याव्यात.

(कार्यवाही- सहा.शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालय/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**संस्थान शैक्षणिक संकुलाकडील श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी एकच मुख्याध्यापक असून दोन्ही शाळा वेगवेगळया ठिकाणी बऱ्याच अंतरावर असल्यामुळे तसेच तेथील विद्यार्थी व शिक्षक यांचेवर नियंत्रण रहाणेसाठी दोन्ही शाळा वेगळया करणेत याव्यात, असे ठरले होते. परंतु दोन्ही शाळा विभक्त केल्यास शाळांना शासनाची मान्यता मिळणार नाही. शाळा संहितेनुसार दोन्ही शाळा एकत्रच असायला हव्यात. तरी या प्रकरणी मा.कार्यकारी अधिकारी यांनी शाळा संहितेच्या नियमानुसार सखोल अभ्यास करुन समितीस अवगत करावे. तसेच अशा प्रकारचे विषय व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत येऊ नये, यावर प्रशासकीय स्तरावरच निर्णय घेण्यात यावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ सहा.शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालय/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०६.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२४** दिनांक ०६.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **सन-२०१७ मधील संस्थान मार्फत साजरे होणाऱ्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई कामाचे ऑनलाईन दरपत्रक (Commercial Bid) उघडणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८४९ नुसार सन-२०१७ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणा-या तीनही उत्सवासाठी आवश्यक असलेल्या निमंत्रण पत्रिका व त्यासाठीची पाकीटे छपाई करणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

दि.३०.०१.२०१७ ते दि.०९.०२.२०१७ अखेर ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या तांत्रिक निविदांचे सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडणेबाबत तसेच सर्व कागदपत्रे तांत्रिक निविदा लिफाफामध्ये सिलबंद करुन शिर्डी कार्यालयात दि.१०.०२.१७ रोजी जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील ६ प्राप्त छपाई धारकांच्या सिलबंद व ऑनलाईन तांत्रिक निविदा दि.१७.०२.२०१७ रोजी मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडण्यात आल्या.

| अ.नं. | निविदा धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | निट प्रिंटस्, अहमदनगर |
| ०२ | रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स ,औरंगाबाद |
| ०३ | टॅको व्हीजनस् प्रा.लि. मुंबई |
| ०४ | अभियंकित प्रिंटर्स, नाशिक |
| ०५ | मधुरा प्रिंट सोल्युशन, नाशिक |
| ०६ | प्रवरा ऑफसेट, लोणी |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ५ मधुरा प्रिंट सोल्युशन, नाशिक यांचा छपाई कामाचा अनुभव निविदेत कळविल्याप्रमाणे तीन वर्षाचा नसल्याने सदरची निविदा अपात्र करण्यात आली आहे. व अ.नं. १ ते ४ व ६ ह्या निविदा पात्र असल्याने त्यांचे दरपत्रक (Commercial Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदा धारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| ०१ | रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स,औरंगाबाद | २.८४ |
| ०२ | निट प्रिंटस्, अहमदनगर | १.७० |
| ०३ | प्रवरा ऑफसेट, लोणी | **१.६५** |
| ०४ | अभियंकित प्रिंटर्स, नाशिक | १.७८ |
| ०५ | मधुरा प्रिंट सोल्युशन, नाशिक | अपात्र |
| ०६ | टॅको व्हीजनस् प्रा.लि., मुंबई | १.६७ |

**सन-२०१७ मधील संस्थान मार्फत साजरे होणाऱ्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाई करणेकामी प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे प्रती नग रु.१.६५ मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी प्रती नग रु.१.६० मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१७ या वर्षामधील संस्थान मार्फत साजऱ्या होणाऱ्या सर्व उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाईकामी प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे प्रती नग रु.१.६० मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना छपाईचा कार्यादेश देण्यात यावा. तसेच अंतीम दर त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

०२ **झेरॉक्स मशिन खरेदीकामी प्राप्त मुळ निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

**(अ)** संस्थानचे दैनंदिन झेरॉक्सच्या कामासाठी एक नग अद्यावत नामांकित कंपनीचे झेरॉक्स मशीन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६८ अन्वये *"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानचे दैनंदिन झेरॉक्स कामासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे ०१ नग अद्यावत झेरॉक्स मशिन विहित पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली".*

सदर खरेदीकामी अंदाजे रु.५,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने संदर्भीय शासन नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणे गरजेचे असल्याने झेरॉक्स मशिन्स खरेदीकामी इकडील कार्यालयाकडील दि.०७.०९.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

| अ.नं. | कार्यवाहीचा तपशिल | दिनांक/ कालावधी |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी | दि.२८-२९/०९/२०१६ |
| ०२. | वेबसाईटवर ई-निविदा प्रसिध्द करण्याची दिनांक व वेळ | दि.२९/०९/२०१६ सकाळी ११.०० वा. |
| ०३. | ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.०८/१०/२०१६ सायं. ०५.०० वा. |
| ०४. | तांत्रिक निविदा प्रत्यक्ष स्विकारण्याची दिनांक व वेळ | दि.१०/१०/२०१६ सकाळी ११.०० वा.<br>ते दि.१२/१०/२०१६ सायं. ०५.००वा. पावेतो |
| ०५. | तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक | दि.१५/१०/२०१६ सकाळी ११.०० वा. |

संदर्भीय शासन नियमावलीनुसार प्रस्तावित को-या ई-निविदेची किमंत रु.२,०००/- मात्र व बयाणा रक्कम रु.१०,०००/- मात्र ठेवणेत आलेली होती.

**(ब)** मात्र मुदतीअंती फक्त एकाच निविदाधारकाकडून तांत्रिक लिफाफा सादर करण्यात आलेला होता. तसेच दि.१५.१०.२०१६ रोजी ऑनलाईन निविदांची पाहणी केली असता, त्यामध्येही फक्त एकाच निविदाधारकाची निविदा प्राप्त झालेली होती. संदर्भीय शासन नियमावलीनुसार एकाच निविदाधारकाची निविदा प्राप्त झाल्यास त्याबाबत काहीही निर्णय घेता येत नाही. त्यामुळे पुन्हा निविदा प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त आहे.

**(क)** मात्र ई-निविदा प्रसिद्ध केल्यानंतर काही वितरकांनी निविदेमध्ये नमुद वर्णन/क्षमतेबाबत (Specification) प्रश्न/ शंका उपस्थित करुन, निविदेमध्ये नमुद वर्णनाप्रमाणे झेरॉक्स मशिन कोणत्याही कंपनीकडून उपलब्ध होऊ शकत नाही, सदर वर्णनाचे झेरॉक्स मशिन घेतल्यास त्याची किमंत खुप जास्त राहील, कारण ते assignable करावे लागेल, असे दुध्वनीद्वारे कळविलेले आहे.

**(ड)** त्यामुळे अहमदनगर, औरंगाबाद, नाशिक येथील झेरॉक्स मशिनची विक्री अथवा उत्पादन करणा-या वेगवेगळया कंपन्यांचे अधिकृत वितरकांशी दुध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष चर्चा करुन, संस्थानची आवश्यकतेनुसार सर्व कंपन्याकडे उपलब्ध असणारे झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत चर्चा करुन, त्यांचेकडून सर्व संमतीने सर्वसमावेशक असे वर्णन घेण्यात आले. तसेच संस्थानचे झेरॉक्स ऑपरेटर यांनी सदरचे वर्णनाचे अवलोकन करुन, दैनंदिन कामकाजाचे सोईच्या दृष्टीने झेरॉक्स मशिन खरेदीकामी खालीलप्रमाणे वर्णन निश्चित केलेले आहे.

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | वर्णन/क्षमता | संख्या | अंदाजे दर प्रती नग (सर्व करांसह) |
|---|---|---|---|---|
| ०१. | Xerox Machine | Copy Speed - **50PPM & above**<br>Print Resolution– **600 X 600 dpi**,<br>A3 Multifunction- **Copy/ Print/ Scan**,<br>ARDF Duplex, 4 Trays (500 Sheet),<br>100 sheets by pass,<br>Scan to Function – Email/NW/USB<br>Warranty – 1 year.<br>1 year free service (without Material)<br>Local service support | ०१ नग | रु.५,००,०००/- |

सबब उपरोक्त **"अ" "ब" "क"** व **"ड"** चे अवलोकन करता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५६८ नुसार उपरोक्त परिच्छेद **"ड"** मध्ये नमुद केलेल्या वर्णनाचे झेरॉक्स मशिन खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस इकडील कार्यालयाकडील दि.१६.१२.२०१६ रोजीचे टिपणीन्वये मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | कार्यवाहीचा तपशिल | दिनांक / कालावधी |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी | दि.१८-१९/०१/२०१७ |
| ०२. | वेबसाईटवर ई-निविदा प्रसिध्द करण्याची दिनांक व वेळ | दि.१८/०१/२०१७ सकाळी ११.०० वा. |
| ०३. | ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.२८/०१/२०१७ सायं.०५.०० वा. |
| ०४. | तांत्रिक निविदा प्रत्यक्ष स्विकारण्याची दिनांक व वेळ | दि.३०/०१/२०१७ सकाळी ११.०० वा. ते दि.३१/०१/२०१७ सायं.०५.००वा. पावेतो |
| ०५. | तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक | दि.०३/०२/२०१७ सकाळी ११.०० वा. |
| ०६. | मुळ निविदा (Commercial) उघडणे दिनांक | पुढील मा.व्य.समितीचे सभेत |

शासन नियमावलीनुसार प्रस्तावित को-या ई-निविदेची किमंत रु.२,०००/- मात्र व बयाणा रक्कम रु.१०,०००/- मात्र ठेवणेत आलेली तांत्रिक निविदेसोबत बयाणा रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार) मात्र व निविदा किमंत रु.२,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार) मात्रचे डी.डी. तसेच दुकान नोंदणी दाखला, सेल्स टॅक्स/ सेंट्रल सेल्स टॅक्स नोंदणी दाखला, व्हॅट/टीन नंबर, पॅनकार्ड कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबत प्रमाणपत्र वगैरे कागदपत्रांची ऑनलाईन स्कॅन करुन Soft Copy व दि.३०/०१/२०१७ ते दि.३१/०१/२०१७ पर्यंत तांत्रिक कागदपत्रांची प्रत्यक्ष मागणी करण्यात आलेली होती.

झेरॉक्स मशिन खरेदीकामी दि.१७.०१.२०१७ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करुन, उपरोक्त नमुद कालावधीमध्ये सदरची ई-निविदा महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

मुदतीअंती खालील निविदाधारकांकडून प्रत्यक्ष Technical Bid प्राप्त झालेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाधारकांचे नांव** | **आवक क्रमांक व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | Aspire Techno build, Pune | २१७७२/३०.०१.२०१७ |
| ०२. | ओम साई मार्केटींग, औरंगाबाद | २१७७३/३०.०१.२०१७ |
| ०३. | ASZ इन्फोटेक, नाशिक | २१७७४/३०.०१.२०१७ |
| ०४. | इंन्टीग्रेटड सिस्टीम, नाशिक | २१७७५/३१.०१.२०१७ |

उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेमधील Online व प्रत्यक्ष प्राप्त झालेल तांत्रिक लिफाफे (Technical Bid) मा.व्यवस्थापन उप समितीचे दि.१७.०२.२०१७ चे सभेत उघडून त्यातील कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे.

सोबतच्या तक्त्यात नमुद केलेनुसार अ.क्र.०४ इंन्टीग्रेटड सिस्टीम, नाशिक यांनी बयाणा रक्कम व निविदा फीचे डी.डी.हे खाजगी बॅंकेचे दिल्याने त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आलेली असून, उर्वरीत अ.क्र.०१ ते ०३ यांनी निविदेतील कागदपत्रांची नियमानुसार पुर्तता केलेली असल्यामे त्यांच्या निविदा पात्र ठरविण्यात आलेल्या आहे. निविदा पात्र ठरलेल्या निविदाधारकांचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| **अ.क्र.** | **निविदाधारकांचे नांव** |
|---|---|
| ०१. | Aspire Techno build, Pune |
| ०२. | ओम साई मार्केटींग, औरंगाबाद |
| ०३. | ASZ इन्फोटेक, नाशिक |

झेरॉक्स मशिन खरेदीकामी उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेतील मुळ निविदा (Commercial Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदा धारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | ASZ इन्फोटेक, नाशिक | **३,२५,५००/-** |
| ०२ | ओम साई मार्केटींग, औरंगाबाद | ४,०५,०००/- |
| ०३ | Aspire Techno build, Pune | ४,२९,९९९/- |

**संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेले झेरॉक्स मशिन खरेदीकामी ASZ इन्फोटेक, नाशिक यांचे रु.३,२५,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी या दिलेल्या दरामध्ये १०% सवलत लेखी स्वरुपात दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेले झेरॉक्स मशिन खरेदीकामी ASZ इन्फोटेक, नाशिक यांचे रु.२,९२,९५०/- निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-१२)

---

०३ **वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून प्राप्त झालेले दरपत्रक उघडून निम्नतम दर देणाऱ्या विमा कंपनीस कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (२)(झ)-** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

**प्रस्तावना:-** दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर एकवर्ष कालावधी करीता वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा विमा नुतनीकरण करणे कामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाप्यामध्ये निविदा मागविणेत आलेले होते.

त्यानुसार संस्थानचे १०६ वाहनांचा दि०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीचा विमा नुतनीकरण करणे कामी चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन खालील प्रमाणे ०५ (पाच) सिलबंद दरपत्रके इकडील विभागाकडे प्राप्त झालेली आहेत.

| **अ.न.** | **विमा कंपनीचे नांव** | **आवक क्रमांक व दिनांक** | **दरपत्रके स्थिती** |
|---|---|---|---|
| १. | नेशनल इन्श्युरन्स कं.लि. कोपरगांव | २३१०७-२१.०२.२०१७ | सिलबंद पाकीट |
| २. | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. तत्पर सेवा कार्यालय शिर्डी | २३११२-२१.०२.२०१७ | सिलबंद पाकीट |
| ३. | दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर | २३११३-२१.०२.२०१७ | सिलबंद पाकीट |
| ४. | दि.ओरिएन्टल इंश्योरेंस कंपनी लि.कोपरगांव | २३११४-२१.०२.२०१७ | सिलबंद पाकीट |
| ५. | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय राहुरी | २३११५-२१.०२.२०१६ | सिलबंद पाकीट |

उपरोक्त प्रमाणे चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुन प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १. | नेशनल इन्श्युरन्स कं.लि. कोपरगांव | १७,७५,०००/- |
| २. | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. तत्पर सेवा कार्यालय शिर्डी | १८,१९,३०४/- |
| ३. | दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर | **१६,४५,३६६/-** |
| ४. | दि.ओरिएन्टल इंश्योरेंस कंपनी लि.कोपरगांव | १६,५५,२४३/- |
| ५. | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय राहुरी | १६,८७,०१९/- |

**वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणेकामी दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं. लि., श्रीरामपुर यांचे रु.१६,४५,३६६/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले होते. दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं. लि., श्रीरामपुर यांचे प्रतिनिधींबरोबर उपसमितीने दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेचे अधिकार त्यांचे स्तरावर नाहीत, मी कंपनीशी बोलून कळवितो, असे उपसमितीसमोर तोंडी सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील १०६ वाहनांच्या वार्षिक विम्याचे नुतनीकरण करणेकामी दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं. लि., श्रीरामपुर यांचेकडून लेखी स्वरुपात अंतीम दर घ्यावेत व त्यानुसार कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०४ **संस्थानच्या विविध विभागांसाठी बसविण्यात आलेल्या युपीएस बॅट-यांचे वार्षिक दरपत्रकासाठी प्राप्त ई-निविदामधील पात्र निविदाधारकांच्या व्यवसायीक निविदा उघडून त्यातील निम्नतम पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.30/11/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.781

**प्रास्ताविक:** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दिलेले युपीएस व्यतीरिक्त कॅन्टीन विभाग, जनसंपर्क विभाग, साईप्रसाद निवासस्थान विभाग, साईआश्रम विभाग, साईधर्मशाळा कार्यालय, साई कॉम्प्लेक्स देणगी व पुस्तक विक्री कांऊटर येथे संस्थानचे विविध ठिकाणी युपीएस वापरात आहेत.

सदरचे युपीएससाठी वापरण्यात येणाऱ्या बॅटऱ्यांचे वार्षिक दर निश्चित करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.30/11/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.781 अन्वये ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता घेण्यात आलेली आहे.

ई-निविदा प्रक्रियाअंतर्गत प्राप्त तांत्रिक निविदांचा तपशिल पुढिलप्रमाणे

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | आवक नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | Salbat Industries, Mumbai | आ.नं. 20753 दि.19/01/2017 | मुदतीत प्राप्त |
| 2 | Shiraz C. Lalkaka Entreprises, Mumbai | आ.नं. 20932 दि.21/01/2017 | मुदतीत प्राप्त |
| 3 | Power Gun Systems, Kolhapur | जा.नं. 21080 दि.23/01/2017 | मुदतीत प्राप्त |
| 4 | Aspire Technobuild, Pune | आ.नं.21082 दि.23/01/2017 | मुदतीत प्राप्त |
| 5 | Microtronics, Aurangabad | आ.नं. 21196 दि.24/01/2017 | मुदतीत प्राप्त |
| 6 | Tejas Electronics, Ahmednagar | आ.नं.21201 दि.24/01/2017 | मुदतीत प्राप्त |

प्राप्त पुरवठाधारकांच्या तांत्रिक ई-निविदा व बंद लिफाफे दि. 17/02/2017 रोजी मा. उपसमितीचे सभेमध्ये उघडण्यात आलेले आहेत. उघडण्यात आलेल्या तांत्रिक ई-निविदेमधील पुरवठाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Bidders Name | Description | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Certificate of Registration for Vat | Shop Act. License | Audited Balance Sheet of last two years | Letter of Authorization Agency | Scan Copy Of Detail Of Firm | IT Returns of last two financial years | EMD DD Rs. 10,000/- | Tender price DD Rs. 500/- | Remarks |
| Salbat Industries, Mumbai | 27380064-535v | MW04029/Commercial - II | 2014-15 2015-16 | Exide | Yes | 2014-15 2015-16 | UBI 371151 | UBI 371150 | Accepted |
| Shiraz C. Lalkaka Entreprises, Mumbai | 27110276-580V | E010911/Shop-1 | 2014-15 2015-16 | Exide | Yes | 2014-15 2015-16 | UBI 316087 | UBI 316088 | Accepted |
| Power Gun Systems, Kolhapur | 27330254-440V | 171020031-795632 | 2014-15 2015-16 | Exide | Yes | 2014-15 2015-16 | SBI 761646 | SBI 761647 | Accepted |
| Aspire Technobuild, Pune | 27861170-459 V | 16310003105-20774 | 2014-15 2015-16 | Exide | Yes | 2014-15 2015-16 | UBI 783786 | UBI 783787 | Accepted |
| Microtronics, Aurangabad | 27240064-321 C | 90036/1998 | 2014-15 2015-16 | Amaron | Yes | 2014-15 2015-16 | OBC 774981 | OBC 774980 | Accepted |
| Tejas Electronics, Ahmednagar | 27960104-374 V | T/50 | 2014-15 2015-16 | Exide | Yes | 2013-14 2015-16 | OBC 411255 | OBC 411256 | Accepted |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे प्राप्त झालेल्या सर्व पुरवठाधारकांच्या तांत्रिक निविदा पात्र झालेल्या आहेत. सबब, सदर पुरवठाधारकांनी सादर केलेल्या व्यवसायीक ई-निविदा मा.उप-समितीचे सभेत उघडुन पात्र न्युन्नत्तम निविदाधारक/ पुरवठाधारकास कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे पात्र निविदाधारक/ पुरवठाधारकांच्या व्यवसायीक ई-निविदा मा.उप-समितीचे सभेत उघडुन त्यातील न्युन्नत्तम निविदाधारक/ पुरवठाधारकास कार्यादेश देणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे विषयाकींत प्रकरणी पात्र निविदाधारक/पुरवठाधारकांच्या व्यवसायीक ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | **100 AH 60 nos.** | 65 AH 65 nos. | 42 AH 77 nos. | 26 AH 85 nos. | 18 AH 160 nos. | 12 AH 50 nos. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील वार्षिक प्रती नग (without Tax) दर रु. | | | | | |
| 1 | Power Gun Systems, Kolhapur | ६,५००/- | ४,६५०/- | ३,४५०/- | २,३००/- | १,६५०/- | १,४००/- |
| 2 | Microtronics, Aurangabad | **६,२५६/-** | **४,१०६/-** | **२,९४४/-** | **१,८४९/-** | **१,५७५/-** | **१,०५०/-** |
| 3 | Tejas Electronics, Ahmednagar | ७,९४५/- | ५,२२१/- | ३,७४६/- | २,७२४/- | १,९३०/- | १,४७६/- |
| 4 | Aspire Technobuild, Pune | ६,८२२/- | ४,७२०/- | ३,५४०/- | २,४९५/- | २,१००/- | १,२५०/- |
| 5 | Salbat Industries, Mumbai | ८,९०१/- | ६,०३८/- | ४,४५२/- | २,९०८/- | २,३५१/- | १,८९८/- |
| 6 | Shiraz C. Lalkaka Entreprises, Mumbai | ६,९४५/- | ४,७०५/- | ३,५३०/- | २,४१०/- | १,९०५/- | १,६८०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या विविध विभागांसाठी आवश्यक असलेल्या यु.पी.एस.साठी आवश्यक असलेल्या बॅटऱ्या खरेदी करणेकामी Microtronics, Aurangabad यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले (Without Tax) वार्षिक निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांचेकडून आवश्यकतेनुसार बॅटऱ्या खरेदी करणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

०५ **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुर्नमुद्रण करणेकामी लिफाफा ई-निविदेतील क्र.०२ दरपत्रके (Commercial Bid) उघडणे व निम्नतम दर केलेल्या निविदाधारकांना कार्यादेश पारित करणेबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

'श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील'

**प्रस्ताविकः-** उपरोक्त तरतुदीनुसार प.पू. श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशित साईचरित्र, पुस्तके व फोटो साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिली जातात.

**प्रस्तावः-** श्री साई समाधी शताब्दी सन-२०१७-२०१८, श्री च्या पादुका दर्शन व साईभक्त संमेलन सोहळाच्या विविध राज्यांच्या राजधानीत होणा-या कार्यक्रमात बुकस्टॉलचे नियोजन प्रस्तावित आहे, तसेच मंदिर परिसरात नव्याने ०३ बुकस्टॉल सुरु केले असल्याने, तसा प्रस्ताव दि.३१.१०.२०१६ रोजी साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी अंदाजे खर्च रुपये. ४,५५,२०,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यात छपाईकामी साईचरित्र, इतर पुस्तके व फोटोंचा समावेश आहे.

**ठरावः-** मा.व्यवस्थापन समिती दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८२३ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेली, साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुर्नमुद्रण करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, संस्थान प्रकाशित प्रकाशनांवर मुळ किंमत व सवलतीच्या दराची किंमत छापणेत यावी, असे ठरले.

उपरोक्त संस्थानचे विषयांकित कामासाठी संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात शासकीय दराने ई-निविदा सूचना जाहिरातीस प्रसिध्दी देऊन त्यासाठी दि.१२.०१.२०१७ ते दि.२७.०१.२०१७ अखेर खालील ०८ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपव्यवस्थापन समिती दि. १७.०२.२०१७ रोजीच्या सभेत सिलबंद पाकीटे व ई निविदेतील लिफाफा क्र.०१ (Technical Bid) उघडून निविदेतील पूर्वपात्रते विषयक कागदपत्रांची छाननी केली असता निविदेतील अटी/शर्तीनुसार प्राप्त स्पर्धक निविदाकारांचा तक्ता खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अं.नं. | निविदाकारांचा तपशिल | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| ०१ | प्रिंट प्लस प्रा.लि. मुंबई | पात्र |
| ०२ | सकाळ पेपर्स प्रा.लि. कोल्हापूर | पात्र |
| ०३ | सॅप सोल्युशन प्रा.लि. मुंबई | पात्र |
| ०४ | **चेरी ऑफसेट, सोलापूर** | **अपात्र** |
| ०५ | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | पात्र |
| ०६ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | पात्र |
| ०७ | संप्रती ऑफसेट, सोलापूर | पात्र |
| ०८ | लोकमंगल प्रिंट& पॅक, प्रा. लि. सोलापूर | पात्र |

**विभागाची मागणी/ स्पष्ट अभिप्राय:-** प्रस्तावित साठा संपत आलेल्या संस्थान प्रकाशित प्रकाशने (पुस्तके/ फोटो) पुर्नमुद्रण करणेकामी ई- निविदेतील लिफाफा क्र.०२ नुसार दरपत्रके (Commercial Bid) उघडून निम्नत्तम दरधारकांना श्री साई समाधी शताब्दी निमित्त सन २०१७-२०१८ च्या नियोजनाकामी लवकरात लवकर कार्यादेश देणे उचित राहील.

उपरोक्त संस्थान कामासाठी प्राप्त ०८ निविदेपैकी अं.नं.०४ चेरी ऑफसेट, सोलापूर यांची निविदा, ई- निविदेतील अटी/शर्ती पान क्र.०३ वरील ०४ नुसार तसेच "यापूर्वी ज्यांनी पुरवठा आदेश दिलेनंतर मागणीनुसार छपाईचा पुरवठा केलेला नाही. अशा पुरवठाधारकांच्या निविदा कारवाई केलेपासून ०३ वर्ष विचारात घेतल्या जाणार नाहीत" यास अनुसरुन त्यांची निविदा अपात्र करण्यात आली आहे.

करीता उर्वरित पात्र ०७ निविदाकारांचे ई-निविदेतील लिफाफा क्र.०२ आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

**<u>पुस्तके छपाईकामी आलेल्या मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता-</u>**

| अं.नं. | छपाई तपशिल | लोकमंगल प्रिंट अन्ड पॅक, सोलापूर | निट प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि, मुंबई | सकाळ पेपर्स, कोल्हापूर | संप्रती ऑफसेट प्रिंटर्स, सोलापूर | प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई | टॅको हीजन प्रा.लि., मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित पोथी मराठी -आवत्ती ३५ वी (३०००० नग) | १२५/- | १२०/- | ८४.५० | १४५/- | १४५/- | **<u>८४/-</u>** | १११.५९ |
| ०२ | श्री साई सतचरित्र- इंग्रजी आवत्ती २६ वी (५०००० नग) | ५४/- | **<u>३५/-</u>** | ३५.१० | ५७/- | १२६/- | ४१.३० | ४५.११ |
| ०३ | श्री साई सतचरित्र - तेलगू आवत्ती २७ वी (१००००० नग) | ५९/- | ४७/- | **<u>४४.५०</u>** | ७५.५० | १२५/- | ५४.८५ | ६१.५१ |
| ०४ | श्री साई सतचरित्र तामिळ आवत्ती २१ वी (१००००० नग) | ७४.५० | ५२.८० | **<u>५१.५०</u>** | ८०.७५ | ११९/- | ६२.३५ | ७१.४८ |
| ०५ | श्री सॉईसच्चरित पोथी- हिंदी आवत्ती ३ री (१०००० नग) | ११८/- | १००/- | ९३.४५ | १२५/- | १३८/- | **<u>६५/-</u>** | ११३.६१ |
| ०६ | श्री साईबाबांचे आवतार व कार्य- मराठी आवत्ती- १८ वी (१०००० नग) | १८/- | ०० | **<u>१२.०९</u>** | २१/- | २०.९० | १३.२५ | ०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | श्री साईनाथ सगुणोपासना - मराठी आवत्ती-५४ वी (१००००० नग) | ४.५० | ४.९० | **४.१६** | ६/- | ५.६३ | ५.३० | ०० |
| ०८ | श्री साई सगुणोपासना – तेलगू (पॅकेट-साईज) आरती आवत्ती ०२ वी (५०००० नग) | १२.५० | १०.५० | **१०.२०** | १४.५० | १२.९० | ११.९५ | ०० |
| ०९ | श्री साई स्तवन मंजरी-मराठी आवत्ती ३९ वी (१५०००० नग) | २.५० | २.३० | २.२९ | **२/-** | ३.८५ | २.६० | ०० |
| १० | मुलांचे साईबाबा - मराठी आवृत्ती क्र.१४ वी (७००० नग) | ८.५० | ७/- | **५.९२** | ६/- | ७.३८ | ६.६० | ०० |
| ११ | मुलांचे साईबाबा - इंग्रजी आवृत्ती क्र.१५ वी (२५००० नग) | ९.५० | ७.०० | ५.९१ | ६.५० | **४.२८** | ६.५५ | ०० |
| १२ | मुलांचे साईबाबा - तेलगू आवृत्ती क्र.१६ वी (५०००० नग) | ११.०० | ७.०० | ६.७४ | ५.९० | **५.८८** | ७.२० | ०० |
| १३ | मुलांचे साईबाबा - तामिळ आवृत्ती क्र.९ वी (२०००० नग) | ८.५० | ७.०० | ५.३० | ५.९० | **५.२८** | ६.४० | ०० |
| १४ | मातृसाई – तेलगू आवृत्ती क्र.६ वी (१५००० नग) | ४२/- | ३५/- | **३४.७५** | ७१/- | ४३.५० | ४३.०५ | ०० |
| १५ | खापर्डे डायरी - तामिळ आवृत्ती (१०००० नग) | २२/- | २१/- | १८.२२ | १९.५० | २१.९० | **१७.२०** | ०० |
| १६ | सचित्र साईबाबा आवृत्ती क्र. १२ वी (२०००० नग) | ८.५० | ५.९० | **५.३६** | ५.९५ | ७.६८ | ७.६० | ०० |
| १७ | श्री साईचे सत्यचरित्र – तेलगू आवृत्ती क्र.०६ वी (२०००० नग) | १६३/- | **८३.५०** | ८४/- | १०५/- | १४६/- | ८७.८० | १००.५९ |
| १८ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी - कन्नड आवृत्ती क्र.०६ वी (२५००० नग) | ४.५० | ०० | **२.७१** | ३/- | ३.९५ | ४.१५ | ०० |
| १९ | श्री साईचरित्र - बंगाली आवृत्ती क्र.९ वी (१५००० नग) | ६६.५० | ५२/- | **५१/-** | १००/- | १२५/- | ५९.२० | ६५.८९ |
| २० | श्री साईचरित्र पोथी- तेलगू ओवी टू ओवी आवृत्ती क्र.०८ (२०००० नग) | ११७/- | ९२/- | ९२.१० | १९५/- | १३८/- | **८४/-** | ११२.२९ |
| २१ | श्री साईचरित्र - ओडिया आवृत्ती क्र.०५ वी (१५००० नग) | ५७.५० | ४३/- | **४१.०५** | ९०/- | १०५/- | ४९.१० | ५५.१२ |
| २२ | श्री साई सर्मथचरित्र- इंग्रजी झरीन आवृत्ती क्र.०६ वी (१०००० नग) | १७५/- | ०० | **११४/-** | १६४/- | १३५/- | १२८/- | १५४.०१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी - बंगाली आवृत्ती क्र.२ री (१०००० नग) | ८/- | ०० | **६.१३** | ७/- | १२.४८ | ७.४५ | ०० |
| २४ | श्री साई सतचरित्र- पोथी- मराठी डिलक्स आवृत्ती क्र.०१ (१०००० नग) | ३००/- | २७०/- | २२०/- | ३००/- | २८५/- | **१५८/-** | २२७.०१ |
| २५ | श्री साई सगुणोपासना- बंगाली, आवृत्ती क्र.४ थी (१०००० नग) | ९/- | ०० | ७.४६ | ९/- | १३.४० | **७.३५** | ०० |
| २६ | श्री साईचरित्र – मल्याळम आवृत्ती क्र.०३ (५००० नग) | ६९.५० | ६२/- | **५९.६५** | ९०/- | १४५/- | ७६/- | ७२.३५ |
| २७ | श्री साई सगुणोपासना- हिंदी आवृत्ती क्र.८ वी (५०००० नग) | १०/- | १०/- | **८.५३** | १७/- | १२.४८ | ९.८० | ०० |
| २८ | श्री साई सगुणोपासना- गुजराती आवृत्ती क्र.०३ री (१५००० नग) | १५/- | ९/- | **८.०४** | १५/- | ११.६८ | १२.२० | ०० |
| २९ | श्री साई सगुणोपासना- तामिळ आवृत्ती क्र.९ वी (५०००० नग) | १६/- | ११.८० | **१०.१२** | १६/- | १२.४८ | १९.५० | ०० |
| ३० | श्री साई सगुणोपासना- इंग्रजी आवृत्ती क्र.१८ वी (१०००० नग) | १६/- | १४/- | **१२.४३** | १८/- | १४.८० | १९.२० | ०० |
| ३१ | श्री साई सगुणोपासना- ओडिया आवृत्ती क्र.०३ री (१०००० नग) | ६/- | ६/- | **५.६४** | ६/- | ९.८५ | ५.९५ | ०० |
| ३२ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी- पंजाबी आवृत्ती क्र.०१ (५००० नग) | ४/- | ०० | **३.७७** | ५/- | ६.८० | ६.२० | ०० |

**फोटो छपाईकामी आलेल्या मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | छपाई तपशिल | लोकमंगल प्रिंट अन्ड पॅक, सोलापूर | निट प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि, मुंबई | सकाळ पेपर्स, कोल्हापूर | संप्रती ऑफसेट प्रिंटर्स, सोलापूर | प्रिंटप्लस प्रा.लि., मुंबई | टॅको हीजन प्रा.लि., मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | व्दारकामाईत बसलेले बाबा-१४X२० (५०००० नग) | ४.५० | ०० | ३.७७ | ४/- | **३.४०** | ०० | ३.४७ |
| ०२ | दगडावर बसलेले बाबा २०X२८ (५०००० नग) | ९/- | ०० | ७.४१ | ७.५० | **६.४५** | ०० | ६.५० |
| ०३ | दगडावर बसलेले बाबा थ्रीडी फोट- २.५ X ३.५ (२००००० नग) | ०० | ०० | ५.२५ | ०० | १२.५० | ०० | **३.८७** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर प्राप्त झाले होते.**

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि., मुंबई यांना जास्त छपाईचा कार्यादेश जात असल्यामुळे उपसमितीने त्यांचे प्रतिनिधीबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी त्यांच्या ऑफिसला विचारुन दर कमी करुन देतो, असे सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि., मुंबई यांचेकडून लेखी स्वरुपात अंतीम दर घेण्यात येऊन, अंतीम दरानुसार मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने संबंधीतांना छपाई कामाचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

०६ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयासाठी कॅन्टीन इमारतीमध्ये अॅल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन्स व इतर अनुषंगीक कामांसाठी प्राप्त ई- निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडुन त्यावर निर्णय घेणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :** नि.क्र.६५८ दि.१९/०९/२०१६

**प्रस्तावना:** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे बेडचे संख्येत वाढ करणेकामी कॅन्टीन इमारतीचे तळमजल्यावर रुग्णालयाचे प्रशासकिय कार्यालये स्थलांतरीत करणेकामी अॅल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन्स करणे, आतिल भागास रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी येणारे अंदाजे रु१६.,४१,६५० -/ मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मापन समितीचे वस्थाव्य . ता देणेत आलेली आहेचे सभेत मान्यरोजी २०१६/०९/१९.दि.

सदर मान्यतेनुसार ईते दि २०१६/१०/२५. करुन दिनिविदा सूचना प्रसिध्द-.०२या २०१६/११/ होत्याकालावधीत निविदा मागविणेत आल्या. सदरचे विहित प्राप्त झालेल्या ई ) ०१.निविदेचा लिफाफा क्र- Technical bid) दिलेखाधिकारी यांचे उपस्थित उघडणेत प्रशासकिय अधिकारी व मुख्य रोजी २०१६/११/०८. आला असून, प्राप्त कागदपत्रांचा छननी अहवाल सादर केला त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी *Only two bidder are qualified* असे निर्देशित केले होते दोनच ठेकेदार पात्र होत असलेनेकरीता याकामी फक्त ., याकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा रद्द करून दुस) यांदा-2nd Call) ई निविदा सूचना-वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करून दि अखेर २०१६/१२/२६.ई-निविदा मागविणेत आल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे दुस-यांदा (2nd Call) ई-निविदा सूचना प्रसिध्द केल्यानंतर विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या असुन सदर ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ दि.१७/०२/२०१७ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत उघडणेत आला आहे. सदरहु ई-निविदांचे लिफाफा क्र.०१ ) Technical bid) मध्ये ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **कागदपत्रांचा तपशिल** | | | | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **बयाना रक्कमेचा डी डी.व कोया-निविदेची किंमत** | **मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला** | **सार्वजनिक बांधकाम विभाग/ इतर शासकिय विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र.** | **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे/नाही** | **काळ्या यादीत नाव समाविष्ट नसलेबाबत चे पत्र.** | |
| ०१ | अॅल्युमिना कन्सेप्ट्स, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | -- | जोडले आहे. | जोडले आहे. (ऑन लाईन) | पात्र |
| ०२ | संजय जी गायकवाड, राहाता | जोडले आहे. | जोडले आहे . | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०३ | निखील गुजराथी, कोपरगाव | जोडले आहे. (इ.एम.डी. | -- | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | अपात्र |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु.१६५००/- ऐवजी रु.१६०००/-) | | | | | |
| ०४ | महाजन ब्रदर्स, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०५ | अनिलकुमार कन्स्ट्रक्शन, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०६ | आर. व्ही. कुऱ्हाडे, कुंदेवाडी, सिन्नर, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |

संस्थान रुग्णालयाचे बेडचे संख्येत वाढ करणेकामी कॅन्टीन इमारतीचे तळमजल्यावर रुग्णालयाचे प्रशासकिय कार्यालये स्थलांतरीत करणेकामी करावयाचे कामांसाठी वरीलप्रमाणे पात्र ठेकेदारांच्या ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | राजाराम विठ्ठल कुऱ्हाडे, सिन्नर, नाशिक | १७,२३,७३२.५२ |
| २ | महाजन ब्रदर्स, नाशिक | १६,०८,८१७.०२ |
| ३ | संजय जी. गायकवाड, राहाता | **१४,३६,४४३.७७** |
| ४ | अनिलकुमार कन्स्ट्रक्शन, नाशिक | १६,४१,६५०.०२ |
| ५ | ॲल्युमिना कन्सेप्टस, नाशिक | १५,२६,७३४.५२ |

**श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रशासकीय कार्यालय कॅन्टीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करणेकामी ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन्स व इतर अनुषंगीक कामे करुन घेणेसाठी संजय जी. गायकवाड, राहाता यांचे रु.१४,३६,४४३.७७ मात्र निम्नतम प्राप्त झाले होते. त्यांचेबरोबर उपसमितीने दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी या दरामध्ये आणखी ०.५% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संजय जी. गायकवाड, राहाता यांचे रु.१४,२८,२३५/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच अंतीम दर त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०७ व्दारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक रस्ता (पाथवे) करणेकामी प्राप्त ई- निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडुन त्यावर निर्णय हाणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय: विषयांकीत कामासाठी मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१८६ खालील प्रमाणे झालेला आहे.

" ... यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) तयार करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१२,२९,९००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच, याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यताघेण्यात यावी, असे ठरले."

**मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश.:** C.A. No. 5070 of 2015 In P.I.L. NO. 18 of 2015 dated 31/07/2015 अन्वये परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:** सदरहु कामासाठी खालील तपशिलाप्रमाणे ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

| अ.क्र. | तपशिल | ई-निविदा कालावधी | निविदा अपलोड सादर करणेची मुदत | प्राप्त ई-निविदांची संख्या | पात्र ई निविदा संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्रथम ई-निविदा मागणी (दि.१७/१०/२०१५ रोजीचे टिपणी नुसार) | १७/११/२०१५ ते ३०/११/२०१५ | ३०/११/२०१५ | ०२ | ०० |
| ०२. | व्दितीय ई-निविदा मागणी (दि.२२/०१/२०१६ रोजीचे टिपणी नुसार) | २३/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ | ०५/०३/२०१६ | ०० | ०० |
| ०३. | तृतीय निविदा मागणी (दि.११/०३/२०१६ रोजीचे टिपणी नुसार) | ०६/०४/२०१६ ते १३/०४/२०१६ | १३/०४/२०१६ | ०३ | ०० |
| ०४. | चौथ्यांदा ई-निविदा मागणी (दि.२७/०६/२०१६ रोजीचे टिपणीनुसार) | २२/०७/२०१६ ते २९/०७/२०१६ | २९/०७/२०१६ | ०३ | ०० |
| ०५. | पाचव्यांदा ई-निविदा मागणी (दि.२९/०९/२०१६ रोजीचे टिपणीनुसार) | २५/१०/२०१६ ते ०२/११/२०१६ | ०२/११/२०१६ | ०३ | ०२ |

वरीलप्रमाणे विषयांकीत कामासाठी पाचव्यांदा ई-निविदा मागणीचे वेळी फक्त दोनच ठेकेदार पात्र होत असल्याने प्राप्त झालेल्या ई-निविदा रद्द करून सहाव्यांदा (6th Call) ई-निविदा सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करून दि.२६/१२/२०१६ अखेर ई-निविदा अपलोड करणेची मुदत देणेत येऊन, दि.३०/१२/२०१६ पर्यंत लिफाफा क्र.०१ (Technical Bid) सादर करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या असून, सदर ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ दि.१७/०२/२०१७ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत उघडणेत आला आहे. सदरहू ई–निविदांचे लिफाफा क्र. ०१ (Technical Bid) मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी डी.व को-या निविदेची किंमत | मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला | सार्वजनिक बांधकाम विभाग/ इतर शासकिय विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र. | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे . .नाही/ | काळ्या यादीत नाव समाविष्ट नसले बाबतचे पत्र. | |
| ०१ | ॲल्युमिना कनसेप्ट, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. (ऑन लाईन) | पात्र |
| ०२ | मे. अनिलकुमार कन्स्ट्रक्शन, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ०३. | आर. व्हि. कु-हाडे, कुंदेवाडी | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |

**प्रस्ताव:** तरी द्वारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) करणेकामी वरीलप्रमाणे पात्र ठेकेदारांचा ई) ०२.निविदेचा लिफाफा क्र-Commercial Bid) उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक रस्ता (पाथवे) करणेचे काम विभागांतर्गत करुन घेण्यात यावे. यासाठी आवश्यक त्याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच प्रस्तावित निविदाप्रक्रिया रद्द करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०८ संस्थानचे मौजे निमगाव-कोऱ्हाळे गट नं.१९५ मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंज दुरुस्ती करणे व भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई- निविदांचा वाणिज्यीक लिफाफा उघडून त्यावर निर्णय घेणे.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-** २१ (१) विश्वस्तव्यवस्थेच्या निधी आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल.

(क) अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे."

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :-**

१) मा. त्रीसदस्य समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र. ३०० खालीलप्रमाणे आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीची काम करणेसाठी येणा-या अंदाजे रु.१५,३८,८७०/- मात्रचे खर्चास, संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.*

*तसेच मा. खंडपीठाच्या आदेशास अधीन राहून उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली."*

*१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१६ खालीलप्रमाणे आहे.*

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.१९५ पै.मधील हेलीपॅडजवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंजमधील दुरुस्तीची कामे करणेसाठी विविध पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली."*

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्री साईचे दर्शनासाठी येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी संस्थानचे मौजे निमगांव- कोऱ्हाळे येथील गट नं.१९५ पै. मधे हेलीपॅड तयार करणेत आला आहे. तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू हेलीपॅडचे वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस सूचना दिल्या होत्या .

त्यानुसार संस्थानचे हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाऊंज मधील खालील कामे करणेसाठी प्रस्ताव तयार करणेत आला होता.

०१. वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे
०२. वेटींग लाऊंज करीता ॲल्यु. स्लायडींग खिडक्या बसवणे
०३. अंतर्गत भिंतींना लस्टर पेंट करणे
०४. दरवाज्यांना आतिल व बाहेरील बाजुने लॅमीनेट लावणे
०५. जिप्सम बोर्ड फॉल्स सिलींग करणे.
०६. फ्लोरींग वर PVC मॅटीन टाकणे
०७. खिडक्यांना व्हिनीशिएन ब्लाईंडस् लावणे
०८. थ्रि सिटर सोफे खरेदी करणे
०९. ॲण्टी चेंबर बनविणे कामी एक्झिक्युटीव टेबल व खुर्ची खरेदी करणे.

मा. त्रीसदस्य समितीचे दि.२३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ५०७३/२०१५ दि.०५/०५/२०१५ अन्वये अर्ज सादर करण्यात आला होता. तथापी शासनाने दि.२८/०७/२०१६ रोजीचे आदेशाने संस्थानचा कारभार पहाणेसाठी नव्याने मा. व्यवस्थापन समितीची सदस्याची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे, मा. उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१२ रोजीच्या आदेशाने गठित केलेल्या मा. त्रीसदस्य समितीचा कार्यकाल संपुष्टात आलेला असल्याने नव्याने गठीत झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा, विषय नं. ०२ निर्णय क्र. ५५६ अन्वये मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हिल अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत निर्णय समंत झाला. सदरहू निर्णयानुसार विधी विभाग यांनी त्यांचे जा.क्र. एसएसएस/वशी-विधी/२१५८/२०१६, दि.०८/०९/२०१६ रोजीचे पत्राने सदरहू सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालयातून मागे घेण्यात (Withdraw) आले असल्याचे कळविले आहे.

मौजे निमगांव को-हाळे गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाऊंज दुरुस्ती करणेसाठी जिल्हा दरसुची २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकानुसार

रु.११,२८,१८१/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तसेच वेटींग लाऊंज करीता वरीलप्रमाणे फर्निचर खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,२९,७५२/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार इकडील विभागाचे दि.२९/१०/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेस मान्यता मिळाली. त्यानुसार ई-निविदा सुचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली. दि. ०५/१२/२०१६ पर्यंतच्या ई-निविदा अपलोड करणेच्या मुदतीत फक्त एकच निविदा जमा झाल्याने सदरहु कामी ई-निविदा जमा करणेस दि.१५/१२/२०१६अखेर मुदतवाढ देणेत आली. तसेच टेक्नीकल बिड मधील कागदपत्र संस्थानकडे जमा करणेचे मुदतीत एकुण सहा ठेकेदारांनी ई-निविदा जमा केल्या आहेत. तसेच खालील ठेकेदारांचे तांत्रीक माहितीचे लिफाफे प्राप्त झालेले आहेत.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हेमंत जी. मुथा, राहुरी | १७३७९ | ०७/१२/२०१६ |
| २ | अनिल कुमार कन्सट्रक्शन, नाशिक | १८२४८ | १७/१२/२०१६ |
| ३ | आर. व्हि. कु-हाडे, नाशिक | १८२४७ | १७/१२/२०१६ |
| ४ | रविंद्र साहेबराव शिंदे , कोल्हार बु. | १८२४६ | १७/१२/२०१६ |
| ५ | वामने विजय मच्छिंद्र, माळेवाडी | १८२१५ | १६/१२/२०१६ |
| ६ | अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | तांत्रीक माहितीचा लिफाफा जमा केला नाही. | |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ई- निविदांचा तांत्रीक लिफाफा मा स्थानीक उपसमिती दि.१७/०२/२०१७ रोजीचे सभेत उघडण्यात आला आहे. त्यापैकी खालील ठेकेदार पात्र आहे.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १ | हेमंत जी. मुथा, राहुरी |
| २ | अनिल कुमार कन्सट्रक्शन, नाशिक |
| ३ | आर. व्हि. कु-हाडे, नाशिक |
| ४ | वामने विजय मच्छिंद्र, माळेवाडी |

तरी संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९५ पै. मधील हेलीपॅड जवळील वेटींग लाऊंज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेस व वेटींग लाऊंज मधील दुरुस्तीचे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी उपरोक्त ०४ ठेकेदारांचे वाणिज्यीक लिफाफे उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव-कोऱ्हाळे गट नं.१९५ मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंज दुरुस्ती करणे व भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम विभागांतर्गत करुन घेण्यात यावे. याकामी आवश्यक असलेले साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी.**

**तसेच याठिकाणी संस्थानमध्ये इतरत्र असलेले सोफे ठेवण्यात यावे व प्रस्तावित निविदाप्रक्रिया रद्द करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०९ **श्री साईप्रसादालय येथील बायोगॅस प्लँट व बुंदी किचनचे पत्राशेड परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेले कोटेशनचा वाणिज्यीक लिफाफा उघडून त्यावर निर्णय घेणे.**

**श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, “मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे” अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेत उपरोक्त विषयाबाबत खालील निर्णय समंत करण्यात आलेला आहे:-

१. दि.३०/११/२०१७ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.७७३

“यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील बायोगॅस प्लॅन्ट व बुंदी किचनचे पत्राशेड परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.”

**प्रस्तावना:-** श्री साईप्रसादालयात फुड वेस्टेज समस्या दूर करणेकरीता इमारतीच्या उत्तर बाजूस पाच मे.टन क्षमतेचा बायोगॅस प्लॅण्ट कार्यान्वित करणेत आलेला आहे. सदर प्रकल्पाच्या डायजेस्टर टाकीच्या बाजुने व

इतर ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने चिखल तयार होतो तसेच सदरचा प्रकल्प बघणेकरीता मा. विश्वस्त, शासकीय अधिकारी इतर प्रमुख मान्यवर येत असतात. याकरीता मेकॅनिकल विभागाने उपरोक्त ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत इकडील विभागास कळविले आहे. तसेच प्रसादालयाच्या मागील बाजूस बुंदी पत्राशेड मधे साईभक्तांना दर्शन रांगेत देण्यात येणारी बुंदी तयार करण्यात येते. सदर पत्राशेड समोरील काही भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. याबाबत लाडू व बर्फी प्रसाद निमिर्ती विभागाने त्यांचे दि.०३/०९/२०१६ रोजीचे पत्राने कळविले .

बायोगॅस प्लान्ट भोवती व बुंदी निर्मिती शेड भोवतीचे ३४६ चौ.मी. जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७७३ अन्वये रुपये २,७१,८०८/- मात्रचे खर्चास व याकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्ताव:-** बायोगॅस प्लान्ट भोवती व बुंदी निर्मिती शेड भोवतीचे जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणारा खर्च हा रक्कम रु.३,००,०००/- मात्रपेक्षा कमी असल्याने याकामी ठेकेदारांना पत्र देऊन विहित पध्दतीने कोटेशन मागविणेस तसेच या कामासाठी जास्तीत जास्त स्पर्धात्मक कोटेशन्स प्राप्त व्हावेत याकरीता कोटेशन्स मागणीची सूचना संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस दि.१४/१२/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार इकडील जा.क्र. ५३३३/२०१६ दि.१७/०१/२०१७ रोजीचे कोटेशन पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले होते. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०३/०२/२०१७ अखेर पर्यंतचे कोरी कोटेशन अर्ज विक्रीची अंतीम मूदत ठेवण्यात आली होती. सदरहू मूदतीत ०४ ठेकेदारांनी कोटेशन अर्ज विकत घेतले होते. सिलबंद कोटेशन सादर करणेचे दि.०६/०२/२०१५ अखेरचे मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोटेशन सादर केले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव व गांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | २२२१५ | ०६/०२/२०१५ |
| ०२ | श्री. विजय मच्छिंद्र वमणे, माळेवाडी | २२२१४ | ०६/०२/२०१५ |
| ०३ | श्री. अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | २२२१७ | ०६/०२/२०१५ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशनचा तांत्रीक लिफाफा मा.स्थानीक उपसमिती दि.१७/०२/२०१७ रोजीचे सभेत उघडण्यात आला असून उपरोक्त तिनही ठेकेदार तांत्रीक दृष्ट्या पात्र असल्याने त्यांचा वाणिज्यीक लिफाफा उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील बायोगॅस प्लँट व बुंदी किचनचे पत्राशेड परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम विभागांतर्गत करुन घेण्यात यावे. याकामी आवश्यक असलेले साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच प्रस्तावित निविदाप्रक्रिया रद्द करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१० **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल डिजीटल रुम करिता प्रोजेक्टर व इतर साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत.**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील क्रमांक १७ ( १ ) व १७ (२ ढ ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६रोजीचे सभेत विषय नं. १२, निर्णय क्र.६९९

**प्रास्ताविक–** विषयाकींत कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ रोजीचे सभेत विषय नं. १२, निर्णय क्र.६९९ खालीलप्रमाणे झालेला आहे.

“..... यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरिता नामंकित कंपनीचे प्रोजेक्टर होम स्पिकर सिस्टम व इतर साहित्य विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी जाहिरात प्रसिद्ध करते वेळेस, त्यामध्ये विशिष्ट कंपनीच्या नावाचा समावेश न करता, फक्त तपशिल देण्यात यावा, असे ठरले ”

उपरोक्त खरेदीकामी अंदाजे रु.१,००,०००/-पर्यंतचा खर्च अपेक्षित असल्याने वृत्तपत्रात जाहिरात न देता संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व कोटेशनचा नमुना प्रसिद्ध करुन पुरवठादारांना कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून दरपत्रक मागविणे असल्याने, सदर साहित्य खरेदीकामी दोन वेळा माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. परंतू दि. १०.१२.२०१६ अखेर एकच निवीदा प्राप्त झाल्याने दि.०६.०१.२०१७ रोजीचे मंजूर टिपणीने दि. ०१.०२.२०१७ ते दि. १५.०२.२०१७ अखेरे तिस-यांदा जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली त्यास अनुसरुन मुदतीअंती ४ दरपत्रकांची बंद पाकीटे प्राप्त इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेली आहेत. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोटेशन धारकांचे नांव | आवक नंबर/दिनांक | निवीदा |
|---|---|---|---|
| ०१ | एम.बी. ट्रेडिंग कंपनी, सुभाष रोड, नाशिक रोड | २२५९२ / ११.०२.२०१७ | बंद पाकीट |
| ०२ | दिशा पॉवर कंट्रोल्स, नाशिक | २२५९३ / ११.०२.२०१७ | बंद पाकीट |
| ०३ | कुसुमा एन्टरप्रायजेस, शारंगपुर रोड नाशिक | २२५९४ / ११.०२.२०१७ | बंद पाकीट |
| ०४ | रिद्धी एन्टरप्राजेस, गंजमाळ, नाशिक | २२५९२ / ११.०२.२०१७ | बंद पाकीट |

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता प्रोजेक्टर व इतर साहीत्य खरेदी करणेकामी प्राप्त झालेली दरपत्रकांची बंद पाकीटे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | दरपत्रकामधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | एम.बी. ट्रेडिंग कंपनी, सुभाष रोड, नाशिक रोड | ७४,४००/- |
| २ | दिशा पॉवर कंट्रोल्स, नाशिक | ७८,४००/- |
| ३ | कुसुमा एन्टरप्रायजेस, शारंगपुर रोड नाशिक | ७६,२००/- |
| ४ | रिद्धी एन्टरप्राजेस, गंजमाळ, नाशिक | **७२,३००/-** |

**श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल डिजीटल रुम करिता प्रोजेक्टर खरेदी करणेसाठी प्रसिध्दीस दिलेल्या जाहिरातीमध्ये मॉडेल VPL-DX142 चे दर मागविणेत आलेले होते. परंतु मध्यंतरीच्या कालावधीमध्ये सदरहू मॉडेल बंद होऊन, नवीन मॉडेल VPL-DX240 बाजारामध्ये उपलब्ध झालेले आहे. तसेच दरपत्रकधारकांनी नवीन मॉडेल VPL-DX240 चे दर दरपत्रकामध्ये नमुद केलेले आहेत, अशी माहिती प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल यांनी उपसमिती सभेसमोर दिली व उपसमितीने मॉडेल VPL-DX240 चे दर स्विकारणेत यावे, अशा सुचना दिल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल डिजीटल रुम करिता प्रोजेक्टर खरेदी करणेसाठी व इतर अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकामी रिद्धी एन्टरप्राजेस, गंजमाळ, नाशिक यांचे एकत्रित रु.७२,३००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**११ आटा व बेसन गिरणीचे जाते आऊटसोर्स पध्दतीने टाकणे व नविन जाते फिटींग करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्री साई प्रसादालयात लाडू, बुंदी व चपाती बनविणेकामी आवश्यक बेसन व आटा तयार करणेकामी १८ इंच साईजच्या तीन व १६ इंच साईजच्या तीन अशा एकूण ६ गिरणी कार्यरत आहेत. या गिरणींची गुणवत्ता व आऊटलेट मिळणेकरीता नियमित जात्यांना टाके टाकावे लागतात किंवा नविन जाते फिटींग करावे लागतात. मागील कार्यादेशात या गिरणींना टाके टाकणेसाठी व नविन जाते फिटींग करणेची मुदत दिनांक ३१/०१/२०१७ रोजी संपलेली आहे. फेब्रुवारी २०१५ ते जानेवारी २०१७ या दोन वर्षाच्या कालावधी करीता १८ इंच साईजचे जातेला टाके मारणेकरीता श्री आण्णासाहेब बावके यांना प्रती नग २४०/- व १६ इंच साईजच्या जातेकरीता दिनेश आसाराम गुजर यांना प्रती नग रु. १७९/- याप्रमाणे कायार्देश देण्यात आलेला आहे. फेब्रुवारी २०१५ ते सप्टेंबर २०१६ या १९ महिन्याच्या कालावधीकरीता रक्कम रु १,०१,१७१/- एवढा खर्च आलेला असून प्रति महा सरासरी रक्कम रु. ५३२४/- खर्च झालेला आहे. पुढील दिनांक ०१/०२/२०१७ ते ३१/०१/२०१९ या दोन वर्षाचे कालावधीकरीता जातेला टाके मारणे व नविन जाते फिटींग करणे यासारखी कामे आऊटसोसींग पद्धतीने करणेकरीता स्थानिक जाते टाकणा-या टेक्निशियन यांचेकडून करुन घेणेकामी कोटेशनमागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९३१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार जा.नं. एसएसएस/वशी-मेकॅनिकल/५४५५/२०१७ दिनांक २१ जानेवारी, २०१७ अन्वये ५ जाते टाकणा-या टेक्नीशियन यांना कोटेशन देणेकामी पत्रे पाठविण्यात आली. या पत्रामध्ये कोटेशन संस्थानकडे पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक ०३/०२/२०१७ अशी देण्यात आली होती. या मुदतीत खालील टेक्नीशियन यांनी बंद पाकीटामध्येकोटेशन्स दिलेली आहेत :

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **आवक क्रमांक** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | श्री नितीन सुधाकर पाळंदे, मु.पो. राहाता | २१७०५ | ३०/०१/२०१७ |
| २ | श्री आण्णासाहेब दगडू खैरनार, मु.पो. मढी | २१७२३ | ३१/०१/२०१७ |
| ३ | श्री हरिभाऊ सुर्यभान गमे, मु. केलवड | २२०६२ | ०३/०२/२०१७ |
| ४ | श्री बाळासाहेब बाबुराव ढगे, मु.पो. को-हाळे, | २२०६३ | ०३/०२/२०१७ |
| ५ | श्री आण्णासाहेब सखाराम बावके, मु.पो. साकुरी | २२०६४ | ०३/०२/२०१७ |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे ५ जाते टाकणा-या टेक्नीशियन यांचेकडून कोटेशन्सप्राप्त झालेली आहेत. सदर कोटेशन्स मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे उघडावी लागणार आहेत.

श्री साई प्रसादालयातील आटा व बेसन गिरणीचे दिनांक ०१/०२/२०१७ ते ३१/०१/२०१९ या दोन वर्षाचे कालावधीकरीता जाते टाकणे व नविन जाते फिटींग करणे ही कामे आऊटसोर्स पद्धतीने टेक्नीशियन यांचेकडून करुन घेणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशन धारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | १६ इंच जात्याला टाके मारणे | १८ इंच जात्याला टाके मारणे | नवीन १६ इंच जाते बसविणे | नवीन १८ इंच जाते बसविणे |
|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशनमधील एकत्रित प्रती नग मुळ दर रु. | | | |
| १ | श्री नितीन सुधाकर पाळंदे, मु.पो. राहाता | २२५/- | २५०/- | १५००/- | २०००/- |
| २ | श्री आण्णासाहेब दगडू खैरनार, मु.पो. मढी | **<u>१७५/-</u>** | **<u>२३५/-</u>** | ९७५/- | १३४५/- |
| ३ | श्री हरिभाऊ सुर्यभान गमे, मु. केलवड | २५०/- | ३१०/- | १३००/- | १५००/- |
| ४ | श्री बाळासाहेब बाबुराव ढगे, मु.पो. को-हाळे | २००/- | ३००/- | **<u>९००/-</u>** | **<u>१०००/-</u>** |
| ५ | श्री आण्णासाहेब सखाराम बावके, मु.पो. साकुरी | १९८/- | २४८/- | १०००/- | ११००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आटा व बेसन गिरणीचे जात्यांना आऊटसोर्स पध्दतीने टाके टाकणेकामी श्री आण्णासाहेब दगडू खैरनार, मु.पो. मढी यांचे व नविन जाते बसविणेकामी श्री बाळासाहेब बाबुराव ढगे, मु.पो. को-हाळे यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१२ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** कोटेशन/ ई-निविदाधारकांकडून राष्ट्रीयकृत बँकाचे बयाणा रकमेचे डी.डी. मागविणेत येतात. परंतु बरेचसे कोटेशन/ निविदाधारक खाजगी बँकांचे डी.डी. सादर करतात. खाजगी बँकांचे डी.डी. असल्यामुळे संस्थान नियमानुसार ते अपात्र ठरतात व पुरेशा कोटेशन/ निविदांअभावी फेरजाहिरात प्रसिध्द करणेची आवश्यकता भासते. याकरीता यापुढे खरेदी प्रक्रियेमध्ये राष्ट्रीयकृत बँकांबरोबरच खाजगी बँकाचेही डी.डी. स्विकारणेत यावेत.

(कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **दिनांक ०६.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२५** दिनांक ०६.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी प्राप्त ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा उघडुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज मे.बीव्हीजी इंडिया लि. पुणे यांना दि.२१/०१/२०१३ आदेशान्वये १ वष कालावधीसाठी देण्यात आले होते. सदर कामाची मुदत संपल्याने त्यांना २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखील निविदा प्रक्रिया पुर्ण न झाल्याने दि.२८/०४/२०१४ चे मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने पुर्वीच्या अटी-शर्तीस अधिन राहून आहे त्याच मंजुर दरामध्ये सदर कामास नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. दरम्यानच्या काळात दि.०३/०२/२०१४ ते १५/०२/२०१४ व १५/०५/२०१४ ते ३०/०५/२०१४ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. परंतु दोन्ही ई-निविदे प्रक्रियेत दोनच निविदा प्राप्त झाल्याने फेर निविदा करण्याचे ठरले.

दि.१०/१२/२०१४ रोजीच्या मंजुर टिपणीनुसार श्री साईबाबा हॉस्पिटल करीता वाढीव २२ कर्मचारी व श्री साईनाथ रुग्णालया करीता वाढीव ६ कर्मचारी असे दोन्ही रुग्णालयाकरीता १२५+२८ असे एकुण १५३ कर्मचारी पॉईन्टची मान्यता मिळाली. सदर विषय मा.त्रिसदस्य समितीच्या दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर केला असता "श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या स्वच्छतेचे काम यांत्रीकीकरणासह आऊटसोर्स पध्दतीने देणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद, खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी." असा निर्णय झाला होता. परंतु नव्याने मा.व्यवस्थापन समिती गठीत झाल्याने सदरचा सिव्हील अर्ज मागे घेण्यात आला.

सध्या दोन्ही रुग्णालयाकरीता सन २०१३-१४ करीताचे कंत्राटदारच १२५ कर्मचारी पॉईन्टवर स्वच्छतेकामी आवश्यक असणारे केमीकल्स व आवश्यक साहित्यासह प्रती महिना रक्कम रु.१२,२२,८२०/- (अक्षरी रु. बारा लाख बावीस हजार आठशे वीस मात्र) प्रमाणे काम करत आहे. सदर कंत्राटदारने किमान वेतनात व केमीकल किंमतीत वाढ झाल्याने वाढीव रकमेची मागणी केलेली होती. त्यामुळे नविन निवदा प्रक्रियेसाठी सदर रकमेमध्ये २५ टक्के वाढ ग्राह्य धरल्यास दोन्ही रुग्णालयाचे यांत्रीकीकरणासह स्वच्छते कामी एकुण १५३ कंत्राटी कर्मचारी व आवश्यक साहित्यासह/सामुग्रीसह एक वषासाठीचा ठेका दिल्यास प्रति महिना अंदाजे रक्कम रु.१८,७०,९१४/- पुर्णांकित १९,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. याप्रमाणे (वार्षिक रक्कम रु.२,२८,००,०००/-) अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

दि.१९/०९/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०८ निर्णय क्र.६६५ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करून घेणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,२८,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरकामी अहमदनगर, औरंगाबाद, मुंबई, पुणे व नाशिक या शहरांच्या वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानच्या संकेतस्थळावर ई-निविदाबाबतची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच एकूण २१ पुरवठाधारक यांना फोन व ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. ई-निविदा विक्रीची मुदत दि.१६/१२/२०१६ ते ११/०१/२०१७ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदेच्या हार्ड कॉपी स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१६/०१/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यानुसार ऑनलाईन ०८ निविदा आलेल्या आहेत. परंतु श्री साईबाबा हॉस्पिटकडे प्रत्यक्षात खालील ०९ निविदाधारकांच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.,

| अ.नं | निविदाधारकाचे नावे | प्राप्त ठिकाण व दिनांक |
|---|---|---|
| १ | एम.पी इंटरप्रायसेस अॅन्ड असोसिएटस लि. पुणे | श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०३/०१/२०१७ |
| २ | बी. व्ही.जी इंडिया लि. पुणे | सामान्य प्रशासन विभाग दि.०३/०१/२०१७ |
| ३ | श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई | मुंबई कार्यालय दि.०४/०१/२०१७ |
| ४ | अप-शॉट युटीलीटी सर्व्हीसेस, चेन्नई | श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०५/०१/२०१७ |
| ५ | गोल्डन हॉस्पिटॅलीटी सर्व्हीसेस, मुंबई | मुंबई कार्यालय दि.०५/०१/२०१७ |
| ६ | स्पिक-एन- स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०७/०१/२०१७ |
| ७ | सीएलआर फॅसीलीटी सर्व्हीसेस, पुणे | श्री साईबाबा हॉस्पिटल दि.०७/०१/२०१७ |
| ८ | सिग्मा टेक. सोलुशन इंडिया लि. पुणे | सामान्य प्रशासन विभाग दि.०७/०१/२०१७ |
| ९ | सुमित फॅसीलीटी, पुणे | सामान्य प्रशासन विभाग दि.१०/०१/२०१७ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि.१७/०२/२०१७ रोजी उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. वरील प्राप्त निविदाधारकांपैकी सीएलआर फॅसीलीटी सर्व्हीसेस, पुणे यांची ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेली नाही. त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरवावी लागणार आहे.

साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने करून घेणेकामी पात्र असलेल्या आठ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं | निविदाधारकाचे नाव | **निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | सुमित फॅसीलीटी, पुणे | २,५८,०३,८०७.२४ |
| २ | बी. व्ही.जी इंडिया लि. पुणे | २,२५,८१,४४४/- |
| ३ | श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई | **२,१९,३६,३७२/-** |
| ४ | स्पिक-एन- स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | २,५८,२४,०००/- |
| ५ | एम.पी इंटरप्रायसेस अॅन्ड असोसिएटस लि. पुणे | २,३७,९०,७८०/- |
| ६ | गोल्डन हॉस्पिटॅलीटी सर्व्हीसेस, मुंबई | २,२४,५३,३२३.३६ |
| ७ | सिग्मा टेक. सोलुशन इंडिया लि. पुणे | २,१९,९५,९६४/- |
| ८ | अप-शॉट युटीलीटी सर्व्हीसेस, चेन्नई | २,४५,९०,६२८/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई याचे एकत्रित रु.२,१९,३६,३७२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाकरीता साहित्य खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाने मागणीपत्रकान्वये Instrument ची मागणी केलेली आहे. Neuro O.T. या विभागामध्ये मेंदूच्या वेगवेगळया शस्त्रक्रिया (उदा. मणक्याच्या, मानेच्या, मेंदूच्या इ. शस्त्रक्रिया) करण्यात येत असून दिवसेंदिवस राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे ऑपरेशनची संख्या वाढलेली आहे. मेंदूच्या ऑपरेशनसाठी वेगवेगळया Instrument ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे ८ – ९ वर्षापूर्वी खरेदी केलेले होते व ते वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करताना अडचणी निर्माण होतात, त्यामुळे त्यांनी नवीन Instruments ची मागणी केलेली आहे.

दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.४०३ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता अ व ब प्रस्तावात नमुद केलेले Instrument विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.४,१९,०९६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०१/१०/२०१६ ते दि.२२/१०/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/१०/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण ०५ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत,त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | Austin Health Care, Pune |
| 2 | Maharashtra Surgicals, Thane |
| 3 | South India Surgical Co.Ltd., Chennai |
| 4 | Dolphin Surgicals, Thane |
| 5 | AVM Health Care Products Pvt.Ltd., New Delhi |

वरीलप्रमाणे प्राप्त तांत्रिक ई-निविदा दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त निविदांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या पाच कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | Austin Health Care, Pune | २,३८,४०७/- |
| 2 | Maharashtra Surgicals, Thane | २,५९,९६४.७२ |
| 3 | Dolphin Surgicals, Thane | **२,१४,९५०/-** |
| 4 | South India Surgical Co.Ltd., Chennai | २,७१,३७०/- |
| 5 | AVM Health Care Products Pvt.Ltd., New Delhi | २०,११,६६८/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. विभागाकरीता आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. संबंधीतांनापुरवठा आदेश देणेपुर्वी सदरहू साहित्य वापरणाऱ्या डॉक्टरांचा अभिप्राय घेण्यात यावा व ते साहित्य वापरण्यास योग्य असेल तरच पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असे साहित्य खरेदी करणेकामी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०३ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.1 या विभागाकरीता Instrument खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील CTVS O.T. या विभागाने मागणीपत्रकान्वये Instrument ची मागणी केलेली आहे. श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डियाक ओ.टी. या विभागात दैनंदिन ह्दयाच्या शस्त्रक्रिया होतात. (उदा.A.S.D., V.S.D., बायपास, व्हॉल्व रिप्लेसमेंटचे) सदरचे ऑपरेशन हे ह्दयाशी निगडीत असते. छातीचे दोन भाग करुन सदर ऑपरेशन केले जाते. सदर ऑपरेशनच्या वेळेस Instruments ची अत्यंत आवश्यकता असते.

सदर Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. South India Surgical Co. Ltd., Mumbai यांचेकडून ई-मेलव्दारे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. South India Surgical

Co. Ltd., Mumbai यांचे दरानुसार उपरोक्त Instrument खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४,०८,३७५/- (अक्षरी रुपये - चार लाख आठ हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३९५ अन्वये उपरोक्त Instrument विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.४,०८,३७५/- (अक्षरी रुपये - चार लाख आठ हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र) इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०१/१०/२०१६ ते दि.२२/१०/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/१०/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण ०५ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. तथापि प्रत्यक्षात चार सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | Maharashtra Surgicals, Thane |
| 2 | Dolphin Surgicals, Thane |
| 3 | Austin Health Care, Pune |
| 4 | South India Surgical Co.Ltd., Chennai |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त निविदांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या चार कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 1 | Austin Health Care, Pune | ४,६३,२४५/- |
| 2 | Maharashtra Surgicals, Thane | ६,६४,१३१.८३ |
| 3 | Dolphin Surgicals, Thane | **३,४६,२६०/-** |
| 4 | South India Surgical Co.Ltd., Chennai | ४,३५,९०४/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.1 या विभागाकरीता आवश्यक असलेले Instrument खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. संबंधीतांना पुरवठा आदेश देणेपुर्वी सदरहू साहित्याबाबत या क्षेत्रातील तज्ञांचा अभिप्राय घेण्यात यावा व ते साहित्य वापरण्यास योग्य असेल तरच पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असे साहित्य खरेदी करणेकामी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०४ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.2 या विभागाकरीता Cautery Machine खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि.१०/०३/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती, त्यामुळे ओ.टी. मधील Cautery Machine जळाल्यामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.11/05/2015 (औषध भांडार प्राप्त दि.14/05/2015) चे मागणी पत्रकान्वये 1 नग Cautery Machine ची मागणी केलेली आहे.

सदर Cautery Machine खरेदीकामी M/s. Nirmal Agencies, Ahmednagar यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानूसार सदर Cautery Machine खरेदीकामी अंदाजे रु.५,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. खराब झालेल्या Cautery Machine ची विमा पॉलीसी काढण्यात

आलेली असल्यामुळे सदर Cautery Machine खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमापॉलीसी कडून परत मिळणार आहे.

उपरोक्त ०१ नग Cautery Machine विहित पध्दतीने ई- निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.५,५०,०००/- चे खर्चास दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३९१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील मान्यतेनुसार दैनिक दबंग दुनिया – मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना– औरंगाबाद, संध्यानंद – मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०३ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या आहेत. संस्थानचे शिर्डी कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या असून, मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही, तसेच Upload केलेल्या ३ निविदाधारकांपैकी एका निविदाधारकाची प्रत्यक्षात तांत्रिक निविदा प्राप्त झालेली नाही. Upload केलेल्या ०३ निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | 29/01/2016 |
| 2 | M/s. Austin Healthcare, Pune | 29/01/2016 |
| 3 | M/s. Aditi Enterprises, Nashik | 30/01/2016 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तथापि वरील प्राप्त निविदाधारकांपैकी M/s. Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai यांनी प्रत्यक्षात निविदेची Hard Copy दिलेली नाही, तसेच Online Upload निविदेमध्ये Machine चा Technical Compliance दिलेला नाही. त्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरवावी लागणार आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी दोनच निविदा पात्र ठरतात, तसेच खरेदीकामी कमीतकमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.०९/०६/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे.

त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.०६/०९/२०१६ ते २१/०९/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२४/०९/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती, तर एकुण ०९ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याचा अहवाल ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर दि.२१/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२८/०९/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी एकुण तीन ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या सदरहू ई-निविदा दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | Austin Health Care, Pune | **१,४१,०००/-** |
| 2 | Shreya Enterprises, | ६,७०,०००/- |
| 4 | M/s. Nirmal Agencies, Ahmednagar | ६,२४,७५०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.2 या विभागाकरीता ०१ नग Cautery Machine खरेदीकामी Austin Health Care, Pune यांचे रु.१,४१,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. परंतु निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांमधील निम्नतम दरधारक व इतर**

**यांचे दरांमध्ये खुपच तफावत दिसून येते. याकरीता सदरहूकामी पुरवठा आदेश देणेपुर्वी Austin Health Care, Pune यांचेकडून Cautery Machine चा वापर करणाऱ्या डॉक्टरांसमोर डेमो घेण्यात यावा व डेमो समाधानकारक असल्यासच त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०५ **श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील टी.एस.आर. या विभागाने दि.२८/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०४/०९/२०१४) तीन नग Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. त्यांचेकडे सध्या असलेला Monitor व्यवस्थित काम देत नाही. हॉस्पिटलमधील ॲडमीट (दाखल) असलेल्या रुग्णांच्या शरीरात होणारे बदल उदा. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण, रक्तदाब, ई.सी.जी. इत्यादी बदलाचे नियमित निरीक्षण करणेसाठी सदर Multiparameter Monitor चा वापर होत असतो. सदर बदलानुसार डॉक्टर पेशंटवर योग्य ते उपचार पद्धती ठरवु शकतात. सदरहू Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे एका नगासाठी रक्कम रु.३,००,०००/- याप्रमाणे एकूण ०३ नग Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे रु.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०६/११/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.९७९ अन्वये ०३ नग Multiparameter Monitor विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या एकूण अंदाजे रक्कम रु.९,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार आपला वार्ताहर मुंबई, पुढारी – पुणे, दिव्य मराठी - नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन – अहमदाबाद, हितवाद – नागपूर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०४ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 19/02/2015 |

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे व खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे दि.२७/०३/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.०५/१०/२०१५ ते २४/१०/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/१०/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Critical Care System, Pune | 26/10/2015 |
| 2. | M/s. Austin Health Care, Pune | 26/10/2015 |

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे व खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे दि.२४/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून सदरचे खरेदीकामी दैनिक सामना – औरंगाबाद, गावकरी – नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते दि.०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 08/03/2016 |
| 2 | M/s. Excel Corporation, Nashik | 08/03/2016 |
| 3 | M/s. Shree Enterprises, Nagpur | 08/03/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणा-या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली असून संबंधित निविदाधारकांकडून Demo घेणेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | M/s. Shree Enterprises, Nagpur | **१,८५,०००/-** |
| 2 | M/s. Excel Corporation, Nashik | २,६५,०००/- |
| 4 | M/s. Austin Health Care, Pune | २,१०,२००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाकरीता ०३ नग Multiparameter Monitor खरेदीकामी M/s. Shree Enterprises, Nagpur यांचे रु.१,८५,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. त्यांना पुरवठा आदेश देणेपुर्वी M/s. Shree Enterprises, Nagpur यांचेकडून Multiparameter Monitor चा वापर करणाऱ्या डॉक्टरांसमोर डेमो घेण्यात यावा व डेमो समाधानकारक असल्यासच त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro ICU या विभागाकरीता Syringe Pump खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो आय.सी.यु.या विभागाकरिता आवश्यक असणारे Syringe Pump विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.९,१८,०००/- चे खर्चास दि.२५/०९/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.८७० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात आपला वार्ताहर मुंबई, पुढारी– पुणे, दिव्य मराठी- नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन– अहमदाबाद, हितवाद– नागपूर या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune |
| 2 | M/s. B. Braun Medical (India) Pvt. Ltd., Mumbai |
| 3 | M/s. Vishal Surgical Eq. Co. (P) Ltd., Mumbai |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद ई-निविदा मा. वैद्यकीय संचालक यांचे समोर दि.१२/०५/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात येऊन प्राप्त निविदांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक्र तक्ता तयार करण्यात आला होता. तथापि रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने दि.१९/०९/२०१५ रोजी Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे कळविल्यामुळे सदर Syringe Pump खरेदीकामी दि.२३/१०/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा फेर ई-निविदा मागविण्यास मंजुरी घेऊन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीचा कालावधी दि.२९/०७/२०१७ ते

दि.१६/०८/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होता, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२१/०८/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी चार ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune |
| 2 | M/s. South India Surgical Co.Ltd., Chennai |
| 3 | M/s. Deva Distributors, Shrirampur |
| 4 | M/s. Excel Corporation, Nashik |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक सिलबंद ई-निविदा दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त निविदांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या ०४ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | M/s. Excel Corporation, Nashik | ६,३०,०००/- |
| 2 | M/s. Austin Health Care, Pune | **५,१४,८००/-** |
| 3 | M/s. Deva Distributors, Shrirampur | ९,००,०००/- |
| 4 | M/s. South India Surgical Co.Ltd., Chennai | ६,०४,८००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro ICU या विभागाकरीता Syringe Pump खरेदीकामी M/s. Austin Health Care, Pune यांचे रु.५,१४,८००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. त्यांना पुरवठा आदेश देणेपुर्वी M/s. Austin Health Care, Pune यांचेकडून Syringe Pump चा वापर करणाऱ्या डॉक्टरांसमोर डेमो घेण्यात यावा व डेमो समाधानकारक असल्यासच त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाकरीता नवीन Syringe Pump खरेदी करुन जुने Infusion Pump buyback करणेकामी प्राप्त कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाने दि.२८/०८/२०१४ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०४/०९/२०१४) रोजीचे मागणीपत्रकान्वये ११ नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pump हे अत्यवस्थ रुग्णांना इंजेक्शनची मात्रा (प्रमाण) नियंत्रित करुन देणेकामी उपयोग होतो. सध्या TSR विभागात 3 Syringe Pump असुन ते त्यांना कमी पडत आहेत, कारण तेथे दररोज सरासरी ३६ रुग्ण दाखल असतात व रुग्णांच्या संख्येच्या तुलनेत Syringe Pump ची संख्या कमी पडते त्यामुळे त्यांनी नवीन ११ नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pump खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु.५१,०००/- याप्रमाणे ११ नग Syringe Pump खरेदीकामी अंदाजे एकूण रक्कम रु.५,६१,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच सन २००६ साली नवीन हॉस्पिटलचे मशिनरी/ उपकरणे खरेदी करतेवेळी M/s. Allwin Lifecare, Mumbai यांचेकडून १० नग Infusion Pump खरेदी करण्यात आलेले होते. सदर १० नग Infusion Pump औषध भांडार विभागात सन २००६ पासुन शिल्लक आहेत, त्यापैकी सध्या ०९ पंप Buyback करता येतील.

त्यामुळे सदर Infustion Pump परत करुन (बायबॅक) वरील Syringe Pump खरेदी करता येईल. सदर Infusion Pump बाबत सरकारी लेखापरिक्षण करतेवेळी त्यांना देखील Infusion Pump चा वापर होणार

नसेल तर बायबॅक करावे अशा सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार सदर Infusion Pump बायबॅक करता येतील. सदर ०९ नग Infusion Pump ची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.४६,४९१/- इतकी होते.

दि.२०/११/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.१००९ अन्वये TSR विभागाकरिता ११ नग Syringe Pump विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.५,६१,०००/- चे खर्चास तसेच जुने Infusion Pump buyback करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार पुण्यनगरी, नाशिक आणि डी.एन.ए., मुंबई या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १८ पुरवठाधारक/ अधिकृत विक्रेते यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.१४/०२/२०१५ ते दि.२८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०३/०३/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. B. Braun Medical (India) Pvt. Ltd., Mumbai | 03/03/2015 |

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे व खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदांची आवश्यक असल्यामुळे दि.२५/०४/२०१५ रोजीचे टिपणीन्वये दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.०५/१०/२०१५ ते २४/१०/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/१०/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Austin Health Care, Pune | 26/10/2015 |

उपरोक्तप्रमाणे सदरचे खरेदीकामी दुस-यांदा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे व खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे दि.२४/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून सदरचे खरेदीकामी दैनिक सामना – औरंगाबाद, गावकरी – नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती.

त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते दि.०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1. | M/s. Austin Health Care, Pune |
| 2. | M/s. Shree Enterprises, Nagpur |
| 3. | M/s. South India Surgical Co.Ltd., Chennai |
| 4. | M/s. Excel Corporation, Nashik |
| 5. | M/s. B.Braun Medical (India) Pvt.Ltd., Mumbai |

वरीलप्रमाणे खरेदीकामी दुस-यांदा ई-निविदेस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक निविदा मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित विभागातील वापर करणाऱ्या डॉक्टरांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे.

तथापि उपरोक्त निविदाधारकांपैकी M/s. South India Surgical Co.Ltd., Chennai यांनी निविदेमध्ये Syringe Pump करीता Sino Medical या कंपनीचे China हे मॉडेल भरलेले असून सदर मॉडेलचा Syringe Pump हा चांगल्या दर्जाचा नसल्यामुळे M/s. South India Surgical Co.Ltd., Chennai यांची निविदा विचारात घेता येणार नाही. त्यामुळे सदरचे खरेदीकामी चार निविदा पात्र होत आहेत.

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०४ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | M/s. Shree Enterprises, Nagpur | **३,६३,०००/-** |
| 2 | M/s. Excel Corporation, Nashik | ३,८५,०००/- |
| 3 | M/s. Austin Health Care, Pune | १०,८३,५००/- |
| 4 | M/s. B.Braun Medical (India) Pvt. Ltd., Mumbai | ५,७२,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील TSR या विभागाकरीता नवीन Syringe Pump खरेदी करुन जुने Infusion Pump buyback करणेकामी M/s. Shree Enterprises, Nagpur यांचे रु.३,६३,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. त्यांना पुरवठा आदेश देणेपुर्वी M/s. Shree Enterprises, Nagpur यांचेकडून Syringe Pump चा वापर करणाऱ्या डॉक्टरांसमोर डेमो घेण्यात यावा व डेमो समाधानकारक असल्यासच त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा द्वितीय निम्नतम दरधारकाचा विचार करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

०८ **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU विभागाकरीता A.C.T. Machine खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रूग्णालयातील सी.आर.यु.या विभागात A.C.T.Machine चा कार्डियाक शस्त्रक्रिया झाल्यानंतर रूग्णांना जे रक्त द्यावयाचे असते त्याचे प्रमाण कमी-जास्त करण्यासाठी होतो तसेच रक्त शरीरात गेल्यावर गोठून जाऊ नये व पर्यायाने त्याचा त्रास रूग्णाला होऊ नये म्हणून सदर मशीनचा वापर केला जातो. परंतु सदर विभागात A.C.T. Machine उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन A.C.T. Machine ची मागणी केली आहे.

दि.०६/११/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील सी.आर.यु.या विभागाकरीता ०१ नग A.C.T. Machine विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू. १,८०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती त्यानुसार सदरचे खरेदीकामी तीन वेळेस वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या, परंतु प्रत्येक वेळेस पुरेश्या निविदा प्राप्त न झाल्यामुळे फेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तथापी शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांकस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-३/ उद्योग- ४, दि.३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३- रु.५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात्त आली आहे.

शासनाच्या खरेदीसाठीचे कार्यपध्दतीचे नियमावलीनुसार ०१ नग A.C.T. Machine खरेदीकामी अंदाजे रू.१,८०,०००/- (अक्षरी रू.एक लाख ऐंशी हजार मात्र) इतका अंदाजे खर्च अपेक्षित असल्यामुळे कोटेशन मागवून खरेदी करता येईल. त्यानुसार इकडील पत्र क्र. २१७२ दि.२१/१२/२०१६ अन्वये एकूण १० अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.१९/०१/२०१७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०३ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

**त्याचा तपशील खालीलप्रमाणे**

| Sr. No. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| १ | M/s. Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१३/०१/२०१७ |
| २ | M/s. ERA Lifesciences, New Delhi | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१०/०१ /२०१७ |
| ३ | M/s. Life Diagnostica, New Delhi | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१६/०१/२०१७ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| 1 | M/s. Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | **३,७५,०००/-** |
| 2 | M/s. ERA Lifesciences, New Delhi | ४,५०,०००/- |
| 3 | M/s. Life Diagnostica, New Delhi | ३,७८,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU विभागाकरीता ०१ नग A.C.T. Machine खरेदी करणेकामी रु.३,००,०००/- मात्र पेक्षा जास्त खर्च येणार असल्यामुळे सदरहूकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०९ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.2 मध्ये Epoxy Flooring चे काम करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रूग्णालयातील C.V.T.S. O.T. No.2 मध्ये दि.१०/०४/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लावली होती त्यामुळे ओ.टी. मधील Epoxy Flooring खराब झालेले असल्यामुळे सदर विभागाने मागणीपत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे. दि.१४/०७/२०१५ रोजीचे मा. उपसमिती सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील C.V.T.S. O.T. No.2 मध्ये Epoxy Flooring चे काम करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू. ३५,२६९.००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती त्यानुसार इकडील पत्र क्र.३१७८ दि.२०/०२/२०१६ अन्वये एकूण ०८ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.२७/०२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु ०३ कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. ९२० दि.०८/०८/२०१६ अन्वये एकूण ११ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/०८/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून कोटेशन विहित वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा तिस-यांदा इकडील पत्र क्र. १५११ दि.१४/१०/२०१६ अन्वये एकूण १२ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.२५/१०/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते,तरी देखील कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा चौथ्यांदा इकडील पत्र क्र. २२६३ दि.०३/०१/२०१७ अन्वये एकूण २४ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.२०/०१/२०१७ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०५ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे**:-**

| Sr. no. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| १ | M/s. Sagar Kame, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१८/०१/२०१७ (सामान्य प्रशासन विभाग) |
| २ | M/s Wel-Know Works, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१ /२०१७ |
| ३ | M/s. Wadkar & Company, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१/२०१७ |
| ४ | M/s. Trust me Solution, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१/२०१७ |
| ५ | M/s. Rainbow Enterprises, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१९/०१/२०१७ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०५ सिलबंद कोटेशन्स कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | M/s. Sagar Kame, Pune | ४४,६६९/- |
| २ | M/s Wel-Know Works, Nashik | ३८,२४७/- |
| ३ | M/s. Wadkar & Company, Nashik | ३९,८७७/- |
| ४ | M/s. Trust me Solution, Nashik | २८,२१५/- |
| ५ | M/s. Rainbow Enterprises, Nashik | **२३,५१३/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.2 मध्ये Epoxy Flooring चे काम करुन घेणेसाठी M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचे रु.२३,५१३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१० **श्री साईबाबा रुग्णालयातील FSW विभागाकरीता ECG Machine खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रूग्णालयातील FSW या विभागात २० ते २५ रूग्ण ॲडमिट असतात. त्यांचे ECG करण्यासाठी ECG मशिन ची आवशक्यता असते. सध्या FSW विभागात असलेल्या मशिनची External Body तुटलेली असल्याने त्यांनी नवीन मागणी केली आहे.

दि.१०/१०/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील FSW या विभागाकरीता ०१ नग ECG Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू.१,००,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती त्यानुसार इकडील पत्र क्र.२३३० दि.१३/०१/२०१७ अन्वये एकूण २२ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.०६/०२/२०१७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरून ०४ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

**त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| S.N. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| १ | M/s. Girish Surgicals Works, Mumbai | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.२५/०१/२०१७ |
| २ | M/s. Arihant Enterprises, Ahmednagar | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.२१/०१/२०१७ |
| ३ | M/s. Emco Meditake Pvt.Ltd.,Mumbai | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.२७/०१/२०१७ |
| ४ | M/s. Divine Healthcare, Navi Mumbai | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.०४/०२/२०१७ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | M/s. Girish Surgicals Works, Mumbai | ५५,७००/- (6 channel) |
| | | ४८,७००/- (6 channel) |
| २ | M/s. Arihant Enterprises, Ahmednagar | **३२,०००/-** (3 channel) |
| ३ | M/s. Emco Meditake Pvt.Ltd.,Mumbai | ३३,६००/- (Digital single channel) |
| | | ४२,७३५/- (Digital 3 channel) |
| ४ | M/s. Divine Healthcare, Navi Mumbai | ७३,७७५/- (12 channel) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील FSW विभागाची १२ चॅनेलचे ECG Machine ची खरेदी करावयाची मागणी होती. परंतु फक्त M/s. Divine Healthcare, Navi Mumbai या एकमेव पुरवठाधारकानेच १२ चॅनेल ECG Machine चे दर दिलेले आहेत व नियमानुसार कमीत कमी ०३ पुरवठाधारकांचे दर प्राप्त होणे आवश्यक आहेत, याकरीता सदरहूकामी फेर कोटेशन मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

११ **श्री साईबाबा रुग्णालयातील Embalming Machine खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रूग्णालयातील तसेच दूवरचे अंतरावर राहत असलेल्या रुग्णाचा मृत्यू झाल्यास Embalming Machine द्वारे रुग्णालयात Embalming प्रक्रिया करुन मृतदेह जास्त काळ व्यवस्थीत ठेवता येईल व त्यामुळे दूच्या Death झालेले मृतदेह त्यांचे भागात व्यवस्थित पोहचता येईल.

दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय न. ४६ निर्णय क्र. ५५५ अन्वये इतर राज्यातील असलेल्या साईभक्त रूग्णास साधी रूग्णवाहिका व शव वाहिनी उपलब्ध करून देणेस तसेच मृतदेह जास्त काळ चांगला राहण्यासाठी Embalming Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू.२,८७,७००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती त्यानुसार इकडील पत्र क्र. १५१२

दि.१४/१०/२०१६ अन्वये एकूण १० अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.२५/१०/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु त्यास अनुसरून फक्त ०२ कोटेशन प्राप्त झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. २२६७ दि.०३/०१/२०१७ अन्वये एकूण १० अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.२०/०१/२०१७ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून ०४ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

**त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| **Sr. no.** | **Name of Supplier** | **Received Date** |
|---|---|---|
| १ | M/s. Span Surgical Co., Coimbatore | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१/२०१७ (सामान्य प्रशासन विभाग) |
| २ | M/s. Instrument & Chemicals Pvt. Ltd., Chennai | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१३/०१ /२०१७ (सामान्य प्रशासन विभाग) |
| ३ | M/s. Elite Surgical & Scientific Co, Coimbatore | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१६/०१/२०१७ (सामान्य प्रशासन विभाग) |
| ४ | M/s. R.K. International, Chennai | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१६/०१/२०१७ (सामान्य प्रशासन विभाग) |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नाव** | **कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | M/s. Span Surgical Co., Coimbatore | १,८२,७००/- |
| २ | M/s. Instrument & Chemicals Pvt. Ltd., Chennai | **५५,६५०/-** |
| ३ | M/s. Elite Surgical & Scientific Co, Coimbatore | १,८६,९००/- |
| ४ | M/s. R.K. International, Chennai | १,८९,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ०१ नग Embalming Machine खरेदी करणेकामी M/s. Instrument & Chemicals Pvt. Ltd., Chennai यांचे एकत्रित रु.५५,६५०/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. परंतु त्यांचे मशिन प्लास्टीकचे आहे व प्लास्टीक मशिनला तडा गेल्यास मशिन खराब होऊ शकते, यामुळे स्टेनलेस स्टीलचे Embalming Machine घेण्यात यावे. स्टेनलेस स्टीलचे Embalming मशिन खरेदी करणेकामी द्वितीय निम्नतम दरधारक M/s. Span Surgical Co., Coimbatore यांचे एकत्रित रु.१,८२,७००/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **श्री साईबाबा रुग्णालयातील Dental Material खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

दि.30/11/2016 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीत श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डेंटल या विभागाकरीता डेंटल मटेरियल खरेदीकामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रू.2,37,800/- इतक्या सर्वसमावेशक खर्चास विषय नं. 55 निर्णय क्रं. 809 अन्वये मान्यता मिळाली होती.

| **Sr. No.** | **Treatment Procedure** | **App. Procedure done per year** |
|---|---|---|
| | **Ceramic Work** | |
| 1) | Full ceramic Fuse to Metal Per Unit with Die Cutting & Ditching | 305 |
| 2) | Half Ceramic(Facing) Fuse to Metal / Unit | 10 |

| | | |
|---|---|---|
| 3) | Ceramic Free Metal per Unit | 15 |
| | **Metal Work** | |
| 4) | White Metal with Acrylic Facing per Unit | 5 |
| 5) | White Metal Without Facing / Unit | 100 |
| 6) | J. Gold (Gold Techincal Alloy) Without Acrylic Facing per Unit | 10 |
| | **Acrylic Work** | |
| 7) | Acrylic J. C. Per Unit | 10 |
| 8) | C.D. In Fiber Glass With Normal Teeth Set Upto Polish | 8 |
| 9) | C.D. In Lucitone With Kulzer Teet Set Upto Polish | 5 |
| 10) | C.D. In High Impact (Meleodent, Germany) With Kulzer Teeth Se | 5 |
| 11) | Additional if Required Extra Imprted Teeth Set Will Be Charged | 5 |
| 12) | R.P.D. Upto 3 Teeth | 11 |
| 13) | Additional Per Teeth | 10 |
| 14) | Each Clasp | 5 |
| 15) | More Than 8 Teeth Will be Considered C.D. Charge | 5 |
| 16) | Additional Palatal/ Lingual Bar Each | 10 |
| 17) | Speacial Tray in Shelac Base Plate U/L | 15 |
| 18) | Speacial Tray in Formatry Material U/L | 15 |
| 19) | Record Base in Shelac With Wax Rim U/L | 5 |
| 20) | Obaturator | 5 |
| | **New Aditional Procedure** | |
| 21) | Ceramic Crown by CAD / CAM | |
| | 5 years Warranty | 10 |
| 22) | Impant Prosthesis Per Unit | |
| | PFM | 10 |
| | Metal Free | 5 |
| 23) | Flexible RPD | 5 |
| 24) | Flexible CD | 5 |

त्यानुसार इकडील पत्र क्र. 2342, दि. 21/01/2017 अन्वये एकूण 08 अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि 08/02/2017 अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन 05 कोटेशन प्राप्त झालेले आहे. प्राप्त झालेल्या कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Sahyadri Dental Siramix, Loni | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. 02/02/2017 |
| 2 | M/s.Datta Dental Lab, Ghulewadi | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. 04/02/2017 |
| 3 | M/s.Sai Dental Lab, Loni | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. 04/02/2017 |
| 4 | M/s. Sai Ceramic Dental Lab, Loni | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. 08/02/2017 |
| 5 | M/s.Om Chaitanne Dental Lab, Sangamner | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. 08/02/2017 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | M/s.Sahyadri Dental Siramix, Loni | M/s.Datta Dental Lab, Ghulewadi | M/s.Sai Dental Lab, Loni | M/s. Sai Ceramic Dental Lab, Loni | M/s. New Om Chaitanne Dental Lab, Sangamner |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate per nos. In Rs. | | | | |
| **Ceramic Work** | | | | | | |
| 1 | Full ceramic Fuse to Metal Per Unit with Die Cutting & Ditching (305 Nos.) | **400/-** | 600/- | 550/- | 650/- | **400/-** |
| 2 | Half Ceramic(Facing) Fuse to Metal / Unit (10 Nos.) | **300/-** | 500/- | 400/- | 550/- | 350/- |
| 3 | Ceramic Free Metal per Unit (15 Nos.) | 1500/- | 1800/- | 1600/- | 350/- | **120/-** |
| **Metal Work** | | | | | | |
| 4 | White Metal with Acrylic Facing per Unit (5 Nos.) | 150/- | 180/- | 200/- | 175/- | **110/-** |
| 5 | White Metal Without Facing / Unit (5 Nos.) | **100/-** | 150/- | 160/- | 120/- | **100/-** |
| 6 | J. Gold (Gold Techincal Alloy) Without Acrylic Facing per Unit (10 Nos.) | 200/- | 200/- | 250/- | 200/- | **70/-** |
| **Acrylic Work** | | | | | | |
| 7 | Acrylic J. C. Per Unit (10 Nos.) | 100/- | 175/- | 150/- | 125/- | **40/-** |
| 8 | C.D. In Fiber Glass With Normal Teeth Set Upto Polish (8 Nos.) | **750/-** | 900/- | 1000/- | 2500/- | --- |
| 9 | C.D. In Lucitone With Kulzer Teet Set Upto Polish (5 Nos.) | 1500/- | 1800/- | 1500/- | 3000/- | **750/-** |
| 10 | C.D. In High Impact (Meleodent, Germany) With Kulzer Teeth Se (5 Nos.) | 1500/- | 1700/- | 1500/- | 3500/- | **700/-** |
| 11 | Additional if Required Extra Imprted Teeth Set Will Be Charged (5 Nos.) | **1000/-** | 1100/- | 1200/- | 2000/- | --- |
| 12 | R.P.D. Upto 3 Teeth (11 Nos.) | 300/- | **50/-** | 600/- | 350/- | 150/- |
| 13 | Additional Per Teeth (10 Nos.) | **50/-** | 80/- | **50/-** | **50/-** | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | Each Clasp (5 Nos.) | **25/-** | **25/-** | **25/-** | **20/-** | --- |
| 15 | More Than 8 Teeth Will be Considered C.D. Charge (5 Nos.) | 750/- | 1200/- | 1000/- | 3000/- | --- |
| 16 | Additional Palatal/ Lingual Bar Each (10 Nos.) | **200/-** | 700/- | 500/- | 1000/- | --- |
| 17 | Speacial Tray in Shelac Base Plate U/L (15 Nos.) | 100/- | 200/- | 150/- | 250/- | **75/-** |
| 18 | Speacial Tray in Formatry Material U/L (15 Nos.) | **150/-** | 250/- | 250/- | 350/- | --- |
| 19 | Record Base in Shelac With Wax Rim U/L (5 Nos.) | 150/- | 275/- | 300/- | 300/- | **75/-** |
| 20 | Obaturator (5 Nos.) | **500/-** | 1000/- | 800/- | 1000/- | --- |
| **New Aditional Procedure** | | | | | | |
| 21 | Ceramic Crown by CAD / CAM- 5 years Warranty (10 Nos.) | **2150/-** | 2500/- | 2500/- | 2250/- | --- |
| 22 | Impant Prosthesis Per Unit PFM (10 Nos.) | **600/-** | 1200/- | 1000/- | 1500/- | --- |
| 23 | Metal Free (5 Nos.) | **2000/-** | 3500/- | 3000/- | 3500/- | --- |
| 24 | Flexible RPD (5 Nos.) | **1500/-** | 1600/- | 1800/- | 2000/- | --- |
| 25 | Flexible CD (5 Nos.) | **3000/-** | 3500/- | 4000/- | 6000/- | --- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील दंत विभागासाठी Dental Material खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा परंतु ज्या साहित्यांसाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठाधारकांचे समान निम्नतम दर आलेले असतील असे साहित्य खरेदी करणेकामी विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच अ.नं.८ व अ.नं.१७ चे साहित्य एकमेकांशी सलग्न असल्यामुळे सदरहू दोन्ही साहित्य अ.नं.८ चे निम्नतम दरधारक M/s. Sahyadri Dental Siramix, Loni यांचेकडून खरेदी करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ओ.टी. तील कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेले ओ.टी. ड्रेस कापड खरेदी करणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समिती दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेत नि.क्र.७२५ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.४८,८७,९१६/-चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलबंद ई-निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली होती त्यानुसार विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. समक्ष नमुने पाहिल्यानंतर ज्या लिननचा दर्जा चांगल्या प्रकारचा

आहे व त्यांचे दरही L-1 प्रमाणे आहे ते लिनन स्विकारण्यास व ज्या लिननचे दर L-1प्रमाणे आहे परंतु त्यांचा दर्जा चांगल्या प्रतीचा नसल्यामुळे सदर लिनन L-2 किंवा L-3 पुरवठाधारकांकडुन स्विकारावे किंवा कसे असा प्रस्ताव ठेवला होता सदर प्रस्तावावर तत्कालीन मा.मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी कापडाचा दर्जा प्रयोगशाळा ठरवत असते व फक्त L-1 चेच दर स्विकारण्यात यावे असा अभिप्राय दिला त्यामुळे सदर खरेदीकामी ज्या पुरवठाधारकांचे दर निम्नत्तम आहे अश्या एकुण सात पुरवठाधारकांना रु.१९,१५,३९२.२५ इतक्या रकमेचे पुरवठा आदेश देण्यात आले होते व त्यांचा मालही प्राप्त झालेला होता. माल प्राप्त झाल्यानंतर सदर पुरवठाधारकांचे प्राप्त कापडाचे नमुने शासनमान्य प्रयोगशाळा मे. टेक्सटाईल कमिटी,मुंबई यांना टेस्टिंगकरीता पाठविण्यात आले होते प्राप्त अहवालानुसार इतर पुरवठाधारकांचे नमुने मागणीप्रमाणे होते त्यापैकी मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर यांचे प्राप्त अहवालानुसार त्यांचे कापड पॉलिस्टर+व्हिसकॉस होते.

निविदेत नमुद केलेले कापड कॉटन+टेरीकॉट असे होते परंतु मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर यांनी दिलेले कापड निविदेतील वर्णनाप्रमाणे नाही असे प्रयोगशाळेत सिध्द झाले आहे त्यामुळे त्यांचेकडुन मटेरीयल न घेता त्यांना काळ्या यादीत टाकावे असे निर्देश होते त्याप्रमाणे मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर हे त्यांचे मटेरीयल परत घेऊन गेले आहेत व मा.उपसमिती सभा दि.२/२/२०१६ नि.क्र.५२ अन्वये त्यांना काळया यादीत टाकले आहे.

परंतु दोन्ही रुग्णालयाची एकत्रीत खरेदी असुन व सर्व ओ.टीमध्ये कपडयाकरीता दैनंदिन अडचण येत असल्यामुळे सदर लिनन खरेदी करणे आवश्यक होते तसेच मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२०/११/२०१४ नि.क्र.१००१ अन्वये शासनाच्या दरकरारावर उपलब्ध खरेदी करणेविषयी आदेश आहेत.

त्यामुळे मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर यांना रु.७४०७६९.७५/-इतक्या रकमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता त्याच रकमेच्या सरासरीत शासनाच्या दरका महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामडंळमुंबई यांचेकडुन कापड खरेदीकरीता चौकशी केली असता त्यांचेकडुन कापडाचा नमुना मागविला होता. सदर नमुना शासनमान्य कापड तपासणी लॅब मे.सुपरीटेंड्स कंपनी ऑफ इंडिया(प्रा.)लिमीटेड यांचेकडे तपासणीकरीता इकडील पत्र क्र.१०८१ दि.१५/०७/२०१५ अन्वये पाठविण्यात आला होता. सदर कापडामध्ये ६७ टक्के पॉलिस्टर व ३३ टक्के कॉटनचे प्रमाण आहे त्यामुळे ड्रेसकरीता लागणारे एकुण १०३०० मी.कापड व त्याकरीता लागणारा खर्च रु.६,४८,९००/- खर्चाचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२७/१०/२०१५ रोजी ठेवण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२७/१०/२०१५ नि.क्र.४०३ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांना लागणारे ओ.टी.तील ड्रेसकरीता कापड मे.महाराष्ट्र राज्य पॉवरलुम्स यंत्रमाग महामंडळ मर्या.मुंबई या एकाच ठराविक कंपनीकडून खरेदी करणे ऐवजी याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी तसेच कापड प्राप्त झाल्यानंतर शिलाईकामी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार सदर कापड खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन दि.१५/०२/२०१६ ते०८/०३/२०१६ अखेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यास अनुसरुन एकुण०८ सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झाल्या होत्या.

सदरच्या सर्व तांत्रिक बंद निविदा मा.व्यवस्थापन सभा दि.१८/०३/२०१६ रोजी खरेदी समिती समक्ष उघडण्यात आल्या असुन L-1 पुरवठाधारक मे.आशा क्लॉथ,नाशिक व L-2 पुरवठाधारक मे.श्री लक्ष्मी चव्हाण एजन्सी,सटाणा तसेच मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांनी ईनिविदे प्रक्रीयेमध्ये भाग घेतलेला असल्याने शासन निर्णयाप्रमाणे एकुण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ च्या दराने राखीव ठेवण्यात यावी त्यामुळे त्यांचे कापडाचे नमुने अशाप्रकारे तीनही पुरवठाधारकांचे प्राप्त कापडाचे नमुने हे शासनमान्य कापड तपासणी प्रयोगशाळा मे.टेक्सटाईल कमिटी,मुंबई यांचेकडे

तपासणीकरीता पाठविण्यात यावे असे मा.व्यवस्थापन सभा दि.१८/०३/२०१६ रोजी ठरले त्याप्रमाणे तीनही पुरवठाधारकांचे नमुने हे मे.टेक्सटाईल कमिटी,मुंबई यांचेकडे इपत्र क्र.८८४ दि.३०/०७/२०१६ रोजी तपासणीकरीता पाठविण्यात आले होते व दि.०४/१०/२०१६ रोजी सदर मे.टेक्सटाईल कमिटी,मुंबई नमुन्याचा अहवाल ताब्यात मिळाला असुन सदर अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | आवश्यक कापड | पुरवठाधारकांचे नाव | आवश्यक पोत | मे.टेक्सटाईल कमीटी यांचा प्राप्त अहवाल |
|---|---|---|---|---|
| १ | स्काय ब्ल्यु ४७५६मी. | मे.आशा क्लॉथ, नाशिक | ६७ % पॉलिस्टर ३३ % कॉटन | व्हिसकॉस१७.५+पॉलिस्टर ८२.५ टक्के |
| | | मे.लक्ष्मीचव्हाण एजन्सी, सटाणा | | व्हिसकॉस१५.७+पॉलिस्टर ८४.३ टक्के |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई | | **कॉटन २८.२ + पॉलिस्टर ७१.२ टक्के** |
| २ | नेव्ही ब्ल्यु ३९४४ मी. | मे.आशा क्लॉथ, नाशिक | ६७ % पॉलिस्टर ३३ % कॉटन | व्हिसकॉस१६.६+पॉलिस्टर ८३.४ टक्के |
| | | मे.लक्ष्मीचव्हाण एजन्सी,सटाणा | | पॉलिस्टर १०० टक्के |
| | | मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई | | **कॉटन २८.२ +पॉलिस्टर ७१.२ टक्के** |
| ३ | मरुन १६०० मी. | मे.आशा क्लॉथ, नाशिक | ६७ % पॉलिस्टर ३३ % कॉटन | व्हिसकॉस१६.३+पॉलिस्टर ८३.७ टक्के |
| | | मे.लक्ष्मीचव्हाण एजन्सी,सटाणा | | पॉलिस्टर १०० टक्के |
| | | मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई | | **कॉटन २८.२ +पॉलिस्टर ७१.२ टक्के** |

तसेच पुरवठाधारकांचे ई-निविदेतील दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | तपशील | आवश्यक कापड | पुरवठाधारकाचे नाव | दर प्रती मी. |
|---|---|---|---|---|
| १ | स्काय ब्ल्यु- ६७ % पॉलिस्टर ३३% कॉटन | ४७५६ मी. | L-1 मे.आशा,नाशिक | ४५.०० |
| | | | L-2 श्री लक्ष्मी चव्हाण एजन्सी,सटाणा | ५३.०० |
| | | | L-3 मे.आर.के.कलेक्शन,नाशिक | ५८.०० |
| | | | L-4 मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती,दिल्ली | ६३.८० |
| | | | L-5 मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे | ६५.०० |
| | | | L-6 मे.क्रिटीकल केअर सिस्टीम,पुणे | ६६.०० |
| | | | **L-7 मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लि. मुंबई** | **७३.१०** |
| | | | L-8 मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिक | ९७.२० |
| २ | नेव्ही ब्ल्यु-६७ % पॉलिस्टर ३३% कॉटन | ३९४४ मी. | L-1 मे.आशा, नाशिक | ४५.०० |
| | | | L-2 श्री लक्ष्मी चव्हाण एजन्सी,सटाणा | ५६.०० |
| | | | L-3 मे.आर.के.कलेक्शन,नाशिक | ५८.०० |
| | | | L-4 मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती,दिल्ली | ६३.८० |
| | | | L-5 मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे | ६५.०० |
| | | | L-6 मे.क्रिटीकल केअर सिस्टीम,पुणे | ६६.०० |
| | | | **L-7 मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लि. मुंबई** | **८३.७०** |
| | | | L-8 मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिक | ९७.२० |
| ३ | मरुन-६७ % पॉलिस्टर ३३ % कॉटन | १६०० मी. | L-1 मे.आशा,नाशिक | ४५.०० |
| | | | L-2 श्री लक्ष्मी चव्हाण एजन्सी,सटाणा | ५७.०० |
| | | | L-3 मे.आर.के.कलेक्शन,नाशिक | ५८.०० |
| | | | L-4 मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती,दिल्ली | ६३.८० |
| | | | L-5 मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे | ६५.०० |
| | | | L-6 मे.क्रिटीकल केअर सिस्टीम,पुणे | ६८.०० |
| | | | **L-7 मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लि. मुंबई** | **८३.७०** |
| | | | L-8 मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिक | ९७.२० |

उपरोक्तप्रमाणे L-1 मे.आशा क्लॉथ, नाशिक व L-2 मे. लक्ष्मीचव्हाण एजन्सी, सटाणा व मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम प्रा.लि., मुंबई यांचे कापड तपासणीसाठी पाठविला असता L-1 व L-2 यांचा तपासणी अहवाल आपल्या मागणीप्रमाणे नाही व मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम प्रा.लि.,मुंबई यांचे कापड तपासणी अहवाल जवळपास आपल्या मागणीप्रमाणे असल्यामुळे तसेच शासनाचे अंगीकृत व्यवसाय अंतर्गत नमुद असलेली महामंडळे/ उपक्रमांनी त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंसाठी निविदेत सहभाग घेतल्यास त्यांच्यासाठी एकुण खरेदीच्या ३०

टक्के खरेदी एल-१ दराने राखीव ठेवण्यात यावी असा नियम असल्यामुळे व दोन्ही रुग्णालयाला सदर कापडाची अत्यंत गरज असल्यामुळे उर्वरीत पुरवठाधारकांचे कापडाचे नमुने हे तपासणीसाठी पाठविण्यात यावे किंवा मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम प्रा.लि., मुंबई यांनाच पुरवठा आदेश दयावा किंवा कसे याबाबत योग्य निर्णय होणेकामी दि.१५/१०/२०१६ अन्वये प्रस्ताव ठेवला असता सदर प्रस्तावावर तत्कालीन मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५.१५ व परिच्छेद ५.१२ नुसार कारागृह व हातमाग महामंडळ यांचेकडुन थेट खरेदी करता येते त्याबाबत पत्रव्यवहार करावा असे वाटते. महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कॉर्पोरेशन लि.मुंबई यांचे दर तक्त्यात ७ नंबर असुन त्यांचे दरही तुलनात्मकदृष्ट्या जादा आहेत त्यामुळे १०० टक्के पुरवठा आदेश त्यांना देणे उचित होणार नाही. असे निर्देश केले होते. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता तातडीने मच्छरदाणी खरेदी करणेकरीता दि.२४/०९/२०१६ टिपणीअन्वये रु.२५०००/- मात्रचे खर्चास मान्यत मिळाली होती त्यानुसार पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागविणेकामी पत्र तयार केले होते, सदर पत्रावर तत्कालीन मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी प्रथम कारागृह विभागाकडे उपलब्ध आहेत काय? ते तपासावे असे निर्देश केले होते त्यानुसार मध्यवर्ती कारागृह,येरवडा यांना इकडील पत्र क्र.२०९९ दि.०९/१२/२०१६ अन्वये त्यांचेकडे उपरोक्तप्रमाणे कापड व रुग्णालयाकरीता खरेदी करावयाच्या असलेल्या मच्छरदाणी उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत पत्रव्यवहार केला असता त्यांचे दि.३०/१२/२०१६ अन्वये त्यांचेकडे कापड व मच्छरदाणी उपलब्ध नाही उपलब्ध झाल्यास आपले कार्यालयास स्वतंत्र पत्राने कळविण्यात येईल असे कळविले आहे.

त्यामुळे मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादीत यांनाच दर कमी करणेबाबत विनंती केली असता त्यांनी दि.२७/०१/२०१७ चे मेलद्वारे खालीलप्रमाणे दर कमी करुन पाठवित आहोत असे कळविले आहे.

| अ.क्र. | कापडाचे विवरण | कापडाची रुंदी इंचात व से.मी मध्ये | निविदेत दिलेले दर | दर प्रमी मी. |
|---|---|---|---|---|
| १ | स्काय ब्ल्यु/नेव्ही ब्ल्यु/मरुन कलर टेरीकॉट कापड ६७% पॉलिस्टर+३३% कॉटन | ३५ इंच (८९ से.मी.) | ७३.१० | ६३.०० |
| २ | स्काय ब्ल्यु/नेव्ही ब्ल्यु/मरुन कलर टेरीकॉट कापड ६७%पॉलिस्टर+३३% कॉटन | ५८ इंच (१४८ से.मी.) | ८३.७० | ९१.५० |

मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित,मुंबई यांनी दि३०/०१/२०१७ चे दरपत्रकाद्वारे मच्छरदाणीचे २ नग नमुना म्हणुन दिले आहेत.सदर मच्छरदाणीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | प्रकार | साईज इंचात | दर प्रती नग |
|---|---|---|---|
| १ | डायमंड | ३६ इंचX८० इंच | ३१५.०० |
| २ | सिलव्हर | ३६ इंचX८० इंच | २३५.०० |

उपरोक्तप्रमाणे मच्छरदाणीचे नमुने मा.वैद्यकीय संचालक यांना दि.०४/०२/२०१७ रोजी समक्ष दाखविले असता त्यापैकी सिल्व्हर मच्छरदाणीचा नमुना मान्य केला आहे, त्यामुळे रु.२५०००/-च्या खर्चापोटी (रु.२३५X१०६ नग=रु.२४९१०/-) एकुण १०६ नग मच्छरदाणी खरेदी करता येतील.

**विभागाचा अभिप्राय-** निविदे प्रक्रियेमध्ये भाग घेतलेले L-1,L-2 चे शासन मान्य कापड तपासणीचे प्राप्त अहवालानुसार सदर कापड आपल्या मागणीप्रमाणे नाही परंतु मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादीत यांचे कापड तपासणी अहवाल जवळपास आपल्या मागणीप्रमाणे असल्यामुळे, तसेच त्यांनी अ.नं.१, नुसार ३५ इंच (८९ से.मी.) रु.६३/- प्रती मीटर दराप्रमाणे कापड देऊ केलेले आहे, तसेच दोन्ही हॉस्पिटलमध्ये कापडाचा व मच्छरदाणीचा तुटवडा भासत असल्यामुळे खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादीत यांना पुरवठा दयावा, असे मत आहे.

तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ओ.टी. तील कर्मचाऱ्यांना आवश्यक असणाऱ्या ओ.टी. ड्रेससाठीचे कापड व मच्छरदानी खरेदी करणेसाठी निम्नतम व द्वितीय निम्नतम दरधारककाकडील कापडाचा नमुना आपले मागणीप्रमाणे नसल्यामुळे सदरहू कापड प्रस्तावात नमुद केलेल्या दराप्रमाणे मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादीत यांचेकडून खरेदी करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१४ **श्री साईनाथ रुग्णालयातील General O.T. या विभागासाठी जुने Washing Machine परत (Buyback) करुन नवीन Washing Machine खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२) ण**

**प्रास्ताविक**:- श्री साईनाथ रुग्णालयातील General OT या विभागाने Washing Machine-Capacity- 11 Kg, Semi Auotomatic- ०२ नगांची मागणीपत्रकान्वये मागणी केली आहे.

सदर विभागामध्ये सध्या असलेले Washing Machine हे सन २०११ मध्ये रक्कम रू.२८,९९०/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून सदर मशिनची External Body तुटलेली असल्याने त्यांनी नवीन Washing Machine ची मागणी केली आहे. तसेच जुन्या मशिनची ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रक्कम रु.५०००/- इतकी येते.

दि. १२/१२/२०१६ रोजी एकुण ३४ पुरवठा धारकांना अंदाजे रक्कमेसाठी ई-मेल व्दारे कोटेशन देणेबाबत कळविले होते त्यास अनुसरून एकुण ०३ कोटेशन प्राप्त झाले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे**:-**

| Sr.No. | Supplier Name | Qty. | Estimate cost ( per unit) | Total Amt. in. Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Attharava Health Tech India Pvt.Ltd., Mumbai | 2 | 78494.00 | 156988.00 |
| 2 | M/s. Jeevan Radio House, Shrirampur | 2 | 36500.00 | 73000.00 |
| 3 | M/s. Mahalaxmi Traders, Shrirampur | 2 | 16500.00 | 33000.00 |
| | | | Avarage Amt.In Rs. | 87663.00 |
| | | | Less 20 % | 70130.13 |

उपरोक्त ०२ नग Washing Machine खरेदीकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांचे अंदाजे खर्चासाठी दरपत्रकाची सरासरी रक्कम रू.७०,१३०.१३ (अक्षरी रू. सत्तर हजार एकशे तीस मात्र) इतकी येते.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील General O.T. या विभागाने मागणीपत्रकान्वये मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

३) जुन्या Washing Machine ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु. रु.५०००/- इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- श्री साईनाथ रुग्णालयातील General OT या विभागाने 15Kg Semi Auotomatic Washing Machine ०२ नगाची मागणीपत्रकान्वये मागणी केली आहे. सदर विभागामध्ये सध्या असलेल्या मशिनची External Body तुटलेली असल्याने त्यांनी नवीन Washing Machine ची मागणी केली आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.५०००/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही. त्यामुळे त्यांच्या मागणीनुसार विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन०२ नग नविन Washing Machine खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील General OT या विभागातील जुने ०१ नग Washing Machine परत (buyback) करून नविन ०२ नग Washing Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७०,१३०.१३ (अक्षरी रू. सत्तर हजार एकशे तीस मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील General OT या विभागातील जुने ०१ नग Washing Machine परत (buyback) करून नविन ०२ नग Washing Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७०,१३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०४** **दिनांक ०९.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२२६** दिनांक ०९.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०५** **सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज सध्या मा. व्यवस्थापन मंडळ पहात आहे. अधिनियमातील कलम १७ अन्वये मा.व्य. मंडळाची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे:

“(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील.

वरील तरतुदीवये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यातील जमा-खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

I. **जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अं. क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१६-१७ | अंदाजपत्रक २०१७-१८ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूण % | % (टक्के) |
| १ | प्रारंभीची शिल्लक | १०,०५,००,००० | १३,०६,५०,००० | ०.८६ | ३० |
| २ | देणगीव्दारे मिळणारी अपेक्षित जमा | ३५८,४०,३०,००० | ४२८,६५,२०,००० | २८.१४ | २० |
| ३ | अपेक्षित महसुली जमा | २०१,९७,५०,००० | २१०,३८,२५,००० | १३.८१ | ४ |
| ४ | **एकूण जमा (२+३) :-** | **५६०,३७,८०,०००** | **६३९,०३,४५,०००** | **४१.९६** | **१४** |
| ५ | अपेक्षित निर्गतवणूक | १५२,६९,५१,२०० | ८७०,९१,५९,१९६ | ५७.१८ | ४७० |
| | **एकूण अपेक्षित जमा (२+४+५):-** | **७२३,१२,३१,२००** | **१५२३,०१,५४,१९६** | **१००** | **१११** |

II. **खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अं. क्र. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१६-१७ | अंदाजपत्रक २०१७-१८ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूण % | % (टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | २३१,१६,६०,००० | ९४७,८३,१५,१२४ | ६२.२३ | ३१०.०२ |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १४२,२२,३१,००० | ११३,४३,६७,८७२ | ७.४५ | -२०.२४ |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ४,७०,९७,१०० | ४,७१,२८,००० | ०.३१ | ०.०६ |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | २६५,२३,९०,००० | ३५९,७०,५२,२०० | २३.६२ | ३५.६२ |
| ५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ६८,७३,३३,१०० | ८५,१७,१९,००० | ५.५९ | २३.९२ |
| ६ | **एकूण खर्च (१ ते ५) :-** | **७०२,०७,११,२००** | **१५१०,८५,८२,१९६** | **९९.२०** | **११२.१८** |
| ७ | अंतिम शिल्लक | ११,०५,२०,००० | १२,१५,७२,००० | ०.८० | १० |
| | **एकूण अपेक्षित खर्च (६ ते ७) :-** | **७२३,१२,३१,२००** | **१५२३,०१,५४,१९६** | **१००** | **११०.६२** |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२(२) मधील तरतुदींनुसनर,"व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासननाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्थापन निधितून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधित जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल."

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधितून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१७-१८ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधितून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहून करता येईल.

सन २००४-०५ ते २००९-१० या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधिमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले होते. त्यास शासन निर्णय क्र. सनसंवि-२००९/ ५४७/ (५७/०९)- का.सोळा दिनांक- २१ ऑगस्ट,२०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधिमध्ये वर्ग करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात प्रायोजीत बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार झालेला खर्च हा तरतुदीपेक्षा कमी आहे. सन २०१६-१७ व २०१७-१८ या आथिर्क वर्षासाठी व्यवस्थापन निधितून अपेक्षित खर्च झाल्यास,वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागांमार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न रुपये १०९१ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील पाच वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

तथापि चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५ % खर्च व अखर्चित उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रम प्राप्त होईल, अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट "अ" व "ब" म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रक व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक यास रुग्णालय विभागासह मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकाचे अवलोकन करणेत येऊन, त्यामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्त्या करणेत आल्या.**

**सुधारित अंदाजपत्रकामध्ये समाधी शताब्दी वर्षाच्या निमित्ताने करावयाच्या विकास कामांसाठी, त्याचबरोबर कॅन्सर हॉस्पिटल व मेडीकल कॉलेज उभारणीकामी निधीची तरतूद करावी. निळवंडे धरणातून पाईपलाईनद्वारे पाणी आणण्यासाठी रु.६० कोटी मात्र, दुरध्वनी यंत्रणा बदलणे व विस्तारीकरणासाठी रु.५० लक्ष मात्र निधीची तरतूद करावी, नवीन सीसीटीव्ही प्रकल्पासाठी तरतूद केलेल्या रु.५० कोटी मात्र रकमेमधून सीसीटीव्ही व सिक्युरिटी प्रकल्प वेगवेगळे दर्शवावे, दोन चाकी**

**व चार चाकी वाहनांच्या पुजेसाठीचे शुल्क अनुक्रमे रु.५००/- व रु.१०००/- मात्र करावे, विद्युत विभागाकरीता इंधन व वंगन खर्चासाठी रु.५०,००,०००/- मात्र व लाईट फिटींग, रिवायरींग केबल व इतर खर्चाकरीता रु.१,५०,००,०००/- मात्र रक्कम दर्शवावी, ४ लाख नग थ्रीडी टेबल फोटो एकाच वेळी न छापता, १ लाख नगांची छपाई करावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये वाढ करणेत यावी. मोफत प्रसादभोजन योजनेसाठी देणगीचा लक्षांक रु.१० कोटी मात्र करावा. दर्शनरांगेतील साईभक्तांना १०० ग्रॅम बुंदीप्रसाद ऐवजी ५० ग्रॅम बुंदीप्रसाद पाकिटाचे वाटप करण्यात येत आहे, त्यामुळे मागील वर्षाच्या खर्चाच्या ६०% याप्रमाणे तरतूद करणेत यावी. संस्थानचे विविध प्रकल्पासाठी जमीन खरेदी करणेकरीता रु.३५० कोटी मात्र रकमेची तरतूद करण्यात यावी. तसेच शैक्षणिक संकुलाकडील सर्व शाळांना अनुदान मिळणेकरीता शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**उपरोक्त सर्व दुरुस्त्यांसह संस्थान व रुग्णालय या विभागांचेसन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०६** **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावून तपासणी करुन मुल्यांकन करणेकामी नेमणेत आलेल्या मुल्यांकनकारांना(Gold-Silver Valuer) मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांचे समाधी दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो भक्त दररोज येत असतात, हीच भक्तांची संख्या सलग सुट्टयांचे कालावधीत लाखोंच्या घरात जाते. शिर्डी येथे येणा-या या हजारो भक्तांपैकी बहुतांशी भक्त श्री साईचे चरणी रोख रक्कम, सोने-चांदी व इतर मौल्यवान वस्तू देणगी रुपाने अर्पण करीत असतात. या देणगी रुपाने प्राप्त होणा-या सोने-चांदी व मौल्यवान वस्तूंची कस लावून तपासणी करुन, त्याचे बाजारभावाने मुल्यांकन केलेनंतर विहित पध्दतीने नोंदी घेऊन, सदरच्या वस्तू लेखाशाखेकडे जमा करणेत येत असतात. सध्या अशा प्रकारच्या सोने-चांदी वस्तू कापडी पिशवीत सिलबंद करुन लेखाशाखेकडील स्ट्रॉंगरुममध्ये ठेवणेत येतात.

दानपेटीव्दारे तसेच देणगी रुपाने समक्ष प्राप्त होणारे सोने-चांदीच्या वस्तूंचा कस लावून तपासणी करणे व त्याचे बाजारभावाने मुल्यांकन करणेकामी खाली नमूद केलेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, सध्या ०३ मुल्यांकनकारांची (सराफांची) नेमणूक करणेत आलेली आहे.

(०१) मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१४ / निर्णय क्रमांक ९२३.

(०२) मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०२ एप्रिल, २०१६ / निर्णय क्रमांक २४०.

| अ.नं. | मुल्यांकनकाराचे (सराफाचे) नाव व पत्ता | मानधन | नेमणूकीची मुदतवाढ/ अंतिम मुदत | पुढील कालावधीकरीता संमती आहे किंवा कसे? |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ज्वेलर्स, संगमनेर (श्री. सुधीर वडनेरे) | रुपये १५१/- प्रति माह | दि. ३१ मार्च, २०१७ | संमतीपत्र आले आहे. |
| ०२ | श्री लक्ष्मी अलंकार, शिर्डी (श्री.बाळासाहेब नागरे) | रुपये १५१/- प्रति माह | दि. ३१ मार्च, २०१७ | संमतीपत्र आले आहे. |
| ०३ | श्री गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी | रुपये ३०००/- प्रति माह | दि. ३१ मार्च, २०१७ | संमतीपत्र आले आहे. |

उपरोक्त मुल्यांकनकारांची (सराफांची) नेमणूक सन २०१४ मध्ये, विहित पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, सुरुवातीस सन २०१५-१६ या कालावधीकरीता नेमणूक करणेत आलेली होती. त्यानंतर, त्यांचे नेमणुकीस सन २०१६-१७ साठी म्हणजेच, दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर ०१ वर्षाचे कालावधीसाठी आहे त्याच अटी-शर्तीवर व मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली आहे. उपरोक्त सर्व मुल्यांकनकार स्थानिक असल्याने, त्यांचे नेमणूकीचे कालावधीतील सेवा समाधानकारक आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात उपरोक्त सर्व मुल्यांकनकारांना एकत्रित वार्षिक मानधन रुपये ३७,९६३/- मात्र आदा करणेत आलेले आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता, रुपये ३९,६२४/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**(ब)** वर परिच्छेद अ मध्ये नमूद केलेप्रमाणे, उपरोक्त अ.नं. ०१ ते ०३ मध्ये नमूद केलेले ०३ ही मुल्यांकनकारांची (सराफांची) सेवा समाधानकारक असल्याने, पुढील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ०१ एप्रिल, २०१७ ते दिनांक ३१ मार्च, २०१८ या कालावधीकरीता आहे त्याच अटी-शर्तीवर व मानधनावर मुदतवाढ देणेस व याकामी येणारे अंदाजित वार्षिक खर्च रुपये ३९,६२४/- मात्रपर्यन्तचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार उपरोक्त तक्त्यामधील अनं.१ ते ३ या मुल्यांकनकारांची (सराफांची) सेवा समाधानकारक असल्यामुळे पुढील सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी त्यांना आहे त्याच अटी, शर्तीवर व मानधनावर मुदतवाढ देणेस व त्याकामी येणाऱ्या रु.३९,६२४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०७** **दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळास आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक मदत देणे.**

**प्रस्ताव–** दीनदयाळ ही एक मान्यताप्राप्त पंजीकृत सामाजीक संस्था असून १९९७ पासून अत्यंत अविकसीत अशा पारधी समाजाच्या विकासाकरिता आणि आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या परिवाराकरिता तसेच कृषीक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाकरिता कार्यरत आहे. पोशिंद्याच्या आत्महत्या हा कलंक पुसण्याच्या दिशेने संस्थेने २००६ साली शेतकरी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून कामास सुरवात केली आहे आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे पालकत्व स्विकारून त्यांना कुटूंब आधार योजनेच्या माध्यमातून सुरू करून दिलेल्या व्यवसायामुळे आता हे परिवार अत्यंत प्रतिष्ठापूर्वक स्वावलंबी जीवन जगत आहे. यामध्ये शेळीपालन, किरणादुकान आटाचक्की, मुलामुलींच्या शिक्षणाची व्यवस्था इ. अंर्तभूत आहेत तसेच येणा-या काळात आत्महत्या होवू नये, शेतकरी बांधवामध्ये जगण्याची नवी उमेद निर्माण व्हावी या करिता शेतक-यांसाठी शाश्वत शेतीचे प्रयोग करीत आहे यामध्ये मातीपरिक्षण, कमीखर्चीक शेती, सेंद्रीय पद्धतीने शेती इ. विषय संस्था हाताळीत असून त्याचे उत्तम परिणाम सुद्धा मिळत आहेत. कृषी क्षेत्रातील एकूण समस्येंवर प्रभावी उकल शोधण्याकरिता 'कृषी संशोधन केंद्र' या प्रकल्पाचे लोकार्पण दि. ८ ऑक्टोंबर २०१६ रोजी रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री मा डा. मोहनजी भागवत यांच्या हस्ते झाले आहे.

आगामी काळात कूटूंब आधार योजनच्या माध्यमातून ६०० परिवारांना विविध व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टया सक्षम स्वावलंबाकडे वाटचालीस मदत करण्याची संस्थेची योजना असून या प्रकल्पास एकूण रु. ६,३२,५०,०००/- इतका खर्च आहे. संस्था कूठल्याही प्रकल्पाकरिता शासकीय अनुदान घेत नाही. या पवित्र कार्यास सहकार्य करावे अशी विनंती केली असून प्रकल्प खर्चाची विगतवारी खालीलप्रमाणे दिलेले आहे:-

| Sr No. | Activity | Unit cost@ | No of Units | Investment required |
|---|---|---|---|---|
| 1 | Goat Unit (8) | 70,000 | 200 | 1,40,00,000 |
| 2 | Dairy Animals | 70,000 | 150 | 1,05,00,000 |
| 3 | Small Busicness | 70,000 | 100 | 70,00,000 |
| 4 | Tailoring Shop | 30,000 | 50 | 15,00,000 |
| 5 | Flour Mill | 80,000 | 50 | 40,00,000 |
| 6 | Foof Processing Unit including Start of Working Capital | 50,000 | 50 | 25,00,000 |
| A | Total for Livelyhood activities | | 600 | 3,95,00,000 |
| B | Assistancefor Education of Children, average per family. | 20,000 | 600 | 1,20,00,000 |
| C | Assistance for Medical Exp. Of Family (on an average five member per family) | 7500 | 600 | 45,00,000 |
| D | Training Hanfholding assistance to women entrepreneurs | 2500 | 600 | 15,00,000 |
| E | Project Implementation Cost | 10% of the project cost | 0 | 57,50,000 |
| | | | **Total Assistance required** | **6,32,50,000/-** |

उपरोक्त बाबींसाठी खर्च करणेसाठी स्वतंत्र प्रस्ताव मागवावे व त्यावर नियंत्रणाची कार्यपद्धती याबाबत प्रस्ताव मागविणे आवश्यक आहे.

**<u>अर्थ साहाय्य साठी संस्थान अधिनियमातील तरतुद-</u>**

**१)** *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.*

**२)** *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन*

*राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.*

*कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल (एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.*

**विभागाचा अभिप्रायः-**

**अ.** दररोज शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

**आ.** सन २०१७-१८ मध्ये आयोजित श्री साईबाबा महासमाधी शताब्दीच्या पुर्वतयारीकरिता एकत्रित कृती आराखडा तयार करण्यात येत असून, त्यासाठी संस्थानला ३०००/- कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे, या अनुषंगाने संस्थानकडे सध्या उपलब्ध असणा-या निधीचा आढावा घेऊन सदर प्रयोजनाकरिता संस्थानने नियोजन करावे असे महाराष्ट्र शासनाचे पत्र प्राप्त झाले आहे.

मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतूने अनुदान द्यावयाचे असल्यास मा. व्यवस्थापन समितीसमोर विषय ठेवता येईल व त्यानंतर छाननी समितीचे मान्यता घेऊन सदर प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेस्तव सादर करता येईल तरी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ ही संस्था आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे पालकत्व स्विकारून त्यांना आधार देत आहे, त्यामुळे मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतूने छाननी समितीच्या मान्यतेने दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस तुर्तास रु.१ कोटी मात्र रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात यावी व सदरहू रक्कमेचा विनियोग ते कशा प्रकारे करणार याबाबतचा त्यांचेकडून अहवाल घेण्यात यावा.**

**तसेच सदरहू अनुदान त्यांना देणेपुर्वीछाननी समितीच्या पुर्वपरवानगीने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०८** **जिल्हा रुग्णालय, चंद्रपूरया आरोग्य संस्थेकरीता एम.आर.आय. मशिन देणे.**

**प्रस्ताव –** चंद्रपूर जिल्हयात १५ तालुके आहेत यामध्ये कोपरना, राजूरा, गोंडपिंपरी हे अदिवासी क्षेत्र आहे. याशिवाय जिल्हयात मोठया प्रमाणावर औद्योगीक क्षेत्र, थर्मल पॉवर स्टेशन, सिमेंट उद्योग, स्टील उद्योग, पेपर मिल, कोळसा खाणी व इतर कारखाने आहेत. चंद्रपूर जिल्हयास तेलंगणा राज्याची सिमा तसेच यवतमाळ व अदिवासी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हाची सिमा लागुन असल्यामुळे सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे मोठया प्रमाणात आंतरबाहय रुग्णांची संख्या जास्त आहे.

सद्यस्थितीत सामान्य रुग्णालय येथे रुग्णांकरिता एमआरआय मशीन उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होते. जनतेला आरोग्य सेवा सुविधा अत्यंत प्रभावीपणे मिळणेसाठी रु. १५ कोटी ६० लक्ष किंमतीचे खर्च अपेक्षित असलेबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांनी कळविले असून एमआरआय मशीन साठी श्री साईबाबा संस्थान मार्फत उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे.

**अर्थ साहाय्य साठी अधिनियमातील तरतुद-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२) (ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन

राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

**विभागाचा अभिप्राय:- अ)** राज्यातील जिल्हा रुग्णालयांना सिटी स्कॅन व एक्स रे मशीन खरेदी करणेकामी गत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०६.२०१५ चे सभेत निर्णय क्र.१७९ अन्वये आरोग्य विभागाच्या शासकीय/ निमशासकीय रुग्णालयांना रु.४३.६४ कोटी निधी देणेबाबत निर्णय झालेला आहे परंतु सदर बाब न्यायप्रविष्ट झालेने प्रलंबीत आहे.

**ब)** सन २०१७-१८ मध्ये आयोजित श्री साईबाबा महासमाधी शताब्दीच्या पुर्वतयारीकरिता एकत्रित कृती आराखडा तयार करण्यात येत असून, त्यासाठी संस्थानला ३०००/- कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे, या अनुषंगाने संस्थानकडे सध्या उपलब्ध असणा-या निधीचा आढावा घेऊन सदर प्रयोजनाकरिता संस्थानने नियोजन करावे असे महाराष्ट्र शासनाचे पत्र प्राप्त झाले आहे.

तरीही मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतूने अनुदान द्यावयाचे असल्यास मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३०** **जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांना देणगी स्वरुपात एम.आर.आय. मशिन दिल्यास इतरही जिल्हे अशा प्रकारची मागणी करतील, असे कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चंद्रपुर हा आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असल्याने जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे मोठया संख्येने आंतरबाहय रुग्ण असतात. जिल्हा शल्यचिकित्सक,चंद्रपुर यांनी १ नग एम.आर.आय.मशिन उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे. मात्र एम.आर.आय.मशिन उपलब्ध करुन न देता, मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतुने जिल्हा रुग्णालय,चंद्रपुर यांना १ नग एम.आर.आय.मशिन खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे. सध्या संस्थानचे रुग्णालय विभागाची ई-निविदा प्रक्रियेव्दारे पात्र न्युनतम दरधारकाचे दरानुसार येणारी रक्कम अनुदान म्हणून देण्यात यावी. मात्र तत्पुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०९** **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नागरी तीर्थक्षेत्राचा सुनियोजित रस्ताविकास प्रकल्पासाठी मंदिर ट्रस्टचा १०% व शिर्डी नगरपंचायतीच्या कर्जाचा १५% हिस्सा एकूण २५% रक्कम अनुदान म्हणून देणेबाबत फेरसादर.**

**प्रस्ताव–** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे जा.नं.न.पं.बांध/ टे.०८/ ५१८/ २०१४, दि.१५.०२.२०१४ चे पत्रान्वये नगरपंचायत शिर्डी यांनी "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नागरी तिर्थक्षेत्राचा सुनियोजित विकास करणेकामी" रस्ता विकास प्रकल्प या कार्यालयाकडून महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडे रू.२५.२५ कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये शासन अनुदान ७०% व इतर ३०% असे विगतवारी करून पैकी स्था. स्व. संस्था ५%, कर्ज हिस्सा १५% व मंदीर ट्रस्ट १०% असे नमूद करून एकूण २७ रस्त्यांच्या रु. २५.२५ कोटी च्या मंदीर ट्रस्ट व कर्ज हिस्सा एकूण २५% रू. ६.३१ कोटी संस्थानमार्फत मंजूरी मिळणेबाबत विनंती केली आहे.

**संस्थानतर्फे अनुदान देणेबाबात अधिनियमातील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

**मा.त्रिसदस्यीय समितीचा निर्णय–** मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०५.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४३५, "प्रस्तावित कामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी," असे, ठरले.

**मा.खंडपीठाचा आदेश:-** मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद सिव्हील ॲप्लीकेशन नं.५०६५/ २०१५, दि.१७ जुलै २०१५ मध्ये (4) अन्वये शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी नगरपंचायतीचा १५% कर्जाचा हिस्सा रू.३,७८,७५,०००/- व मंदीर ट्रस्टचा १०% हिस्सा रू.२,५२,५०,०००/- अशी एकूण दोन्ही हिस्याची २५ % रक्कम रु.६,३१,२५,०००/- अनुदान म्हणून देणेस, मान्यता दिलेली आहे.

**अ) विधी व न्याय विभाग निर्णयानुसार २७ रस्त्यांकरिता खालीलप्रमाणे वित्तीय आकृतीबंध मंजूर आहे.**

शासन निर्णय क्र.सासंवि-१०१५/५६०/प्र.क्र.१२४/का.१६, दि.१२ एप्रिल २०१६

(अ)

| हिस्सा विभागणी | वित्तीय प्रबंधातील हिस्सा | अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| मंदीर ट्रस्ट | १०% | रु. २,५२,५०,०००/- |
| कर्ज | १५% | रु. ३,७८,७५,०००/- |
| एकूण | २५% | ६,३१,२५,०००/- |

उपरोक्त मंजूर आकृतीबंधातील कर्जहिस्सा रु.३,७८,७५,०००/- व मंदीर ट्रस्टचा हिस्सा रु.२,५२,५०,०००/- असा एकूण रु.६,३१,२५,०००/- देणेबाबत निर्णय झाला. परंतु याबाबत नगरविकास विभागाचाही मंजूर आकृतीबंध खालीलप्रमाणे

**नगरविकास विभागाने मंजूरी दिलेले रस्ते-** शासन निर्णय क्र.नगरो- २०१४/ प्र.क्र.१२५/ नावि-३३ मुंबई दि.१६ जुलै २०१४

१) कनकुरी रस्ता (साईपालखी रोड), २) बिरेगांव रोड ते नवीन पिंपळवाडी रोड ३) बिरेगांव रोड ते चौफुली ते बिरेगांव मंदीर४) शिर्डी बन रोड ते बिरोबा मंदीर चौफुली ५) पिंपळवाडी रोड ते चौफुली रोड ६) शिर्डी निमगांव/ निघोज शिव रोड ७) पिंपळवाडी रोड ते साकुरी शिव नाला रोड ८) शिर्डी साकुरी शिव रोड- पुर्व बाजू ९) शिर्डी साकुरी शिव रोड- पश्चिम बाजू १०) नांदुर्खी ते साकुरी शीव रोड ११) शिर्डी नाला रोड (balance length ch 0/300 to/0/600m) १२) शिर्डी नाला रोड (balance length ch 0/600 to/1/100m) १३) शिर्डी पिंपळवाडी रोड ते नगरपंचायत हद्द १४) स्वागत कक्ष ते नगरपंचायत हद्द १५) साईलिला ते पुखराज लोढा वस्ती १६) श्री साईसंस्थान ते नवीन प्रसादालय १७) बिरेगाव चौफुली ते पिंपळवाडी आणि रूई शीव रोड, १८) नगर मनमाड रोड ते पानमळा रोड १९) शिर्डी बिरेगाव साकुरी- राहाता शीव रोड २०) शिर्डी बिरेगांव साकुरी- राहाता शीव रोड २१) शिर्डी रूई पिंपळवाडी शिव रोड २२) साईद्वारकानगर ते बिरेगांव शिर्डी शीव २३) हॉटेल गोराडीया आपोजिट रोड, २४) शिर्डी पिंपळवाडी मेन रोड २५) शिर्डी बन रोड ते नविन पिंपळवाडी रोड.

यामध्ये शिर्डी नगरपंचायतीच्या प्रस्तावात नमूद केलेल्या एकूण २७ रस्त्यापैकी अ.न. १६ पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता व अ.न. १९ शिर्डी पिंपळवाडी रस्ता ते एस.टी.पी. रोड यांना मंजूरी दिलेली नाही. उपरोक्त १ ते २५ रस्त्यांना नगरविकास विभागाने नावासह मंजुरी दिलेली आहे.

**ब) नगर विकास विभाग निर्णय २५ रस्त्यांकरिता खालीलप्रमाणे वित्तीय आकृतीबंध मंजूर आहे**

| अनु क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव व वर्ग | योजनेची किंमत | अनुज्ञेय अनुदान | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग |
|---|---|---|---|---|
| १. | शिर्डी क वर्ग नगरपंचायत | रु. २१.०३ कोटी | रु.१६.८२४ कोटी (८०%) | रु. ४.२०६ कोटी (२०%) |

महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभाग व नगरविकास विभाग यांच्या दोन्ही निर्णयामध्ये तफावत आहे याबाबत व नगर विकास विभागाचे निर्णया प्रमाणे कार्यवाही करणेबाबत परवानगी मागितली असता, महाराष्ट्र शासनाचे क्र. सासंवि -१०१५/५६०/प्र. क्र. १२४/का.१६ इकडील कार्यालयास प्राप्त झाले त्यात त्यांनी संस्थानने उपस्थित केलेल्या मुद्दयांसदर्भात असे कळविले आहे की, सदर रस्ते विकास प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायतीला नगर विकास विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे निधी द्यावा अथवा विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे निधी द्यावा. याबाबत व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीमध्ये उचित निर्णय घेणे आवश्यक आहे. यास्तव प्राप्त वस्तुस्थितीमध्ये निदर्शनास आलेली विसंगती व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास आणून याबाबत व्यवस्थापन समितीच्या बैठकीत निर्णय घेणे उचित राहील असे कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय-**

१) संस्थानचे बांधकाम विभागाने शिर्डी नगरपंचायतीस या रस्त्यांचा समावेश शताब्दी प्रारुप आराखडयात या रस्त्यांचा समावेश आहे काय याबाबत विचारणा केली असता शिर्डी नगरपंचायतीचे जा. क्र. नप/टि. क्र. ८/५८७/२०१७ दि. ०९.०३.२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यात २५ रस्त्यांचा श्री साईबाबा समाधी शताब्दी प्रारूप आराखडयात समावेश नसलेबाबत अहवाल प्राप्त झाला आहे.

२) संस्थानचे बांधकाम विभागाने शिर्डी नगरपंचायतीकडून मागितलेल्यामाहितीनुसार शिर्डी नगरपंचायतीने प्रस्तावित केलेल्या २५ रस्त्यापैकी ०६ रस्ते महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजने अंतर्गतचे प्रस्तावात विद्यमान रुंदीनुसार विकसीत करणे व शताब्दी प्रारूप कृती आराखडयात शिर्डी विकास योजनेच्या रुंदीनुसार भूसंपादन करुन रुंदीकरण करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता नगरपंचायतीचे कार्य हे नगर विकास विभाग यांचे अंतर्गत चालत असल्याने विधी व न्याय विभाग यांचे रु.६,३१,२५,०००/- ऐवजी नगर विकास विभागाचे २५ रस्त्यांसाठी रु.४.२०६ कोटी देणेचे कार्यवाहीसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र. २३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत नागरी तीर्थक्षेत्राचा सुनियोजित रस्ताविकास प्रकल्पासाठी, शिर्डी नगरपंचायतीस रु.४.२०६ कोटी मात्र रक्कम अनुदान स्वरुपात देणेस तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१०** **साईनिर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल इमारत सिनियर कॉलेजासाठी भाडेतत्वावर घेणेबाबत श्री.विजय तुळशीराम कोते, चेअरमन, श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डी यांचा दि.१७/०१/२०१७ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव –** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्त व्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना–** श्री.विजय तुळशिराम कोते,चेअरमन श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१७/०१/२०१७ रोजीचे अर्जान्वये त्यांचे साईनिर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल हे,नांदूर्खी रोड (एअरपोर्ट रोड) शिर्डी या ठिकाणी आहे. स्कूलची इमारत स्वत:ची असून त्यावरील बांधकाम साधारणत: १५००० स्क्वे.फूट इतके असून त्या ठिकाणी सुमारे ४५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शिर्डीतील मुलामुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते व त्यासाठी त्यांचा फार मोठा वेळ वाया जातो. श्री साईबाबा संस्थानच्या माध्यमातून याच ठिकाणी सिनियर कॉलेज झाले तर विद्यार्थी विद्यार्थिनींची फार मोठी गैरसोय दूर होईल. त्याकामी अर्जदार हे त्यांच्या स्कूलची सुमारे १५००० स्क्वे.फूट बांधकाम असलेली इमारत व परिसर श्री साईबाबा संस्थानला शासकीय दराने भाडेतत्वावर देणेस तयार आहेत. तरी विद्यार्थी/विद्यार्थीनींचे होणारे नुकसान टाळणेसाठी सदर इमारत भाडेतत्वावर घेणेस विनंती, असेबाबत अर्जात नमूद केलेले आहे.

अर्जासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता

१) साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल,शिर्डी हे श्री साई निर्माण प्रतिष्ठाण,रुई,ता.राहाता या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमार्फत चालविले जात असल्याचे दिसून येते. सदरची विश्वस्तव्यवस्था ही मा.सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचेकडील नोंदणी क्रं.महाराष्ट्र/१७/२००९/ अहमदनगर दि.२३/०१/२००९ अन्वये नोंदणीकृत झालेली आहे.

२) उक्त शाळेस मा.शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,अहमदनगर यांचेकडील जा.क्रं.कार्या-४/ बांध/ ३८०/१६ दि.२३/०५/२०१६ अन्वये शासन निर्णय दि.२६/०५/२०१५ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरीता/ विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करणेकरीता काही अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.तसेच जा.क्रं.कार्या-४/ स्वयंअ/३८१/२०१६ दि.२३/०५/२०१६ अन्वये दि.१५/०३/२०१४ पासून दि.१४/०६/२०१७ पर्यंत ३ वर्षांच्या कालावधीसाठी १ ली ते ५ वी करीता श्री साई निर्माण प्रतिष्ठाण,रुई,ता.राहाता,जि.अहमदनगर संस्था संचलित श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल,शिर्डी,ता.राहाता,जि.अहमदनगर या इंग्रजी शाळेस अटी व शर्तीवर मान्यता देण्यात आलेली आहे. त्यातील अट क्रं.१० मध्ये शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ ६८६०७ चौ., एकूण बांधकाम क्षेत्रफळ ३५००० चौ., खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ ३३६०७ चौ., वर्ग खोल्यांची संख्या १३ वगैरेबाबत नमूद केलेले आहे. त्यात सदर क्षेत्राच्या सर्वे नंबरचा अथवा भूमापन क्रमांकाचा उल्लेख केलेला आढळून येत नाही.

३) श्री साई निर्माण प्रतिष्ठाण संस्था, रुई यांनी उक्त शाळेसाठी मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१३३/१० क्षेत्र ०.१९ आर व सर्वे नं.१३३/९ क्षेत्र ०.२१ आर असे एकूण क्षेत्र ०.४० आर क्षेत्रात बांधकाम केलेली शाळा व मोकळी जमीन ही श्री.तुळशीराम बाजीराव कोते,रा.शिर्डी यांचेकडून ३० वर्षे मुदतीकरीता भाडेपट्टा कराराने म्हणजेच दि.१५/०३/२०१३ ते दि.१५/०३/२०४३ या कालावधीसाठी भाडेपट्टयाने घेतली असल्याचे दि.१५/०३/२०१३ रोजीच्या भाडेपट्टा रोखा लीजवरुन दिसून येते. त्यात अट क्रं.६ मध्ये सदरची मिळकत लिहून घेणार ट्रस्ट यांनी ट्रस्टसाठी या जागेचा वापर करावयाचा आहे तसेच सदरची जागा लिहून घेणार यांना इतर कोणासही पोट भाडेकरु म्हणून देणेचा हक्क अथवा अधिकार राहणार नाही,असे नमूद केलेले असून अट क्रं.९

मध्ये भाडेपट्टा ३० वर्षांची मुदत संपलयाशिवाय लिहून देणार यांना सदरची मिळकत खाली करुन मागण्याचा अधिकार राहणार नाही,असे नमूद केलेले आहे.

४) अर्जासोबतच्या शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील नमुना नं.४३ आकारणीस पात्र असलेल्या इमारती आणि जमीनी यांची आकारणी सूची सन २०१३-१४ चे अवलोकन केले असता रकाना २ मध्ये अकृषिक सर्वे नं.१३३/८ असे नमूद असून रकाना ४ मध्ये मालमत्तेचे वर्णन यात क्षेत्र १३४.४७ चौमी चोहोबाजूने पत्राशेड असे नमूद आहे. रकाना ५ मध्ये श्री.तुळशीराम बाजीराव कोते यांचे नाव नमूद असून रकाना ६ मध्ये भोगवटादाराचे नाव श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल, श्रीकृष्णनगर, शिर्डी असे नमूद आहे.

तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील आदेश क्रं.नपं/ बांध/ गुंठेवारी/ कावि/ ११/९८/२०११ दि.२९/११/२०१२ शिर्डी येथील १३३/८ पैकी मधील भूखंड क्रं.१ नियमित करणेबाबतच्या आदेशाच्या प्रतीचे अवलोकन केले असता सर्वे नं.१३३/८ पैकी क्षेत्र ३३४ चौमी व बांधकाम १०६.१७ चौमी हे महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमानुसार रहिवास उपयोगासाठी अकृषिक म्हणून नियमित केलेले आहे व जा.क्रं.नपं/ बांध/कावि११/२१७४/२०१३ दि. /०४/२०१३ अन्वये शिर्डी येथील सर्वे नं.१३३/८ पैकी मधील जागेवर रहिवास प्रयोजनासाठी बांधकाम वापरास मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे. त्यातील अट क्रं.२७ मध्ये प्रस्तावित बांधकामास रहिवास वापर अनुज्ञेय राहील. या व्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी वापर केलेस सदरची परवानगी रद्द करण्यात येईल,असे नमूद केलेले आहे.

५) अर्जदार यांनी अर्जात सदरचे स्कूल कोणत्या सर्वे नंबरमध्ये आहे,याबाबत खुलासा केलेला नाही. मात्र अर्जासोबत सर्वे नं.१३३/८ चा ७/१२ उतारा प्रत जोडलेला असून त्याचे क्षेत्र ०.६३ आर व खराबा ०.०१ आर असे असून कब्जेदार सदरी श्री.तुळशीराम बाजीराव कोते यांचे नाव नमूद असून इतर हक्कात गुंठेवारी विकास प्रयोजन क्षेत्र २६७ चौमी खुली जागा ३२.५० चौमी असे नमूद असून भाडेपट्टा करुन देणार साई निर्माण प्रतिष्ठाण,रुई भाडेपट्टा करुन घेणार श्री.तुळशीराम बाजीराव कोते मुदत वर्षे ३३ चे क्षेत्र ०.४० आर वार्षिक भाडे रु.२०,०००/- वगैरे बाबत नमूद केलेले आहे.

मात्र भाडेपट्टा करारनाम्यात सदर सर्वे नंबरचा उल्लेख नसून सर्वे नं.१३३/१० क्षेत्र ०.१९ आर व सर्वे नं.१३३/९ क्षेत्र ०.२१ आर असे एकूण ०.४० आर क्षेत्र नमूद आहे. म्हणजेच सदर शाळेसाठीचे वापरात असलेले क्षेत्र अकृषिक झालेले नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

**विभागाचा अभिप्राय–** १) सुधारीत शिर्डी विकास आराखडयामध्ये संस्थानकरीता शैक्षणिक कारणासाठी शिर्डी येथील सर्वे नं.१९५ पै, १९६ पै, २१२ पैव २१३ पै. क्षेत्र ६ हे.५५ आर इतके आरक्षित असून पैकी क्षेत्र २ हे.१७ आर इतके संस्थानने खरेदी केले असून उर्वरित क्षेत्र खरेदी करणेचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यामुळे शैक्षणिक प्रयोजनासाठी या व्यतिरिक्त अन्य जागा संस्थानने भाडयाने घेणे उचित होणार नाही.

२) अर्जात नमूद केलेल्या शाळेच्या जागेचे मुळ मालक श्री.तुळशीराम बाजीराव कोते हे असून सदर जागा त्यांनी ३० वर्षे भाडे कराराने उक्त साई निर्माण प्रतिष्ठाण या संस्थेस भाडे कराराने दिलेली आहे. ती जागा उक्त संस्थेस अन्य कुणासही पोटभाडेकरु म्हणून देण्याचा हक्क व अधिकार नाही.

३) सध्यस्थितीत साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे सिनियर कॉलेजचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित आहे.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाच्या अभिप्रायाचा विचार करता, सदरहू प्रस्ताव अमान्य करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.११** **कॅथलॅब मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीसचे प्रती महिना दर निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** मा. व्यवस्थापन समिती दि.18/07/2005 च्या सभेतील निर्णय क्र.332

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीओलॉजी विभागाकरीता संदर्भ क्र 01 अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून AXIOM ARTIS dfc Cathlab System एकुण रू. 2,95,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आली आहे. सदर मशिन श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये दि. 18/02/06 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले असुन कंपनीने मशीनकरीता दिलेला तीन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 17/02/2009 रोजी संपला आहे.

मशीनकरीता कंपनीस दिलेल्या वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे-

दि 11/08/05 च्या पुरवठा आदेशातील अट क्र.12 अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the fourth year is Rs.27,22,500/-. For subsequent years the escalation of 10% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes X-ray general I.I. Tube & Detector system, all spare parts and labour will be given free of cost. Payment for CMC to be done at beginning of each year after the demand of company.

वरील अटीनुसार आजपावेतो मे.सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेह्रेसीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशीन दूरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ. वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Period | CAMC Amount in Rs. (Incl. of all Taxes) | Approx. Cost of Spare Parts in Rs. (replaced by Company in CAMC) | Total No. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 17/02/09 to 16/02/10 | 3059001 | 15,00,000+VAT | 4,775 |
| 2 | 17/02/10 to 16/02/11 | 3299920 | 28,00,000+VAT | 5,293 |
| 3 | 17/02/11 to 16/02/12 | 3629912 | 48,00,000+VAT | 7,193 |
| 4 | 17/02/12 to 16/02/13 | 4056616 | 60,50,000+VAT | 8,910 |
| 5 | 17/02/13 to 16/02/14 | 4448682 | 1,22,40,880 (Incl. of all taxes) | 9,008 |
| 6 | 17/02/14 to 16/02/15 | 4697933 | Approx Rs. 70,64,027+ VAT (USD 108733) | 7,239 |
| 7 | 17/02/15 to 16/02/16 | 4904265 | Approx Rs. 3,50,000 + VAT | 4064 |
| 8 | 17/02/16 to 16/02/17 | 5000000 | Approx Rs. 23,79,454.81 | 5280 |
| | **Total in Rs.** | **2,80,96,329/-** | **3,48,04,907/-** | **51762** |

कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीचे इंजिनिअर वर्षातून 4 नियमित व अमर्यादीत तातडीच्या भेटी (Breakdown Visit) देउन दुरुस्ती व देखभाल करीत आहेत. तसेच सदर कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स - रे टयुबसहीत) कंपनीने स्वखर्चाने बदलले आहे.

**मागणी:** मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांनी पत्र क्र. West/HIM/AXA/Nov16/4762, Dt. 05/01/2017 (रूग्णालये प्राप्त दि. 23/01/2017) अन्वये पुढील वर्षाकरीता म्हणजे दि. 17/02/2017 ते दि. 16/02/2018 या कालावधीसाठी Cath Lab मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता खालीलप्रमाणे करारनामा पाठविला आहे.

| Sr. No. | CMC Period | Last year CMC Amount (Rs.) (Including VAT+ Service Tax + Swachh Bharat Cess) | % Increase | Total Contract Price (RS) |
|---|---|---|---|---|
| 1 | 17 Feb. 2017 to 16 Feb. 2018 | 50,00,000/- | 5.0% | 52,50,000/- |

कंपनीने दि.17/02/2017 ते दि. 16/02/2018 या कालावधीसाठी मागील वर्षीच्या रक्कमेत 5.0% वाढ करून एकुण रु.52,50,000/- (अक्षरी रु. बाव्वन्न लाख पन्नास हजार मात्र) इतक्या रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सदर कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण 4 वेळा नियमित सर्व मशिन्सची सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाऊनचे वेळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर/हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत. त्याकरीता आवश्यक तितक्या वेळा भेटी देणार आहेत. सदर मशीन खरेदी करतेवेळी कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट नुसार- कंपनीने 98% अपटाईम दिला असून मशिन दुरूस्ती करीता जर कंपनीमुळे एकूण 5 दिवसांपेक्षा अधिक काळ लागला तर सलग 5 दिवसांनंतर प्रतिदिवस रू.7500/-इतका दंड संस्थान कंपनीस आकारते.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:**

वरील संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार दुरूस्ती व देखभाली करीता सदर खर्च करता येईल.कंपनीने मागिल वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण 27 वेळा भेटी देउन मागील एक वर्षांत अंदाजे रु.23,79,454.81/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत. (संदर्भ परीशिष्ट "अ") तसेच कंपनी ई- मेल दि. 21/01/2015 व दि. 24/03/2015 अन्वये कॅथलॅब मशिनचे Axiom Sensis व UPS चे या दोन्ही ॲक्सेसरिज/ पार्ट उपलब्ध होणे बंद झाल्यामुळे या पार्टची कंपनीने सर्व्हीस देणे बंद केले आहे.

कॅथलॅब मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे 14 रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर दरवर्षी अंदाजे 5,280पेशंटचे अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बी.एम.व्ही. व इतर प्रोसिजर्स झालेल्या आहेत.(संदर्भ परीशिष्ट "ब") त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. सदर दुरूस्ती करीता रु.25,000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** सदर मशिनची दि.31/03/2016 ची घसारा वजा किंमत रू. 14,66,256/- इतकी आहे. सध्या मशिनचे CMC ची किंमत घसारा वजा जाता किमतीच्या तीन पटीपेक्षा अधिक आहे. तसेच सध्या मशिनचे ब्रेकडाउन्सची संख्या देखील वाढली आहे. आणि मे सिमेंन्स लि. मुंबई यांनी देखील त्यांचे दि.06/02/2015 चे ई- मेल अन्वये सदर मशिनला सन 2019 पर्यंतच स्पेअरपार्टसह सर्व्हीस देणे शक्य असल्याचे कळविले आहे.

सदर मशिन बायबॅक करून नवीन मशिन खरेदी करणसाठी मागणीपत्र कॅथलॅब विभागाने दि.06/01/2016 रोजी खरेदी विभागास दिलेले आहे.खरेदी विभागाने ई-निवीदा काढुन नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करण्याची प्रक्रिया सध्या Technical Bid Opening इतपर्यंत झालेली आहे.सदर नवीन मशिन खरेदीस अंदाजे तीन ते सहा महिन्यांचा कालावधी लागु शकतो. तो पर्यतच्या काळात उपलब्ध मशिन व्यवस्थित कार्यान्वीत राहणे कामी कंपनीकडे सध्याचे मशिनचे नवीन मशिन खरेदी होईपर्यंत प्रतिमाह दराने CMC करणे संयुक्तीक राहील.कंपनीने मागील वर्षीच्या CMC रकमेत रू.1,50,000/-इतक्या रकमेची सुट दिली होती. कॅथलॅब मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह सव्हिर्स कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करता येतील असे नम्र मत आहे.

तरी कॅथलॅब मशीनचे मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे नवीनमशिन खरेदी होई पर्यंतच्या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता कंपनी प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करून कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीसचे प्रती महिना दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या रक्कमेच्या खर्चास मान्यता घेणेस्तव आणि सदर रक्कम कंपनीस प्रती महिना अदा करणेस मान्यता घेणेस्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२३३** **कॅथलॅब मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीसचे दर ठरविणेच्या चर्चेसाठी मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.लि., मुंबई यांचे प्रतिनिधी हजर होते. समितीने त्यांचेबरोबर कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीसच्या दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी कळविले की, कॅथलॅब मशिनची टयुब बदलण्याची आवश्यकता भासल्यास १ वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट करावे लागेल याकरीता त्यांनी रु.५० लाख मात्र अंतीम दर देऊ केले व टयुब बदलण्याची आवश्यकता न भासल्यास सहा महिन्याचे कॉन्ट्रॅक्ट करता येईल.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन कॅथलॅब मशिन खरेदी करणेची कार्यवाही चालू असून नवीन मशिन खरेदी करुन सुरु होईपर्यंत अंदाजे४ ते ५ महिन्याचा कालावधी लागेल. याकरीता मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.लि., मुंबई यांनी कॅथलॅब मशिनचे वार्षिक कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेकामी चर्चेअंती दिलेले रु.५० लाख मात्र वार्षिक दर स्विकारणेत यावे. नवीन कॅथलॅब मशिन कार्यान्वीत होईपर्यंत जुन्या कॅथलॅब मशिनची टयुब बदलण्याची आवश्यकता न भासल्यास, त्यांचेबरोबर प्रतिमाह येणाऱ्या दराने कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करणेत यावे. तसेच नवीन कॅथलॅब मशिन कार्यान्वीत होईपर्यंत जुन्या कॅथलॅब मशिनची टयुब बदलल्यास कॉम्प्रेहेन्सीव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्टची पुर्ण रक्कम त्यांना अदा करणेत यावी.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक २४.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२३४** दिनांक २४.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ श्री रामनवमी उत्सव- २०१७ करीता किर्तनकार/ कलाकार निश्चिती व बिदागी निश्चित करणे.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री रामनवमी उत्सव २०१७ सोमवार, दिनांक ०३/०४/२०१७ ते बुधवार, दिनांक ०५/०४/२०१७ (चैत्र शु.८ शके १९३९ ते चैत्र शु.१० शके १९३९) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. याकामी श्री रामनवमी उत्सव अंदाजपत्रक व श्री रामनवमी -२०१७ चे अनुषंगाने करावयाचे नियोजन/ कामे याबाबत स्वतंत्र प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता, त्यास मान्यता मिळालेली आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम-**

| अ.नं. | कीर्तनकाराचे नाव |
|---|---|
| ०१ | वे.शा.सं.ह.भ.प. बबनशास्त्री चिपळुणकर ,डोंबिवली |
| ०२ | ह.भ.प. सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली |

**ब) कलाकार कार्यक्रम –**

श्री रामनवमी उत्सव २०१७ मध्ये धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणेसाठी इच्छुक असणा-या कलाकारांची नावे खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **कलाकारांचे नाव** | **कार्यक्रम** | **कार्यक्रम करण्याची क्षमता** | **कलाकार संख्या** | **मानधन** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** |
| ०१ | श्री. अनंत वसंत पणशीकर **(नाटयसंपदा कला मंच) निर्मित मुंबई** (मो.९८२१६२८४४९) संकल्पना – रेणुका भिडे, लेखक – फ्रान्सिस ऑगस्टीन , दिग्दर्शक – सुदेश म्हशीलकर संगीत – मयुरेश माडगांवकर, नेपथ्य – सचिन गांवकर | **माझी आई तिचा बाप** (विनोदी भुमिकेत स्मिता जयकर आणि मोहन जोशी) | ३ तास | **२०** | **५,००,०००/- (पाच लाख)** |
| ०२ | सौ. विजया साखरकर, मुंबई (मो.९८२०२१५८११) | **साईनाथ भजन संध्या व साईबाबांवर आधारित नाटीका** | ३ तास | २७ | ४०,०००/- **(चाळीस हजार)** |
| ०३ | श्री. महेश एम.शनभग, हुबली (कर्नाटक) (मो.९८८०८८८७२५) | भजन संध्या | ३ तास | २० ते २२ | **११,०००/- (अकरा हजार)** |
| ०४ | डॉ.अर्चना एल. सहकारी , गोवा (मो.८६०५१९२७२४) | भजन संध्या, व हिंदूस्थानी शास्त्रीय गायन, | ३ तास | ८ ते ९ | ४०,०००/- **(चाळीस हजार)** |
| ०५ | श्री.चंचल जामदार,इंदौर (म.प्र,) (मो.०९८९३११३७०३) | सुमधूर भजन व संगीत | २ तास | १० ते १२ | विनामुल्य |
| ०६ | पंडीत ह.भ.प. देवरावजी कुळमेथे, नाशिक (मो.९२२५७३८६५०) | संगीतमय साईसतचरित्र | २ तास | **०३** | योग्य बिदागीची मागणी आहे. |
| ०७ | श्री.राम कोठेकर, बुलढाणा ९६०४३१९६१८ | अभंग, भक्तीगीत, रामायण गायण | २ तास | ४ ते ५ | १८०००/- **(अठरा हजार)** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०८ | श्री पंकज श्रीवास्तव, दिल्ली (मो.९८११२७४१४८) | साई भजन संध्या | २ तास | ८ ते ९ | १०,०००/- **(दहा हजार)** |
| ०९ | श्री.विजय साखरकर, मुंबई (मो.९८२१३९३३२३) | साई-स्वर नृत्योत्सव | ३ तास | २५ | ३०,०००/- **(तीस हजार)** |

**क)** श्री रामनवमी उत्सवातील श्री दासगणु महाराज, प्रतिष्ठान, गोरटे यांचेमार्फत पाठविण्यात येणा-या कीर्तनकाराची कीर्तन कार्यक्रमाची सेवा आजतागायत चालू असलेली परंपरा खालील प्रमाणे.

दुनियेचा बादशहाचा प्रभु रामचंद्राचा जन्मोत्सव शिर्डीमध्ये उत्साहात साजरा व्हावा या श्री साईनाथ महाराजांच्या आज्ञेनुसार इ.स.१९१२ मध्ये हा रामजन्मोत्सव शिर्डी येथे सुरु झाला. त्यानंतर इ.स. १९१४-१५ ला प्रत्यक्ष श्री बाबांच्या आज्ञेने या उत्सवाची सर्व जबाबदारी जमा-खर्च हिशोबासह, श्री दासगणू महाराजांकडे सोपविण्यात यावी. तेंव्हापासून या उत्सवाची सर्व जबाबदारी श्री दासगणू महाराजांनी सर्वभावे सांभाळली उत्सवाचा जमा-खर्चाचा हिशोब श्री साईनाथ महाराज देहरुपात असतांना तसा त्यांना देत असत त्याचप्रमाणे श्री बाबांच्या समाधीनंतरही असा लिखीत हीशोब श्री दासगणू महाराज बाबांच्या समाधीपुढे ठेवत, अशी अनेक वर्षे श्री रामनवमी उत्सवाची सर्वस्वी जबाबदारी पार पाडल्यानंतर, वयोवृध्दतेने, शरीर थकल्यांनतर उत्स्वातील कीर्तनसेवेकरीता इतर सर्व व्यवस्था श्री दासगणू महाराजांनी कमिटेकडे सोपविली.

स्वतः दासगणूजी महाराजांनी जवळ जवळ ४० वर्षे सलग कीर्तनसेवा केल्यानंतर ती जबाबदारी त्यांचे शिष्योत्तम प्राचार्य श्री अनंतमहाराज आठवले यांचेकडे सोपविली इ.स.१९६३ मध्ये श्री आठवले महाराजांनी गोरटे ता. उमरी जि.नोंदड श्री दासगणूंची वस्त्रसमाधी बांधून श्री दासगणू महाराज प्रतिष्ठानची निर्मिती केली आणि प्रतिष्ठान सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेअंतर्गत पंजीकृत केले प्राश्री. आठवले यांनीही १९८५ पर्यंत ४५ वर्षे सलग, श्री रामनवमी उत्सवात शिर्डी येथे कीर्तनसेवा केली. त्यानंतर शिर्डी संस्थानने पत्राव्दारे श्रीरामनवमी उत्सवात श्रीदासगणू महाराज प्रतिष्ठाणला कीर्तनकार पाठविणेबाबत सांगावे आणि दासगणु प्रतिष्ठानने श्री दासगणू महाराज परंपरेतील कीर्तनकार प्रतिवर्षी पाठवावा अशी प्रथा आजही रुढ आहे.

सन १९१४ पासून आज २०१६-१७ पर्यंत जवळ जवळ १०२ वर्षे श्री रामनवमी उत्सवात, शिर्डी येथे श्री दासगणु महाराजांनी स्वतः रचलेली रसाळ कीर्तनाख्याने लावली. सलग १०० वर्षापेक्षा जास्तकाळ टिकून असलेल्या परंपरा अत्यंत मोजक्याच शिल्लक असतील जबाबदारी स्वतः दासगणु महाराजांना देण्याचा श्री साईनाथाच्या समाधीनंतर आणि तरी जबाबदारी स्वीकारणारा श्री दासगणुंच्या निर्वाणानंतर इतकी वर्षे ही परंपरा अत्यंत प्रेमाने श्रध्देने जोपासली जाते. अशाप्रकारे श्री साईनाथ महाराजांच्या वतीने शिर्डी संस्थानचा आदेश येतो आणि श्री दासगणु प्रतिष्ठाणतर्फे, श्री दासगणुंच्या परंपरेतील कीर्तनकार, निरपेक्ष सेवाभावाने, बाबांच्या दरबारात, सेवेसाठी हजर होतो.

मा.व्यवस्थापन उपसमितीचे दि.०१.१०.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.७३३ किर्तनकारांचे पॅनेल यापुढे रद्द करण्यात यावे किर्तनकारांचे अर्ज मागविण्यात यावे व त्यातून किर्तनकारांची निवड करुन किर्तन कार्यक्रम ठेवण्यात यावे असे ठरले आहे.

१) उपरोक्त "अ" नुसार किर्तनकारांचे व "ब" नुसार कलाकारांचे कार्यक्रमासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. व "क" नुसार गोरटे यांचे मार्फत दर श्री रामनवमी उत्स्वाकरीता पाठविलेले कीर्तनकार कीर्तन करीत असतात. सदरची परंपरा ब-याच वर्षापासून चालत आलेली आहे. सदरची परंपरा चालू ठेवावयाची असल्यास "अ" नुसार किर्तनकारांचे कार्यक्रम घेता येणार नाही "अ" व "क" बाबत योग्य निर्णय होणेस व किर्तनकारास ७ ते ८ वर्षापासून बिदागी/ मानधन रु.९००१/- मात्र देण्यात आलेली आहे. यावेळी श्री रामनवमी उत्सवात किर्तनाकारास मानधन/बिदागी बाबत योग्य निर्णय होणेस विनंती.

२) उपरोक्त "ब" तक्त्यात ९ कलाकारांचे कार्यक्रमासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. अ.नं. ६ ते ९ या कलाकारांचे यापुर्वी रामनवमी, पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा उत्सवात कार्यक्रम झालेले आहेत सदर कलाकारांचा विचार न करता अ.नं. १ ते ५ हे नवीन कलाकार आहेत, सदर कलाकारातून ३ कलाकारांची निवड होऊन प्रत्येक दिवशी तीन तासाचा एक कार्यक्रम ७.३० ते १०.३० असा तीन दिवस आयोजित करता येईल व संस्थानमार्फत विनामुल्य रुम, जेवन, नाष्ट्याची व आरती/दर्शन व्यवस्था करता येईल व कॉलम नं.६ मध्ये कलाकारांनी मानधनाची मागणी केलेली आहे. कलाकारांची निवड झाल्यानंतर मानधनाबाबत योग्य निर्णय होणेस विनंती.

वरील १ व २ निर्णयार्थ सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बाबांच्या काळापासुन श्री दासगणु महाराज व त्यांच्यानंतर त्यांच्या प्रतिष्ठाणतर्फे, श्री दासगणुंच्या परंपरेतील कीर्तनकार १०२ वर्षे विनाखंड श्री रामनवमी उत्सवाकरीता किर्तनसेवा देत आहेत, असे प्रस्तावात नमुद केलेले आहे. ही त्यांची प्रथा परंपरा खंडीत होऊ नये, याकरीता यापुढे श्री रामनवमी उत्सवामध्ये किर्तनसेवेकरीता किर्तनकार निश्चित करणेसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत येऊ नये, परंपरेप्रमाणे श्री दासगणू महाराज प्रतिष्ठाणकडून प्रशासकीय स्तरावरच किर्तनकाराची निश्चिती करणेत यावी, असा सर्वानुमते धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.**

**सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री रामनवमी उत्सवाकरीता श्रीदासगणू महाराज प्रतिष्ठाणमार्फत येणाऱ्या किर्तनकाराकडून किर्तनसेवा करुन घेण्यात यावी व त्यांना तीन दिवसाच्या किर्तनसेवेकरीता रु.११,००१/- मात्र बिदागी देण्यात यावी.**

**तसेच उत्सवातील तीन दिवस साईभक्तांकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेत येत असतात. परंतु उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी काल्याचे किर्तन झाल्यानंतर उत्सव समाप्त होतो व साईभक्तांची गर्दीही कमी होते, याकरीता उत्सवातील पहिल्या व मुख्य दिवशीच निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेत यावेत.**

**प्रस्तावातील अ.नं.१ चा कार्यक्रम नामांकित कलाकारांचा व मोठया स्वरुपाचा आहे, परंतु त्यांचे मानधन रु.५ लाख मात्र आहे व या उत्सवातील कार्यक्रमांकरीता रु.३ लाख मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे. या बाबीचा विचार करता अ.नं.१ चे कार्यक्रमासाठीचे मानधन कमी करणेसाठी त्यांचेबरोबर चर्चा करावी. त्यांनी मानधन कमी करण्यास असमर्थतता दर्शविल्यास अ.नं.२ व अ.नं.९ या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करावेत. परंतु याबाबतचा अंतीम निर्णय दि.२७.०३.२०१७ रोजी होणाऱ्या व्यवस्थापन समितीचे घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना सभेस अशी माहिती मिळाली की, दरम्यानचे कालावधीमध्ये अ.नं.१ चे कलाकारांबरोबर संपर्क केला असता, त्यांनी रु.२,४०,०००/- मात्र मानधनामध्ये कार्यक्रम सादर करणेस सहमती दर्शविली. यावर सभेने अशी चर्चा केली की, श्री रामनवमी उत्सवाममध्ये पहिल्या व मुख्य दिवशी प्रस्तावातील अ.नं.१ (रु.२,४०,०००/- मानधनावर) व अ.नं.९ (रु.३०,०००/- मानधनावर) चे कलाकारांचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा, असे ठरले. तसेच उर्वरित बाबतीत उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**०२ मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चितीबाबत.**

संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव २०१७ मध्ये मंदिर विभागामार्फत वीणा, साईसच्चरित पोथीची मिरवणूक, श्रींच्या प्रतिमा (फोटोची) मिरवणूक, अध्याय वाचन, श्रींची पाद्यपुजा, गुरुस्थान येथे रुद्राभिषेक पुजा अशा कार्यक्रमाचे आयोजन मान्यवरांचे हस्ते करणे असल्याने. मान्यवरांची नावे निश्चित झाल्यानंतर वीणा कोणी घ्यावा, पोथी कोणी घ्यावी, श्रींचा फोटो कोणी घ्यावा, अध्यायाचे वाचन कोणी करावे, श्रींची पाद्यपुजा, कोणी करावी, रुद्राभिषेक पुजा कोणी करावी याबाबत रुपरेषा निश्चित करता येईल.

खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी निश्चिती करणेत यावी.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम,<br>**पोथी–** मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील,<br>**प्रतिमा-** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे व मा.श्री.सचिन भागवत तांबे. |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –**<br>१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,<br>२. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले,<br>३. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,<br>४. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे,<br>५. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –** मा.कार्यकारी अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ०४/०४/२०१७. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,<br>**पोथी–** मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, |
| | | **प्रतिमा-** मा.ॲड मोहन मोतीराम जयकर व<br>मा.डॉ. राजेंद्र राजा बाली सिंग अथवा उपस्थित सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, |
| ०५.०४.२०१७ बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक–** उपकार्यकारी अधिकारी |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या मान्यवरांची निश्चिती करण्यात आली. तसेच सदरहू मान्यवरांची यादी दि.२७.०३.२०१७ रोजी होणाऱ्या व्यवस्थापन समिती सभेत सादर करणेत येऊन, अंतीम करावी, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**आजचे सभेत उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन, खालील मान्यवरांची पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम,<br>**पोथी–** मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील,<br>**प्रतिमा-** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे व<br>मा.श्री.सचिन भागवत तांबे. |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –**<br>१. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम,<br>२. मा.श्री.सचिन भागवत तांबे<br>३. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,<br>४. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर,<br>५. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –** मा.कार्यकारी अधिकारी |
| ०४/०४/२०१७. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,<br>**पोथी–** मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, |
| | | **प्रतिमा-** मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले व<br>मा.डॉ. राजेंद्र राजा बाली सिंग अथवा उपस्थित सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, |
| ०५.०४.२०१७ बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक–** उपकार्यकारी अधिकारी |

**या सर्व मान्यवरांना कार्यक्रमाची लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी. तसेच मिरवणूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या श्रींच्या प्रतिमेचे वजन खुप जास्त आहे, ते वजन कमी करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ मंदिर विभाग प्रमुख)

---

०३ **पेस्ट कंट्रोलची कामे विभागामार्फत करणेसाठी आवश्यक किटकनाशक औषधे, यत्रे तथा किरकोळ साहित्य खरेदी व तज्ञ नेमणूकीसाठी उघडण्यात आलेल्या दरपत्रकांबाबत.**

संस्थान अधिनस्त साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती निवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान तसेच साईआश्रम भक्तनिवास या भक्त निवासी संकुलामधील एकुण २६७२ खोल्या, २१ हॉल, ९९ लॉकर्स यांचे एकुण क्षेत्रफळ ८,१९,५०१.११ चौ.फुटास दोन किटकनाशक औषध फवारणी तज्ञांचे नेमणुकी खाली विभागामार्फत करणे आहे, त्याकामी रु.२,९५,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळाली आहे.

(अ) पेस्ट कंट्रोलकामी किटकनाशक औषधे, यंत्रे तथा किरकोळ सामान खरेदीबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-साभनि/ ६२६५/२०१७ दि १३.०३.२०१७ अन्वये चार दरपत्रके धारकांची दरपत्रके दि.१८.०३.२०१७ पर्यंत मागविण्यात आली. सदरची दरपत्रके दि.१८/०३/२०१७ चे मंजुरी टिपणी अन्वये मा.खरेदी समिती समोर उघडण्यास मान्यता घेण्यात आली.

दि.२०/०३/२०१७ रोजी मा. खरेदी समिती समोर प्राप्त दरपत्रके उघडण्यात आली, त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| **अ.नं** | **तपशिल** | **परिमान** | मे.मगनलाल देवसनकर, नासिक | युनिवर्सल ट्रेडींग कार्पोरेशन, पुणे | राहुल एजन्सिज् पुणे | साई कृषी भांडार, नासिक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रुपये/ पैसे | | | |
| १ | टेम्परीड (बायर इंडीया कंपनीचे उत्पादन) | ६० लिटर | २,१३,०००/- | **२,१०,०००/-** | २,२५,०००/- | २,२५,०००/- |
| २ | क्लोरोपायरीफॉस | ४० लिटर | **१०,०००/-** | ११,२००/- | ११,०४०/- | १०,८००/- |
| ३ | स्वयंचलित बॅटरी पंप | ४ नग | ---- | ---- | ---- | ---- |
| ४ | सेफ्टी गॉगल्स | २० नग | ६,४००/- | ---- | ---- | ---- |
| ५ | हातमोजे | २० नग | ७००/- | ---- | ---- | ---- |
| ६ | मास्क | २० नग | १०००/- | ---- | ---- | --- |

वरील तुलनात्मक तक्त्यावरुन असे निदर्शनास येते कि,

१) टेम्परीड (बायर इंडीया कंपनीचे उत्पादन) चे न्युनतम दरधारक- युनिवर्सल ट्रेडींग कार्पोरेशन, पुणे यांना दराबाबत चर्चेसाठी बोलविता येईल.

२) क्लोरोपायरीफॉस चे न्युनतम दरधारक- मे.मगनलाल देवसनकर, नासिक. यांना दराबाबत चर्चेसाठी बोलविता येईल.

३) स्वयंचलित बॅटरी पंप– कोणीही दर दिलेले नाही, आवश्यकता असल्याने स्थानिक परिसरातुन दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल.

४) सेफ्टी गॉगल्स– फक्त मे.मगनलाल देवसनकर, नासिक यांनीच दर दिलेले आहे, आवश्यकता असल्याने यांचेकडून खरेदी करता येतील.

५) हातमोजे- फक्त मे.मगनलाल देवसनकर, नासिक यांनीच दर दिलेले आहे, आवश्यकता असल्याने यांचेकडून खरेदी करता येतील.

६) मास्क- फक्त मे.मगनलाल देवसनकर, नासिक यांनीच दर दिलेले आहे, आवश्यकता असल्याने यांचेकडून खरेदी करता येतील.

(ब) किटकनाशक औषधे फवारणीकामाचे मेहनताना दरपत्रक देणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-साभनि/ ६२६४/ २०१७ दि १३.०३.२०१७ अन्वये चार दरपत्रके धारकांची दरपत्रके दि.१८.०३.२०१७ पर्यंत मागविण्यात आली. सदरची दरपत्रके दि.१८/०३/२०१७ चे मंजुरी टिपणी अन्वये मा.खरेदी समिती समोर उघडण्यास मान्यता घेण्यात आली.

दि.२०/०३/२०१७ रोजी मा. खरेदी समिती समोर प्राप्त दरपत्रके उघडण्यात आली, त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं | मेहनताना (प्रति फवारणी) | साई पेस्ट कंट्रोल, लोणी | प्रवरा पेस्ट कंट्रोल, कोल्हार | **एक्सेल पेस्ट कंट्रोल, पुणे** | एल.पी. पेस्ट कंट्रोल, वाकडी | ओम साई पेस्ट कंट्रोल, औरंगाबाद |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम रु.पै. | रक्कम रु.पै. | **रक्कम रु.पै.** | रक्कम रु.पै. | रक्कम रु.पै. |
| १ | फवारणी क्र.०१ | ५१,१११/- | ९०,१४५ | **११,१०१/-** | २८,८७५/- | ३२,०००/- |
| २ | फवारणी क्र.०२ | ५१,१११/- | ८१,९५०/- | **११,१०१/-** | २८,८७५/- | ३२,०००/- |

वरील तुलनात्मक तक्त्यावरुन असे निदर्शनास येते कि,

१) फवारणी क्र.०१ व ०२ चे न्युनतम दरधारक– एक्सेल पेस्ट कंट्रोल, पुणे यांना दराबाबत चर्चेसाठी बोलविता येईल.

उपरोक्त अ व ब बाबत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, निवासस्थानांकडील पेस्ट कंट्रोलची कामे संस्थानमार्फत करणेसाठी किटकनाशक औषधे, यत्रे तथा किरकोळ साहित्य खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारकांना सभेसमोर बोलविणेत आले असता, तुलनात्मक तक्त्यामधील अ.नं.१ साठीचे निम्नतम दरधारक चर्चेसाठी अनुपस्थित होते. याकरीता त्यांचे दरपत्रकामध्ये प्राप्त झालेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**अ.नं.२ साठीचे निम्नतम दरधारक मे.मगनलाल देवसनकर, नासिक हे चर्चेसाठी उपस्थित होते, उपसमिती सभेसमोर त्यांनी १% दर कमी केले. ते स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच अ.नं.३ ते ६ या साहित्यांसाठी फक्त मे.मगनलाल देवसनकर, नासिक या एकाच पुरवठाधारकाने दर दिलेले आहेत व या साहित्यांची किंमत रु.५०००/- पेक्षा कमी होत असल्यामुळे सदरहू उर्वरित साहित्य मा.कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारात मे.मगनलाल देवसनकर, नासिक यांनी दिलेल्या योग्य दरामध्ये खरेदी करणेत यावे.**

**तसेच याकामी तज्ञ नेमणूकीसाठी प्राप्त झालेल्या दरांमधील निम्तनम दरधाकर एक्सेल पेस्ट कंट्रोल, पुणे यांचेबरोबर उपसमितीने दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी दरपत्रकामध्ये दिलेल्या दरावर १०% मात्र सुट देऊ केली, त्यांनी दिलेले अंतीम दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

०४ **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंझुमेबल मटेरीयल खरेदी करणेबाबतच्या तुलनात्मक तक्त्यावर निर्णय होणेबाबत.**

**सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०४/२०१६ च्या सभेतील निर्णय क्र.२२८

**प्रस्तावित:-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठी आवश्यक असलेले कंझुमेबल मटेरीयल (पार्ट –A) मा.व्यवस्थापन समितीची निर्णय क्र.228 नुसार मान्यता आहे. त्यानुसार ई-टेंडरींगव्दारे दि.१०/१०/२०१६ ते १७/१०/२०१६ याकालावधीत महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर ऑनलाइन निविदेची मागणी करुन कमीतकमी तिन निविदाधारकांनी ज्या ॲटमचे दर भरलेले आहेत तेच मटेरीयल खरेदी करण्यात आलेले आहे. उर्वरित रक्कम रु.८५१८७/- किंमतीचे शिल्लक मटेरीयल खरेदी करणेकामी इकडील टिपणी दि.२५/०१/२०१७ च्या टिपणीने पुर्व मंजूरी घेऊन पत्र क्र.एसएसएस/ आयटीआय/ स्टोअर/ १७/७४१/५९६४ दि. १८/०२/२०१७ नुसार ११ पुरवठादारांकडून दरपत्रकांची मागणी करण्यात आलेली होती. दरपत्रक पाठविण्याची अंतिम दि.२८/०२/२०१७ होती दि.०४/०३/२०१७ अखेर प्राप्त झालेली ०६ दरपत्रके दि. २०/०३/२०१७ च्या मा.खरेदी समितीच्या समक्ष ०६ दरपत्रके उघडण्यात आलेली आहेत. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे.

**मागणी:-** तुलनात्मक तक्त्यानुसार मे.ॲशियन सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक यांचे अ.नं.९ मे. क्विक सप्लायर्स, नाशिक यांचे अ.नं.११,१३,१४,१८,१९ मे.दिप ढंटरप्रायजेस,मुंबई यं चे अ.नं.१७ मे.हिंदुस्तान टुल्स ॲण्ड इंजिनीअरींग कंपनी,मुंबई यं चे अ.नं.८,१०,१५,१६ मे.बॉम्बे मशिनरी ॲण्ड हार्डवेअर मार्ट, श्रीरामपुर यांचे अ.नं.२,३,४,५,७ व मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांचे अ.नं. १,६,१२ चे दर न्यूनतम आहेत. न्यूनतम दर असलेल्या ०६ निविदाधारकांना एकुण रक्कम रु.७१६८०/- चे साहित्य पुरविणेकामी पुरवठा आदेश द्यावा लागणार आहे.

**अनुमान:-** तरी वरील नमुद केलेप्रमाणे न्यूनतम दर असलेल्या ०६ पुरवठादारांना एकुण रक्कम रु.७१६८०/- चे साहित्य पुरविणेकामीपुरवठा आदेश देणेकामी मा.उपसमितीचे सभेमध्ये मान्यता मिळणेकामी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंझुमेबलमटेरीयल खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या मुळ दरांवर चर्चा करणेसाठी संबंधीत पुरवठाधारकांना उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. परंतु एकही पुरवठाधारक चर्चेसाठी उपस्थित नव्हते. याकरीता त्यांनी दिलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनापुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

०५ **श्री रामनवमी उत्सव- २०१७ मध्ये साईभक्तांचे सोयीकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे "*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः-** *"दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१११ अन्वये सालाबाद प्रमाणे याहीवर्षी श्रीरामनवमी उत्सव २०१७ साजरा करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.६२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली तसेच सदरहू उत्सव साजरा करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेत यावी असे ठरले."*

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे तर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दि.०३ एप्रिल, २०१७ ते बुधवार दि.०५ एप्रिल २०१७ अखेर श्रींचा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी, गोलभान, कसारा बायपास, लतीफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, झगडेफाटा व निमगांव को-हाळे येथे कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछाईत व विदयुत व्यवस्थेसह तात्पुरती उभारणी करणे आवश्यक आहे. याकामी उपरोक्त निर्णयानुसार श्रीरामनवमी उत्सव २०१७ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी रक्कम रु.१० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सदहू कामी इकडील दि.०२/०३/२०१७ रोजीचे प्रशासकीय मान्यतेनुसार ई– निविदा सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी देणेत आली असून, दि.१८/०३/२०१७ पर्यंत ई- निविदा अपलोड करणेची व लिफाफा क्र. १ (Hard Copy) सादर करणेसाठी मुदत देणेत आली होती. सदर मुदतीत खालील मंडप ठेकेदार यांचे ई निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१. न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर
२. साईकृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर
३. बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड
४. शेटे डेकोरेटर्स, शहापूर, ठाणे
५. न्यु जगदंबा मंडप डेकोरेर्स, वावी

उपरोक्त प्राप्त झालेल्या ई– निविदांचा लिफाफा क्र.१ (Technical Bid) खरेदी समितीचे दि.२०/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले आहे. उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, सर्व ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वरील पात्र ठेकेदारांचे ई- निविदांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) त्याच दिवशी दि.२०/०३/२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले आहे. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**१. श्री रामनवमी उत्सव २०१७ निमित्त दि.०३/०४/२०१७ ते दि.०५/०४/२०१७ अखेर ०३ दिवस या कालावधीत करावयाची मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | साईज | ठेकेदाराचे नांव | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, | | साईकृपा टेंन्ट हाऊस | | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स | | शेटे डेकोरेटर्स | | न्यु जगदंबा मंडप डेकोरेर्स | |
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| १ | मंगल कार्यालय, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत कार्यालयाजवळ, पोलीस स्टेशन जवळ, स्वागत कक्षाजवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. | १२३९० चौ. फुट | ८.२५ | १०२२१७.५ | १०.०० | १२३९०० | ९.०० | १११५१० | ४.०० | **४९५६०** | ४.४७ | ५५३८३.३ |
| २ | कुस्ती ग्राऊंडवर शामियना मंडप, कनात, व बिछायतीसह उभारणे. ( कालावधी - ०५/०४/२०१७ ते ०५/०४/२०१७ अखेर १ दिवस) | ४७२५ चौ. फुट | ८.७५ | ४१३४३.७५ | ५.०० | २३६२५ | ५.०० | २३६२५ | ८.०० | ३७८०० | १.५० | **७०८७.५०** |
| ३ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था करणे. | ६०० चौ. फुट | ११० | ६६००० | १३५ | ८१००० | १०५ | **६३०००** | १६५ | ९९००० | १०८.३३ | ६४९९८ |
| ४ | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे रेलींग व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग करणे. | ११०० र. फुट | ४५ | ४९५०० | ४५ | ४९५०० | १८.०० | **१९८००** | ३० | ३३००० | १९.५ | २१४५० |

**२. मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी /शामियाना मंडप, कनात, बिछाईत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | | ठेकेदाराचे नांव | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, | | साईकृपा टेंन्ट हाऊस | | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स | | शेटे डेकोरेटर्स | | न्यु जगदंबा मंडप डेकोरेर्स | |
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| २.०१ | मुंबई ते सिन्नर मार्गावर (कालावधी दि.२९/०३/२०१७ ते ०२ ०४/२०१७ अखेर ०५ दिवस) | ३१६०० चौ. फुट | ६.५० | २०५४०० | १५.०० | ४७४००० | १५.०० | ४७४००० | ६.९९ | २२०८८४ | ६.३५ | **२००६६०** |
| २.०२ | सिन्नर ते वावी मार्गावर दि.३०/०३/२०१७ ते ०३ ०४/२०१७ अखेर ०५ दिवस) | ७६६५१ चौ. फुट | ५.१० | ३९०९२०.१ | ३.६५ | **२७९७७६.१५** | ४.५० | ३४४९२९.५० | ४.७५ | ३६४०९२.२५ | ३.८० | २९१२७३.८० |
| २.०३ | वावी ते शिर्डी मार्गावर दि.३१/०३/२०१७ ते ०४ ०४/२०१७ अखेर ०५ दिवस) | ३०३७० चौ. फुट | ५.२० | १५७९२४ | ३.७५ | **११३८८७.५०** | ५.०० | १५१८५० | ४.७५ | १४४२५७.५० | ३.९५ | ११९९६१.५० |

तरी श्रीरामनवमी उत्सव २०१७ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप उभारणी करणेकामी उपरोक्त प्रमाणे गडद व अधोरेखीत केलेल्या निम्नतम दराचे ठेकेदार यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस

तसेच उत्सव काळात ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१७ मध्ये साईभक्तांचे सोयीकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या दरांवर चर्चा करणेसाठी निम्नतम दरधारकास उपसमिती सभेसमोर बोलविणेत येऊन, चर्चा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे देऊ केलेले अंतीम स्विकारणेत येऊन, संबंधीतांनाकार्यादेश देण्यात यावा, तसेच उत्सव कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**१. श्री रामनवमी उत्सव २०१७ निमित्त दि.०३/०४/२०१७ ते दि.०५/०४/२०१७ अखेर ०३ दिवस या कालावधीत करावयाची मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | साईज | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स | | शेटे डेकोरेटर्स | | न्यु जगदंबा मंडप डेकोरेर्स | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निविदेमधील मुळ एकत्रित दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले अंतीम एकत्रित दर रु. | निविदेमधील मुळ एकत्रित दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले अंतीम एकत्रित दर रु. | निविदेमधील मुळ एकत्रित दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले अंतीम एकत्रित दर रु. |
| १ | मंगल कार्यालय, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत कार्यालया जवळ, पोलीस स्टेशन जवळ, स्वागत कक्षाजवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. | १२३९० चौ. फुट | --- | --- | ४९५६० | ४९५६० | --- | --- |
| २ | कुस्ती ग्राऊंडवर शामियना मंडप, कनात, व बिछायतीसह उभारणे. ( कालावधी - ०५/०४/२०१७ ते ०५/०४/२०१७ अखेर १ दिवस) | ४७२५ चौ. फुट | --- | --- | --- | --- | ७०८७.५० | ७०००/- |
| ३ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था करणे. | ६०० चौ. फुट | ६३००० | ६३००० | --- | --- | --- | --- |
| ४ | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे रेलींग व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग करणे. | ११०० र. फुट | १९८०० | १९८०० | --- | --- | --- | --- |

**२. मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी /शामियाना मंडप, कनात, बिछाईत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.**

| अ. नं. | कामाचा तपशिल | साईज | साईकृपा टेंन्ट हाऊस | | न्यु जगदंबा मंडप डेकोरेर्स | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निविदेमधील मुळ प्र.चौ.फु. दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले अंतीम प्र.चौ.फु. दर रु. | निविदेमधील मुळ प्र.चौ.फु. दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले अंतीम प्र.चौ.फु. दर रु. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई ते सिन्नर मार्गावर (कालावधी दि.२९/०३/२०१७ ते ०२ ०४/२०१७ अखेर ०५ दिवस) | ३१६०० चौ. फुट | --- | --- | ६.३५ | ६/- |
| २ | सिन्नर ते वावी मार्गावर दि.३०/०३/२०१७ ते ०३ ०४/२०१७ अखेर ०५ दिवस) | ७६६५१ चौ. फुट | ३.६५ | ३.५० | --- | --- |
| ३ | वावी ते शिर्डी मार्गावर दि.३१/०३/२०१७ ते ०४ ०४/२०१७ अखेर ०५ दिवस) | ३०३७० चौ. फुट | ३.७५ | ३.६५ | --- | --- |

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **सन- २०१७ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परीसर व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे "*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** *"दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५ अन्वये सन २०१७ मधील उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंडप व्यवस्था करणेसाठी विहीत पध्दतीने ई– निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:-** उन्हाळा सुट्टीच्या कालावधीमध्ये शिर्डी येथे साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते, त्यामुळे उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर श्री साईप्रसादालय परिसर, भक्तनिवास (५०० रुम) परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकामी उपरोक्त निर्णयानुसार उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.१३,९९,२९१/- मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

याकामी इकडील दि.०२/०३/२०१७ रोजीचे प्रशासकीय मान्यतेनुसार ई – निविदा सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी देणेत आली असून, दि.१८/०३/२०१७ पर्यंत ई- निविदा अपलोड करणेची व लिफाफा क्र.१ (Hard Copy) सादर करणेसाठी मुदत देणेत आली होती. सदर मुदतीत खालील मंडप ठेकेदार यांचे ई- निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१. न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर
२. साईकृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर
३. बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड

उपरोक्त प्राप्त झालेल्या ई– निविदांचा लिफाफा क्र.१ (Technical Bid) खरेदी समितीचे दि.२०/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले आहे. उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, सर्व ठेकेदार तांत्रिक दृष्टया पात्र असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वरील पात्र ठेकेदारांचे ई- निविदांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) त्याच दिवशी दि.२०/०३/२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आले आहे. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**<u>उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता करावयाची मंडप व्यवस्था ( कालावधी -</u>** दि.०१/०४/२०१७ ते दि.१५/०६/२०१६ अखेर ७६ दिवस)

| अ. नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण /एकक | मंडप ठेकेदाराचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | | साई कृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर | | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, | |
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| १ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) उभारणेः- समाधी मंदीर दक्षिण बाजू, गुरुस्थान मंदिर, श्रींचे चावडीसमोर, दर्शनद्वार ते मंदिर गेट, महादेव व श्री गणेश मंदिरासमोर, म्युझियम हॉल समोर, गेट नं. ३ समोर, गेट नं. ४ बाहेरील बाजूने, उदी काऊंटर समोर, जुने प्रसादालय प्रवेशद्वार, दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, दर्शनरांग प्रवेशद्वार पूर्व व पश्चिम बाजूस, साई कॉम्प्लेक्समधील देणगी काऊंटर, बुकस्टॉल समोर, साईप्रसाद निवासस्थान कार्यालया समोर, जनसंपर्क कार्यालयासमोर, दत्त मंदिर समोर, ५०० रुम कॅन्टीन समोर, श्री साईप्रसादालय परिसर, पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू व नगर – मनमाड रस्ता पूर्व बाजू फुटपाथवर, पिंपळवाडी रोड साई कॉम्प्लॅक्स समोर इ. ठिकाणी इ. भागात मंडप उभारणे. | ४७६९७ चौ. फुट | १७.४८ | ८३३७४३.५६ | २०.०० | ९५३९४० | १९.०० | ९०६२४३ |
| २ | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) उभारणेः-** मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर उत्तर बाजूस चावडी गेट ते नगर द्वार गेट पर्यंत व सभाकुंड येथे | ८९९३ चौ. फुट | २६.४० | २३७४१५.२० | २७.५० | २४७३०७.५० | २८.०० | २५१८०४ |
| ३ | शामियाना मंडप कनात व बिछायतीसह उभारणेः- जुने प्रसादालय परिसरातील तिकीट रेलींग समोर व सुलभ शौचालयासमोर. | ८५०० चौ. फुट | १४.४० | १२२४०० | १५.५० | १३१७५० | १६.०० | १३६००० |
| | | | एकूण रक्कम रु. | **११९३५५८.७६** | | १३३२९९७.५० | | **१२९४०४७.००** |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. त्यांचेकडून मंडप व्यवस्था करणेकामी रु.११,९३,५५९/- मात्र इतका खर्च येईल. मंदिर परिसराचे पूर्व बाजूकडील मोकळ्या जागेत (१६ आर.) मध्ये साईभक्तांचे दर्शन रांगेच्या सुविधेकरीता कायमस्वरुपी शेडची व्यवस्था करणेकामी टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेसाठी ई-निविदा प्रक्रीया सुरु असलेने, सदर भागातील मंडप व्यवस्थेचा समावेश उन्हाळयाचे कालावधीत करणेत आला नव्हता. तथापी, सदरहू निविदा प्रकीयेस काही अवधी लागणार असल्याने, १६ आर. जागेमध्ये उन्हांळयाचे व श्रीरामनवमी उत्सव कालावधीमध्ये साईभक्तांचे गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेता सदरहू ठिकाणी १६००० चौ. फुट मंडप व्यवस्था ३० दिवसांचे कालावधीकरीता उपरोक्त अ.नं.०२ चे मंजूर दरात करुन घेता येईल त्यासाठी रु.१,६६,५६०/- मात्र इतका खर्च येईल.

**प्रस्ताव:** तरी वर नमूद ई– निविदांपैकी निम्नतम दराचे ठेकेदार न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांना ७६ दिवसांचे कालावधीसाठी कार्यादेश देणेस तसेच उन्हाळयाच्या कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व्यवस्था करावयाची झाल्यास मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णयार्थ सादर.

**सन- २०१७ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परीसर व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या दरांवर चर्चा करणेसाठी निम्नतम दरधारक न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी मागील वर्षाच्या दरामध्ये १०% वाढ करुन दर भरलेले होते. उपसमितीने दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी उपरोक्त तक्त्यामधील अ.नं.३ चा शामियाना मंडप वगळता इतर कामे मागील वर्षाच्या दरामध्ये करुन देणेस सहमती दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१७ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परीसर व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांनाशामियाना मंडप सध्याचे दराने व इतर कामांसाठी मागील वर्षाच्या दरामध्ये कार्यादेश देण्यात यावा. तसेच उन्हाळयाच्या कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व्यवस्था करावयाची झाल्यास मंजूर दराने करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०७ **बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदीकामी उघडण्यात आलेल्या कोटेशन्सबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधील तरतुद:-** *अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट –कलम (१) च्या खंड (क) अन्वये" मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतुद आहे.*

**मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णयः-** दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ७११ अन्वये बांधकाम विभागाचे आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने एकुण ९०० गोण्या सिमेंट खरेदी करण्यास व या कामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना:-** बांधकाम विभागास दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामासाठी पहील्या टप्प्यात खरेदी करण्यात आलेल्या ३०० गोण्या सिमेंट पैकी सध्या विभागाकडे ५० गोण्या शिल्लक असुन विभागाकडील दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामात अडचण येउ नये याकरीता ३०० गोण्या सिमेंट खरेदी करणेकामी इकडील दि.२०/०२/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये येणारे रक्कम रु. ९३०००/- मात्रचे खर्चास व या कामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता घेणेत आलेली आहे.

त्यानुसार इकडील जा. क्र. ६०८९/२०१७ दि.०२/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असुन, या कामी ०४ सिलबंध कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव/गांव | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | वाकचौरे पाटील सेल्स एजन्सी, साकुरी | २३७८८/०३/०३/२०१७ |
| ०२ | श्री पटेल सॉ मिल , शिर्डी | २३७८९/०३/०३/२०१७ |
| ०३ | कृष्णा ट्रेडर्स, साकुरी | २३७९०/०३०३/२०१७ |
| ०४ | आदित्य ट्रेडर्स, शिर्डी | २३७९१/०३/०३/२०१७ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंध कोटेशन दि.२०/०३/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आले आहे त्याचा तुलनात्मक तक्ता खलिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण/ एकक | कृष्णा ट्रेडर्स, साकुरी | | वाकचौरे पाटील सेल्स, साकुरी. | | श्री पटेल सॉ मिल, शिर्डी | | अदित्य ट्रेडर्स, शिर्डी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| ०१ | सिमेंट ३०० गोणी | अल्ट्राटेक | ३१०/- | ९३,०००/- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | अंबुजा | ३१०/- | ९३,०००/- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | ए.सी.सी. | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | बिर्ला ए-१ | २७०/- | ८१,०००/- | **२५०/-** | **७५,०००/-** | -- | -- | २६०/- | ७८,०००/- |
| | | बिर्ला गोल्ड | २७०/- | ८१,०००/- | -- | -- | २८७/- | **८६,१००/-** | -- | -- |
| | | एकुण रुपये | | ८१,,०००/- | | **७५,०००/-** | | -- | | **७८,०००/-** |
| | | शेरा | | | **निम्नतम** | | | | | |

**प्रस्ताव**:- उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात पुरवठादार वाकचौरे पाटील सेल्स,साकुरी.यांनी नमुद केलेप्रमाणे बिर्ला ए- वन सिमेंट गोणीचे दर रु.२५०/-प्रती गोणी हे निम्नतम असुन त्यांचे कडुन बिर्ला ए वन कंपनीचे ३०० गोण्या सिमेट खरेदी करणेस रक्कम रुपये ७५,०००/-(अक्षरी रुपये पंचाहत्तर हजार ) मात्र खर्च येईल. तरी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेस निर्णयार्थ सादर.

**बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या दरांमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी प्रती गोणी रु.२/- मात्र सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदीकामी वाकचौरे पाटील सेल्स, साकुरी यांचे बिर्ला ए- वन सिमेंटसाठी प्रती गोणी रु.२४८/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईबाबा हॉस्पिटल व सी.सी.टी.व्ही. विभागाकरीता नवीन ए.सी. खरेदीकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही करणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४८३ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटलचे विविध विभागाकरीता सात नग ए.सी. खरेदी करणे व त्याकामी रक्कम रुपये ३,३६,०००/- तसे. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५९४ अन्वये सी.सी. टि.व्ही. विभागाकरीता दोन नग ए.सी. खरेदी करणे व त्याकामी रक्कम रुपये १,२०,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार २ टन क्षमतेचे ९ नग ए.सी. खरेदीकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर जाहीरात अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोंडीगसाठी १५/०२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दिनांक २३/०२/२०१७ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. ई-निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक २७/०२/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी अपलोड करण्यात आलेल्या ई-निविदा व जाहिरातमध्ये कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील पुरवठादारांच्या तांत्रिक ई-निविदांच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेल्या होत्या :

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | श्री कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई | ४. | ए.जे. हॅवक, मुंबई |
| २ | क्लासिक कुल एअरकंडिशनींग, मुंबई | ५ | तिरुपती इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद |
| ३ | कुल ब्रिज, पुणे | ६ | सुंगधा एअरकंडीशनींग अन्ड रेफ्रिजेरेशन, औरंगाबाद |

उपरोक्त प्राप्त ६ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक २३/०२/२०१७ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, TIN, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त सहाही तांत्रिक निविदा पात्र आहे. या पात्र झालेल्या ६ निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial Bid) बीड दिनांक २०/०३/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आल्या असून, त्यात पुढीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मागणी | दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | मे. कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई | ९ नग | ६३,९००/- | ५,७५,१००/- |
| २. | मे. क्लासिक कुल एअरकडींशनिग, मुंबई | | ६५,०००/- | ५,८५,०००/- |
| ३. | मे. तिरुपती इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद | | ५३,१००/- | ४,७७,९००/- |
| **४.** | **मे. सुंगधा एअरकंडीशनींग अॅन्ड रेफ्रिजेरेशन, औरंगाबाद** | | **४५,६००/-** | **४,१०,४००/-** |
| ५. | मे. कुल ब्रिज, पुणे | | ४६,२२५/- | ४,१६,०२५/- |
| ६. | मे. ए.जे. हॅवक अॅन्ड इलेक्ट्रीकल्स प्रा. लि., मुंबई | | ६६,५००/- | ५,९८,५००/- |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व सी.सी. टि.व्ही. विभागाकरीता नवीन ९ ए.सी. खरेदीकामी मे. सुगंधा एअरकंडीशनिंग अॅन्ड रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांचे एकूण दर रुपये ४,१०,४००/- मात्र निम्नतम आहेत.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व सी.सी. टि.व्ही. विभागाकरीता नवीन ९ ए.सी. खरेदीकामी प्राप्त व पात्र झालेल्या ई-निविदांपैकी निम्नतम दरधारक मे. सुगंधा एअरकंडीशनिंग अॅन्ड रेफ्रिजरेशन, औरंगाबाद यांना नियोजित ठिकाणी ए.सी. बसविणेकामी कार्यारंभ आदेश देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीस शिफारस करणेकरीता प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सादर.

**श्री साईबाबा हॉस्पिटल व सी.सी.टी.व्ही. विभागाकरीता नवीन ए.सी. खरेदीकामी प्राप्त झालेल्या दरांमधील निम्नतम दरधारक मे. सुंगधा एअरकंडीशनींग अॅन्ड रेफ्रिजेरेशन, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी प्रती नग रु.४५,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व सी.सी.टी.व्ही. विभागाकरीता ९ नग नवीन ए.सी. खरेदीकामी मे. सुंगधा एअरकंडीशनींग अॅन्ड रेफ्रिजेरेशन, औरंगाबाद यांचे प्रती नग रु.४५,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०९ **शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे लिफ्ट बसविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही करणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे लिफ्ट बसविणेकामी येणा-या रुपये २४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदेची जाहीरात अपलोड करण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नगर येथील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोंडीगसाठी १५/०२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्यामुळ प्रती दिनांक २७/०२/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ईनिविदा व जाहिरातमध्ये कळविण्यात आले होते.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादारांच्या तांत्रिक ई-निविदांच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | M/s. Victora Lift Pvt. Ltd., Mumbai | 3. | M/s. Omega Elevator, Ahmedaba |
| 2. | M/s. Power Link Engineering Ltd., Nashik | 4. | M/s. Golden Star Elevator, Pune |

वरील प्राप्त ४ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ०२/०३/२०१७ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, TIN, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट व सर्व्हे रिपोर्ट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून, त्यात वरील चारही तांत्रिक निविदा पात्र झाल्या आहेत. या पात्र झालेल्या ४ निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial Bid) बीड दिनांक २०/०३/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आल्या असून, त्यात पुढीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत :

| Sr. No. | Description | Qty | Omega Elevator, Ahmedabad | **Victora Lifts Pvt. Ltd., Mumbai** | Power Link Engineering Ltd., Nashik | Golden Star Elevators Company, Pune |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Supply, erection, commissioning for new passenger auto door lift for G+3 | 1. | 13,50,000/- | **12,79,000/-** | 16,90,000/- | 22,90,000/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | floors and 10 passenger at Bus Stand, Shirdi as per detailed specification in technical bid. | | | | | |
| 2. | Supply, erection, commissioning for new passenger auto door lift for G+3 floors and 8 passenger at Bus Stand, Shirdi as per detailed specification in technical bid. | 1. | 13,14,000/- | **12,26,000/-** | 15,21,000/- | 20,90,000/- |
| | | **Total Rs. :** | 26,64,000/- | **25,05,000/-** | 32,11,000/- | 43,80,000/- |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे २ लिफ्ट बसविणेकामी मे. व्हिक्टोरा लिफ्टस प्रा. लि., मुंबई यांचे दर रुपये२५,०५,०००/- मात्र निम्नतम आहेत.

तरी शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे २ लिफ्ट बसविणेकामी प्राप्त व पात्र झालेल्या ई-निविदांपैकी निम्नतम दरधारक मे. व्हिक्टोरा लिफ्टस प्रा. लि., मुंबई यांना लिफ्ट बसविणेकामी कार्यारंभ आदेश देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीस शिफारस करणेकरीता प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सादर.

**शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे २ नग लिफ्ट बसविणेकामी M/s. Victora Lift Pvt. Ltd., Mumbai यांचे एकत्रित रु.२५,०५,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले असून त्यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी एकत्रित रु.२५,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे २ नग लिफ्ट बसविणेकामी M/s. Victora Lift Pvt. Ltd., Mumbai यांचे एकत्रित रु.२५,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१० **वाहन क्र.एम.एच.१७/ एजे-२९५१ (XUV) करीता नविन टायर खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रकामधील निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्यासोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील", असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तावनाः-** वाहन क्रं.एमएच-१७/एजे-२९५१(महिंद्रा XUV) या वाहनास नवीन टायर खरेदी करणे बाबत दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत 235-65-17 या साईजचे ब्रिजस्टोन (ट्युबलेस) कंपनीचे ०५ टायर्स खरेदी करणे कामी स्थानिक / परिसरातील अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व या कामी येणारे अंदाजे रु.६२,०००/- (अक्षरी रु. बासष्ट हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/६३१२/२०१७ दि.१५/०३/२०१७ चे पत्रान्वये ०८ पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यापैकी एकुण ०६ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. सदर दरपत्रके दि.२०/०३/२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेली असुन दरपत्रकात देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **पुरवठधारकाचे नांव व ठिकाण** | **दरपत्रकात देवु केलेले दर** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| | | प्रति नग | एकुण रक्कम | |
| ०१ | नरेंद्र टायर्स, कोपरगांव | १२,७५०.०० | ६३,७५०.०० | L4 |
| **०२** | **सतिषऑटो सेंटर, श्रीरामपुर** | **१२,०००.००** | **६०,०००.००** | **L1** |
| ०३ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी | १२,२९९.०० | ६१,४९५.०० | L2 |
| ०४ | सुदर्शन टायर्स, कोपरगांव | १०,३५०.०० | ५१,७५०.०० | दरपत्रकात MRF कंपनीचे दर दिल्याने **अपात्र** ठरविण्यात आले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | चंद्रप्रभा टायर्स, साकुरी | १२,६८०.०० | ६३,४००.०० | L3 |
| ०६ | राम टायर्स, कोपरगांव | १३,४००.०० | ६८,२५०.०० | L5 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचा विचारकरता, अ.नं.०४ चे सुदर्शन टायर्स, कोपरगांव यांनी दरपत्रकात MRF कंपनीचे टायरचे दर दिलेले असुन आपली मागणी ब्रिजस्टोन कंपनीची असलेने त्यांना अपात्र ठरविलेले आले. इतर पुरवठाधारकांनी दिलेले ब्रिजस्टोन कंपनीचे टायर दरांचा विचारकरता सतिष ऑटो सेंटर, श्रीरामपुर यांनी निम्नतम दर प्रति नग रु.१२,०००/- मात्र देवु केलेले आहेत.

**मागणी-** तरी वाहन क्रं.एमएच-१७/एजे-२९५१ (महिंद्रा XUV) करीता235-65-17 या साईजचे ब्रिजस्टोन (ट्युबलेस) कंपनीचे ०५ टायर्स खरेदी करणे कामी सतिष ऑटो सेंटर, श्रीरामपुर यांनी देवु केलेले निम्नतम दर प्रति नग रु.१२,०००/- प्रमाणे एकुण रु.६०,०००/- मात्र स्विकारण्यात येवुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन क्र.एम.एच.१७/ एजे-२९५१ (XUV) करीता नविन टायर खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या दरांमधील निम्नतम दरधारक, सतिषऑटो सेंटर, श्रीरामपुर उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. यामुळे सदरहूकामी दरपत्रकामधील त्यांचे प्रती नग रु१२,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**११ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रुग्णांना दिले जाणाऱ्या वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये बदल करणेबाबत.**

**अधिनिय २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१९, निर्णय क्र.२११.

**प्रास्तविक:-** उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये बदल प्रस्तावीत करुन प्रस्ताव दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.२११. अन्वये उपरोक्त प्रस्ताव रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच ज्या रुग्णालयांना जास्तीत जास्त अनुदान दिले जात आहे, त्या रुग्णालयांची समिती सदस्यांनी प्रत्यक्ष पाहाणी करुन जास्त अनुदान कशामुळे दिले जाते.यांची चौकशी करावी, असे ठरले.

वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत प्रस्तावीत केलेले बदल पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. नं. | जुनी नियमावली | दुरुस्त नियमावली | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया/ उपचारासाठी देण्यात येईल.<br>अ) ह्दयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार<br>ब) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार.<br>क) मेंदुची शस्त्रक्रिया नंतरचे उपचार<br>ख) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>ग) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया)<br>घ) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)<br>ङ) मनका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>च) कॉक्लीअर इन्प्लॅट | वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया/ उपचारासाठी देण्यात येईल.<br>अ) ह्दयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार<br>ब) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपण व नंतरचे उपचार.<br>क) मेंदुची शस्त्रक्रिया नंतरचे उपचार<br>ख) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>ग) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया, थॅलॅसेमिया, सिकलसेल ॲनिमिया)<br>घ) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)<br>ङ) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>च) कॉक्लीअर इम्प्लांट<br>छ) ऑर्गन ट्रान्सप्लान्ट– किडनी, हार्ट, बोनमॅरो, लिव्हर, कॉर्नीया.<br>ज) ॲक्सीडेन्ट– ज्यामध्ये व्हॅस्कुयूलर सर्जरी आवश्यक आहे व त्या अशा रुग्णांलाच की ज्या संस्थान रुग्णालयात होऊ शकत नाहीत.<br>झ) जॉईन्ट रिप्लेसमेंट- गुडघा व कमरेचा, खुबा | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा, याकरीता दिर्घआजार संख्या वाढविणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सांधा रोपन शस्त्रक्रिया.<br>ञ) रोग प्रतिकार शक्ती कमी करणारे आजार Immuno Logical Disease (SLE, Multiple Sclerosis, Rheumatoid Orthritis) | |
| २ | रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पान्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.<br>अ) रुग्ण वा / आणि रुग्णांचा पालक नोकरी करत असल्यास ज्याचेकडे नोकरी करत असेल / असतील त्या संस्थेने / व्यक्तीने रुग्णांला वा / आणि रुग्णाच्या पालकाला देण्यात येत असलेल्या पगारासंबंधीचे (वेतन/ भत्ते इ. सर्व मिळुन एकुन उपलब्धीचे) प्रमाणपत्र / पगाराची स्लीप आणि इतर मार्गाने (म्हणजे शेती / गुंतवणीकीवरील व्याज / घरभाडे इ.) रुग्णाला / रुग्णाच्या पालकाला उत्पन्न आहे वा नाही. याबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit)<br>ब) रुग्णाचा/ पालकाचा व्यवसाय वा व्यापार असेल तर रुग्णाने वा / आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.<br>क) रुग्ण वा/ आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पान्नाचे प्रमाण पत्र द्यावे.<br>क) रुग्ण जर शेती करत असेल तर त्याचे एकुण उत्पन्नाचे तहसिलदाराकडुन प्रमाणपत्र येते. परंतु त्याशिवाय तो ज्यांचेवर अवलंबुन आहे. त्या मुलाचे/ मुलीचे वा पालकाचे एकुण लक्षात घेणे जरुरी आहे म्हणुन कुटुंबातील सर्वाच्याएकत्रित एकुण उत्पन्नाचे वा पालकाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र द्यावे.मात्र रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान देण्यात येईल. | रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पन्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.<br>अ) रुग्णाचा / पालकाचा व्यवसाय / शेती वा नोकरी / व्यापार असेल तर रुग्णाने वा/ आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.<br>ब) रुग्ण वा/ आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पान्नाचे प्रमाण पत्र द्यावे.<br>क) रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान देण्यात येईल. | यापुर्वीच्या नियमावलीतील जाचक अटी काढून टाकुन गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा विचार केलेला आहे. |
| ३) | अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल. | अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा प्रा. लिमिटेड कंपनी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल.परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान देण्याचे रुग्णांलयाच्या यादीत असणे आवश्यक आहे. | वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा दुरुपयोग होऊ नये व गरीब व गरजु रुग्णांना लाभ घेता यावा. |
| ४) | संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येत नाही. | संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येणार नाही. | संस्थानमध्ये कमीत कमी दरात शस्त्रक्रिय केल्या जातात व पेशंटला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बिलात देखिल सवलत दिली जाते. त्यामुळे संस्थान रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. |
| ५) | अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे. | अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे सही, पदवी, रजिस्टेशन नंबर सह रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे. | अनुदान योजनेचा दुरुपयोग होऊ नये याकरीता आवश्यक. |
| ६) | औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १०,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही. | औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १०,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही. | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा. |
| ७) | अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने डी.डी.अथवा क्रॉस चेकने पाठविण्यात येईल. (अकौंटपेयी) | अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने आर.टी.जी.एस. ने पाठविण्यात येईल. | जेणे करुन लवकरात लवकर अनुदान रक्कम रुग्णापर्यंत पोहचणे करीता आवश्यक. |
| ८) | रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही. | रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही. | रुग्ण दुरुपयोग करु शकतात. |
| ९) | रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल.त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही. | रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल.त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही. | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा. |
| १०) | अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इर्मजन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालय खाते (अकौंट) बंद होणेचे आत अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्ततांकरुन अर्ज सादर करावा.जेणेकरुन त्यास संस्थानने पाठविलेल्या रकमेचा उपयोग होईल. | अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इर्मजन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालयातुन रुग्णास डिसचार्ज देणेपुर्वी अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज सादर करावा. | अनुदान मागणी अर्जदेणेकामी काही ठराविक कालावधी आवश्यक असल्यामुळे ही अट घातली आहे. |
| ११) | प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु अशा गंभीर आजारासाठी पाच वर्षानंतर पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येईल. | प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारासाठी (कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, व रक्तासंबधीचे आजार उदा.हिमोफेलिया, थॅलॅसेमिया, सिकलसेल ॲनिमिया) पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास यांना प्रत्येक वर्षी अनुदान देण्यात येईल. तसेच इतर आजारासाठी तीन वर्षानंतर पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी अट शिथिल केलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आर्थिक अनुदान देण्यात येईल. | |
| १२) | अनुदान मागणी अर्जासोबत रेशनकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. | अनुदान मागणी अर्जासोबत रेशनकार्डची व पेशंटची आधारकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. | आधार कार्ड हा युनिक आय डी नंबर असल्यामुळे सदर कार्डची झेरॉक्स आवश्यक आहे. |
| १३) | शासनाच्या जिवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी असणा-या रुग्णांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येत नाही. | केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या जिवनदायी/ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, तत्सम योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येणार नाही. | काही रुग्ण या दोन्ही योजनेचा लाभ घेऊ शकतात यासाठी सदर अट घातली आहे. |
| १४) | अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी (ॲटस्टेट प्रती ) असावी. | अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी (ॲटस्टेट प्रती ) असावी. | कोणत्याही योजनेचा लाभ घेणेकामी नियमानुसार साक्षांकित प्रती आसणे आवश्यक आहे |
| १५) | स्टॅम्प रिसीट वउपयोगिता प्रमाणपत्राबाबत. | अनुदान प्राप्त होणा-या रुग्णालयांनी पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा त्याच रुग्णासाठी वापर करावा, रुग्ण डिसचार्ज झाला असल्यास सदरच्या रुग्णाला दिलेल्या रकमेची स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावी. दिलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचे रकमेचा उपयोग त्या रुग्णासाठी न झाल्यास ती रक्कम संस्थान खाती त्वरीत जमा करणे आवश्यक आहे. | उपयोगिता प्रमाणपत्र अत्यावश्यक केल्यामुळे दिलेले अनुदान त्या रुग्णाला वापरले किंवा कसे ? याबाबत माहिती उपलब्ध होईल. |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान:-** श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, त्यास दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१ व शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/३७६/(७६)-का सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२, दि.५ मे २००६.अन्वये शासनाची मान्यता आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१९, निर्णय क्र.२११ अन्वये वैद्यकीय आर्थिक नियमावली बदलाबाबतचा प्रस्ताव मा.रुग्णालय उपसमिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रुग्णांना दिले जाणाऱ्या वैद्यकिय आर्थिक अनुदानासाठीच्या सुधारित नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील अ.नं.१४ वगळता इतर नियमास मान्यता देण्यात यावी.**

**अ.नं.१४ मध्ये अर्जासोबत जोडाव्या लागणाऱ्या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी ऐवजी स्वत: साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी असावी, असा बदल करणेत यावा.**

**तसेच सदरहू नियमावलीची दि.०१ एप्रिल २०१७ पासून अंमलबजावणी करणेत येऊन, महाराष्ट्र शासनास माहितीसाठी पाठविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका)

---

**१२ मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षिका यांनी संस्थान रुग्णालयांमधील औषधांच्या तुटवडयाबाबत चर्चा केली. नवीन औषध खरेदी प्रक्रिया सुरु असून ती प्रक्रिया अंतीम होणेस कमीत-कमी ३ महिन्यांचा कालावधी लागेल. सध्या औषधांची कमतरता असून मागील पुरवठाधारकांबरोबरच्या करारनाम्याचा कालावधी संपुष्टात आलेला असल्यामुळे ते पुरवठा करण्यास तयार होत नाहीत, अशी माहिती त्यांनी सभेस दिली.

यावर उपसमितीने अशी चर्चा केली की, विशिष्ट परिस्थीती पहाता, मागील पुरवठाधारकांना लेखी स्वरुपात मागील मंजूर दराने अथवा त्या दरांमध्ये ५-१०% वाढ करुन औषधे/ सर्जिकल साहित्य पुरवठा करणेस तयार आहेत का, याची विचारणा करुन, सविस्तर तौलानिक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री रामनवमी उत्सवासाठी श्री साईरामनवमी यात्रा कमीटी, शिर्डी यांना साईबाबा संस्थानकडून निधी देणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री. ज्ञानेश्वर (आबा) गोंदकर पा. अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी दि.२२.०३.२०१७ रोजीचे पत्रान्वये सालाबादप्रमाणे यावर्षी श्रीरामनवमी उत्सवामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कुस्ती, टांगा शर्यत व विविध कामांसाठी श्री साईबाबा संस्थान रक्कम खर्च करत असते. यावर्षी समाधी शताब्दी महोत्सव जवळ आलेला असल्याने आम्ही शिर्डी ग्रामस्थ या वर्षीची यात्रा अधिक आकर्षक व नियोजनबध्द पध्दतीने साजरी करणार आहोत. त्यासाठी यावर्षी अधिक रकमेचा खर्च होणार आहे. आम्ही शिर्डी ग्रामस्थ श्री साई संस्थानच्या रकमेमध्ये काही रक्कम लोकवर्गणीने गोळा करत असतो. तरी यावर्षी आम्ही केलेल्या नियोजनाप्रमाणे यात्रेचा तसेच सर्व कार्यक्रमांचा अंदाजे खर्च हा खालील प्रमाणे राहील.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | कुस्ती हंगामा खर्च | ६,००,०००.०० |
| ०२ | २ लावणी उत्सव खर्च | ३,२५,०००.०० |
| ०३ | तमाशा उत्सव खर्च | १,२५,०००.०० |
| ०४ | जाहिरात अंदाजे खर्च | १,००,०००.०० |
| ०५ | इतर किरकोळ खर्च (फटाके, लायटींग,फेटे, बॅन्ड , बॅचेस, कलाकार राहण्याचा व सत्कार समारंभ) | १,००,०००.०० |
| | एकूण रक्कम रु. | **१२,५०,०००.००** |

वरील तक्यात दर्शविले प्रमाणे अंदाजे रु.१२,५०,०००/- मात्र खर्च आहे. पैकी आम्ही सर्व ग्रामस्थ मिळून जवळपास रु.२,५०,०००/-मात्र लोकवर्गणी गोळा करणार आहोत. उर्वरीत रक्कम रु.१०,००,०००/- मात्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी मंजूर करावेत अशी विनंती केली आहे

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेत विषय नं.१११ व निर्णय क्र.१११ नुसार " श्री रामनवमी उत्सव"- २०१७ साजरा करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ६२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. यामध्ये रु.७,००,०००/- मात्र कुस्ती हंगामा या शीर्षाखाली तरतूद करण्यात आलेली आहे.

आता, श्री.ज्ञानेश्वर (आबा) गोंदकर पा. अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी दि.२२.०३.२०१७ रोजीचे पत्रान्वये रामनवमी उत्सव-२०१७ चे कार्यक्रमासाठी (कुस्त्या,लावणी कार्यक्रम, तमाशा मंडळ व इतर सर्व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी) रु.१०,००,०००/- मात्रची मागणी केलेली आहे.

श्री.ज्ञानेश्वर (आबा) गोंदकर पा. अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांनी मागणी केलेल्या १०,००,०००/- रकमेपैकी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेत विषय नं.१११ व निर्णय क्र.१११ नुसार कुस्ती हंगामा करीता रु.७,००,०००/- मात्र मंजूर केलेले आहे. उर्वरीत अतिरिक्त होणारा खर्च रु.३,००,०००/- मात्र मंजूरी होणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत लावणी व तमाशा या कार्यक्रमांसाठी निधी देणे उचित नाही, असे समितीचे मत झाले. परंतु अध्यक्ष, श्री साई रामनवमी यात्रा कमिटी, शिर्डी यांच्या मागणीचा विचार करता, त्यांना दि.२५.०२.२०१७ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१११ अन्वये**

**कुस्ती हगामाकरीता मंजुर असलेली रु७,००,०००/- मात्र व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी रु.३,००,०००/- मात्र रक्कम देण्यास मान्यता देण्यात आली. सदरहू रक्कमेचे संस्थान प्रतिनिधीमार्फत वाटप करणेत येऊन, उर्वरित रक्कम संस्थान जमा करण्यात यावी व लावणी/ तमाशा यासाठी या रकमेमधून खर्च करण्यात येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईप्रसादालयाकरीता भाजीपाला खरेदीबाबत.**

**प्रस्ताव –** प्रसादालय विभागासाठी सन २०१६-१७ करीता भाजीपाला खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.२२ अन्वये रक्कम रु.३,००,००,०००/- (रुपये तीन कोटी) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली होती. तसेच सदर खर्चास मा.उच्च न्यायालयाची सिव्हिल ॲप्लिकेशन क्र.३४८९/२०१६ अन्वये दिनांक ३१.०३.२०१६ रोजी मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार दर रविवार व गुरुवारी प्रसादालयाचे मागणीप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता येथील मोंढयावर लिलावामध्ये भाजीपाला खरेदी करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२० अन्वये सन २०१७-१८ करीता भाजीपाला खरेदीकामी विहीत पद्धतीने ई-निविदांची मागणी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया दिनांक १८.०३.२०१७ ते दिनांक ३१.०३.२०१७ या कालावधीत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक ०५.०४.२०१७ अशी ठेवण्यात आली आहे.

उपरोक्त ई-निविदा प्रक्रियेतील ऑनलाईन टेक्निकल बीड उघडून त्यातील पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडून मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणे, पुरवठा आदेश देणे याकामी अंदाजे एक महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे सध्या खरेदी करण्यात येत असलेल्या पद्धतीने वरील प्रकिया पुर्ण हाईपर्यंत दर रविवार व गुरुवारी प्रसादालयाचे मागणीप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता येथील मोंढयावर लिलावामध्ये भाजीपाला खरेदी करावा लागणार आहे.

तरी सन २०१७-१८ भाजीपाला खरेदी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठा आदेश देईपर्यंत सन २०१६-१७ सालासाठीचे खरेदी करण्यात येत असलेल्या पद्धतीने दर रविवार व गुरुवारी प्रसादालयाचे मागणीप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता येथील मोंढयावर लिलावामध्ये भाजीपाला खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता भाजीपाला खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नवीन पुरवठा आदेश होईपर्यंत, सन २०१६-१७ सालासाठी भाजीपाला खरेदी करण्यात येत असलेल्या पद्धतीने दर रविवार व गुरुवारी प्रसादालयाचे मागणीप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता येथील मोंढयावरुन लिलावाद्वारे भाजीपाला खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **माहे एप्रिल २०१७ करीता गावरान तुप, किराणामाल व अनुषंगीकसाहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव–** भांडार विभागाने सोबतचे दिनांक २१.०३.२०१७ चे मागणीपत्रान्वये एप्रिल-२०१७ महिन्यासाठी किराणामाल व अनुषंगिक साहित्य ६१ Items खरेदीची मागणी सादर केली आहे. सदर मागणीस अनुसरुन सदर माल खरेदीकामी खालीलप्रमाणे सविस्तर प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०१६-१७ मध्ये किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी दि.११ जुन, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीत वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच तांदुळ खरेदीसाठी दिनांक ३० जुन, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ व पेपरकप खरेदीसाठी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीकरीता पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. तर बिस्किटे मार्च-२०१६ मध्ये दिलेले पुरवठा आदेशास अनुसरुन मंजूर निविदा दराने मार्च-२०१७ पर्यंत टप्प्याटप्प्याने मा.व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी मान्यता घेऊन खरेदी करण्यात आलेली आहे.

सन २०१७-१८ या वर्षासाठी किराणामाल व अनुषंगिक साहित्य, बिस्किटे, भाजीपाला, गाईचे तूप इ. खरेदीकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ चे सभेत मान्य करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी दिनांक १८.०३.२०१७ ते ०७.०४.२०१७,

बिस्किटे खरेदीकामी दिनांक २१.०३.२०१७ ते ०७.०४.२०१७, भाजीपाला खरेदीकामी दिनांक १८.०३.२०१७ ते ३१.०३.२०१७ व गाईचे तूप खरेदीकामी दिनांक ११.०३.२०१७ ते ३१.०३.२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा भरण्यासाठी कालावधी ठेवण्यात आलेला आहे.

सदर कालावधी संपल्यानंतर या प्रक्रियेची तांत्रिक निविदा उघडणे, खाद्यतेल व तूप लॅब तपासणी करणे, तज्ञ समितीकडून सॅम्पल निवडणे, कमर्शियल निविदा उघडणे, त्यानंतर मा.उपसमिती/मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणे व त्यावर अंतिम निर्णय होणे, मंजूर निविदाधारक अनामत रक्कम भरुन घेणे, करारनामे करुन घेणे व पुरवठा आदेश देणे ही कार्यवाही एप्रिल-२०१७ अखेरपर्यंत पूर्ण होईल, असा अंदाज आहे.

भांडार विभागाने दिनांक २१.०३.२०१७ रोजी दिलेले ६१ Items ची मागणी व कॅन्टीन विभागाची दुधाची मागणी अशी एकुण ६२ Items ची मागणी झाली आहे.

सदर मागणीची छाननी खरेदी विभागाकडून करण्यात येऊन प्रत्यक्ष खरेदी करावयाचे किराणामाल व अनुषंगिक साहित्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर तक्त्यामध्ये बहुतांशी Items चे सन २०१६-१७ चे पुरवठा आदेशाचे Quantity पैकी बराच माल खरेदी करणे शिल्लक आहे. तथापि सर्व पुरवठाधारकांशी वार्षिक कालावधीचा पुरवठा आदेश दिलेनंतर केलेले करारनाम्यामध्ये पुरवठा आदेश दिलेल्या Quantity पैकी आवश्यकतेनुसार माल खरेदी करण्याची तसेच पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंत माल पुरविणे बंधनकारक असल्याची तरतूद आहे. तसेच निविदा कालावधीत एखाद्या Items ची मागणी संपली तर पुरवठा आदेशाच्या Quantity च्या २५ टक्के जादा माल खरेदी करण्याची तरतूद आहे.

करारनाम्यातील वरील अटी शर्तीचा विचार करता अ.नं.२५ भाजके पोहे ५० किलो, अ.नं.१४ जिलेबी रंग ७० किलो, एवढेच दोन Items ची वार्षिक पुरवठा आदेशापेक्षा अनुक्रमे ५० किलो व २३ किलोची मागणी जास्त झालेली आहे. तसेच अ.नं.६० पत्रावळ (चार कप्प्याची) प्रसादालयाने केलेली वार्षिक मागणी संपल्यानंतर या महिन्यात २५ टक्के वाढीव मागणी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन खरेदी केली आहे.

तथापि पुन्हा पत्रावळीची मागणी ३ लाख करण्यात आली आहे. पत्रावळीचे पुरवठाधारकांशी या जादा मागणीबाबत दूध्वनीवरुन चर्चा केली असून सदर पुरवठाधारक मंजूर दराने वाढीव मागणी पुरविण्यास तयार आहेत.

सदर माल सन २०१६-१७ चे मंजूर निविदा दराने खरेदी प्रस्तावित करताना भांडार विभागाचे सध्याचे मागणीतून काही शिल्लक येणे असलेला माल वजा करण्यात येऊन माल खरेदी Quantity कमी करण्यात आली आहे. तर काही Items चे बाबतीत पुढील महिन्यातील श्री रामनवमी उत्सव, शाळांना असणा-या सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी विचारात घेऊन मागणी तशीच ठेवण्यात आली आहे. तसेच पेपर पिशवीचे बाबतीत नवीन पुरवठा आदेश दिले तरी याकामी Raw मटेरियल खरेदी करणे, प्रिंट करणे, पाऊच करणे या बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत. तसेच अ.नं.७५,७६ व ७९ बिस्किटे मागील वर्षी मार्च-२०१६ मध्ये पुरवठा आदेश दिलेल्या निविदाधारकांकडून मागील मंजूर दराने खरेदी करावे लागतील.

भांडार विभागाचे मागणीची छाननी केल्यानंतर सादर केलेले तक्त्यातील अ.नं.८ मध्ये नमूद केलेल्या मालाचे खरेदीसाठी रक्कम रु.४,६४,९३,६००/- (रुपये चार कोटी चौसष्ठ लाख त्र्यान्व हजार सहाशे) मात्र खर्च येईल. तसेच अ.नं.७ नुसार खरेदी करावे लागणारे मालाची पुरवठा चलने प्रत्यक्षात पुरवठाधारकांना देण्यात आलेली आहेत.

तरी भांडार विभागाचे मागणीला अनुसरुन खरेदी विभागाने तयार केलेले तक्त्यातील रकाना क्रं.७ व ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एप्रिल-२०१७ साठी किराणामाल सन २०१६-१७ चे मागील पुरवठाधारकांकडून मंजूर निविदा दराने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे माहिती केंद्र इतर राज्यांमध्ये सुरु करणेस व सदर कामास गती येणेसाठी माहिती केंद्र मंडळ गठीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतूदः-** महाराष्ट्र शासनाने पुर्नघटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे अधिनियमात समितीचे कर्तव्य व अधिकार या शिर्षकाखाली अधिनियम नं.१७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व

कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी-पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव अयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे,भक्तगणांना आवश्यक सोयी सुविधा पुरविणे या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वतव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील अशी तरतूद आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीची सिकंदराबाद, बंगलोर व चेन्नई येथे सध्या माहितीकेंद्र सुरु आहेत. सदर माहितीकेंद्रावरुन ऑनलाईन दर्शन/आरती, रुम आरक्षण व देणगी आदी सुविधा उपलब्ध असून श्री साईबाबा संस्थानची अधिकृत प्रकाशने श्री साईभक्तांच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत.

**प्रस्ताव:-** मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांच्या सेवेसाठी भारतात अजून अशी १०० केंद्रे सुरु केली पाहीजेत अशी मनिषा व्यक्त केली असून त्यास अनुसरुन ज्या ज्या ठिकाणावरुन माहितीकेंद्र सुरु करणेबाबत मागणी होईल त्या त्या ठिकाणी माहितीकेंद्रे सुरु करणे साईभक्तांच्या दृष्टीने व बाबांचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठी महत्वाचे आहे.

जनसंपर्क विभाग कडील दि.०१.०३.२०१७ ची मंजूर टिपणीमध्ये आंध्रप्रदेशातील अमरावती, महाराष्ट्रातील नागपूर, गुजरातमधील अहमदाबाद, राज्यस्थानमधील जयपूर, मध्यप्रदेशातील भोपाळ, उत्तरप्रदेशातील लखनौ, छतीसगडमधील रायपूर, पंजाबमधील चंदीगड, ओडीसामधील भुवनेश्वर, पश्चिम बंगालमधील कोलकत्ता आणि बिहारमधील पटणा तसेच इतर राज्यतील राजधानीच्या ठिकाणी मोठया साईमंदिराच्या मदतीने माहितीकेंद्र सुरु करता येतील असे जनसंपर्क विभागाचे टिपणीत नमूद आहे.

**अनुमान:-** इमारत भाडे, फर्निचर व संगणकीय खरेदी/इंटरनेट, कंत्राटी कर्मचारी नेमणूक इ. करिता खर्चीक बाब. आरती –दर्शन, रुम बुकींग व देणगीव्दारे मिळणा-या उत्पन्नातून आर्थिक खर्च भरुन निघेल.

**विभागाचा मागणी:-** मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या मौखिक निर्देशान्वये श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिरडीची इतर राज्यांमध्ये माहितीकेंद्र सुरु करणेबाबत खालील विभागांमार्फत कार्यवाही करता येईल.

**१) जनसंपर्क विभाग:-** संस्थानचा जनसंपर्क विभाग हा मंदिर प्रशासन व साईभक्तांसाठी माध्यम साधणारा महत्वाचा विभाग असल्याने, देश-विदेशातील साईभक्त शिर्डीस आलेनंतर प्रथम जनसंपर्क विभागाशी संपर्क साधून संस्थान कामकाजविषयी माहिती घेत असतात. करिता जनसंपर्क विभागाकडे वरील शहरामधील व साईमंदिरामधील साईभक्तांनी माहितीकेंद्र सुरु करणेबाबत इच्छा व्यक्त केलेस जनसंपर्क विभागाने त्यांच्याकडून पत्र घेऊन, सदरचे पत्र मालमत्ता विभागाकडे वर्ग करता येईल.

**२) मालमत्ता विभाग:-** जनसंपर्क विभाग अथवा साईभक्तांनकडून मागणी प्रस्ताव (माहितीकेंद्राबाबत) आलेनंतर संस्थानचे इतर माहितीकेंद्रासाठी आवश्यक असलेली ५०० स्के.फु. जागा उपलब्ध होत असल्यास जागेचा ताबा घेणे, आवश्यक करारनामे करुन घेणे व गरज भासल्यास विधी विभागाचा अभिप्राय/ मार्गदर्शन घेणे, तसेच जनसंपर्क अधिकारी यांचे मदतीने इतर मोठया साईमंदिराशी समन्वय साधून माहितीकेंद्रासाठी जागा मिळणेबाबत मंदिराचे प्रतिनिधींशी चर्चा करणे.

**३) बांधकाम विभाग:-** संदर्भ क्र.०२ नुसार ज्या शहरातील माहितीकेंद्राबाबत जागेची पुर्तता पुर्ण झालेनंतर कार्यालयीन फर्निचर व अनुषंगिक साहित्य ह्या विभागामार्फत पुर्तता करुन घावयाची आहे. सदर विभागाकडून माहितीकेंद्रासाठी ५०० स्के.फु. जागा पुरेशी असलेबाबत दि.११.०३.२०१७ रोजीचे पत्रा सोबत आराखडा देखील सादर केलेला आहे.

**४) माहिती व तंत्रज्ञान विभाग:-** ताबा मिळालेल्या व फर्निचरसह तयार झालेल्या माहितीकेंद्रावर संस्थानची संगणकीय व्यवस्था तसेच माहिती व ऑनलाईन बुकींची सुविधा प्राधान्याने उपलब्ध करुन देणे व संबंधीतास संगणकीय संस्थान कामकाजाचे प्रशिक्षण देणे.

**५) सामान्य प्रशासन विभाग:-** सदर विभागामार्फत नवीन तयार होणा-या माहितीकेंद्रावर आवश्यक ते प्रशक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.

**६) प्रकाशने विभाग:-** उपरोक्त ०१ ते ०५ विभागाकडील प्राथमिक स्वरुपाचे कामकाज पुर्तता होत असतांना, प्रकाशने विभागामार्फत पाहाणी करुन त्वरीत तेथे संस्थान प्रकाशित साहित्य (पुस्तके, फोटो, सीडी व डायरी-कॅलेंडर्स इ.) भक्तांसाठी उपलब्ध करुन देऊन वेळोवेळी प्रशासकीय कामकाज पाहाणे

**७) लेखाशाखा:-** सुरु झालेल्या माहितीकेंद्रावर देणगी, आरती-दर्शन, रुम आरक्षण व पुस्तके विक्री यांच्या लेख्यांची नोंद ठेवणे व वेळोवेळी रेकॉर्ड चेक करुन घेण्याची कार्यवाही लेखाशाखा विभागाने करावी.माहितीकेंद्र सुरु करणेबाबतचे कामकाजात सुसुत्रता व गती येणाच्या दृष्टीने वरील ०७ ही विभागांचे मंडळ गठीत करुन कामकाज पुर्ण करणे सुखकर होईल. या करिता विभागाचा अभिप्राय खालील प्रमाणे सादर आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मतः- अ)** मालमत्ता विभागाकडून दि.१६.०३.२०१७ चे पत्रा सोबत अहमदाबाद, चंदीगड व तामिळनाडू येथील माहितीकेंद्राबाबतचे प्रस्ताव इकडील कार्यालयाकडे सादर झालेले आहेत. सदर प्राप्त प्रस्तावाबाबत उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मालमत्ता विभागाने प्रथमत: प्राथमिक आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करावी.

**ब)** मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांच्या सेवेसाठी भारतात अजून अशी १०० केंद्र सुरु करणेबाबत व्यक्त केलेला मनोदयास मुर्त स्वरुप येणेकामी उपरोक्त ०१ ते ०७ विभागांचे एक मंडळ गठीत करणे योग्यराहील, त्यास माहितीकेंद्र मंडळ या नावाने संबोधता येईल. जेणे करुन नवीन माहिती व सुविधा केंद्राबाबतची सर्व कामे ज्या त्या विभागाने टप्याटप्याने लवकरात लवकर पुर्ण केलेस कामास गती मिळेल व माहितीकेंद्र सुरु करता येईल.

करिता सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इतर राज्यांमध्ये संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.सचिन तांबे व जनसंपर्क अधिकारी यांचे मंडळ गठीत करणेत आले. या मंडळाने एका महिन्यामध्ये माहिती केंद्रासाठीची जागा व इतर अनुषंगीक बाबींची पाहणी करुन, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यापदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.कमलाकर बाळासाहेब रणदिवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधूर्ग यांनी दि.२४/०३/२०१७ रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

मी सद्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी या पदावर जिल्हा परिषद, सिंधूर्ग येथे दि.२०/१०/२०१५ पासून कार्यरत आहे. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे प्रशासकीय अधिकारी हे पद रिक्त असल्याचे समजते, या पदावर माझी काम करण्याची मनस्वी इच्छा आहे. यापुर्वी मी गट विकास अधिकारी, ता.राहाता, जि.अहमदनगर येथे सुमारे साडेतीन वर्ष कार्यरत होतो. तरी माझी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी या रिक्त पदी नियुक्तीकरिता शिफारस होणेस नम्र विनंती.

दि.०७/०८/२००९ चे मंजुर आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवर प्रशासकीय अधिकारी वेतनबॅण्ड १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीत एकूण ५ पदे मंजुर आहेत. त्यापैकी सध्यस्थितीत संस्थानचे प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे –

सध्यस्थितीत संस्थानचे प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | जात-प्रवर्ग | नेमणूकीचा प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे | हिंदु-मराठा | **खुल्या प्रवर्गातून** पदोन्नती. |
| ०२ | श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर | हिंदु-मराठा | मा.त्रिसदस्य समिती दि.१५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार शासनाकडून प्रशासकीय अधिकारी या पदावर सक्षम अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणूका होईपावेतो **खुल्या प्रवर्गातून तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis Promotion)** पदोन्नती. |
| ०३ | श्री.दिलीप त्र्यंबक उगले | हिंदु-कुणबी | मा.त्रिसदस्य समिती दि.१५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार शासनाकडून प्रशासकीय अधिकारी या पदावर सक्षम अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीने नेमणूका होईपावेतो **खुल्या प्रवर्गातून तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis Promotion)** पदोन्नती. |
| ०४ | श्री.अशोक रभाजी औटी | हिंदु-मराठा | प्रभारी कार्यभार |

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे आरक्षाबाबतचे पत्र क्र.बीसीसी-२००/ प्र.क्र.२२/ २०००/१६ ब दि.१९/०५/२००३ नुसार पाच प्रशासकीय अधिकारी या पदांपैकी दोन पदे राखीव असून तीन पदे खुल्या प्रवर्गासाठी आहेत. (दोन राखीव पदे– प्रथम अ.जा.१ व अ.ज.१ नंतर वि.जा.भ.ज., इमाव, विमाप्र आळीपाळीने)

प्रशासकीय अधिकारी या पाच पदांपैकी एक पद खुल्या प्रवर्गातून भरलेले आहे. उर्वरीत २ पदे खुल्या प्रवर्गातील व २ पदे आरक्षीत असे एकूण ४ पदे रिक्त आहेत. परंतु दैनंदिन कामकाजाचे सोईसाठी रिक्त दोन पदांवर तात्कालिक पदोन्नती व एक पदावर प्रभारी कार्यभार सोपविणेत आलेला आहे, अशी वस्तुस्थिती आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.२४/०५/२००८ निर्णय क्र.५००, दि.१८/०७/२०१२ निर्णय क्र.६३३, दि.२६/०२/२०१३ निर्णय क्र.१५७, दि.१५/०३/२०१४ निर्णय क्र.२११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार दोन प्रशासकीय अधिकारी पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार अथवा अन्य संवर्गातील दोन अधिका-यांची प्रतिनियुक्तीने संस्थानकडे नेमणूक होणेकामी दि.१९/०७/२००८, ०९/०९/२०१३, ०९/१२/२०१४, ३०/१०/२०१५, ०९/०१/२०१६, २२/०७/२०१६ व दि.१०/११/२०१६ अन्वये शासनाचे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेत आलेले आहे. परंतु शासनाकडून अद्यापपावेतो कोणत्याही अधिका-याची नेमणूक करणेत आलेली नाही.

आता, श्री.कमलाकर बाळासाहेब रणदिवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधूदूर्ग यांनी दि.२४/०३/२०१७ रोजीचे विनंती अर्जान्वये संस्थानचे रिक्त प्रशासकीय अधिकारी या पदावर काम करण्याची इच्छा असून नियुक्ती साठी शिफारस होणेबाबत विनंती केली आहे.

तसेच संस्थानचे प्रशासकीय कामाचा वाढता व्याप व सन २०१८ मध्ये श्री साईबाबांच्या समाधीला १०० वर्ष पुर्ण होत असल्याने करावयाच्या विकास कामांसाठी पुर्वतयारी या सर्व बाबी विचारात घेता, संस्थानचे रिक्त प्रशासकीय अधिकारी या पदावर श्री.कमलाकर बाळासाहेब रणदिवे यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक होणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शिफारस करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८ मध्ये श्री साईबाबांच्या समाधीला १०० वर्ष पुर्ण होत असल्याने विकास कामांची पुर्वतयारी करणे व संस्थानच्या प्रशासकीय कामाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा विचार करता, संस्थानचे आकृतीबंधामधील रिक्त असलेल्या प्रशासकीय अधिकारी या पदावर श्री.कमलाकर बाळासाहेब रणदिवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधूदूर्ग यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक होणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शिफारस वजा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **मौजे निघोज, तालुका राहाता येथील गट नं.177/178/282/1/284/288/6 मधील भुखंड क्रमांक 1 मधील इमारत बी व डी साईबाबा संस्थानला दान करणेबाबत श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी तालुका वसई यांचा दिनांक ११/११/२०१६ रोजीचा प्रस्ताव मुद्रांकशुल्क व नोंदणी शुल्क अदा करुन दान पत्रास दस्ताचा दस्त नोंदणी बाबत.**

**प्रस्ताव –** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (२) (ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी दानपत्राने स्विकारणेकामीच्या दानपत्राच्या नोंदणीकामी होणा-या खर्चास म्हणजेच मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ.खर्चास मान्यता मिळणेबाबत व दानपत्र नोंदणीकृत करणेबाबत..

**प्रस्तावना-** मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी साईबाबा संस्थानलाविनामोबदला हस्तांतर करणेकामी श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, ता.वसई यांनी दि.११/११/२०१६ रोजीच्या अर्जान्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.९४७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.काशिनाथ गोविंद पाटील,कोपरी,ता.वसई-विरार (पूर्व),जि.ठाणे यांची मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच या इमारतीमध्ये राज्यातील गोरगरीब,आदीवासी,वंचित,दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकीय सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रित अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली आय.ए.एस.अकॅडमी सुरु करणेचा अभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले.”

उपरोक्त दि.१७/१२/२०१६ रोजीच्या टिपणीतील मुद्दा क्रं.३ बाबत संस्थानच्या बांधकाम विभागाकडील अभिप्राय मागविणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील दि.२१/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये इकडेस अभिप्राय सादर केलेले आहेत. सदर पत्रातील मुद्दा क्रं.२ मध्ये सदरहू बी व डी इमारती मंजूर रेखांकनानुसार दिसून येतात. अर्जदार यांनी जोडलेल्या आराखडयानुसार सदरचे इमारतींना पश्चिमेस असलेल्या नगर-मनमाड महामार्गाकडून पूर्वेकडे जाणारा १२ मी.रस्ता असल्याचे दिसून येते. त्यानंतर या रस्त्याचे पूर्वेस अर्जदार यांचे उर्वरित क्षेत्र असून सदर इमारतींकडे जाणेसाठी रस्ता आहे. मात्र नकाशावर रस्ता दर्शविलेला नाही,असे नमूद केलेले आहे. त्याबाबत उक्त इमारतींच्या रेखांकन आराखडयातील ज्या ज्या सुविधा अर्जदार यांना आहेत त्या त्या सुविधा अर्जदार हे उक्त दानपत्राद्वारे संस्थानला देणार आहेत. मुद्दा क्रं.५ मध्ये सदर इमारतीचे बांधकामाचे मंजूर रेखांकनानुसार तळमजल्यावर पार्कींग दाखविले आहे. मात्र सध्या बी इमारतीचे तळमजल्याचे अर्ध्या भागात मच्छ संग्रहालय केल्याचे दिसून येते,असे नमूद आहे. त्याबाबत उक्त दानपत्र नोंदणीकृत झालेनंतर अर्जदार यांचेकडून सदर मत्स्यालयाची जागा खाली करुन घेता येईल. तसेच मुद्दा क्रं.६ मध्ये सदरहू इमारतींचे बांधकाम सुस्थितीत आहे. परंतु इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला इमारतीचे स्ट्रक्चरल इंजिनियर यांनी केलेले डिझाईन, ड्राईंग संस्थानला पुढील कामे करणेसाठी आवश्यक आहेत. स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकडून स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीबाबत सर्टिफिकेट घेण्यात यावे,असे नमूद आहे. याकामी

अर्जदार यांचेकडून पूर्तता करुन घेता येईल व मुद्दा क्रं.७ मध्ये स्ट्रक्चरल ऑडीटसाठी स्ट्रक्चरल सल्लागार यांची नेमणूक करुन त्यानंतर स्ट्रक्चरल ऑडीट करावे लागेल,असे नमूद आहे. याबाबत बांधकाम विभागाने मुद्दा क्रं.६ मध्ये सदरहू इमारतींचे बांधकाम सुस्थितीत आहे,असे नमूद केलेले आहे तेंव्हा आवश्यकतेनुसार उक्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट बांधकाम विभागामार्फत करुन घेता येईल.
सदरहू क्षेत्र निघोज ग्रामपंचायत हद्दीत असून या क्षेत्रालगत रस्ता,विद्युत व्यवस्था इ.उपलबध आहे. भविष्यात

सदरहू इमारती संस्थानचे विविध प्रकल्पांतर्गत सोयी-सुविधांसाठी उपयुक्त होतील,असेबाबत संस्थानचे बांधकाम विभागाने अभिप्राय दिलेले आहेत.

इकडील दि.२२/०३/२०१७ रोजीच्या कार्यालयीन टिपणीच्या अनुषंगाने उक्त दानपत्र नोंदणीकामी येणा-या मुद्रांक शुल्काची रक्कम माफ करुन मिळणेकामी मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ६४५२/ २०१७ दि.२४/०३/२०१७ अन्वये उक्त मिळकतीचा ७/१२ उतारा, दानपत्राचा मसुदा, मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय क्रं.९४७ ची प्रत व इतर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करणेस आला होता. तथापि मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील आदेश क्रं. कक्ष-३/ अभि.प्रक्र.३०/ १७/ ९५८/२०१७ दि.२४/०३/२०१७ अन्वये “उक्त दानपत्राचे प्रारुपमध्ये नमूद मिळकतीचे या कार्यालयातील सहायक नगररचनाकार यांनी सन २०१६-१७ चे केलेले मुल्यांकन रु.३२,२७,१३,५००/- इतके होत असून सदर दस्त हा त्यात नमूद मिळकतीबाबत अटी व शर्ती व बाबी पाहता दानपत्राचा होत आहे,असे माझे मत झाल्याने त्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची १ मधील अनुच्छेद ३४ च्या अंतर्गत अनुच्छेद २५ नुसार प्रभाव क्षेत्रासाठी ४ % प्रमाणे मुद्रांक शुल्क रु.१,२९,०८,५४०/- व जिल्हा परिषद अधिभार १ % प्रमाणे रु,३२,२७,१३५/- असे एकूण मुद्रांक शुल्क रु.१,६१,३५,६७५/- इतके येईल. परंतु महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ७० अन्वये मुद्रांक शुल्क रु.१,६१,३५,६८०/- (अक्षरी रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतके देय आहे. मान्य असल्यास ६० दिवसांचे आत ई-चलनाद्वारे शासनास जमा करण्यात यावे. अन्यथा सदर बाबतीत समाधानी नसल्यास महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमचे कलम ५३(अ) अन्वये मुख्य नियंत्रक,महसुल प्राधिकारी यांचेकडे किंवा मुल्यांकनाच्या बाबतीत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमचे कलम ३२(ब) अन्वये मा.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडे अपील दाखल करावे” असेबाबत आदेश निर्गत केलेले आहेत.

दानपत्र करुन देणार श्री.काशिनाथ गोविंद पाटील,कोपरी,चंदनसार,ता.वसई यांनी त्यांचेकडील दि.२३/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये उक्त दानपत्राचा व्यवहार मे.दुय्यम निबंधक साहेब,राहाता यांचेकडे नोंदवावयाचा आहे. त्याकामी मुद्रांक व नोंदणीचा तसेच तद्नुषंगिक जो खर्च सदरचा दस्तऐवज करणेसाठी होणार आहे तो खर्च साईबाबा संस्थानने सोसावा व संस्थानच्या खर्चाने सदरचा व्यवहार दानपत्र करुन देणार यांचेकडून पूर्ण करुन घ्यावा असे इकडेस कळवून त्यात त्यांनी दानपत्राने ज्या दोन्ही मिळकती संस्थानला दान देणार आहेत त्या मिळकती अर्जदार यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकीच्या व स्वतःचे उत्पन्नातून विकसित केलेल्या आहेत. त्याचेशी अर्जदार यांचे कुटूंबातील कोणत्यही सदस्याचा हक्क,हितसंबंध नाही. तरीसुध्दा संस्थानचे मालकी हक्काकामी काही त्रूटी राहू नये म्हणून अर्जदार यांचे कुटूंबातील व्यक्तींचे त्यांचीही सदरचे दान देण्यास व दानपत्रास संमती आहे याबाबतचे प्रतिज्ञापत्र संस्थानला देत असलेचे नमूद केलेले आहे.

अर्जदार श्री.काशिनाथ गोविंद पाटीलयांचे उक्त दि.२३/०३/२०१७ रोजीच्या अर्जावरुन ते सदर दानपत्राचे नोंदणीकामी होणारा खर्च म्हणजेच मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क तसेच तदनुषंगिक जो खर्च होणार आहे तो ते स्वतः खर्च करणेस तयार नाहीत. सदरचा खर्च हा श्री साईबाबा संस्थानने करावा असे त्यांनी उक्त अर्जात स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उक्त दानपत्र नोंदणीकामी मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील उपरोक्त आदेशान्वये मुद्रांक शुल्क रु.१,६१,३५,६८०/- (अक्षरी रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) + नोंदणी शुल्क रक्कम रु.३०,०००/- (रु.तीस हजार मात्र) अशी एकूण रक्कम रु.१,६१,६५,६८०/- (अक्षरी रु.एक कोटी एकसष्ट लाख पासष्ट हजार सहाशे ऐंशी मात्र) इतका खर्च संस्थानला करावा लागणार आहे. मा.मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचे आदेशाविरुध्द अपील करण्याची तरतूद आहे. तथापि अपीलाचे निर्णयास बराचसा कालावधी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेंव्हा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे आदेशामधील मुद्रांक शुल्करक्कम रु.१,६१,३५,६८०/- (अक्षरी रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतकी तक्रार ठेवून (अंडर प्रोटेस्ट) शासनास RTGS द्वारे जमा करता येईल. तसेच नोंदणी शुल्क रक्कम रु.३०,०००/- (रु.तीस हजार मात्र) इतकी शासनास RTGS द्वारे जमा करता येईल व उपरोक्त दानपत्राचा दस्त नोंदवून घेता येईल व तद्नंतर संस्थान पॅनलवरील वकील अॅड.श्री.जे.के. गोंदकर यांचे सल्ल्यानुसार मा.मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे आदेशा विरुध्द अपील दाखल करणेबाबतची कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त दानपत्राचे नोंदणीकामीचे मुद्रांक शुल्काची रक्कम रु.१,६१,३५,६८०/- (अक्षरी रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतकी संस्थानचे लेखाशाखेमार्फत RTGS द्वारे सरकारजमा करणेस व नोंदणी शुल्क रक्कम रु.३०,०००/- (रु.तीस हजार मात्र) इतकी RTGS द्वारे शासनास जमा करणेस व सदरचे दानपत्र मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडे नोंदविणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निघोज, तालुका राहाता येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील हे संस्थानला दान स्वरुपात देत असलेल्या बी व डी इमारतीचे दस्त नोंदणी करीता मुद्रांकव नोंदणी शुल्क भरणेकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी मुद्रांकव नोंदणी शुल्काची खातरजमा करुन दस्त नोंदणीबाबत पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या शिर्डी सर्व्हे नंबर नं. १/१०, १/११, १/१२, १/१४, १/१८, १/४, १/७, २/६, २/५, २/४, ३/१, ३/७ पैकी मधील इमारती काढून त्याठिकाणी नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामाबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

| अ.नं. | कलम | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम / उपकलम क्रमांक | तरतुदीचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, हीसमिती ची कर्तव्ये असतील. |
| ०२ | **२१** | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | **१ (ग)** | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** मा.त्रिसदस्य समितीच्या दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्रं. ५३० संमत करणेत आलेला आहे.

*“..... आजचे सभेपुढे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री उदय काप्रे यांनी श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पप्रकाशाचे सादरीकरण करून प्रकल्पाबाबत खालीलप्रमाणे माहिती दिली. नियोजित दर्शनरांग इमारत व मंदिर परिसराचा पुनर्विकास करतांना दर्शनरांगेचा हॉल, भव्य अशा उंचीचे छत व प्रशस्त प्रतिक्षालय, भव्य प्रवेशव्दार जेथे सर्व साईभक्त दर्शनासाठी एकत्र जमतील, अशा पदध्तीने नियोजनबध्द स्वरूपात विकसीत करण्यात येणार आहे.सध्या कमी पडत असलेली दर्शन रांगेची सुविधा व दि.०१ ऑक्टोबर,२०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षास सुरुवात होणार असलयाने तत्पुर्वी भक्तांना दर्शन रांगेची सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.”*

**मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद आदेश:-** Civil Application No.12347/ 2014 in Public Interest Litigation No.18/2011वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०५/०४/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्टची नेमणूक करणे व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चास राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्याचे अटीवर मान्यता प्रदान केलेली आहे.

**प्रस्तावना:-** मा. त्रिसदस्य समितीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेतील वर नमूद निर्णयानुसार सदरहु प्रकल्पासाठी आर्किटेक्ट नेमणुकीसाठी व प्राथमिक अंदाजानुसार अपेक्षित असलेल्या रु.३४०.२० कोटी इतक्या खर्चास मा. उच्च न्यायालयाचे परवानगी करीता सिव्हील अर्ज क्रं.१२३४७/२०१४ दाखल करणेत आला होता. सदर सिव्हील अर्जावर मा. उच्च न्यायालयाने दि.०५/०४/२०१६ रोजी वरीलप्रमाणे आदेश केला असून सदर आदेशान्वये विषयांकित प्रकल्पासाठी आर्किटेक्ट नेमणुकीस व येणा-या अपेक्षित खर्चास राज्य शासनाची प्रशासकिय मान्यता घेण्याचे अटीवर परवानगी दिलेली आहे.

त्यानुसार मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे जानं.३३१/२०१६, दि.२३/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांची सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणेस व रु.३४०.२० कोटी मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०९/०५/२०१६ रोजीचे पत्राव्दारे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो. नवी दिल्ली यांचेशी करावयाचे करारनाम्याचे (Tender Document/Contract Agreement) प्रारुप छाननीकरीता विभागास तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे, असे कळविले होते. आर्किटेक्ट यांनी दि.०७/०४/२०१४ रोजीचे ई-पत्राव्दारे यापुर्वी मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पासाठी दि.०९/११/१९९७ रोजी संस्थान बरोबर झालेल्या करारनाम्यातील सर्व अटी शर्तीनुसार तसेच करारनाम्यातील शर्त क्र.३, ४व ५ अन्वये ठरविण्यात आलेल्या ३.५०% इतक्या प्रोफेशनल फी मध्ये विषयांकित प्रकल्पासाठी काम करणेची तयारी दशिर्वली आहे. उपरोक्त करारनामा मसुदा मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांना दि.१७/०५/२०१६ रोजीचे पत्रान्वये सादर केलेला आहे.

मा.कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी पत्र क्रसासंवि-१०१६/६०४ प्र.क्र.८५/ का.१६दि.१९/०९/१६ रोजीचे पत्रान्वयेखालीलप्रमाणे कळविले आहे.

*“....संदर्भाधीन पत्रान्वये उपरोक्त विषयाबाबत आपण सादर केलेल्या प्रारुप करारनाम्याची या विभागाच्या विधी शाखेद्वारे छाननी करण्यात आली असून या संदर्भात विधी शाखेद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार*

*आपणास कळविण्यात येते की, प्रस्तावित करारनाम्यावर निळया शाईने नमूद करण्यात आलेल्या सुधारणांप्रमाणे प्रारुपांमध्ये आवश्यक बदल करण्यात यावेत तसेच रिक्त ठेवण्यात आलेल्या जागा भरुन आणि खाली नमूद अटींचे तंतोतंत पालन करुन करारनामा अंतिम करण्यात यावा.*

1. The Shirdi Sansthan is requested to see that the terms and conditions of the agreement are in the interest of the Sansthan.
2. It is advisable to add in Clause 2 under caption 'Schedule of Services'—assist the owners in tender process of contractor, if deemed necessary.
3. It is advisable to provide for time schedule for completion of work of the Architect. In case of delay in the work, it is advisable to provide for penalty clause.
4. It is advisable to put the burden of obtaining approval to drawings of the project from the statutory bodies on the architect.
5. In Clause *4.02 considering the deduction towards TDS etc., the sentence is added in blue ink.*

*विभागाच्या सुचनांप्रमाणे संस्थानद्वारे अंतिम करण्यात येणा-या करारनाम्याच्या प्रारुपाची प्रत या विभागाच्या माहितीस्तव सादर करण्यात यावी. विभागाने नमूद केलेल्या सर्व सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांची राहील. "*असे कळविले आहे.

नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग बांधकामासाठी सामासिक आंतराचे नियमात शिथीलता मिळणेकामी मा.सहसंचालक नगररचना, आणि मुल्यनिर्धारण विभाग, नासिक यांना संस्थानचे जा.क्र.२६७१/२०१६ दि.३१/०८/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. अद्याप सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही.

तसेच नियोजीत साईबाबा दर्शनरांग प्रयोजनासाठी वाढीव चटई क्षेत्र वापरास मान्यता मिळणेकामी मा. प्रधान सचिव (नवी-०१) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे संस्थानचे जा.क्र.२३९८/२०१६ दि.११/०८/२०१६ अन्वये प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२५/११/२०१६ रोजीचे पत्राने मा.संचालक, नगररचना, पुणे, मा.विभागीय सहसंचालक नगररचना, नाशिक, मा.सहाय्यक संचालक नगररचना, अहमदनगर व मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना प्रस्तुत प्रकरणी अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले आहे. अद्याप सदरहू प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही.

साईभक्तांना वेळेत व सुलभ दर्शन व्हावे यासाठी दि. १२/१२/२०१६ पासून टाईम दर्शन पास व्यवस्था सुरु करणेत आली आहे. सदर टाईम दर्शन प्रणालीत भक्तांना श्रींच्या दर्शनासाठी ठराविक वेळ निश्चित केली आहे. सदर प्रणालीचा परिणाम अभ्यासून निश्चित अशी दिशा ठरविणेसाठी सद्यस्थितीत दर्शन रांग इमारत बांधकाम प्रकल्प स्थगित ठेवणेत आलेला आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने गठीत कृती आराखडा उपसमितीचे वेळोवेळी झालेल्या बैठकांचे निर्णयानुसार शासकिय व निमशासकिय विभागांनी आपापले विभागाचे प्रस्तावासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचे अनुषंगाने संबंधीत शासकिय व निमशासकिय विभागांची कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.१६/०३/२०१७ रोजी संस्थानचे साईनिवास अतिथीगृह शिर्डी येथे बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीदरम्यान प्रारुप कृती आराखड्याची पाहणी करतांना मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी शताब्दी वर्षात होणा-या गर्दीचे अनुषंगाने जुने प्रसादालय परिसरातील साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती वगळून उर्वरीत जागेत नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करता येईल, असे सुचविले आहे.

अतिथीगृह, सुलभ शौचालय या इमारती तसेच सध्या मंदिर परिसरातील इमारती आहे तशाच ठेऊन साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या जागी नविन दर्शनरांग प्रकल्प हाती घेता येईल. यासाठी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांनी पुर्वी आराखडा सादर केला होता.

**प्रस्ताव:-** तरी शिर्डी सर्व्हे नं.१ पै., २ पै. व ३ पै. मधिल साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नविन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळाल्यास आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल. तरी त्यासाठी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी दि.१२.१२.२०१६ पासून बायोमेट्रीक बेस टाईम स्लॉट दर्शनव्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे. या प्रणालीमध्ये साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी दर्शनरांगेमध्ये जाणेसाठीची वेळ मिळते. यामुळे पुर्वी प्रस्तावित करण्यात आलेल्या ३०,००० साईभक्तांच्या क्षमतेच्या व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या मोठया स्वरुपाच्या प्रकल्पाची आता आवश्यकता नाही. त्याकरीता साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती आहे तशाच ठेवून फक्त जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा-सुविधांचे काऊंटर्सयोग्य जागेची निश्चिती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी (Demolition) प्रथमत: स्वतंत्र निविदा मागवण्यिात याव्या. याचबरोबर यापुर्वी रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या प्रकल्पाबाबत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या दि.२३.०४.२०१६ रोजीचा प्रस्ताव रद्द करणेत येऊन, वरीलप्रमाणे सुधारीत प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता घेणेसाठी नव्याने प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **संस्थान निधीतून विकसीत करणेत आलेल्या रस्त्यांवर बोर्ड तयार करुन बसविणेकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव –** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.६१ मा. विश्वस्तांच्या सूचनाबाबत मध्ये निर्णय क्र.९०४ (०७) खालीलप्रमाणे झालेला आहे.

".. शिर्डी नगरपंचायतीस, शिर्डी शहरामधील ज्या विकासकामांसाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, त्या ठिकाणी, त्या आशयाचा संस्थानचे नावाचा बोर्ड लावणेत यावा."

**प्रस्तावना:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीनुसार संस्थान निधीतून खालील रस्त्यांची विकास कामे करणेत आलेली आहेत.

**अ) सन २०१० पूर्वी विकसीत करणेत आलेले रस्ते.**

| **अ.नं.** | **रस्त्याचे नाव** | **सद्यस्थिती व झालेला खर्च रु.** |
|---|---|---|
| ०१. | जुना पिंपळवाडी रस्ता कॉक्रीटीकरण करणे | संस्थानमार्फत सन २००५ मध्ये काम पुर्ण एकूण खर्च रु.९६,४०,६६७.०० |
| ०२. | नविन पिंपळवाडी रस्ता कॉक्रीटीकरण करणे | संस्थानमार्फत सन२०१० मध्ये काम पुर्ण एकूण खर्च रु.२,५७,५७,९३१.०० |
| ०३. | रथपालखी रस्ता कॉक्रीटीकरण करणे | संस्थानमार्फत सन२००५ मध्ये काम पुर्ण एकूण खर्च रु.८०,१८,९७८.०० |

**ब)** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीनुसार सन २०१० नंतर संस्थान निधीतून खालील रस्त्यांची विकास कामे करणेत आलेली आहेत.

| रस्ता क्र. | रस्त्याचे नाव | लांबी(मी) | रुंदी(मी) |
|---|---|---|---|
| **महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे** यांचे मार्फत विकसीत करणेत आलेले ०५ रस्ते – (खर्च रु.९.३०कोटी) | | | |
| ०१. | शिर्डी निमगाव शिव रस्ता कॉन्क्रीटीकरण - नगर मनमाड रस्ता ते हॉटेल सन-एन-सॅन्ड पुर्व बाजू | ७७० | १०.१२ |
| ०२. | शिर्डी रुई रस्ता कॉन्क्रीटीकरण- शिर्डी निमगाव शिव रस्ता ते पिंपळवाडी रस्ता | ६२६ | ६/८ |
| ०४. | कनकुरी रस्ता कॉन्क्रीटीकरण ते पुनमनगरनगर मनमाड रस्ता- | १०७० | १२ |
| १०. | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील द्वारकामाई ते ताजीमखान बाबा चौकापर्यंत रस्ता.- पेव्हींग ब्लॉक्स | ७५ | ९ |
| ११. | गावठाण हद्दीतील विकास योजनेतील ६ मीटर रुंदीचा दक्षिणोत्तर रस्ता – ताजिमखान बाबा चौक ते नविन पिंपळवाडी रस्ता- पेव्हींग ब्लॉक्स | ३० | ६ |
| **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे** मार्फत विकसीत करणेत आलेले ०६ रस्ते – (खर्च रु.२५.३४ कोटी) | | | |
| ०३. | नांदुर्खी रस्ता – नगर मनमाड रस्ता ते नांदुर्खी शिव -कॉन्क्रीटीकरण | १८७७ | १८ |
| ०५. | विकास योजनेतील १८ मीटर रुंद वळण रस्ता -नगरमनमाड रस्ता ते आ.क्र. ३१ पर्यन्त -डांबरीकरण | १८४० | १८ |
| ०६. | विकास योजनेतील १५ मीटर रुंद आ.क्र.३१ ते नविन पिंपळवाडी रस्ता - कॉन्क्रीटीकरण | ५६५ | १५ |
| ०७. | विकास योजनेतील २४ मिटर वळण रस्ता – नगर मनमाड रस्ता ते साईश्रद्धा हौसिंग सोसा. रस्ता- डांबरीकरण | ४५० | २४ |
| ०८. | विकास योजनेतील हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील १८ मिटर रुंदीचा रस्ता - दक्षिणोत्तर निमगांव शिव ते पिंपळवाडी रस्ता- कॉन्क्रीटीकरण | ४५० | १८ |
| ०९ . ०९अ. | विकास योजनेतील १८ मिटर रुंदीचा रस्ता- नगर मनमाड ते स.नं.९ कॉन्क्रीटीकरण - पूर्व पश्चिम | ८४० | १८ |
| | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा पूर्व पश्चिम-रस्ता ते आरक्षण क्र.३१.-डांबरीकरण | १५०० | १८ |

शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०९ रस्त्यांची कामे पूर्ण असुन वापरात आहेत. मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदर रस्त्यांवर खालीलप्रमाणे बोर्ड तयार करून बसविता येतील.

| | |
|---|---|
| शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे निधीतून विकसीत करण्यात आलेला रस्ता.<br>लांबी : -------मीटर<br>रुंदी : -------मीटर |

वरीलप्रमाणे ५'X२' साईजचे ३३ नग बोर्ड ४ मि. मी. जाडीचे फायबर रेनफोर्स्ड प्लेटवर रेट्रोरिफ्लेक्टीव कलरमध्ये तयार करुन बसवून घेता येईल. त्यासाठी सन २०१६-१७ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.४,८४,३४१/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानूसार याकामी २०% कपात करुन रु.३,८७,४७३/- इतकी रक्कम येते.

**प्रस्ताव :** तरी संस्थान निधीतून विकसीत करणेत येत असलेल्या/ आलेल्या रस्त्यांवर बोर्ड तयार करुन घेणेसाठी येणारे खर्चास व सदरचे काम बांधकाम व मेकॅनिकल विभागामार्फत करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान निधीतून विकसीत करणेत आलेल्या रस्त्यांवर बोर्ड तयार करुन बसविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री गुरुस्थान मंदिराकरीता सोन्याच्या पादुका देणगी दाखल स्विकारणेस परवानगी बाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रींचे गुरुस्थान मंदिरामध्ये अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या पादुका पुर्वीपासुन स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सदर पादुका या चांदीमध्ये तयार करण्यात आलेल्या आहेत.

**प्रस्ताव-** साईभक्त श्री विजय कुमार बार्ली, रा.हैद्राबाद यांनी दि.२८/०२/२०१७चे विनंती अर्जान्वये श्रींचे गुरुस्थान मंदिरातील फोटोसमोरील चांदीच्या पादुकांना ७५० ग्रॅम सोन्याचे पादुकांचे आवरण देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. यासाठी लागणारा सर्व खर्च ते देण्यास तयार आहेत.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** श्रीसाईसच्चरितातील अध्याय क्र.५ मध्ये भाई नवाचे भक्तांनी आपले उपास्यदैवत असलेल्या अक्कलकोटच्या स्वामींनी स्वप्नामध्ये जाऊन दर्शन देऊन शिर्डीला जाण्याची आज्ञा केली व त्याचे स्मरण रहावे व भक्तांना अक्कलकोटचे स्वामींचे दर्शन शिर्डीतच व्हावे याकरीता श्रीगुरुस्थानचे निंबवृक्षाचे जवळ पादुका स्थापन केल्याचा उल्लेख अढळुन येतो. शके १८३४ साली श्रावण शुद्ध पर्वकाळामध्ये निंबवृक्षातळी स्वामींच्या पादुका श्री दादा केळकरांच्या व उपासनी महारांच्या हस्ते स्थापन केल्याचाही उल्लेख याच अध्यायात आहे, असे या पादुकांचे महात्म्य श्रीसाईसच्चरीतामध्ये नमूद आहे.

श्रीगुरुस्थान मंदिराचे जिर्णोद्धारापुर्वी याठिकाणी संगमरवरी पादुका स्थापन करण्यात आल्या होत्या. तसेच उत्सव काळात चांदीचे कव्हर बसविण्यात येत असे. परंतु मार्बलच्या व चांदीच्या दोन्ही पादुकांची झीज झाल्याने तसेच साईभक्त श्री.जी.कुमार, रा.बँगलोर यांचे दि.०६/०४/२००५चे विनंती अर्जान्वये व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९/०१/२००५चे सभेतील निर्णय क्र.२५ नुसार श्रीसमाधी मंदिर व श्रीगुरुस्थान मंदिरात नवीन मार्बल पादुका बसवुन त्यावर चांदीचे कव्हर बसविणेबाबत ठराव संमत झाला व दि.०९.०४/२००५रोजी गुढीपाडव्याचे शुभमुहूर्तावर संस्थानचे माजी विश्वस्त व माजी कार्यकारी अधिकारी महोदय यांचे हस्ते विधीवत पूजा करुन नवीन तयार झालेल्या श्रीगुरुस्थान मंदिरामध्ये मार्बल पादुका बसवुन त्यावर चांदीचे कव्हर कायमस्वरुपी बसविण्यात आलेले आहे.

साईभक्त श्री.बी.विजय कुमार यांनी सध्याच्या चांदीच्या पादुकांवर ७५० ग्रॅम सोन्याचे आवरण देणगीदाखल देणेबाबत विनंती केलेली आहे. यापुर्वीही श्री.बी.विजय कुमार यांनी समाधी मंदिराचे कळसाला, श्रीगुरुस्थान मंदिराला, श्रीशनि-गणपती-महादेव मंदिर, नंदादीप, समाधी मंदिरातील समाधी चौथ-याचे खालचे बाजूस, इ. ठिकाणी सोन्याचा मुलामा लावुन दिलेला आहे. त्याचप्रमाणे समाधी मंदिरातील सोन्याच्या पादुका, सोन्याची झारी व फुलपात्र असे देणगीदाखल दिलेले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्रीगुरुस्थान मंदिरातील पादुकांना सोन्याचे पादुका देणगीदाखल स्विकारणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दानशुर साईभक्त श्री.बी.विजय कुमार यांचेकडून श्रीगुरुस्थान मंदिरातील चांदीच्या पादुकांवर७५० ग्रॅम सोन्याचे आवरण देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **हॉस्पिटल खरेदी औषध भांडार विभाग, डेडस्टॉक विभाग व जिवनदायी योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण करणेसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मेडिकल स्टोअर व भांडार विभागाशी संबंधित सर्जिकल साहित्य, औषधे इ. खरेदीचे विशेष लेखापरिक्षण करण्यासाठी संदर्भ क्र.१ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमधिल मेडिकल स्टोअर व भांडार विभागासंबंधित सर्जिकल साहित्य, औषधे व इतर खरेदी सन २००७-०८ ते २०१३-१४ या सात वर्षाच्या कालावधितील दप्तराचे विशेष लेखापरिक्षण/तपासणी

करणेकामी शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, लातूर यांची विशेष लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती त्यास अनुसरुन सदर कालावधीचे लेखापरीक्षण पुर्ण करुन लेखापरीक्षण अहवाल त्यांनी सादर केलेला आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये मा. व्यवस्थापन समिती सभा विषय क्र.१०५ निर्णय क्र.१०५ दि.२५.०२.२०१७ नुसार जीवनदायी योजनेअंतर्गत रु.६४ कोटी रकमेच्या बिलांबाबत सध्या कार्यरत असलेल्या सनदी लेखापालांची नेमणूक करुन त्यांचे कडून प्राप्त होणारा स्वयंस्पष्ट अहवाल शासनास सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

संदर्भ क्र.३ "रुग्णालयातील जुन्या यंत्राची विक्री नोंद वही (Dead Stock Register) योग्य रितीने जतन करण्यात आलेली नाही. रुग्णालयातील यंत्रे विक्री करताना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १७ (४) मधिल तरतूदीचे पालन करण्यात आलेले नाही, औषध व सर्जिकल साहित्य यांची खरेदी पध्दती, प्रत्यक्ष प्राप्त झालेली औषधे, कालावधी, पुरवठा आदेश, दरपत्रक शिल्लक साठा यामध्ये सकृत दर्शनी गंभीर स्वरूपाच्या उणिवा आढळून येतात" अशा स्वरुपाचे आक्षेप घेण्यात आलेले आहेत. तसेच "रुग्णालयातील मेडिकल स्टोअर व भांडार विभागाशी संबंधित सर्जीकल साहित्य औषधे व इतर खरेदीचे विशेष लेखापरिक्षण त्वरीत करण्यात यावे" असे शासनाच्या निरिक्षण अहवालात सुचविले आहे. संदर्भ क्र.१ नुसार उपरोक्त प्रमाणे सन २०१४-१५ अखेर विशेष लेखापरिक्षण झालेले असुन सन २०१५-१६ व सन २०१६-१७ चे विशेष लेखापरिक्षण करुन तसा अहवाल सादर करता येईल.

उपरोक्त प्रमाणे दप्तराचे विशेष लेखापरिक्षण/ तपासणी करणेकामी शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, लातूर यांचे दि.१६.०३.२०१७ रोजीचे ईमेल व्दारे प्राप्त झालेल्या पत्राप्रमाणे त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मेडिकल स्टोअर व भांडार विभागाशी संबंधित सर्जिकल साहित्य, औषधे इ. खरेदीचे विशेष लेखापरिक्षणासाठी रक्कम रु.४०,०००/-, दोन्ही हॉस्पिटलचे डेड स्टॉक तपासणीसाठी रक्कम रु.३५,०००/- व जिवनदायी योजनेचे विशेष लेखापरिक्षणासाठी रक्कम रु.२५,०००/- अधिक १५ % सेवा कर इतकी लेखापरिक्षण फी व रुपये ७ प्रती कि.मी. प्रमाणे प्रवास खर्चाची मागणी केलेली आहे. वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, लातूर हे संस्थानचे वैधानिक शासन नियुक्ती लेखापरिक्षक म्हणून सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षी काम केलेले आहे. तसेच त्यांनी पुर्वी साईबाबा हॉस्पिटलच्या औषध भांडारचे सात वर्षाचे व इतर खरेदी विशेष लेखापरिक्षण केलेले आहे. त्याच प्रमाणे अपोलो मेडिकल दुकानाचेहि विशेष लेखापरिक्षण केलेले आहे. त्यांना या कामाचा चांगला अनुभव असल्याने त्यांच्याकडुन सदर कामे करुन घेणे योग्य ठरेल, असे मत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा हॉस्पिटल मधील औषध भांडार विभागासंबंधित सर्जिकल साहित्य, स्टेंट,औषधे व इतर खरेदीचे सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्ष कालावधीतील तसेच दोन्ही हॉस्पिटल संबंधित डेडस्टॉकचे सन २००६-०७ ते २०१६-१७ अखेर व साईबाबा हॉस्पिटलमध्ये सन २००७-०८ ते २०१३-१४ अखेर कार्यान्वित असलेल्या जिवनदायी योजनेचे विशेष लेखापरिक्षण/तपासणी करणेकामी शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, लातूर यांची विशेष लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती होणेस व यासाठी येणा-या खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल मधील औषध भांडार विभागातील सर्जिकल साहित्य, स्टेंट, औषधे व इतर खरेदीचे सन २०१५-१६ व २०१६-१७ या दोन वर्ष कालावधीतील तसेच दोन्ही हॉस्पिटलमधील डेडस्टॉकचे सन २००६-०७ ते २०१६-१७ अखेर व साईबाबा हॉस्पिटलमध्ये सन २००७-०८ ते २०१३-१४ अखेर कार्यान्वित असलेल्या जिवनदायी योजनेचे विशेष लेखापरिक्षण/ तपासणी करणेकामी शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक मे.शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं., चार्टर्ड अकौटंटस्, लातूर यांची विशेष लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करणेस व यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी

अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**<u>प्रास्ताविक–</u>** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**<u>मागणी–</u>**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परिचारीका | आई / वडील | Diabetes & arthritis | डॉ.म्हात्रे / डॉ.काळे | साईबाबा हॉस्पिटल | ११२९०.०० | ११२९०.०० | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | श्री.दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-लिपीक | आई | Diabetes | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ५४७९.०० | ५२०७.०० | |
| ३ | श्री.वसंत भानुदास लबडे<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा-टेक्नीकल अधिकारी | स्वंतः | Lab Test | डॉ.म्हात्रे | साईबाबा हॉस्पिटल | १७५०.०० | १४५०.०० | |
| ४ | डॉ.सुरवसे संतोष बब्रुवन<br>विभाग-भुलतज्ञ<br>हुद्दा-साईबाबा हॉस्पिटल | स्वंतः व आई | Diabetes Blood Pressure | डॉ.शिंदे | साईबाबा हॉस्पिटल | १०३३७.०० | १०३३७.०० | |
| | | | | | **एकूण** | **२८८५६.००** | **२८२८४.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| ५ | डॉ.वैभव सुभाष शिंदे<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-आर एम ओ | मुलगा | Urethral fistulla | डॉ.देवरे | के ई एम हॉस्पिटल,पुणे | ५९२९०.०० | ४९६५०.०० | अ.नं.५ ते १० करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटल मध्ये पाठविणेत आले आहे. |
| ६ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे<br>विभाग-द्वारावती भक्तनिवास,<br>हुद्दा – मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ३१९४१७.०० | २६११३७.०० | |
| ७ | मंजुषा विजय चौधरी<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल,<br>हुद्दा – लॅब टेक्नीशियन | वडिल | Ca Prostate | डॉ.मुंदडा | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई | २९८२७.०० | २९८२७.०० | |
| ८ | श्री.गोरक्षनाथ जगन्नाथ वाणी<br>विभाग-साईबाबा भक्तनिवास<br>हुद्दा-लिपीक | पत्नी | Ca | डॉ.राम नाईक | आनंद रुषीजी, हॉस्पिटल, अहमदनगर | १३००४७.०० | १२८४६७.०० | |
| ९ | डॉ.निहार भालचंद्र जोशी<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-भुलतज्ञ | आई | Ca | डॉ.राम नाईक | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल , पुणे | ९४८७३.०० | ७६७१३.०० | |
| १० | श्री.भाऊसाहेब निवृत्ती औताडे<br>विभाग-कॅन्टीन<br>हुद्दा-कुपन विक्रेता | वडिल | Ca | डॉ.देवरे | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक | १३६२९४.०० | १२२३९४.०० | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | निशा योगेश ठाकुर<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा-परिचारीका | मुलगी | A/H/O RTA Craniofamy & evacuation of SDH done | डॉ.गोडगे | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल,पुणे | ३८३२९६.०० | ३४४७६८.०० | |
| १२ | श्री.दिलीप गंगाधर बकरे<br>विभाग- अभिलेख कक्ष<br>हुद्दा-प्र.अधिक्षक | स्वंतः | CVA | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिीक,पुणे | ९०५५.०० | ९०५५.०० | |
| | | | | | **एकुण** | **११६२०९९/-** | **१०२२०११/-** | |
| | **क – संस्थानच्या यादीत रेफर केले होते परंतु उपचार न झाल्याने निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार केले होते.** | | | | | | | |
| ११ | श्री.कैलास नारायण घायदर<br>विभाग-लाडु व बर्फी निर्माता<br>हुद्दा-प्र.अधिक्षक | स्वंतः | Diabetes Retinopathy & Retinal detachment | डॉ.सोनटक्के | आनंद रुषीजी हॉस्पिटल व डॉ.बापये हॉस्पिटल,नाशिक,दृष्टीआय इंन्टीटयुट, औरंगाबाद | ४२५४०.०० | ३४०३२.०० | |
| १२ | श्री.साईनाथ दिलीप जगताप<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-लिपीक | वडील | Dengue fever with thrombocytopenia | डॉजाधवर | प्रवरा हॉस्पिटल, लोणी शताब्दी सुपरस्पेशालीटी हॉस्पिटल, नाशिक | ४८३४२.०० | ३७२६६.०० | |
| | | | | | एकुण | **९०८८२.००** | **७१२९८.००** | |
| | **अ + ब+ क एकूण** | | | | | **१२८१८३७/-** | **११२१५९३/-** | |

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.११२१५९३**/-** इतकी आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–</u>** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले. तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकरीता एम.एस.चेकर प्लेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:** कलम २ (१४) (घ)– भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे

**प्रस्तावना–** शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे सब स्टेशनकरीता शेड उभारणीचे काम पुर्ण झालेले असून, सदर शेडमधील केबल ट्रेंचवर एम.एस. चेकर प्लेट बसविणेबाबत बांधकाम विभागाने कळविले

आहे. बांधकाम विभागाचे मागणीनुसार इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष मोजमापे घेतली असून, घेतलेल्या मोजमापानुसार सदर ठिकाणी 8' x 4' x 6 mm साईजचे १५ नग चेकर प्लेटची आवश्यक आहे.

**मागणी–** वरील साईजची चेकर प्लेट इकडील विभागाकडे शिल्लक नसल्याने ती बाहेरील पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागवून खरेदी करावी लागणार आहे. या खरेदीकामी खर्चाचा अंदाजकरीता विविध पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली असून, त्यानुसार सदर मटेरिअल खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मशीनरींचा तपशील | नग | दर रुपये | एकूण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | M.S. Chequered Plate : Size – 8' x 4' x 6 mm | 15 | 8,-/594 | 1,28,-/910 |

उपरोक्तप्रमाणे चेकर प्लेट खरेदीकामी रुपये १,२८,९१०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चाची तरतूद सन २०१७-२०१८ या वर्षातील 'इमारत दुरुस्ती व देखभाल खर्च' या शिर्षातील अंदाजपत्रकात करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**विभागाचा स्पष्ट अहवाल–** शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकरीता एम.एस. चेकर प्लेट खरेदी करणेकामी पुरवठदारांकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,२८,९१०/- (अक्षरी रुपये एक लाख, अठ्ठावीस हजार, नऊशे दहा) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीच्या जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकरीता एम.एस. चेकर प्लेट खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२८,९१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देणे व ई-निवीदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव –** अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (१०)**

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयामार्फत सकाळी ६ ते १० या वेळेत भक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे (५ पुरी, कडधान्य भाजी, बर्फी वडी ) ही उक्ती ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंगव्दारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (१०) नूसार, जा.एसएसएस/वशी/११४२/२०१६ दि.०९/०६/२०१६ अन्वये, दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ या कालावधीकरीता प्रती पाकीटास मजूरी रु.१.४० पैसे सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.१५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**मागणी:-** प्रास्तविक नूसार दिनांक १६/0६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत भक्तांना अल्पोपहार (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक १५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती पाकीटास रु.१.४० पैसे सर्व करांसह प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार माहे जून-१६ ते माहे डिसेंबर-२०१६ अखेर ७ महिन्याचे बिलाची रक्कम रु.१९,२१,६८४/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.३२,९४,३१५/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास दि.१६/०६/२०१७ ते दिनांक १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.३९,५३,१७९/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लाख त्रेपन्न हजार एकशे एकोणऐंशी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.३९,५३,१७९/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लाख त्रेपन्न हजार एकशे एकोणऐंशी मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३९,५३,१७९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५** **श्री साईप्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या) पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देणे व ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव –** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (८)**

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनात देण्यात येणारी चपाती पुरी ही उक्ते ठेकेदारी/ पध्दतीनेआऊटसोर्सिंग द्वारे तयार करुन घेण्यात येत आहे त्यानूसार .श्री साई प्रसादालयातील चपाती/पुरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (८) नूसार, जा.एसएसएस/ वशी/११४०/२०१६ दि.०९/०६/२०१६ अन्वये, दि.यशोधरा महिला सह.उत्पादक संस्था, नाशिक यांना दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ या कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा आटा+मैद्यास रु.७६४/- (अक्षरी रक्कम रु. सातशे चौसष्ट मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आहेत. या कामाची मुदत दि.१५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी चपाती/पुरी तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता. सदरहु विषयावर सविस्तर चर्चाहोवून असे ठरले की, ''श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनासाठी आवश्यक असणा-या चपात्या तयार करणेकामी चपाती मशिन कार्यरत असून अजूनही मशिन्स घ्यावयाचे प्रस्तावितआहे. याकरीता मनुष्यबळाव्दारे चपात्या/पुरी तयार करुन घेणेआवश्यक वाटत नाही, यामुळे सदरहु प्रस्ताव रद्द करणेत यावा. असे ठरलेले आहे. "

तथापी सदरचे निर्णयास अनुसरुन, श्री साई प्रसादालयात सध्या ताशी २०,००० क्षमतेचे एकच मशिन कार्यरत आहे. सदर मशिन तांत्रिक बिघाडामुळे अथवा काही कारणास्तव बंद पडले तर पर्यायी दुसरे चपाती मशिन प्रसादालयाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे भक्तांची प्रसादभोजन व्यवस्थेकामी अडचण होवू नये. करीता दुसरे चपाती मशिन प्रसादालयात उपलब्ध होईपावेतो, तसेच श्रींचा शताब्दी महोत्सव-२०१८ करीता भक्तांची मोठयाप्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष

कालावधीसाठी संस्थानकडे पर्यायी व्यवस्था असावी म्हणून मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करुन घेणे आवश्यक असल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

**मागणी:-** प्रास्तविक नूसार दिनांक १६/0६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये आऊटसोर्सींग पध्दतीने चपाती/पुरी तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक १५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील चपाती व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती क्विंटल कोरडा गहु आटा + मैद्यास रक्कम रु.७६४/- प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार माहे जून-१६ ते माहे डिसेंबर-१६ अखेर ७ महिन्याचे बिलाची रक्कम रु.१८,५०,८६५/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.३१,७२,९११/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास दि.१६/0६/२०१७ ते दिनांक १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.३८,०७,४९३/- (अक्षरी रक्कम रुपये अडवतीस लाख सात हजार चारशे त्र्यानव मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

श्री साई प्रसादालयात सध्या ताशी २०,००० क्षमतेचे एकच मशिन कार्यरत आहे. सदर मशिन तांत्रिक बिघाडामुळे अथवा काही कारणास्तव बंद पडले तर पर्यायी चपाती मशिन प्रसादालयात उपलब्ध होईपावेतो, तसेच श्रींचा शताब्दी महोत्सव-२०१८ करीता भक्तांची मोठयाप्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी संस्थानकडे मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणे ही एक पर्यायी व्यवस्था असणे गरजेचे आहे.

तरी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपाती) व पुरी आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.३८,०७,४९३/- (अक्षरी रक्कम रुपये अडवतीस लाख सात हजार चारशे त्र्यानव मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ फेर सादर.

**निर्णय क्र.२४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये चपाती तयार करणेसाठी सध्या एकच चपाती मशिन कार्यरत असून दुसरे चपाती मशिन घेण्याचे प्रस्तावित आहे सदरहू मशिन काही तांत्रिक कारणास्तव बंद पडल्यास प्रसाद भोजनाच्या सेवेत खंड पडू नये याकरीता नवीन चपाती मशिन उपलब्ध होईपर्यंत, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपाती)/ पुरी मनुष्यबळाद्वारे आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नव्याने सुरु करावयाचे राज्य कौशल्य विभागातंर्गत अभ्यासक्रमाचे साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव –** **सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र :-** मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.९५१

**प्रस्तावित:-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत Maharashtra State Skill Development Society (MSSDS) अंतर्गत (1) Production & Manufacturing (2) Information & Communication Technology (3) Auto Motic Repair (4) Electrical (5) Fabrication (6)

Refrigeration & air Conditioning हे कोर्सेससुरु करणेची व त्याकामी असवश्यक असलेले साहित्य खर्चास मा.व्यवस्थापन समितीने दि.२२/१२/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९५१ अन्वये मान्यता आहे.

सदरील कोर्सेस करीता आवश्यक असलेले साहित्य/ संगणक/ सॉप्टवेअर/ संगणक साहित्य/फर्नीचर साहित्य खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. याबाबतची साहित्य यादी अंदाजे किंमतीसह सोबत जोडलेली आहे.

MSSDS अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वरील कोर्सेस सुरु करण्यास आवश्यक असलेली साहित्य/ संगणक/ साप्टवेअर/ संगणण्क साहित्य/ फर्नीचर खरेदी ही महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांकः भंखस्प्र.क.८२/भाग-II/उद्योग-४ मंत्रालय,मुबंई ४०००३२ दिनांक ३० ऑक्टोबर २०१५ नुसार साहित्य खरेदीकामी खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

**मागणीः-** MSSDS अंतर्गत आवश्यक असलेले साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील साहित्य हे ई-निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी विभागामार्फत खरेदी करता येईल.

**अनुमानः-** तरी MSSDS अंतर्गत आवश्यक असलेले साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख मात्र) खर्चास व सदरील साहित्य खरेदी ही खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये MSSDS अंतर्गत आवश्यक असलेले साहित्य विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यामकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी सभेस अशी माहिती मिळाली की, महाराष्ट्र शासनाने संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांची राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेवर (SCVT) सदस्य म्हणून नेमणूक केलेली आहे. ही बाब कौतुकास्पद असून सभेने त्यांचे अभिनंदन केले**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता** Defibrilator Machine **खरेदीबाबत.**

**प्रस्ताव –** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाने दि.०१/०९/२०१६ रोजीचे मागणी पत्रान्वये एक नग Defibrilator Machine ची मागणी केलेली आहे. कारण ऑपरेशन थिएटरमध्ये दैनंदिन शस्त्रक्रिया होत असतात त्यामध्ये काही रुग्णंना ह्दयाचा आजार देखील असतात. सदर मशिन हे रुग्ण अत्यावस्थेत असल्यावर जेव्हा त्याचे ह्दय बंद पडण्याचे स्थितीत असते त्यावेळेस अशा रुग्णांना सदर मशिनने शॉक देऊन ते पुन्हा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणेकामी वापरण्यात येते. सदर विभागात सध्या Defibrillator मशिन नसल्यामुळे त्यांनी नवीन एक नग मशिनची मागणी केलेली आहे.

वरीलप्रमाणे Defibrillator Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी दि.१४/१२/२०१६ चे ईमेल पत्रान्वये दरपत्रक मागविण्यात आले होते. M/s. Nihon Kohden India Private Limited, Gurgaon-Haryana यांनी त्यांचे खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे

| Sr. No. | Item Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | DEFIBRILLATOR - (Biphasic with recorder) | 1 | ३,४२,०६३.०० | ३४२०६३.०० |
| | | | **Total Amt in Rs.** | **३४२०६३.००** |

उपरोक्त प्रमाणे 01 नग Defibrilator Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३,४२,०६३/- (अक्षरी रू. तीन लाख बेचाळीस हजार त्रेसष्ठ मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाने दि.०१/०९/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.१५/०९/२०१६) Defibrillator मशिन नसल्यामुळे त्यांनी नवीन एक नग मशिनची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या भांखस– २०१४ / प्र.क्र. ८२/ भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाने दि.०१/०९/२०१६ रोजीचे मागणी पत्रान्वये एक नग Defibrilator Machine ची मागणी केलेली आहे. कारण ऑपरेशन थिएटरमध्ये दैनंदिन शस्त्रक्रिया होत असतात त्यामध्ये काही रुग्णंना ह्दयाचा आजार देखील असतात. सदर मशिन हे रुग्ण अत्यावस्थेत असल्यावर जेव्हा त्याचे ह्दय बंद पडण्याचे स्थितीत असते त्यावेळेस अशा रुग्णांना सदर मशिनने शॉक देऊन ते पुन्हा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणेकामी वापरण्यात येते. सदर विभागात सध्या Defibrillator मशिन नसल्यामुळे त्यांना नवीन मशिन विहीत पध्दतीने ई निविदा मागवुन खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता ०१ नग Defibrilator Machine विहित पध्दतीने ई निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ३,४२,०६३/- (अक्षरी रू. तीन लाख बेचाळीस हजार त्रेसष्ठ मात्र ) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग Defibrilator Machine खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,४२,०६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्स दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर 01 विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 3700/2006, दि. 15/03/2006 अन्वये मे.बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.ली. मुंबई यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स (Model-Luxtec LX 300) सर्व करांसहीत एकुणरु. 2,86,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आला आहे. सदर लाईट सोर्स नियमीत वापरात असुन लाईटसोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.19/04/2007 रोजी संपलेला आहे.सध्या लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअरपार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन बदलुन घेतले जातात.

सध्या कार्डीयाक ओ. टी.01 विभागातील लाईटसोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे विभागाने त्यांचे पत्र क्र. 348, दि. 07/02/2017 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर लाईटसोर्सची तपासणी केली असता सदर बल्ब खराब झाले असल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर लाईटसोर्स कार्डीयाक ओ.टी.विभागात नियमीत वापरात असल्याने दुरूस्त करणे आवश्यक आहे. सदर लाईटसोर्सचा बल्ब यापुर्वी कंपनीकडुन बील क्र. BLL/1804/14-15, दि.22/07/2014 अन्वये एकुण रू. 42,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला होता. सदर बल्ब दि. 25/07/2014 रोजी बदलणेत आला होता.

**मागणी:-** लाईट सोर्सचे पुरवठाधारक मे. बी. एल. लाईफसायन्सेस प्रा.ली. मुंबई यांचेकडे विचारणा केली असता कंपनीने त्यांचे पत्र क्र. BLL/P/Q-171/16-17 दि.06/03/2017 अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr.No. | Item Code | Description | Qty | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | 0025001** | Lamp Only for all 300 Watt Light Sources Except MLX | 01 | 45,000.00 |

| | |
|---|---|
| + CST @ 5 % | 2,250.00 |
| **Total Amount (Incl.all taxes) in Rs.** | **47,250.00** |

वरीलप्रमाणे लाईटसोर्सकरीता बल्ब खरेदी करणेकामी सर्वकरांसहीत एकुण रू.47,250/- (अक्षरी रू. सत्येचाळीस हजार दोनशे पन्नास मात्र) इतका खर्च येणार आहे.उपरोक्त बल्ब करीता कंपनी 650 तासांची वॉरंटी देत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासननिर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल. सदर दुरूस्तीकरीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापनसमिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यापुर्वी सदर झेनॉन बल्ब दि.25/07/2014 रोजी बदलणेत आला होता. सदर बल्ब बदललेनंतर 6200 तासांचा वापर झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर लाईट सोर्स कार्डीयाक ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. यापुर्वीच्या Xenon Bulb चा 6200 तासांचा सतत वापर झाला असुन सध्या त्याची प्रकाश मानता (intensity) खूपच कमी झाली असल्यामुळे बदलणे आवश्यक आहे. तसेच कार्डीयाक ऑपरेशन विभागात दररोज विविध प्रकारच्या हृदय शस्त्रक्रिया होत असतात. त्यामुळे लाईट सोर्सचा बल्ब बदलणे आवश्यक आहे. सदर बल्ब Monopoly Item नसुन अशाप्रकारचा बल्ब विविध पुरवठाधारक कंपन्याकडुन कोटेशन मागणी करुन निम्नतम दराने खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी कार्डीयाक ओ.टी. 01 विभागातील लाईटसोर्सचा बल्ब विविध पुरवठाधारक कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्डीयाक ओ.टी.1 विभागातील लाईटसोर्सचा बल्ब खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **माहे जुलै २०१६ ते डिसेंबर २०१६ जमा खर्च तक्त्यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव–** लेखाशाखा विभागामार्फेत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणाऱ्या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा-खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवसथापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येतो. त्या अनुषंगाने माहे जुलै,२०१६ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीतील मासिक जमा-खर्च तक्ते दिनांक ९.३.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात आले होते. निर्णय क्रमांक २०२ अन्वये जमा खर्च तक्त्यांचे अवलोकन करण्यात येऊन सदर तक्ते विवरणासहीत सादर करण्यात यावेत व त्यामध्ये प्रशासनावरील खर्चाचाही समावेश करण्यात यावा असे ठरले.

त्यास अनुसरुन माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ व माहे ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील मासिक जमा-खर्च तक्ते विवरणासह सादर करण्यात आले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| **महिना** | **जमा** | **खर्च** |
|---|---|---|
| जुलै २०१६ | ४०,२५,०५,६७०/- | २०,२६,८३,२१८/- |
| ऑगस्ट २०१६ | ५६,९७,७९,९६५/- | १८,०४,३९,९४८/- |
| सप्टेंबर २०१६ | ३६,११,१३,१३८/- | ३२,२९,९३,५८७/- |
| ऑक्टोबर २०१६ | ३४,०१,९७,८६२/- | १९,२५,२४,२०८/- |
| नोव्हेंबर २०१६ | ४२,९३,८२,७८६/- | १३,३९,५१,३४२/- |
| डिसेंबर २०१६ | ४७,४८,५४,४२३/- | १८,७३,५५,३०६/- |

लेखाविषयक (Accounting) नोंदी घेण्याकरिता कॉग्नीझंट मार्फत ईआरपी संगणक प्रणाली सुरू करण्यात आली असून त्यामधून अदयाप जमा खर्च तक्ते/विवरणे मिळत नाही त्यामेध्य अदयाप विकासीकरण चालु आहे. टॅली ही संगणक प्रणालीमध्ये लेखाविषयक नोंदी घेऊन जमा-खर्च तक्ते तयार करावे लागल्याने काहीसा विलंब होत आहे.

तरी माहे जुलै २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.२५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुलै २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीतील मासिक जमा-खर्च तक्त्यांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **तत्कालीन कार्यकारी अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांचे खुलाश्याबाबत.**

**प्रस्ताव–** माहे एप्रिल २०१५ मधील तांदूळ प्रकरणाबाबत मा.जिल्हाधिकारी सो. तथा समिती सदस्य यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना दि.१८/०९/२०१५ रोजी गोपनीय अहवाल सादर केलेला आहे. या अहवालावरुन संबंधीतानी समितीची पुर्व मंजुरी न घेता चुकीची कार्यवाही, दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचे दिसुन येते, याकरीता संस्थानचे मुख्यलेखाधिकारी, यांचेसह तत्कालीन कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांचेकडुन लेखी खुलासे मागविणेत यावेअसे मा.त्रिदस्यीय समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३५४ नुसार ठरले. त्यानुसार संबधितांना कारणे दाखवा नोटीसा काढण्यात आलेल्या होत्या.

श्री राजेंद्र मारुतीराव जाधव, माजी कार्यकारी अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११६/२०१६ दि.०८ एप्रिल, २०१६ रोजी देण्यात आलेली नोटीस–

आपण श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, येथे प्रतिनियुक्तीने दि.३०/०९/२०१४ ते ३१/०८/२०१५ या कालावधीत कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत असतांना तांदुळ प्रकरण मा.व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास न आणता चुकीच्या पद्धतीने हाताळून त्यामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचे खालील बाबींवरुन आढळून आले आहे.

१. मुख्य लेखाधिकारी यांचे दि.१०/०४/२०१५ चे अहवालामध्ये भांडारपालाने गोडाऊनमधील गहू व तांदळाच्या साठयाबाबत दि.१०/०१/२०१५ रोजी आपणाला अहवाल सादर केल्याचे निदर्शनास येते, त्यावर आपण हे प्रकरण श्री.बी.डी.साबळे, प्रशासकीय अधिकारी यांचेकडे सुपूर्त केले, तथापि त्यांनी दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत काही कारवाई केली नाही व त्यांचे सेवानिवृत्तीनंतर आपण हा अहवाल देण्याबाबत मुख्य लेखाधिकारी यांना सुचविले होते. मग १०जानेवारी २०१५ते मुख्य लेखाधिकारी यांनी अहवाल देईपर्यंत आपण जाणीवपूर्वक या प्रकरणाबाबत पुढील कारवाई करण्यास हलगर्जीपणा व दिरंगाई केल्याचे स्पष्ट होते. अधिक्षक, भांडार यांनी आपल्याला अहवाल सादर केल्यानंतर वेळीच या प्रकरणात लक्ष दिले असते तर हे प्रकरण कदाचित घडलेही नसते व संस्थानची विनाकारण झालेली बदनामी टळली असती.

२. आपण मुख्य लेखाधिकारी यांना हे प्रकरण गंभीर होते तर याबाबत अहवाल सादर करण्यासाठी एखादया विशिष्ट बाबीचे सविस्तर लेखापरिक्षण/चौकशी करण्याचे गोपनीय आदेश लेखी स्वरुपात का दिले नाही? त्यामुळे या प्रकरणाची गंभीरता लक्षात येऊन याबाबतचे लेखी रेकॉर्डही तयार होऊन उपलब्ध राहिले असते.

३. प्रसादालय विभागाने तांदूळाचे आळया, किडे आढळून आल्याचे आपणाकडे दि.९/४/२०१५ रोजीचे टिपणीव्दारे सादर केल्यानंतर लगेचच १दिवसात मुख्य लेखाधिकारी यांचा दि.१०/०४/२०१५ अहवाल घेणे, दि.१४/४/२०१५ रोजी जाणीवपूर्वक ठरविक अधिकाऱ्यांना नोटीस देणे, याबाबतची फाईल संबंधित प्रशासकिय अधिकारी यांचे स्वाक्षरीशिवाय (विहीत कार्यालयीन पद्धत सोडून) वरिष्ठांकडे सादर करणे या बाबी संशयास्पद आहेत.

४. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे आल्यानंतर किंवा व्यवस्थापन समिती सभेत चर्चेसाठी ठेवा अशी सूचना दिल्यानंतरही दि.३१/८/२०१५ पर्यंत आपण हा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला नाही व आपण सेवामुक्त होण्याच्या दिवशीच मा.जिल्हाधिकारी यांचेकडे जाणीवपूर्वक चक्रीय पद्धतीने सदरची फाईल सादर केलेली आहे.

५. मा.जिल्हाधिकारी यांचेकडे अपूर्ण कागदपत्र सादर केली तसेच दि२९/४२०१५ रोजी या प्रकरणी दिलेले आदेश, दिलेले पेमेंट, घेतलेले आक्षेप, धुरीकरण यासंबंधित माहिती मागितली होती. ती कुठलीही माहिती तत्परतेने सादर केली नाही.

६. सदर तांदूळ दि.१५-१६/४/२०१५रोजी सील केल्यानंतर तो स्वच्छ करण्यासाठी वेळोवेळी सादर केलेल्या टिपण्यांवर"कृ.चर्चा" असे अगर विपर्यस्त शेरे लिहून प्रकरण लांबवणे, त्याला वेगळी दिशा देणे व तांदूळ स्वच्छतेच्या कामाला मान्यता देण्यासाठी ३महिन्यांचा अवधी लावणे हे आपले वर्तन संशय निर्माण करण्यास पूरक आहे व संस्थानच्या हिताचा थोडाही लवलेश यामध्ये नाही.

७. सदर तांदूळ स्वच्छ केल्यानंतर खाण्यास योग्य रिपोर्ट येणे, आपण या प्रकरणी वेळीच लक्ष न दिल्यामुळे संस्थानला दुसरा तांदूळ खरेदी करावा लागणे , त्यामध्ये संस्थानचे भांडवल गुंतणे, तसेच स्वच्छ करणेसाठीची प्रक्रिया विलंब करणेच्या काळात दुसरा तांदूळ खरेदी केल्यामुळे भांडवल अडकून पडणे या बाबी घडल्या आहेत.

८. जो तांदूळ दि.७/४/२०१५ पर्यंत प्रसादालयात भक्तांना प्रसाद रुपाने खाऊ घालत होते. तोच तांदूळ दि.८/४/२०१५ चे प्रसादालयाच्या टिपणीवरुन सिल करुन वापरण्यास प्रतिबंद केला. वास्तविक पाहता सदर तांदळाची लॅब मार्फत तपासणी करुन त्याचा अहवाल व्यवस्थापनास देऊन त्यावर निर्णय घेणे गरजेचे होते. परंतू आपण तसे न करता परस्पर तांदूळ वापरण बंद केले. त्यानंतर सदर तांदूळ भक्तांना प्रसादरुपाने वापरण्यास अन्न व औषध प्रशासन विभागाने खुला केला आहे.

सदर प्रकरणात आपली कृती संशयास्पद दिसून येते प्रकरण हाताळताना आपण सर्व बाबी मा.व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास आणणे गरजेचे होते व समितीने मान्यतेने पुढील कार्यवाही करणे अपेक्षित होते परंतु आपण बेकायदेशीरपणे व व्यवस्थापन समितीला अंधारात ठेवून स्वत च्या अधिकारात चुकीची कार्यवाही केलेली दिसून येते. आपण एका आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या सुप्रसिद्ध देवस्थानचे प्रशासकीय प्रमुख म्हणून कार्यरत असतांना आपल्याकडून वरिलप्रमाणे घडलेल्या बाबींची अपेक्षा नव्हती. सदर प्रकरणामुळे विविध वृत्तपत्र तसेच इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्यामुळे साईभक्तांच्या मनात संस्थानची प्रतिमा मलीन झाली, संस्थानच्या नांवलौकिकास बाधा पोहोचून संस्थानची विनाकारण बदनामी झाली आहे.

याबाबत आपणावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव का सादर करण्यात येऊ नये? या बाबतचा लेखी खुलासा ७दिवसाचे आंत सादर करावा अन्यथा याबाबत आपले काही म्हणणे नाही असे समजून उचित कारवाईसाठी शासनाकडे अहवाल सादर केला जाईल याची नोंद घ्यावी.

**श्री राजेंद्र मा. जाधव यांनी त्यांचे दि१८/४/२०१६ रोजीचे पत्रान्वये दिलेला खुलासा-**

समितीने विषयांकित बाबी प्रकरणी दि.०८/१०/२०१५ रोजी ठराव पारित केल्यानंतर बऱ्याच विलंबानंतरही मला माझे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली नव्हती तथापि, आता संदर्भ क्र.२ येथील माझ्या पत्रान्वये मी विनंती केल्यानुसार माझा खुलासा मागविण्यात येत आहे. त्याबद्दल मी समितीचा आभारी आहे. उक्त ठरावामध्ये समितीचे सदस्य तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी समितीला सादर केलेल्या गोपनीय पत्रातील नमूद बाबींवर माझा खुलासा मागविण्याचे ठरले असल्याने मी उक्त

संदर्भ-२ येथील पत्रान्वये जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या पत्राची मागणी केली होती. तथापि उक्त पत्रासोबत ती देण्यात आलेली नाही. तथापि, मला पाठविण्यात आलेल्या नोटीसमधील सर्व मुद्दे त्या पत्रात नमूद आहेत असे गृहित धरुन मी मुद्देनिहाय खुलासा पुढीलप्रमाणे सादर करीत आहे :

**मुद्दा क्र. १: अधिक्षक, भांडार विभाग यांनी गहू व तांदुळाच्या साठयाबाबत दिलेल्या अहवालावर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करणे.**

भांडार अधिक्षक यांनी दि१०/१/२०१५ रोजी अहवाल सादर केल्यानंतर लागलीच प्रक्रीयशी संबधित नसलेले तत्कालिन प्रशासकीय अधिकारी श्री साबळे यांना मी याबाबतची तपासणी वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत सुचविले होते व त्यासाठी या प्रकरणी कधी कधी या खरेदीपोटी विलांची अदागयी झाली त्याचा तपशील सादर करण्याबाबत देखील त्याच चर्चेच्यावेळी लेखाधिकाऱ्यांना सुचति केले होते. तथापि, वेळोवेळी सूचना देऊनही श्री. साबळे यांनी मार्च २०१५अखेर त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यन्त अहवाल सादर केला नाही ही वस्तुस्थिती दर्शक माहिती मी समितीला प्रथम सादर केलेल्या दि.२९/०४/२०१५च्या प्रस्तावामध्ये स्पष्टपणे नमूद केली होती. प्रशासन अधिकाऱ्यांसारख्या वरिष्ठ वर्ग -१अधिकाऱ्यांच्या सदर कृतीबाबत समितीने उचित कारवाईबाबत सुचविणे यामागे अपेक्षित होते. धान्याच्या अतिरिक्त साठयाबाबतची चौकशी मी स्वत: सुरु केली होती. त्यामुळे यामध्ये माझ्याकडून दिरंगाई अथवा हलगर्जीपणा घडला असे म्हणणे उचित होणार नाही व असे करण्याचे मला काही कारणही नव्हते. यातील खरेदी प्रक्रिया ही फार पूर्वीच पार पडली होती. त्यामुळे हे प्रकरण कदाचित टाळता आले असते. याचा अर्थ स्पष्ट होत नाही.

**मुद्दा क्र. २: मुख्य लेखाधिकाऱ्यांना लेखापरिक्षण/ चौकशी करण्याचे आदेश गोपनीय का दिले नाहीत.**

मुख्य लेखाधिकाऱ्यांना लेखापरिक्षण अथवा चौकशीचे आदेश मी केव्हाही दिलेले नाहीत. किंबहुना या प्रकरणी चौकशी करण्यास सक्षम नाहीत. त्यांना मी केवळ या पोटी अदा करण्यात आलेल्या रक्कमा व परिमाण याबाबतची माहिती सादर बिलावरुन संकलितपणे देण्याच्या सूचना केल्या होत्या, ही माहिती अभिलेखावरील

खुल्या स्वरुपातील असल्याने यासाठी गोपनीय सूचना देण्याची आवश्यकता नव्हती. त्यांनी सादर केलेली माहिती लेखा स्वरुपात अभिलेखावर उपलब्ध आहे. चौकशीच्या टप्प्यातील ज्या बाबी गोपनीय स्वरुपात हाताळणे आवश्यक आहे, त्या सर्व बाबी मी गोपनीय स्वरुपात हाताळल्या असल्याने सदरहू कागदपत्रांचे अवलोकन करता स्पष्ट होईल.

**मुद्दा क्र. ३: लेखाधिकाऱ्यांचा अहवाल ३दिवसांत घेणे, जाणीवपूर्वक ठराविक अधिकाऱ्यांना नोटीस देणे, याबाबतची फाईल प्रशासकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीशिवाय हाताळणे:**

वर मुद्दा क्र.१येथे नमूद केल्याप्रमाणे याबाबतची माहिती संकलित करण्याबाबत मुख्य लेखा धिकाऱ्यांना यापूर्वीच सांगण्यात आले होते. त्यामुळे एका दिवसांत अहवाल घेतला हे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. या अतिरीक्त धान्य खरेदी प्रक्रियेशी संबंधित कोणकोणते अधिकारी त्या ठिकाणी कार्यरत होते याबाबतची माहिती विषयक अहवाल कामगार विभागाकडूनच घेण्यात आला होतो. जो अभिलेखावर उपलब्ध आहे. त्यानंतर या नोटीसचे प्रारुप देखील कामगार अधिकाऱ्याकडून तयार करुन घेण्यात आले होते जे मी पुढे सुधारीत करुन गोपनीयरीत्या निर्गमित केले होते. माझ्या सहीने निर्गमित व्हावयाचा प्रत्रव्यवहार अथवा टिप्पण्या मी स्वत: तयार करण्यामध्ये गैर काहीही नाही.

**मुद्दा क्र. ४: जिल्हाधिकारी यांच्या "सदरचा विषय व्यवस्थापन समितीच्या बैठकीत चर्चेसाठी ठेवणे" अशा सुचना असूनही ३१/०८/२०१५ पर्यंत हा विषय प्रलंबित ठेवला.**

तांदळात अळया अथवा किडे आढळल्याबाबत जेव्हा वृत्तपत्रात बातम्या आल्या, त्या लगतच्या शिर्डी येथील व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी समितीच्या अध्यक्षांसमक्ष बैठकीपूर्वी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याकडे या अनावश्यक खरेदीबाबत विचारणा करुन आपण स्वत:च्या घरी राशन भरतांना एवढया मोठया प्रमाणात खरेदी करता काय? अशा देखील त्यांना विचारणा करुन त्यांच्याकडून झालेल्या नुकसानीची वसुली करा अशा सूचना अध्यक्षांसमक्ष स्वत: दिल्या होत्या. त्या अनुषंगाने विहित कार्यपद्धतीनुसार या खरेदीशी संबधित असलेल्या सर्वांचा प्राथमिक खुलासा घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी चक्रीय पद्धतीने दि.२९/०४/२०१५ रोजी प्रथमत: सादर केला होता. त्यावर जिल्हाधिकारी महोदयांनी ज्या अतिरीक्त कागदपत्रांची मागणी केली होती त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन पुन्हा हा प्रस्ताव २०मे,२०१५दरम्यान व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी पुन्हा दुसऱ्यांदा सादर करण्यात आला. याबाबतच्या टिप्पणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे सोबत सादर केली आहेत याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे, असा उल्लेख करुनही जर का ती कागदपत्रे आढळली नसल्यास तशी नोंद जिल्हाधिकाऱ्यांनी विहित प्रशासकीय कार्यपद्धतीनुसार त्यावर नोंद करु शकले असते. तसेच हा विषय चक्रीय पद्धतीऐवजी व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ठेवावा अशा सुचना त्यावर नमूद करुन मा.अध्यक्षांच्या मान्यतेसाठी सादर करु शकले असते. त्यावर अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार हे समितीच्या अध्यक्षांना आहेत हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

अनुषंगाने नमूद करण्यात येते की. जिल्हाधिकारी यांनी मला याबाबत अशा तोंडी सूचना कधीही केल्या नव्हत्या व तसे केले असते तर जो प्रस्ताव चक्रीय पद्धतीने सादर केला होता तो तशाच व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यास मला स्वत: कोणतीही अडचण नव्हती. सदर माहितीचे अवलोकन करता हा प्रस्ताव वेळोवेळी समितीच्या निदेशानुसार तयार करुन तिसऱ्यांदा ३१/०८/२०१५ रोजी समितीसमोर सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव अंतिमत: जेव्हा सादर केला त्यावरील टिप्पणीमध्ये अध्यक्षांनी केलेल्या सूचना नुसार तांदुळ सफाईबाबत करण्यात आलेली कार्यवाही बाबतचा अहवाल हा भांडार अधिक्षकांकडून ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयात प्राप्त झाल्यानंतर लगेचच तिसऱ्यांदा सादर करण्यात आलेला आहे या सादर करण्यात आलेल्या टिप्पणीमध्ये या सर्व बाबींचा सविस्तरपणे उल्लेख आहे. दिनांक ३१/०८/२०१५ हा माझ्या सेवामुक्तीचा शेवटचा दिसत असला तरी त्या दिवशी असे प्रस्ताव मी सादर करु शकत नाही असा कोणताही नियम नाही.

**मुद्दा क्र. ५: जिल्हाधिकारी यांनी २९/०४/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसारची माहिती तत्परतेने सादर केलेली नाही.**

दि.२९/०४/२०१५ रोजी प्रथमत: प्रस्ताव माझ्या स्तरावरुन चक्रीय पद्धतीने जिल्हाधिकारी यांना सादर केला होता व त्यानंतर काही दिवसांनी जिल्हाधिकारी महोदयांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसह नस्ती मला प्राप्त झाल्यानंतर तसेच मुद्यांत नमूद केल्याप्रमाणे ती लागलीच पुन्हा२०मे च्या दरम्यान सादर करण्यात आली आहे. संबंधित टिप्पणीमध्ये याचा स्पष्ट उल्लेख असून त्यानुसार कागदपत्रे तपासल्यास जिल्हाधिकारी त्यावर असे नमूद

करु शकले असते. तथापि त्यावर काहीही नमूद न करता व तारीखही न नोंदविता १५-२० दिवसांनी ती कागदपत्रे त्यांनी परत पाठविली होती.

**मुद्दा क्र. ६: दिनांक १५ व १६ एप्रिल रोजी तांदुळ सील केल्यानंतर तो स्वच्छ करण्यासाठी परवानगीस विलंब करणे.**

प्रशासनाने सादर केलेल्या टिप्पणीवर "कृपया चर्चा" असे लिहिलेल्या शेऱ्याचे विपर्यस्त अशी संभावना करणे चुकीचे आहे. चर्चा म्हणून नमूद केल्यानंतर संबंधित अधिकारी येऊन चर्चा करतात व त्या चर्चेच्या अनुषंगाने टिप्पणीच्या स्वरुपात फेरसादर करण्यात येते ही सर्वसाधारण कार्यपद्धती अवलंबिण्यात आलेली आहे. अन्न व औषध प्रशासनाने सदरचा तांदुळ वापरण्यास प्रतिबंध केल्यानंतर त्यांची परवानगी घेऊन प्रथमतः त्याचे धुरीकरण करण्यात आले. धुरीकरण केल्यानंतर तो माल पुर्णपणे झाकून ठेवून काही कालावधीसाठी त्याची प्रतिक्षा करावी लागते याची आपणांस कल्पना असावयास हवी. त्यांनतर या प्रकरणी सफाईसाठी वेळोवेळी कोणकोणती कार्यपद्धती अवलंबिली याबाबतचा तत्कालिन अध्यक्षांना सादर केलेल्या अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. त्यामुळे यामध्ये माझ्याकडून कोणताही विलंब झालेला नसून याबाबत नाहक संशय व्यक्त करणे उचित नाही.

**मुद्दा क्र. ७: तांदुळ स्वच्छ करण्याची प्रक्रिया लांबविल्यामुळे संस्थानाला दुसरा तांदुळ खरेदी करावा लागणे व या खरेदीमुळे संस्थेचे भागभांडवल अडकून पडणे**

तांदळाच्या अतिरिक्त खरेदीमुळे संस्थानचे अनावश्यक भागभांडवल अडकून पडले व संस्थानचे आर्थिक नुकसान झाले. हा मुद्दा समितीने या ठिकाणी मान्य केल्याबाबत समितीचा मी आभारी आहे. तांदळामध्ये अळया व किडे सापडल्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने हा तांदुळ संस्थानला वापरण्यास प्रतिबंध केल्यानंतर तो प्रसादालयाच्या वापरासाठी घेणे कदापि शक्य नव्हते व चालू असलेल्या प्रसादालयात तांदळाची व्यवस्था करणे क्रमप्राप्त होते. सुरुवातीला तातडीने बराच आवश्यक तेवढा तांदूळ देणगी स्वरुपात उपलब्ध करुन घेण्यात आल्यानंतर व्यवस्थापन समितीने मान्य केलेला आवश्यक निविदा दर म्हणजे पुर्वीच्या रु.३८५१अथवा रु.३३४०या दराच्या तुलनेत रु. २९७५या नवीन दराने खरेदी करण्यात आला होता. संस्थानचे भांडवल यामध्ये गुंतविण्याचा प्रश्न नव्हता तर ती एक आवश्यक बाब होती. तथापि, यापुर्वी आवश्यक भरमसाठ प्रमाणात चढया दराने तांदूळ खरेदी केल्यामुळे संस्थानचे मोठया प्रमाणात भागभांडवल अडकून पडणे तसेच आर्थिक नुकसान होणे, या खरेदी प्रक्रियेशी मी संबधित नसल्यामुळे माझ्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान झाले हे म्हणणे उचित होणार नाही. तसेच याबाबतचा प्रस्ताव अंतिमतः ३१/०८/२०१५ रोजी व्यवस्थापन समितीला सादर करण्यात आला त्यावेळी भांडारपालाने तांदूळ सफाईमार्फत सादर केलेला अहवालामध्ये महिला बचत गटाने तांदूळ साफ केल्यानंतर ज्या जाळयाच्या/पुंजक्याच्या स्वरुपात तांदुळ सफाई न होऊ शकलेल्या अशा १८ते २०गोणी इतका तांदूळ वेगळा काढला होता. ज्याचा भांडार अधिक्षकाच्या अहवालात व माझ्या टिप्पणीत स्पष्ट उल्लेख आहे. तो देखील पुढे भक्तांना खाण्यासाठी वापरण्याची किमया संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पार पाडली आहे याबद्दल प्रशासनाचे कौतुक करण्याची आवश्यकता वाटते. तांदुळ वापरण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचा अहवाल हा ऑक्टोबरमध्ये प्राप्त झाल्याचे आपल्याच ठरावात नमूद केलेले दिसते. त्यामुळे यापूर्वी हा तांदूळ वापरात आणणे कदापी शक्य नव्हते, हे पुन्हा एकदा आवर्जुन नमूद करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ८: तांदळाची लॅबमार्फत तपासणी करुन अहवाल व्यवस्थापनास न देता परस्पर तांदुळ वापरणे बंद करणे**

तांदळात सापडलेल्या अळया व किडे याबाबतचा अहवाल प्रसादालयाच्या आचाऱ्यांपासून सर्व कर्मचारी, भांडार अधिक्षक, संबधित प्रशासकीय अधिकारी यांच्यामार्फत समितीकडे सादर झाला. ज्यांचे व्हीडीओ व फोटो आजही अभिलेखावर उपलब्ध आहेत. त्यातील अळया व किडे साफ करण्याची प्रक्रिया करुन देखील काही अळया व किडे शिजवलेल्या भातामध्ये सापडत असल्याची बाब आचाऱ्यांनी नमूद केली होती. अशा स्थितीत एखाद्या भक्ताने याबाबत तक्रार केली असता सदर संस्थानाच्या संबंधित सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाकडून गुन्हा दाखल होऊ शकला असता व त्यामुळे संस्थानचीही जगभर नामुष्की झाली.असती व ही नामुष्की टाळण्यासाठी सर्व संबधितांशी चर्चा करुन सारासार विचारपूर्वक हा तांदूळ वारण्याचे बंद करण्यात आले व त्या लगोलाग अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सदरहू तांदळाची पाहणी केल्यानंतर तो वापरण्यास प्रतिबंध करणारे पत्र संस्थानला दिलेले आहे. व तो खाण्यास अयोग्य असल्याची पुष्टी केली आहे. असे असतांना आणखी वेगळ्या लॅबचा रिपोर्ट देण्याची आवश्यकता नव्हती. वर केल्याप्रमाणे लगेचच या विषयी व्यवस्थापन समितीच्या बैठकीत तोंडी चर्चा झाली होती. त्यानंतर या प्रकरणी घ्यावयाच्या दक्षतेबाबत समितीच्या अध्यक्षांनी मला वेळोवेळी केलेल्या सुचना व त्यावर मी पाठविलेल्या उत्तराच्या

तपशीलाचे कागदपत्र सोबत जोडले आहेत. त्यावरुन याबाबतची माहिती व्यवस्थापन समितीला वेळोवेळी अवगत करण्यात आली होती हे स्पष्ट होते. अन्न व औषध प्रशासनाने हा तांदूळ वापरण्यास नंतर खुला केला असला तरी यासाठी तो वापरण्यास सुरवातीला प्रतिबंध त्यांनीच केला होता व तो वापरण्यास योग्य करण्यासाठी प्रशासनाने त्याचे धुरीकरण करणे, मशीनवर तो साफ करुन त्यानंतर विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन महिला बचत गटाची यासाठी नियुक्त करुन त्यांच्याकडून साफ करणे यासारखी लांबलचक प्रक्रिया पार पाडल्यानंतर हे शक्य झाले आहे ही गोष्ट व्यवस्थापन समितीने नजरेआड करणे इष्ट होणार नाही.

उक्त प्रकरणी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुनच प्रशासनातील सर्व संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्या प्राप्त अहवालानुसारच त्या त्या वेळी आवश्यक असलेल्या कृती माझ्याकडून करण्यात आलेली आहे आणि या विषयाबाबतची माहिती व्यवस्थापन समितीला चक्रीय पद्धतीने तसेच अध्यक्षांना वेळोवेळी सादर केलेल्या अहवालाव्दारे अवगत करण्यात आलेली आहे. समितीला आवश्यकता वाटल्यास याबाबतच्या कागदपत्रांची त्रयस्थांमार्फत पडताळणी करु शकतात. त्रयस्थांमार्फत पडताळणी करण्याच्या मागणीचे कारण असे आहे की, यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांनीच समितीसमोर प्रस्ताव तयार करुन सादर केला असल्याने त्यातील हे पुरावे जाणीवपूर्वक मा. अध्यक्ष यांच्या निदर्शनास त्यांनी आणलेले नाहीत. दि. १०/०८/२०१५ च्या ठरावात उप कार्यकारी अधिकारी यांनी तसे नमूद केले आहे. अशी वाक्यरचना दिसते. उप कार्यकारी अधिकारी यांचा या अतिरिक्त खरेदीत सहभाग असल्याने त्यांचे विरुद्ध देखील या प्रकरणी कारवाई प्रस्तावित आहे हे मुद्दाम निदर्शनास आणण्यात येत आहे.

संस्थानच्या या सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध त्यांच्या गैरकृत्याबाबत काहीना काही मुद्यांवर मी कारवाई सुरु केली होती व याही प्रकरणात त्यांच्याविरुद्ध कारवाईचा प्रस्ताव मी व्यवस्थापन समितीला सादर केला होता. त्यामुळे प्रशासनातील हे सर्व संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक या बाबतची माहिती दडवून नव्याने पदभार स्वीकारलेल्या कार्यकारी अधिकारी तसेच अध्यक्ष यांची दिशाभूल करीत आहेत असे माझे स्पष्ट मत आहे. सस्थानाच्या प्रशासनातील ज्या अधिकाऱ्यां विरुद्ध मी गैरकृत्याबद्दल कारवाई सुरु केली आहे त्यांच्याकडून या प्रकरणी तातडीची खरीखुरी माहिती सादर केली जाण्याची अपेक्षा ठेवता येणार नाही. तथापि, या सर्व बाबतीत त्यांच्याकडून प्रकरणाची माह्ति असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांची देखील दिशाभूल केली जात आहे की ते जाणीवपूर्वक अशी भूमिका घेत आहेत याबाबत आश्चर्य वाटते.

संस्थेमधील माझ्या कारकिर्दीत संस्थेच्या हॉस्पिटलमधील दोन डॉक्टरांना स्टेंट खरेदी प्रकरणात निलंबित केले होते. औषध खरेदी निविदेमध्ये नसलेल्या दुसऱ्या कंपनीच्या कमी दर्जाची पर्यायी औषधे खरेदी करणे इत्यादी बाबी मी उघडकीस आणल्या आहेत व त्या कर्मचाऱ्यांना व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने निलंबन करण्यात आलेले आहे. पुढे याबाबत लेखापरिक्षण अहवालामध्ये या बाबी स्पष्ट झाल्या असल्याचे कळते. त्यानंतर मी राबविलेल्या पारदर्शक निविदा प्रक्रियामध्ये जवळजवळ रु.३०कोटीच्या औषधांच्या खरेदीमध्ये जवळपास रु.१०कोटी इतकी संस्थानच्या रक्कमेची बचत झालेली आहे व ही बचत करताना औषधांच्या दर्जामध्ये कोणतीही तडजोड केलेली नाही. अशाच पद्धतीने धान्य खरेदीमध्ये देखील खुली व पारदर्शक पद्धती अवलंबिल्यामुळे पूर्वीच्या रु.३८५१या दराने खरेदी केलेला तांदुळाच्या तुलनेत याच जातीचा दर्जेदार तांदूळ रु.२९७५पर्यंन्त खरेदी केलेला आहे. त्यामुळे संस्थानाच्या निधीची बचत करण्यामध्ये कसोशीने प्रयत्न केले असून याबाबत आवश्यकता भासल्यास या संदर्भातील ठरावाचे अभिलेख त्रयस्थांमार्फत तपासणी करुन व्यवस्थापन समिती याची खातरजमा करु शकते.

प्रस्तुत प्रकरणी वर नमूद केलेले विवेचन आपणाला या प्रकरणाची निश्चित कल्पना येण्यासाठी पुरेशी आहे असे वाटते. या सर्व प्रकरणांमध्ये प्रमुख मुद्दा हा गहू व तांदळाची अनावश्यक अतिरिक्त खरेदी झाली होतीकाय, दर एवढा उच्च असणे व या अनावश्यक व भरमसाठ खरेदीमुळे संस्थानचे नुकसान झाले आहे काय याबाबत निश्चि भूमिका व्यवस्थापन समितीने विचारात घेण्याची गरज आहे व हाच मुद्दा व्यवस्थापन समितीला वेळोवेळी सादर केलेल्या ठरावामध्ये मी समितीसमोर मांडलेला आहे. तथापि, या मुख्य मुद्याला जाणीवपूर्वक बगल देण्याची, दिशाभूल करण्याची बाब प्रशासनाकडून केली जात आहे. व्यवस्थापन समितीसमोर मी चक्रीय पद्धतीने जो प्रस्ताव सादर केलेला आहे त्यावर निर्णय होण्याची आवश्यकता असतांना केवळ दिरंगाई करणे गैर अथवा प्रशासकीय त्रूटीबाबतचे गैरलागू मुद्दे या ठिकाणी उपस्थित करुन मुख्य मुद्यापासून समितीला दूर नेले जात आहे असे या टिप्पणीवरुन दिसते.

मी सादर केलला प्रस्ताव हा समितीसमोर प्रथमत: दि.२९/०४/२०१५ रोजी सादर केला असून त्यावर निर्णय घेण्याऐवजी तो अद्याप पर्यन्त दडपणे हे कोणत्या विहित कार्यपद्धतीत बसते याबाबत आवश्यक वाटल्यास

शासनाच्या विधी व न्याय विभागाचा किंवा ज्या मा.उच्च न्यायालयाने समिती गठीत केली आहे त्यांच्याकडून मार्गदर्शन घेता येईल.

वरील विवेचनासह या प्रकरणी मी मागणी केलेली कागदपत्रे प्रशासनाने मला उपलब्ध करुन दिल्यास त्या प्रकरणी आणखी विस्तृत स्वरुपात माझे म्हणणे सादर करण्याचा हक्क मी राखून ठेवत आहे. व माझा उक्त खुलासा मान्य करण्याची समितीला माझी विनंती आहे.

**तत्कालीन मुख्यलेखाधिकारी श्री.दिलीप रघुनाथ झिरपे, यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ४५५२/ २०१६ दि.०५ मार्च, २०१६ रोजी देण्यात आलेली नोटीस**

आपण श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, येथे प्रतिनियुक्तीने दि.३०/०९/२०१४ ते ३१/०८/२०१६ या कालावधीत कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत असतांना तांदुळ प्रकरण मा.व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास न आणता चुकीच्या पद्धतीने हाताळून त्यामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचे खालील बाबींवरुन आढळून आले आहे.

१. १ ऑक्टोबर २०१३ ते ३१ मार्च २०१४ या कालावधीतील संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या विविध विभागांचे लेखापरिक्षण श्री. सुरेश डौले आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटट, राहूरी यांनी करुन लेखापरिक्षण अहवाल सादर केला होता. भांडार विभाग लेखापरिक्षण अहवालात सर्व साधारण दोष क्रं. २ भांडार विभागात वर्षाअखेरीस असणारा गहू व तांदूळ यांचा स्टॅक मोठया प्रमाणावर दिसून आला परंतू त्यास कीड लागू नये म्हणून काळजी घेण्यात यावी अन्यथा नुकसान संभवते असा अहवाल ११ एप्रिल, २०१४ रोजी दिला आहे.

    या दोषावर आपण काहीच कारवाई केलेली नाही. किमानपक्षी ही बाब संस्थानचे मा. कार्यकारी अधिकारी अगर इतर वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे होते.

२. आपण तांदूळ साठा असतांना अतिरीक्त खरेदी केल्याचा अहवाल दिलेला आहे. आपण अहवालाप्रमाणे तांदुळ अतिरिक्त खरेदी केला होता तर त्याची बीले आपण का आदा केली ? कारण तांदूळाचा जादा आहे जे आपल्याला सुरेश डौले या अंतर्गत लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालावरुन ज्ञात होते कारण अंतर्गत लेखापरिक्षण विभाग हा आपल्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे. तरी देखील आपण तांदूळाची बीले आदा केली आहेत म्हणजेच आपणांस तांदूळाची खरेदी अतिरिक्त होत आहे हे ज्ञात असूनही आपण त्याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केल्या चे सिद्ध होते.

३. आपले अहवालामध्ये आपण टप्प्याटप्प्याने मालाची खरेदी करण्याऐवजी एकदम तांदळाची खरेदी केली ही बाब प्रकर्षाने ठळकपणे निदर्शनास आणलेली आहे. तसेच एकाच वेळी माल स्वीकृती, मालाचे आवक जावक यावर पर्यवेक्षकीय नियंत्रणाचा अभाव इ. करणामुळे रक्कम रु. ४३,४८,९२८/- चे आर्थिक नुकसान झालेचे नमूद केले आहे. आपण मुख्य लेखाधिकारी या अत्यंत जबाबदारीच्या पदावर काम करीत असूनही अंतर्गत लेखापरिक्षक यांनी सादर केलेल्या दि.११/०४/२०१४ च्या अहवालातील दोषांवर जाणीवपूर्वक लक्ष दिले नाही. याममध्ये हलगर्जीपणा व दिरंगाई केल्याचे स्पष्ट होते.

४. आपल्या अहवालामध्ये सदर तांदूळ हा ऑगस्ट व सप्टेंबर २०१४ मध्ये खरेदी करण्यात आलेचे व आणखी तो दोन महिने पुरेल इतका शिल्लक आहे. असे नमूद केले आहे. अंतर्गत लेखापरिक्षक यांनी आपणाला ११ एप्रिल २०१५ रोजी गहू-तांदूळ साठयाबाबत अहवाल दिलेला असतांनाव अंतर्गत लेखापरिक्षण विभाग आपले अधीनस्त कार्यरत असतांना, आपण सदर बाबींकडे लक्ष का दिले नाही. ऑगस्ट सप्टेंबर २०१४ मध्ये तांदूळ खरेदी करण्यापूर्वी वरील बाब वरिष्ठांचे निदर्शनास का आणली नाही. या बाबीवरुन संस्थानप्रती आपली काही निष्ठा नाही हे सिद्ध होते.यामध्ये लक्ष घालावे ही आपली नैतिक जबाबदारी असूनही आपण याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे.

५. आपणाला तांदूळ प्रकरणात कोणी चौकशीचे अधिकार दिले होते काय? किंवा चौकशी करुन अहवाल एक दिवसात सादर करणेबाबत कोणी लेखी आदेश दिले होते काय ? याबाबत कोठेही अढळ होत नाही. अंतर्गत लेखापरीक्षण विभागाचे प्रभारीपदी वरिष्ठ लेखापाल / प्र.वरिष्ठ लेखापाल यांचे नियंत्रण असतांना सदर प्रकरणाचा अहवाल मात्र थेट आपण सादर केला आहे. ही आपली कृती संशयास्पद आहे.

६. मा.कार्यकारी अधिकारी यांना सदर प्रकरणाचा अहवाल सादर करतांना गोपनीय स्वरूपात आवक विभागाला सादर करणे गरजेचे होते. तथापि आपण हा अहवाल कशा पद्धतीने कोणाकडे सादर केला

याचा बोध होत नाही. सदर अहवालावर दाखल तारीख, आवक नंबर नाही. त्यामुळे याकामी विहीत कार्यालयीन पद्धतीचा अवलंब न केल्यामुळे ही आपली कृतीही संशयास्पद आहे.

७. जो तांदूळ प्रसादालयाच्या प्रस्तावावरुन कुठलीही खातरजमा न करता वापरण्यास प्रतिबंध करण्यात आलेला होता. तोच तांदूळ अन्न व औषध प्रशासन विभाग अहमदनगर यांनी वापरण्यास खुला केलेला आहे.

वरील सर्व बाबी संशयास्पद आढळत असल्यामुळे याबाबत प्रशासकीय कारवाई का प्रस्तावित करण्यात येऊ नये? याबाबतचा लेखी खुलासा ७दिवसाचे आंत सादर करावा अन्यथा याबाबत आपले काही म्हणणे नाही असे समजून उचित कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**तत्कालीन मुख्यलेखाधिकारी श्री. दिलीप रघुनाथ झिरपे यांनी त्यांचे दि२४/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये दिलेला खुलासा–**

उपरोक्त विषयासंबंधी आपण मला संदर्भ क्र. १ मधील पत्रान्वये दि.०५ मार्च २०१६ रोजी नोटीस दिली होती. त्या अनुषंगाने मी संदर्भ क्र.२ मध्ये नमुद केलेल्या पत्रान्वये तांदुळ खरेदी गैरप्रकारासंबंधी जिल्हाधिकारी यांनी मा.अध्यक्षांना दिलेल्या अहवालाची प्रत मागीतलेली होती. ती मला नोव्हेंबर २०१६मध्ये मिळाले आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत प्रकरणी मुद्देनिहाय पुढील प्रमाणे खुलासा करत आहे.

**मुद्दा क्र.१– आपण माझा शिर्डी येथील कालावधी ३०/०९/२०१४ ते ३०/०८/२०१५ असा दर्शवून मला कार्यकारी अधिकारी असे संबोधले आहे.**

**खुलासा:-** मी कार्यकारी अधिकारी नसून मुख्यलेखाधिकारी या पदावर कार्यरत होतो. माझा शिर्डी संस्थान येथील मुख्यलेखाधिकारी या पदावरील कालावधी १ मे २०१४ ते ६ जून २०१६ असा होता. वैधानिक लेखापरिक्षकाने, तांदुळ गहू खरेदी प्रकरणी ४३ लक्ष रुपये नुकसानीस कारणी ठरलेला गैरप्रकार हा ३१ मार्च २०१४ पुर्वी चढया भावाने हजारो क्विंटल अतिरिक्त गहू व तांदुळ खरेदी करण्यात आला होता. २०१४-२०१५ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल पहावा. सदरील गैरप्रकार माझ्या कालावधीत घडलेला नाही. परंतु सदरील प्रकरण, गैरप्रकारास कारणीभुत असणारे कर्मचारी व अधिकारी यांनी हाताळले असल्याने त्यांनी आपणाकडे चुकीची माहिती व चुकीचे प्रस्ताव सादर केले आहेत. परिणामी गेली दिड वर्षापासून संबंधीत प्रकरणावर निर्णय घेण्यास विलंब होत आहे.

**मा. जिल्हाधिकारी यांनाही चुकीची माहिती पुरविल्यमुळे मा.जिल्हाधिकारी यांचा अहवाल कसा सदोष झाला आहे याचे पुरावेच मी आपल्या समोर सादर करत आहे.**

**मुद्दा क्र. २:- ३१ मार्च २०१४ अखेर झालेल्या अंतर्गत लेखा परिक्षणावर मी कोणती कार्यवाही केली.**

**खुलासा.** ३१ मार्च २०१४ अखेरचे अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल ३१ मार्च १४ नंतर म्हणजेच ११/०४/२०१४ रोजी प्राप्त झाला व तो कार्यकारी अधिकारी यांच्या नावाने प्राप्त झाला. तो पर्यंत चढया भावाचा अतिरीक्त तांदूळ व गहू खरेदी करुन प्रशासकीय अधिका-यांच्या स्वाक्षरीने देयके पारीतही झाले होते म्हणजे नुकसान घडून गेले होते. गोपनीय अहवाल तयार करताना जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास ही बाब आणली गेली नाही. जिल्हाधिकारी यांनी सुद्धा पुरावे पाहिले नाहीत. ३१ मार्च २०१४ अखेर च्या अंतर्गत लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्तीसाठी पत्रही दिले होते. प्रशासकीय अधिकारी यांनी अंतर्गत लेखापरिक्षणाची दोष दुरुस्ती करताना गहू व तांदळाची कीड लागू नये म्हणून योग्य काळजी घेत आहोत असे उत्तर दिले.

**चढया भावाचा अतीरीक्त गहु व तांदुळ खरेदीमुळे झालेल्यानुकसानीस कोण जबाबदार आहे हे खालील बाबीवरुन स्पष्ट होते.**

a) पुरवठादारास मूळ आदेश देणारे अधिकारी, उपकार्यकारी अधिकारीच होते (पुरावा म्हणून आदेश पहावेत.)

b) त्यानंतर गहू तांदूळ पुरवठादारास त्वरीत माल पाठविण्याचे आदेश देणारे हे प्रशासकीय अधिकारीच होते. (पुरावा म्हणून प्रशासकीय अधिका-यांची स्वाक्षरीचे आदेश पहावेत.)

c) संबंधित प्रशासकीय अधिका-यांवर पुर्णवेळ नजीकचे नियंत्रण व पर्यवेक्षण हे उप-कार्यकारी अधिकारी यांचेच होते. (पुरावा उप-कार्यकारी अधिका-यांची अधिकार व कर्तव्यसूची पहावी.)

d) सदरील गहू व तांदुळ यांची चलने तयार करुन स्वाक्षरी करणारे अधिकारी हे प्रशासकीय अधिकारीच होते. (चलने पहावीत.)

e) ३१ मार्च २०१४ अ पुर्वीची देयके मंजुर करणारे अधिकारी हे प्रशासकीय अधिकारी हेच होते. (पुरावा म्हणुन ३१ मार्च १४ पुर्वीच्या देयकांवरील स्वाक्ष-या पहाव्यात.)

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुनच तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र जाधव यांनी प्रशासकीय अधिकारी व उप-कार्यकारी अधिकारी आप्पासाहेब शिंदे यांना नोटिस देऊन कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना पाठविला होता. परंतु जिल्हाधिकारी यांनी एकही पुरावा न पाहता मुख्य लेखाधिकारी व कार्यकारी अधिकारी यांची कृती संशयास्पद ठरवून मा. अध्यक्ष यांनाच उलट गोपनीय अहवाल सादर केला. प्रशासकीय अधिकारी व उप-कार्यकारी अधिकारी (आप्पासाहेब शिंदे) यांच्यावरील कारवाईच स्थगीत केली. विशेष म्हणजे यावरच न थांबता रु. ४३ लक्ष च्या नुकसानीस उघडकीस आणणा-या मुख्यलेखाधिकारी व कार्यकारी अधिकारी यांनाच नोटिस देण्याचा ठराव पारित करुन घेतला.

उपरोक्त ठरावाबाबत एक आश्चर्यजनक बाब म्हणजे या ठरावाचा मसुदा हा नुकसानीस जबाबदार धरलेले अधिकारी श्री. आपासाहेब शिंदे यांनीच तयार केला. (पुरावा म्हणुन ठरावाचा प्रस्ताव पहावा त्यावर व्यवस्थापन समितीलाच आपासाहेब शिंदे यांनी निर्देश दिल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.)

समिती निर्णय नं. ३५४ पारित करताना स्वच्छ केलेल्या तांदळाचा व अन्न व औषध प्रशासनाच्या खाण्यास योग्य अशा प्रमाणपत्राचा उल्लेख केलेला आहे. मूळातच चढया भावाचा अतिरीक्त तांदूळ व गहू आणि स्वच्छ केलेला तांदुळ हया दोन वेगवेगळया बाबी आहेत. स्वच्छ केलेला तांदूळ हा ऑगस्ट व सप्टेंबर २०१४ मध्ये घेतलेला होता. तो खराब होत आहे, आणखी नुकसान संभवते हे मी माझ्या अहवालातच नमूद केले होते. माझा अहवालाचा समारोप पहावा.

समिती निर्णय नं. ३५४ मध्ये ३१ मार्च २०१४ अखेर चढया भावाने खरेदी केलेल्या गहू तांदळाचा कुठेही उल्लेख न करता स्वच्छ केलेल्या तांदळाचा उल्लेख करुन व मुळ मुद्याला बाजुला ठेऊन प्रशासकीय अधिकारी व तत्कालीन उप-कार्यकारी अधिकारी यांनी स्वत:स दोषमुक्त करुन घेतले कारण त्यावेळी मा. अध्यक्ष व आपण संस्थानच्या समितीवर नुकतेच रुजू झाले होते. गहू व तांदूळ गैरव्यवहाराच्या पुर्व इतिहासाबाबत आपणास काहीही कळविले नव्हते. आपल्या व अध्यक्ष यांच्या नवखेपणाचा पुरेपुर फायदा घेतला गेला.

**मुद्दा क्र. ३:- अतिरिक्त ठरलेल्या गहू व तांदुळ यांच्या देयकांबाबत खुलासा**

३१ मार्च २०१४ अखेर घेतलेला तांदूळ हा चढया भावाचा व अतिरीक्त ठरला आहे. त्याचे नुकसान ४३ लक्ष रुपये आहे. पुरावा म्हणून माझ्या अहवालामधील भाग २ पान क्र. ३, ४ व ५ पहावे. ३१ मार्च २०१४ पुर्वी गोडावून मध्ये आलेल्या चढया भावाच्या अतिरीक्त गहू व तांदुळ त्वरीत पुरवठा करण्याचे आदेश देणारे अधिकारी प्रशासकीय अधिकारी आहेत. (पुरावा म्हणुन आदेश पहावेत. त्यावरील स्वाक्ष-या पहाव्या, यांच्यावर त्या कालावधीत नजीकचे नियंत्रण कोणाचे होते हे पहावे.) हे मी माझ्या दि. ०८/०३/२०१६ च्या पत्रातही नमूद केले होते. माझ्या पत्रावर योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रशासकीय अधिकारी (कामगार विभाग) यांना आपण निर्देशही दिले होते. परंतू कामगार विभागाच्या प्रशासकीय अधिकारी यांनी हे प्रकरण गेल्या ८ महिन्यापासून दडपून ठेवलेले आहे.

**मुद्दा क्र. ४:-** तांदूळ प्रकरणाच्या चौकशीच्या अधिकाराबाबत आणि तो अहवाल थेट सादर करण्याबाबत.

**खुलासा –** मूळात हे आपण लक्षात होणे आवश्यक आहे की एखादया प्रकरणाची चौकशी आणि लेखापरिक्षण या दोन वेगवेगळया बाबी आहेत. मी उपलब्ध कागदपत्रावरुन संबंधीत माहितीचे लेखापरिक्षण करुन लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे. चौकशी अहवाल नव्हे.

तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र जाधव यांनी या प्रकरणाची सर्वांगीण माहिती व कागदपत्रे संकलीत करण्याबाबत मला सूचीत केले होते. नुकसानीचे प्रमाण निश्चित करण्याबाबत सुचना केल्या होत्या. त्याप्रमाणेच मी कार्यवाही केली आहे.

**संकलीत माहितीचे लेखापरिक्षण-** मी महाराष्ट्र शासन सेवेतील, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील वर्ग– १ चा राजपत्रीत अधिकारी आहे. या सेवेतील प्रत्येक अधिका-याकडे येणा-या नस्तीचे व माहितीचे लेखापरिक्षण करणे हे अधिका-यांचे आद्यकर्तव्यच असते हे आपणस ज्ञात असणे आवश्यक वाटते. यासाठी वेगळया आदेशाची गरजच नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेऊनच मी लेखापरिक्षण अहवाल केला आहे. माझा अहवाल आपण व जिल्हाधिकारी चुकीचा ठरवू शकलेला नाहीत. त्यांनतर शासनाने नेमलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांनीही माझ्या अहवालाचे परिक्षण करुन त्यांच्या अहवालामध्ये नोंद घेतलेली आहे.

**मुद्दा क्र. ५:- अहवाल एक दिवसात सादर कसा केला याबाबत.**

**खुलासा–** अहवाल एका दिवसात सादर केलेला नाही. सबब जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये त्रोटक माहिती नमुद केली आहे. कारण अनेक दिवस तांदूळ प्रकरणाची माहिती संकलीत करण्याचे काम सुरु होते.

मी अहवाल एका दिवसात सादर केल्याचा शोध कोणी लावला हा प्रश्न मला देखील पडलेला आहे.

**मुद्दा क्र. ६:- अहवाल थेट सादर करणे.**

**खुलासा–** अंतर्गत लेखापरिक्षण विभागाचा प्रमुख हा मुख्यलेखाधिकारी असतो. गहू, तांदूळ प्रकरणाची माहिती संकलीत करुन अहवाल तयार करण्याचे काम हे कार्यकारी अधिकारी यांनी थेट मुख्यलेखाधिकारी यांचेवर सोपविले होते. व मुख्यलेखाधिकारी यांनी तो अहवाल स्वत:च तयार केला असल्याने त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असणा-या कर्मचा-यांच्या स्वाक्ष-या घेण्याचे बंधन त्यांच्यावर नाही तसे असल्यास जिल्हाधिकारी यांनी तसे नियम नमूद करणे आवश्यक होते.

**मुद्दा क्र. ७:- अहवालाच्या गोपनियते बाबत.**

**खुलासा–** मी सादर केलेला अहवाल कोणत्याही व्यक्ती चौकशी बाबतचा अहवाल नाही. तो केवळ उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन नुकसानीचे प्रमाण निश्चित करण्यासाठी केलेले लेखापरिक्षण आहे. संस्थानने सुरक्षेसंबंधी केलेल्या खरेदी व्यतिरिक्त इतर सर्व खरेदीचे कागदपत्र, माहिती संस्थानच्या लौकीकानुसार सर्वांसाठीच उपलब्ध आहे. संस्थानचा खरेदी कारभार पारदर्शकच आहे. त्यात लपवाछपवीचे कारणच नाही. हे प्रकरण फार मोठे गुपीत नाही. तरी सुद्धा मी सीलबंद पाकीटच दिले होते.

**मुद्दा क्र. ८:- अहवाल कथा पद्धतीने सादर केला.**

**खुलासा–** अहवाल बंद पाकीटात सादर केला आहे.

**मुद्दा क्र. ९:- अहवाल आवक-जावक नोंदी बाबत.**

**खुलासा–** माझ्या अहवालावरील जावक नंबर पहावा. तो. जा.नं.एसएसएस/लेखा/०३/१५ दि.१०/०४/२०१५ असा आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी माहिती घेतलेली नाही असे दिसते. कार्यकारी अधिकारी यांचे कडील आवक नंबर बाबत मुख्यलेखाधिकारी यांच्याकडे विचारणा करण्याचा प्रश्न उदभवत नाही. मी ज्या अधिका-याच्या नावे अहवाल सादर केला आहे आणि त्यांना तो मिळाला देखील आहे, त्याचा उल्लेख मा.जिल्हाधिकारी यांच्या गोपनीय अहवालातही आलेला आहे. तेव्हा आवक नंबरचा प्रश्न पडणे आश्चर्याची बाब वाटते. माझ्या अहवालातील माहितीची सत्यता पडताळण्या ऐवजी, अहवालाचा आवक नंबर, सादर करण्याची पद्धत, गोपनीयता, आदेश कोणी दिला यासारख्या किरकोळ त्रुटी काढून गहू तांदूळ गैरप्रकाराला एकदम उलट दिशा देऊन प्रकरण दडपले गेले हेच यातून स्पष्ट होत आहे. कारण मूळातच तांदूळ प्रकरणाबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री.जाधव व तत्कालीन अध्यक्ष यांची संस्थान मधील सेवेची मुदत असे पर्यंत गोपनीय अहवाल तयार केला नव्हता. नविन कार्यकारी अधिकारी व नविन अध्यक्ष रुजु झाल्यानंतरच त्यावर निर्णय घेतला ही विषेश करुन लक्षात घेण्याजोगी बाब आहे.

माझी व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांची कृती संशयास्पद आहे हे आपण मला दिलेल्या पत्रामध्ये नमूद केले आहे. परंतू आपणास नेमका कोणता संशय आहे हे देखील आपण सांगू शकलेला नाहीत. केवळ गैरप्रकार उघडकीस आणला म्हणून नोटीस देऊन दबाव निर्माण करणे हाच तत्कालीन उप-कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांचा हेतू यावरुन स्पष्ट होतो.

याप्रकरणाचा सूड म्हणून २ सप्टेंबर १५ ते ५ जून २०१६ या कालावधीत अगदी किरकोळ कारणामुळे मला किती नोटीसा देण्याचे प्रस्ताव आपल्या समोर आले हे देखील आपणास ज्ञात आहेच. मार्च २०१४ च्या दुस-या पंधरवाडयामध्ये चढया भावाचा हजारो क्विंटल गहू व तांदुळ (कमी दराचा तांदूळ व गहू उपलब्ध असताना) पुढील १० महिन्यासाठी गरज नसताना स्विकारुन तातडीने देयक अदा करणे हा केवळ अपघात नव्हता तर ती एक विशिष्ठ हेतू मनात ठेवून केलेली कृती होती हे पुढील बाबीवरुन स्पष्ट होईल.

२०१३-१४ मध्ये नवीन तांदूळाच्या दरांपेक्षा जुन्या तांदळाचा दर २७४/- रु. नी जास्त होता. जुन्या तांदळाचा दर रु. ३८५१/- प्रती क्विंटल व नवीन तांदळाचा दर रु ३,५७५/- प्रती क्विंटल. नवीन तांदूळ किती दिवसांनी जुना होतो याचा निश्चित कालावधी ठरवून दिलेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे एक हंगाम पुर्ण झाल्या वर तो तांदूळ जूना होतो. व त्यास नवीन तांदळापेक्षा जास्त भाव मिळतो. परंतु संस्थानने ३१ मार्च अखेर पुढील ९-१० महिने पुरेल इतका जूना तांदूळ जास्त भाव देऊन १० महिने साठवून ठेवला (याचा अर्थ नविन तांदळास जूना तांदळाचा भाव देऊन संस्थानच्या गोडाऊन मध्येच जूना करुन घेतला असल्याची दाट शक्यता आहे.) विशेष

म्हणुन ३१ मार्च १४ अखेर रु. ३,८५१/- प्रती क्विंटलने जूना तांदूळ देणारा पुरवठादार ही तोच व १ एप्रिल २०१४ नंतर म्हणजे १ दिवसानंतर रु. ३,४४०/- प्रती क्विंटल भावाने जून्या तांदळाचे आदेश घेणारा पुरवठादार ही तोच. ३१ मार्च पुर्वी गव्हाचा दर रु. २,२८९/- प्रती क्विंटल व एक दिवसानंतर म्हणजे १ एप्रिल २०१४ नंतर गव्हाचा दर रु. २,०७१/- प्रती क्विंटल.

वरील बाबींचा अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की, रु. ३,४४०/- दराचा तांदूळ व रु. २,०७१/- दराचा गहू संस्थानकडे उपलब्ध होता. परंतू अतिरिक्त साठयामुळे रु. ३,८५१/- दराच तांदूळ व रु. २,२८९/- दराचा गहू वापरावा लागला.

याचा सर्वंकष विचार करुनच तत्कालीन कार्यकारी अधिकारी राजेंद्र जाधव यांनी प्रशासकीय अधिकारी व तत्कालीन उप-कार्यकारी अधिकारी आप्पासाहेब शिंदे यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव, मा. जिल्हाधिकारी यांचेकडे चक्रीय पद्धतीने ठेवला होता. परंतु मा. जिल्हाधिकारी यांनी यावर एकही पुरावा न पाहता प्रशासकीय अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांच्यावरील कारवाई स्थगीत करुन गैरप्रकार उघडकीस आणणारे मुख्यलेखाधिकारी व कार्यकारी अधिकारी यांचे कृती संशयास्पद ठरविली आणी नव्याने रुजु झालेल्या अध्यक्षांना व कार्यकारी अधिकारी यांना प्रकरणाची काही माहिती कळण्यापुर्वीच दि.०८/१०/२०१५च्या सभेत निर्णय क्र. ३५४ संमत करुन घेतला व प्रकरणास वेगळीच दिशा दिली.

तरी आपणास विनंती आहे की याबाबत बारकाईने अभ्यास करावा. सदरील माझा खुलासा संस्थानच्या व्यवस्थापन मंडळासमोर ठेवावा. प्रसंगी व्यवस्थापन मंडळासमोर मला बोलवावे वरिलप्रमाणे खुलासा मान्यतेस्तव सादर.

**तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय श्री. रामराव रंभाजी शेळके यांचे नोटीसबाबत माहिती-**

तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय श्री रामराव शेळके यांना दि.१०-०३-२०१६ रोजी जावक विभागामार्फत बजाविण्यात आली असता सदरचे टपाल श्री रामराव शेळके यांनी स्विकारणेस नकार दिला. तसेच सदरची नोटीस रजि ए.डी. व्दारे पाठविण्यात आली असता श्री शेळके यांनी न स्विकारलेमुळे पाकीट दि.२२-०३-२०१६ रोजी परत आलेली आहे.

**सदर प्रकरणाबाबतविधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी केलेला पत्रव्यवहाराबाबत-**

याबाबत विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सासंवि-१५१६/४०७/प्र.क्र.६१/का.१६, दि.११-०५-२०१६ रोजीचे पत्रान्वये " संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि. ०८-१०-२०१५ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र.३५४ च्या ठरावानुसार संस्थानचे मुख्य लेखाधिकारी, तत्कालिन कार्यकारी अधिकारी व तत्कालिन अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांच्याकडून खुलासा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्या अनुषंगाने श्री. राजेंद्र जाधव, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (तत्कालीन कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ) यांनी त्यांच्या दि. १८.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला आहे. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निदेशास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, श्री जाधव यांनी सादर केलेल्या खुलाश्यानुसार व्यवस्थापन समितीने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती तसेच संस्थानच्या अन्य कर्मचा-यांच्या प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती शासनास तात्काळ सादर करण्यात यावी." असे कळविले होते. याबाबत शासनास जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११२१/२०१६ दि.०९-०६-२०१६ रोजीचे पत्रान्वये सर्व संबंधितांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर सदर खुलासे मा. त्रिसदस्यीय समितीच्या सभेमध्ये सादर करुन त्यावर होणारे निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येणारे असलेबाबत कळविलेले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत अहवाल शासनास सादर करणेबाबत कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग यांनी दि.११-०८-२०१६ व दि.१९-११-२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**सदर प्रकरणाबाबत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणामधील त्रुटी/अपुर्ततांचा दोष- दुरुस्ती अहवालातील खरेदी विभागाकडील मुद्दे व त्यावरील खरेदी विभागामार्फत करण्यात आलेले स्पष्टीकरण-**

सन २०१४-१५ चे Audit Report मध्ये वैधानिक लेखापरिक्षक यांनी, मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेला स्पेशल रिपोर्ट व पेपरच्या बातम्यावरुन खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविलेले होते.

अ ) फुड ग्रेनबाबत मागणी व पुरवठयाचा विचार करता गहू ३८७० क्विंटल व तांदुळ २९१४ क्विंटल जादा खरेदी केल्याचे आढळून येते.

१. भांडार विभागाकडून लेखी स्वरुपात मागणीपत्राव्दारे मागणी केल्यामुळे, खरेदी विभागाकडून गहु-तांदुळाची खरेदी करण्यात आलेली होती व हि खरेदी काही प्रमाणात जास्त झाली आहे. हे अंशत: खरे आहे. तथापि सदर खरेदी टप्प्याटप्प्यानेच करण्यात आलेली होती.

२. सर्वसाधारणपणे गहु व तांदुळ पुर्ण वर्षभरासाठी हंगामामध्ये खरेदी करण्याची पूर्वापार पदृधत होती. तसेच तांदुळ जुना व नवा खरेदी करण्याची पद्धत होती. तयाप्रमाणे हि खरेदी करण्यात आली होती. नवीन तांदूळाची संपूर्ण खरेदी करुन त्याचा साठा करुन, तो जुना होईपर्यंत, जुना तांदूळ खरेदी करुन वापरला जात होता व हा जुना तांदूळ संपलेनंतर स्टॉक केलेला तांदूळ (खरेदी केलेला नवा) वापरणे अशी पद्धत होती. ही बाब याठिकाणी विचारात घेतलेली नाही असे दिसते.

ब) रिपोर्टमधील पार्ट २ (१) चा विचार करता गहू व तांदुळ खरेदीकामी दर तफावतीमुळे रु. २०,४१,३१४/- जादा रक्कम आदा झाल्याचे दिसून येते.

क) रिपोर्टमधील पार्ट २ (१) नुसार गहू व तांदूळ जादा खरेदीमुळे Working Capital अडकून पडले व त्यातुन रु. २३,०७,६०७/- नुकसान झाले.

यामध्ये गहु व तांदुळ खरेदीकामी दर तफावतीमुळे रु.२०,४१,३१४/- व व्याजापोटी रु. २३,०७,६०७/- संस्थानचे नुकसान झाल्याचे नमुद केले आहे.

या बाबी अंशत: ख-या आहेत.

तथापी, याबाबत खालील बाबी विचारात घेणे आवश्यक होते.

१. गहु व तांदुळ वार्षीक खरेदी एकदम करण्याची पद्धत होती. विशिष्ट कालावधीसाठी माल खरेदी करण्याची कार्यपद्धती निश्चित केलेली नव्हती.

२. पुरवठा धारकाला सन २०१३-१४ मध्ये पुरवठा आदेश दिल्यानंतर भांडार विभागाने लगेचच संपुर्ण निश्चित केलेली Quantity खरेदी विभागाकडे मागणी केलेली होती व त्याप्रमाणे खरेदी विभागाने पुरवठा चलन काढले होते. त्यामुळे हे चलन देतांना पुढील वर्षी गहू-तांदुळाचे दर काय येतील हे माहित नसल्यामुळे चढया दराने गहू व तांदुळ खरेदी केले म्हणणे योग्य होणार नाही. तसेच तांदुळ जुना रु. ३,८५१/- प्रतीक्विंटल दराने ७,०९९.९१ क्विंटल व तांदूळ नवा प्रती क्विंटल ३,४४०/- दराने ५,००० क्विंटल खरेदी केलेला होता. मात्र दर तफावत काढताना फक्त जुन्या तांदुळाचे दराचा विचार केलेला आहे, असे दिसते.

३. साईभक्तांची अचानक होणारी गर्दी व यामध्ये साईभक्तांना सेवा देण्यात अडचणी येऊ नये तसेच शिर्डीसारख्या ग्रामीण भागात एकदम एवढा माल उपलब्ध होणे शक्य नसल्यामुळे काही प्रमाणात साठा ठेवण्याची प्रथा होती.

४. संस्थानकडून साईभक्तांना प्रसाद भोजन सेवा तत्परतेने देण्यासाठी गहू-तांदूळ साठा ठेवणे गरजेचे असते व ही सेवा देताना त्यासाठी खरेदी केलेल्या मालासाठी आलेले खर्चाला भांडवलाची गुंतवणूक व त्यावरील व्याजाचे नुकसान याबाबी साईभक्तांसाठीच्या सेवेचा विचार करता गौण ठरतात. कारण साईभक्तांच्या देणगीवरच संस्थानचे कामकाज अवलंबून आहे. व भक्तांना सेवा देणे संस्थानचे आद्य कर्तव्य आहे.

५. दरवर्षी मालाचे भाव, मालाची उपलब्धता, मागणी व पुरवठा यांवर अवलंबून असतात. संस्थानला दरवर्षी लागणारा गहू व तांदळाची खरेदी करताना पुढील निविदेचेवेळी सदर माल स्वस्त होईल का महाग होईल ? याचा अंदाज नसतो. संस्थान ई-निविदा पद्धतीने मालाची खरेदी करते यामध्ये काही मालाचे भाव वाढलेले असतात तर काही मालाचे भाव कमी झालेले असतात. त्यामुळे सदर गहू व तांदळाची खरेदी ही पुढील वर्षीचे गहू-तांदुळाचे दर कमी आहेत म्हणून यावर्षी जादा दराने जाणीवपूर्वक केलेली नाही असे दिसते.

इत:पर या बाबीची पुनरावृत्ती होऊ नये म्हणुन संस्थानने माहे मार्च-२०१५ महिन्यापासुन प्रत्येक महिन्याला आवश्यक असणारा माल खरेदी करण्याची पद्धत सुरु केलेली आहे.

उपरोक्त बाबत तारांकित प्रश्नक्रं. ५१४८३ दि. १६/०३/२०१६ चे अनुषंगाने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि २२/०३/२०१६ रोजी सादर केलेले उत्तर व पूरक टिपणीच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येत आहे.

शिर्डी संस्थानच्या प्रसादालयासाठी लागणारा तांदुळ आणि गहू खरेदीबाबत- तारांकित प्रश्न क्रं. ५१४८३ करीता मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना जा.नं.एसएसएस/वशी -०४/७०३१/२०१६ दि.२२-०३-२०१६ अन्वये पाठविण्यात आलेले पत्र.

| अ.नं. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी संस्थानच्या प्रसादालयासाठी लागणारा तांदुळ आणि गहू यांचा सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी जुना सोनामसुरी (तांदुळ) रु. ३२५१/- प्रती क्विंटल व नवीन सोनामसुरी रु. ३५७५/- प्रति क्विंटल व गहू रु. २२८९/- प्रति क्विंटल या दराने पुरवठादारांचे दर निश्चित केले होते. तसेच सन २०१४-१५ मधील माहे एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीसाठी लागणारा तांदुळ जुना सोनामसुरी रु. ३४४०/- प्रती क्विंटल व गहू प्रति क्विंटल २०७१/- असा दर निश्चित झाला होता, हे खरे आहे काय ? | **अशंत : खरे आहे.**<br>**सन २०१३-१४ साठी जुना सोनामसुरी तांदळाचे दर प्रति क्विंटल रु. ३२५१/- नसुन रु. ३८५१/- आहे.** |
| ०२ | असल्यास दि. ३१ मार्च, २०१४ अखेरीस करुन ठेवलेल्या जास्त साठयामुळे जुना सोना मसुरी तांदुळ रु. ३८५१/- प्रती क्विंटल व नविन सोना मसुरी रु. ३५७५/- प्रति क्विंटल व गहू रु. २२८९/- प्रति क्विंटल अशा चढया भावाचा माल सन २०१४-१५ चे दर कमी असताना देखील केवळ २०१३-१४ चा साठा जास्त असल्याने चढया भावाचा गहु व तांदुळ वापरावा लागला, हे खरे आहे काय ? | **अशंत : खरे आहे.**<br>**मागील वर्षीचा साठा गृहीत धरुन खरेदी ई-निविदा प्रक्रीयेने राबविली जाते. त्यानुसार सन २०१३-१४ मध्ये साधारण: तांदूळ १२०९९ क्विंटल व गहू १७९९८ क्विंटल इतका खरेदी केलेला आहे.**<br>**सन २०१३-१४ मध्ये खरेदी केलेला गहू व तांदळामधून उरलेला माल सन २०१४-१५ मध्ये वापरला आहे. प्रसादालयामध्ये प्रतिमहिना साधारण: १००० क्विंटल गहू व तेव्हडाच तांदूळ वापरला जातो. परंतू सदरचा वापर भक्तांच्या होणा-या गर्दीनुसार कमी जास्त होत असतो.** |
| ०३ | अशाप्रकारे कमी भावाचा तांदूळ व गहू असतांना देखील केवळ चढया दराच्या मालाचा जास्त साठा असल्याने भाव फरक व भांडवल गुंतवणूकीमुळे संस्थमाला रु. ४३,४८,९२१/- इतके आर्थिक नुकसान सोसावे लागते असा आक्षेप शासनाने नेमलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांनी नोंदविला असून तत्पुर्वीच माहे एप्रिल-मे २०१५ मध्ये तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी सदर नुकसानीस जबाबदार असणारे अधिकारी यांनी सदर नुकसानीस जबाबदार असणारे अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस काढून व्यवस्थापन समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी यांचेकडे कारवाईचा प्रस्ताव सादर केला होता, हे खरे आहे काय, | **अशंत : खरे आहे.**<br>सन २०१३-१४ च्या लेखापरिक्षकांनी कोणत्याही प्रकारचा आक्षेप नोंदविलेला नाही. सदरचा आक्षेप हा सन २०१४-१५ चे लेखापरिक्षण करणा-या लेखापरिक्षकांनी नोंदविलेला आहे.<br>वैधानिक लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपावर अनुपालन सादर करण्याची प्रक्रिया चालू आहे. संस्थानमध्ये खरेदी प्रक्रीया ही ई-निविदा काढून व मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेऊन राबविली जाते. त्यामुळे पुढील वर्षी काय दर असेल हे आदल्या वर्षी अंदाजीत करणे अवघड आहे. त्यामुळे जास्त साठा केला असे म्हणणे खरे नाही. |
| ०४ | असल्यास, सदर प्रस्तावावर चार ते पाच महिने कोणतीही कार्यवाही न करता संस्थानच्या तत्कालीन कार्यकारी अधिकारी पदाची मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर ठेऊन दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ चा निर्णय क्रमांक ३५४ मंजुर करुन घेतला आणि नोटीस दिलेल्या अधिका-यांवरील कारवाई स्थगित केली, हेही खरे आहे काय ? | **खरे नाही.**<br>**मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी वेळीच म्हणजे दि.१८/०९/२०१५ रोजी मा. अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अहवाल सादर केलेला आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे अहवालानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.** |
| ०५ | असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे. | कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| ०६ | नसल्यास विलंबाची कारणे काय. ? | विलंब झालेला नाही. |

**सन २०१५ तांदुळ प्रकरणाबाबत झालेले विविध ठराव**

| अ.नं. | मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक | विषय | झालेला निर्णय |
|---|---|---|---|
| ०१. | १३.१२.२०१३ | **विषय नं.३५ –** सन २०१४-१५ (माहे एप्रिल -१४ ते मार्च-१५) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांकरीता किराणा माल व इतर खरेदीबाबत | **निणर्य क्र. ९६७ -** यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४-१५ (माहे एप्रिल -१४ ते मार्च-१५) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी वार्षीक किराणा व इतर माल प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यपद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. ७८,७५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.<br>तसेच सदरहू खरेदीकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर खरेदी प्रक्रिया करणेत यावी, असे ठरले. |
| ०२ | १२.०४.२०१४ | **विषय नं.०४ –** सन २०१४-१५ (माहे एप्रिल -१४ ते मार्च-१५) अखेर प्रसादालय/कॅन्टीन व मंदिर विभागासाठी किराणा माल खरेदीकामी प्राप्त निविदातील फायनान्सीयल बीड उघडून चर्चा/वाटाघाटी होणेबाबत. (रु.३५,००,००,०००/-) | **निणर्य क्र. २६६ -** यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४-१५ (माहे एप्रिल -१४ ते मार्च-१५) प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी पात्र निविदाधारकांच्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन, सर्व निविदाधारकांना सभेसमोर समक्ष बोलविणेत आले व प्रत्येक मालाचा न्युनतम दर सर्वांना कळविणेत आला. त्यानंतर पुनश्च संधी म्हणून सर्व निविदाधारकांना बंद पाकिटामध्ये अंतीम दर देणेबाबत कळविणेत आले व निविदाधारकांनी दिलेल्या<br>अंतीम दरांची बंद पाकिटे माकार्यकारी अधिकारी तथा त्रिसदस्य समिती सदस्य यांचेसमोर उघडणेत येऊन, त्याचा तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच, या केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा, असे ठरले. |
| ०३ | ०९.१०.२०१४ | **आयत्या वेळेचा विषय नं.०१ –** सन २०१४-१५ (माहे ऑक्टो -१४ ते मार्च-१५) करीता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी किराणा माल खरेदीबाबत | **निणर्य क्र. ९२१-** यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>०१. किराणा माल खरेदीकामी उपरोक्तप्रमाणे तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनाकार्यदेश देण्यात यावा.<br>०२.ज्या मालासाठी निवड समितीने एक किंवा दोन निविदाधारकांचे नमुने निवडलेले आहेत अथवा ज्या मालासाठी एकाच निविदाधारकाचे दर आलेले आहेत, अशा वेळी आलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.<br>०३. ज्या मालासाठी दोन किंवा अधिक निविदाधारकांचे समान दर आलेले आहेत त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.<br>०४.श्री.गणेश ड्रायफुट, पुणे यांनी ईनिविदेमध्ये प्रति क्विंटल ऐवजी प्रती किलोचे दर नजर चुकीने दिलेले होते, तरी त्यांचे प्रती किलोचे दर हे प्रती क्विंटलमध्ये करण्यात येऊन, ते अंतीम समजण्यात यावे.<br>०५. तसेच ज्या निविदाधारकांच्या निविदा नामंजूर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | झालेल्या आहेत अथवा कोणत्याही मालासाठी पुरवठा आदेश नाही अशा निविदाधारकांना त्यांची बयाणा रक्कम परत करणेत यावी. |
| ०४ | २३.०७.२०१५ | **विषय नं. ३९-** पानमळा गोडावून येथील प्रतिबंधित १७८३ क्विंटल तांदुळाबाबत | यावर सविस्तर चर्चा होऊन, पानमळा गोडावून येथील प्रतिबंधित १७८३ क्विंटल तांदुळ स्वच्छ करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४९,९२४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस आहे. |
| ०५ | ०८.१०.२०१५ | **विषय नं.३५- अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११ कलम ३४ अन्वये प्रतिबंधीत केलेला तांदूळ सहाय्यक आयुक्त अन्न, अहमदनगर यांनी मुक्त केल्यामुळे प्रसादालयाकडे वापरासाठी देणेबाबत.** | **निर्णय क्र. ३५४-** यावर सविस्तर चर्चा होऊन, अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११ कलम ३४ अन्वये प्रतिबंधीत केलेला तांदूळ सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी मुक्त केल्यामुळे प्रसादालयाकडे वापरासाठी देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.<br>तसेच सदर प्रकरणाबाबत मा. जिल्हाधिकारी सो. तथा समिती सदस्य यांनी मा. अध्यक्ष महोदय यांना दि. १८.०९.२०१५ रोजी गोपनीय अहवाल सादर केलेला होता. या अहवालावरुन संबंधीतांनी समितीची पूर्व मंजूरी न घेता चुकीची कार्यवाही, दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचे दिसून येते, याकरीता संस्थानचे मुख्यलेखाधिकारी यांचेसह तत्कालीन कार्यकारीअधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांचेकडून लेखी खुलासे मागविणेत यावे, असे ठरले. |
| ०६ | १०.११.२०१५ | **विषय नं.६५-** माहे एप्रील-२०१५ मधील तांदूळ प्रकरणाबाबत | **निर्णय क्र.५००-** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रतिबंधीत तांदूळ वापराबाबतची नोंद घेण्यात आली.<br>तसेच दि. ०८.१०.२०१५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३५४ मध्ये ठरलेप्रमाणे संस्थानचे विद्यमान मुख्यलेखाधिकारी यांचेसह तत्कालीन कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांचेकडून लेखी खुलासे मागविणेत यावे. |

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयांनुसार श्रीराजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी व श्री दिलीप रघुनाथ झिरपे, तत्कालीन मुख्यलेखाधिकारी यांचे प्राप्त झालेल्या खुलाशावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२५३** **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सभेस अशी माहिती देण्यात आली की, श्री.राजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी कनकुरी साठवण तला कॅनव्हास प्रुफिंग करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदारास कार्यादेश देणेस व उर्वरित ठेकेदारांची अनामत रक्कम विलंबाने परत केली तसेच देणगी स्वरुपात प्राप्त झालेला रवा व आटा खराब झाल्याचे दाखवून त्याची परस्पर विल्हेवाट लावली याबाबत त्यांचेकडून लेखी खुलासा मागविणेत आला असता; त्यांनी या दोन मुद्दयांचा अद्यापपावेतो खुलासा सादर केलेला नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.राजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचेकडून उपरोक्त दोन्ही मुद्दयांचा तातडीने खुलासा प्राप्त करुन घेण्यात यावा व त्यासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर फेरसादर करणेत यावा.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीमध्ये आवश्यक ते बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाने श्री साईबाबा संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरिता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी शिर्डी संस्थानसाठी २००४ मध्ये अधिनियम तयार करुन दिनांक २३ ऑगस्ट २००४ पासून अंमलात आणला. सदर अधिनियमातील तरतुदींनुसार संस्थानचे कामकाज सुरू झाल्यानंतर त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करतांना कायदेशीर अडचणी येत असून प्रशासकीय कामकाजात क्लिष्टता वाढली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडील विशेष अनुमती याचिका क्र.१९८५६/२०१४ मधील आदेश दि.१७/०२/२०१७ नुसार शासनाचे विधि व न्याय विभाग निर्णय क्र.संकीर्ण २०१४/प्र.क्र.३२/का.१६ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८ फेब्रुवारी, २०१७ अन्वये संस्थानचे कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावर भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ श्रेणीतील अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्त करण्यात येईल. तसेच सदर पदावर नियुक्त होणा-या भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-याच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीमधील अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल, असे आदेशीत केले आहे.

आता, शासनाचे सामान्य प्रशासन अ.शा.प.क्र.एईओ-१११७/५/२०१७ दहा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०८/०३/२०१७ व विधि व न्याय विभाग क्र.२०१४/प्र.क्र.३२/का.१६ मंत्रालय, मुंबई-३२ दि.मार्च २०१७ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एईओ-१०१७/प्र.क्र.१५०/२०१७/दहा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१७/०३/२०१७ रोजीचे शासन निर्णयान्वये संस्थानचे कार्यकारी अधिकारी या पदावर भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-याची नेमणूक केलेली असून दि.०९/०३/२०१७ पासून भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी संस्थानचे कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार सांभाळत आहे.

महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाने पत्र क्र.सासंवि-२००९/२६७/प्र.क्र.२१/का.१६, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४ मार्च, २०१७ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये कालानुरूप झालेले बदल विचारात घेऊन अन्य काही दुरूस्त्या/सुधारणा करणे आवश्यक आहे अथवा कसे याबाबत सर्वांगिण आढावा घेऊन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने संस्थान अधिनियमात सुधारणा करण्याबाबतचा एकत्रित प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

सन २००४ साली संमत झालेला अधिनियम व कालानुरूप झालेले बदल तसेच सन २०१७-२०१८ मध्ये श्री साईबाबांचे समाधीला १०० वर्षे पूर्ण होत असून करावयाची विकासकामे या सर्व बाबींचा विचार करता संस्थानचे अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे आवश्यक ते बदल करणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

**Proposed Amendments in Shri Saibaba Sansthan Trust Act.2004**

| Sr. No. | Section No. | Current Provision | Proposed Amendments | Need for Amendments |
|---|---|---|---|---|
| 01 | 2 (c)(e) | "Executive Officer" Means the Executive Officer of the Committee | "Commissioner cum Chief Executive Officer" means the Commissioner cum Chief Executive Officer of the Committee. Also word Executive Officer to be replaced by the word Commissioner cum Chief Executive Officer in all sections of the Act and its regulations. | सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०८/०३/२०१७ रोजीच्या अ.शा.प.क्र./एईओ/१११७/५/२०१७ व विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण/ २०१४/प्र.क्र.३२/२०१६ दि.२८/२/२०१७ अन्वये भारतीय प्रशासन सेवेतील वरीष्ठ श्रेणीतील अधिका-याची कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. |
| 02 | 11 (2) | The quoram for the meeting of the committee shall be eight | The quoram for the meeting of the committee shall be eight but if the quoram is not fulfilled, the meeting will be adjourned for 30 | राज्य शासनाकडील अधिसूचना दि.२८ जुलै, २०१६ नुसार व्यवस्थापन समितीच्या १२ सदस्यांची नेमणूक करणेत आली आहे. तथापी, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | minutes. After which meeting shall then be proceeded with the permission of Chairman. | त्यापैकी ३ सदस्य आजपर्यंत बैठकीला उपस्थित राहीलेले नाहीत. त्यामुळे उर्वरीत ९ सदस्यांमधून ८ चा कोरम पूर्ण करणे ब-याच वेळा शक्य होत नाही. |
| 03 | 13 (2) | The Executive Officer may be selected from amongst the officers not below the rank of Deputy Collector | The Chief Executive Officer may be selected from amongst one who is holding or has held a post of a District Collector in any other service in the state. The Government shall appoint such other subordinate officers to Chief Executive Officer from State Services on deputation with such designations and assign them such functions as the Government my deem necessary for the purpose of this Act. Provided that all such officers shall be devotee of Shree Saibaba and shall make such declaration in the prescribed format. | विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण/२०१४/ प्र.क्र.३२/ का.१६ दि.२८/०२/२०१७ अन्वये व मा.सर्वोच्च न्यायालयाकडील **SPL Apeeal (c) No.(s)-19856/2014** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निर्णयानुसार |
| 04 | Section 14 (2) | Shall have powers, subject to the control of the Committee (a) to take disciplinary action against any other officer or employee of the committee.<br>(b) to call for tenders for works or supplies and accept such tenders when the amount or value thereof does not exceed twenty-five thousand rupees. | Though there may be any provision in service rules Chief Executive Officer shall have powers.<br>(a) to transfer any officer or employee as and when needed, to take disciplinary action against any other officer or employee of the committee or to suspend any officer or employee of the committee.<br>(b) Though there may be any provisions in the Act., The Chief Executive Officer shall have powers to give administrative sanctions, call tenders for engineering works or supplies and for acceptance of such tenders, acceptance of agreement, issue work order for engineering works the amount of works or value therefore does not axceed Ten Lakh Rupees and for other departmental works does not exceed Five Lakh Rupees.<br>(f) The Chief Executive Officer may delegate any of the powers confirmed on or functions | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा वाढलेला कार्यभार व भारतीय प्रशासन सेवेतील नियुक्त अधिकारी यांचा विचार करता कायद्यात याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत श्री साईबाबा समाधी मंदिर, साईनाथ रुग्णालय, साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, श्री साईप्रसादालय, भक्तनिवास असे विविध उपक्रम राबविले जातात. तेथे भक्तांच्या, रुग्णांच्या सुविधांच्या अनुषंगाने काही निर्णय तातडीने घेणे आवश्यक ठरते तसेच सन २०१७-२०१८ या वर्षात श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता सध्या असलेली रु.२५,०००/- खर्चाची मर्यादा ही अगदीच कमी आहे.<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचा वाढलेला व्याप व कामकाज पहाता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील काही अधिकार प्रशासकीय सोईच्या दृष्टीने उप कार्यकारी अधिकारी किंवा प्रशासकीय अधिकारी यांना प्रदान करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | entrusted to or duties imposed on him by or under this chapter to Deputy Executive Officer and Administrative Officer appointed under section 13 (2) or to such other officer of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi as the Chief Executive Officer may deem fit subject to such restrictions and control as the Government may, by special or general order, lay down and also subject to such limitations and conditions, if any as may be specified in the order of delegation. | अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. |
| 05 | 15 | The Executive Offier of the Committee shall be appointed on such terms and conditions of service as may be determined by the State Government, from time to time. | The officers appointed by State Government under section 13 (2) shall be appointed on such terms and conditions of service as may be determinable by the State Government from time to time. | प्रतिनियुक्तीने राज्य शासन नियुक्ती करणा-या सर्व अधिका-यांसाठी लागु असणे आवश्यक आहे. |
| 06 | 18 (1) | About Advisory Council<br>Instead of<br>i) Divisional Controller, Maharashtra State Transport Corporation.<br>ii) Executive Engineer, Irrigation Department.<br>iii) Executive Engineer, MSEB. | Following members to be added in Advisory Council<br>(i) One officer from Indian Revenue Services or Indian accounts & audit services.<br>(ii) One officer from IT Department or IT Consultant.<br>(iii) One Deputy Secretory from Law and Judiciary.<br>(iv) Joint Director town planning.<br>(v) One Architect or person holding such qualification in State Services. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे वाढलेले कामकाज, आर्थिक बाबी, माहिती तंत्रज्ञान कामकाज, विधि संबंधीत कामकाज यामुळे या क्षेत्रातील व्यक्ती सल्लागार परिषदेत असणे आवश्यक आहे. |
| 07 | 27 | The State Government may, depute any officer not below the rank of Deputy Secretary to inspect any movable or immovable property, records, corves pondence, plans, accounts and other documents velatimg to the sansthan trust, and | Instead of Deputy Secretary any officer not below the rank of Secretary. | उप सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी ही पदे आता समकक्ष आहेत, त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कामाची तपासणी त्यांचेपेक्षा वरीष्ठ अधिका-यांनी करणे आवश्यक आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | the committee and its officers and employees shall be bound to afford all facilities to such officer for such inspection. | | |
| 08 | 28 (1) | 28 (1) | 28 (1) (i) Chief Executive Officer shall have to send all proceedings of meetings of Shri Saibaba Sansthan Management Committee to Secretary Law and Judiciary (New Sub-section to be added) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे कामकाज राज्य शासनाच्या कायद्यान्वये व विधि व न्याय विभागाचे अंतर्गत चालते. त्यामुळे व्यवस्थापन समितीचे बैठकींचे इतिवृत्त विधि व न्याय विभागास पाठविणे आवश्यक आहे. |
| 09 | 29 (1) | The Committee shall cause to be prepared the annual report including the Auditor's report for each financial year ending on 31st March showing therein the financial status and the details of income and expenditure of the Trust and the report of the Scrutiny Committee together with a detailed list of donee institutions (with full address), to whom financial assistance was granted by the Trust with information relating to the object and the amount of such financial assistance, and submit a copy of the report to the State Government and the Charity Commissioner not later than the 30 June of that year. | The Committee shall cause to be prepared the annual report including the Auditor's report for each financial year ending on 31st March showing therein the financial status and the details of income and expenditure of the Trust and the report of the Scrutiny Committee together with a detailed list of donee institutions (with full address), to whom financial assistance was granted by the Trust with information relating to the object and the amount of such financial assistance, and submit a copy of the report to the State Government and the Charity Commissioner not later than the 30 September of that year. | वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरिक्षकांना पुरेसा कालावधी मिळणेसाठी ३० जून ऐवजी ३० सप्टेंबर असा बदल होणे आवश्यक आहे. |
| 10 | 34 (3) | Where the Committee is dissolved or suspended under | Such person not being below the rank of Divisional Commissioner. | राज्य शासनाच्या आदेशान्वये कार्यकारी अधिकारी म्हणून भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-याची नियुक्ती झालेली आहे. समिती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | subsection (1) the state government shall appoint a person as an Administrator from amongst the person in the active service of the state government or from the persons who have retired from such service (such person not being below the rank of a collector) and who is a devotee of Shri Saibaba. | | बरखास्त अथवा निलंबीत असताना प्रशासक म्हणून नियुक्त करावयाचा अधिकारी हा कार्यकारी अधिकारी यांचेपेक्षा सेवाज्येष्ठ असणे आवश्यक आहे. |

**New Sections to be added in Shri Saibaba Sansthan Trust Act.2004**

**1) Powers to Chief Executive Officer in Emergency Situation:-**

The Chief Executive Officer may, in case of emergency direct execution of any work not exceeding amount one lakh or the going of any act, which is not provided for in the budget for the year and the immediate execution or the going of which is in his opinion necessary for the preservation of the properties of the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi or for the service or safety of the pilgrims resorting to the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi and may also direct that the expenses not exceeding amount one lakh of executing such work or doing the act shall be paid, from the funds of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi. The Chief Executive Officer shall fortwith report to the Committee the action taken under this section and the resons therefore.

**2) Power of Chief Executive Officer to request the Committee to reconsider the resolution in certain cases :-**

1) Where Chief Executive Officer considers that an order or resolution passed by the Committee (a) has not been passed in accordance with law (b) is in excess or abuse of the powers conferred on the Committee by or under the Act, or by any other law. (c) if implemented is likely to cause financial loss to the institution. (d) is not beneficial to the institution. The Chief Executive Officer may, without implementing such order or resolution and request the committee to reconsider the resolution.

2) The Chief Executive Officer shall forthwith submit the report of the action taken by him/ her under subsection (1) to the Secretary Law and Judiciary as case may be 3(a) where the resolution is placed for reconsideration under subsection (1) the committee shall reconsider the resolution having due regard to the objections contained in the note and pass such further resolution as it may deem fit. A copy of every such further resolution shall be sent forthwith to the Secretary, Law and Judiciary as the case may be who may pass such order as he deems fit. (b) Where after expiry of 60 days from the date on which the resolution was placed for reconsideration under subsection (1) the committee fails to pass further resolution as required under clause (a) the Secretary, Law and Judiciary as the case may be pass such order as be deems fit. (c) Every order passed by the Secretary, Law and Judiciary as the case may be, under clause (a) or clause (b) shall be final and binding on the committee.

**3) The Chairman of the Committee and the Chief Executive Officer may, however**

(a) sanction gifts of

(1) Laddus and other Prasad

(2) Shawls,

(3) Books and publications of the Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

(4) Idols of Shri Saibaba

(b) Food and accommodation for any dignatory provided that the expenditure involved in any item in any single case does not exceed Rs.5,000/-

(c) Free Darshan and Aarti to any degenatory.

वरीलप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये आवश्यक ते बदल करणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक त्या बदलांचे अवलोकन करणेत आले. त्यामध्ये विश्वस्त नेमणूकीसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२४ जानेवारी, २०१३ रोजीचे अधिसुचनेमधील कलम ४ (२) मध्ये अधिकतम वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा अधिक असता कामा नये, अशी तरतूद आहे. सदर वयाची अट शिथील करणेबाबतचा समावेश उपरोक्त बदलांमध्ये करणेत यावा.**

**तसेच प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या New section to be added in Shri Saibaba Sansthan Trust Act 2004 मधील मुद्दा क्र.२, Power of Chief Executive Officer to request the Committee to reconsider the resolution in certain cases, वगळणेत यावा व मुद्दा क्र.३ मध्ये मान्यवरांना भेटवस्तु देण्याचे अधिकार अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांचेबरोबरच सर्व विश्वस्तांनाही राहतील, असा बदल करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात येणाऱ्या ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव–** "श्री साईबाबांचे पदस्पर्शाने पावन झालेले शिर्डी शहर हे जगप्रसिध्द झाले आहे. त्यामुळे शिर्डीला दरारोज सुमारे १ लक्ष भाविक साईदर्शनासाठी भेट देत आहेत. तसेच महत्वाचे वार्षिक सण व उत्सवाच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे २ ते ३ लक्ष एवढी प्रचंड प्रमाणात वाढत असते. साईदर्शनासाठी शहरात येणारे भाविक दर्शन झालेनंतर शिर्डी शहरातील महत्वाचे रस्ते, सावर्जनिक मोकळया जागा, सावर्जनिक इमारती व मंदिर भोवतीच्या परिसरामध्ये दिवसभर वावर करीत असतात त्यामुळे शिर्डी शहरामध्ये घनकचरा मोठया प्रमाणावर वाढत जातो.

शिर्डी नगर पंचायत ही क वर्ग नगरपंचायत असून शहराची लोकसंख्या सुमारे ३६००४ एवढी आहे. तसेच श्री साईभक्तांना व नागरीकांना नागरी सुविधा देणे आवश्यक आहे.शिर्डी शहराची दैनदिन साफ सफाई करणे गरजेचे आहे. त्यामध्ये भाविकांची वर्दळ ज्या भागामध्ये मोठया प्रमाणावरअसते त्या भागाची दैनंदिन साफ सफाई दिवसातून दोन वेळेस करणे आवश्यक आहे.

त्यामध्ये नगर मनमाड रोड लक्ष्मीनगर ते साईआश्रम एक पर्यंत दोन्ही बाजू आणि पिंपळवाडी रोड (मनोजकुमार पथ) नगर मनमाड रोड ते साईनाथ मंगल कार्यालय पर्यंत साफ सफाई करीता दैनंदिन सुमारे ४० ते ५० सफाई कर्मचारी आवश्यक असतात. त्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी कडून सदर ठिकाणी साफ सफाई करणे करीता दररोज ४० कामगार देणेत येत आहे.

सदर मुदत दि. ३१/०३/२०१७ रोजी संपत आहे. तरी पुढील अर्थिक वर्ष २०१७-२०१८ या वर्षा करीता नगर मनमाड रोड लक्ष्मीनगर ते साईआश्रम एक पर्यंत दोन्ही बाजू आणि पिंपळवाडी रोड (मनोज कुमार पथ ) नगर मनमाड रोड ते साईनाथ मंगल कार्यालय पर्यंत साफ सफाई आपले कडील आरोग्य विभागाकडून चालू ठेवणे आवश्यक आहे." अशी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि. २५/०३/२०१७ चे पत्राव्दारे मागणी केलेली आहे. त्यांचे पत्र दि. २७/०३/२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे

शिर्डी नगरपंचायत यांचे प्रत्येक वर्षीचे मागणीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडून नगर – मनमाड रोड, मनोजकुमार पथ या रस्त्यांचे साफसफाईसाठी सन २००६ पासून ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी देण्यात येत आहे.

यापुर्वी मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेपुढील विषय नं. १३ निर्णय क्र. २६० ने ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी साफसफाईकरिता ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी देण्याचे मंजुर करण्यात आले आहेत. परंतू लेबर कॉन्ट्रॅक्टर मार्फत पुरविण्यात येणा-या अकुशल कंत्राटी कर्मचा-यांमधूनच उपलब्धतेनुसार दरारोज दोन शिप्टमध्ये एकुण सरासरी २० ते २२ कर्मचारी प्रतिदिनी नेमण्यात येत आहेत. माहे एप्रिल २०१६ ते फेब्रुवारी २०१७ पर्यंत त्यांचे वेतनावर रुपये २६,०८,४४५/- इतका खर्च झालेला आहे.

नगर पंचायतीचे दि. २५/०३/२०१७ रोजीचे विनंतीपत्रानुसार उपरोक्त कामी शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना पुढील एक वर्षासाठी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरविल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

| अ.नं. | तपशिल | होणारा खर्च |
|---|---|---|
| | | रुपये पैसे |
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २९४-४७ |
| २ | प्रा. फंड १३.३६% | ३९-३४ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.०००१% | ००-००२९ |
| | एकुण | **३३३-८१** |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १४ % | ४६-७३ |
| | स्व. भा. सेस ०.५% | ०१-६६ |
| | ॲग्री सेस ०.५% | ०१-६६ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | ३८३-८६ |
| ६ | प्रति दिन ४० कर्मचारी रु. | १५३५४-४० |
| ७ | प्रति दिन ४० कर्मचारी ३६५ दिवसाकरिता रु. | ५६०४३५६-०० |
| ८ | +१०% वर्षात होणारी वाढ | ५६०४३५-६० |
| | एकुण | **६१,६४,७९१-६०** |
| | पुर्णांकित | **६१,६४,७९२-००** |

उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरवावयाचे असल्यास त्यांचे वेतनापोटी अंदाजे रुपये ६१,६४,७९२/- (अक्षरी रुपये एकसष्ट लाख चौसष्ट हजार सातशे ब्यान्नव मात्र) इतका खर्च येईल. सदरचा खर्च सन २०१७-२०१८ चे वार्षिक अंदाजपत्रकातील कंत्राटी कर्मचारी मंजूरी मधील तरतुदीमधून करता येईल.

तरी या प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५५** **आजचे सभेत उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक सभेसमोर उपस्थित होते. शिर्डी शहराच्या स्वच्छतेबाबत त्यांनी सविस्तर चर्चा केली. शिर्डी शहराच्या स्वच्छतेसाठी ७० कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासते. याकामी अत्याधुनिक मशिनरींचीही आवश्यकता असून या मशिनरी व ७० स्वच्छता कर्मचारी शिर्डी नगरपंचायतीस पुरविणेत यावे, अशी त्यांनी सभेसमोर विनंती केली. यानंतर अशीही चर्चा झाली की, संस्थानमार्फत पुरविणेत येत असलेले पुर्ण ४० स्वच्छता कर्मचारी हजर नसतात, त्यामुळे या कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेण्यात अडचण येते, याकरीता नगरपंचायतीमार्फत स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेत येऊन, त्या कर्मचाऱ्यांचे वेतन संस्थानने द्यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री क्षेत्र शिर्डी येथे देश-विदेशातून श्रींचे दर्शनासाठी साईभक्त व मान्यवर अतिथी येत असतात, याकरीता शिर्डी शहर स्वच्छ असायला हवे, यासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना त्यांचे मागणीप्रमाणे स्वच्छतेसाठी आवश्यक असणाऱ्या मशिनरी संस्थानमार्फत विहीत पध्दतीने कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात येईपर्यंत, सध्या आहे त्याच ४० कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच सदरहू ४० कंत्राटी स्वच्छता कर्मचारी नगरपंचायतीकडे हजर राहतील याची पुर्णपणे जबाबदारी प्रअधिक्षक, आरोग्य विभाग यांची राहील.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या कामकाजासाठी शताब्दी कक्ष तसेच आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

| अ.नं. | कलम / तरतुद क्रमांक | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | **१७** | समितीची कर्तव्ये व अधिकार | **२(ठ)** | श्री साईबाबांचे जीवन,त्यांचे कार्य त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील. |
| | | | **२(ड)** | श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल. |
| ०२ | **२१** | विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग | **१(ख)** | रुढीनुसार व प्रथेनुसार मंदिरातील धार्मिक विधी पूजा – अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| | | | **१(ग)** | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय-** मा. त्रिसदस्य समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६५५ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*“.. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य नियोजन व आपत्ती व्यवस्थापन करणेसाठी जिल्हाधिकारी स्तरावर ०२ वर्ष कालावधीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शताब्दी कक्षाची स्थापना व त्यासाठी रु. १० कोटी मात्र इतक्या निधीची तरतूद करणेकामी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा,”असे ठरले आहे.*

**प्रस्तावना-** श्री क्षेत्र शिर्डी, ता. राहाता, जिल्हा. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे.

नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत कामकाजाचा समन्वय राखणे व नियोजन करणेसाठी तेथील जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र सिंहस्थ कुंभमेळा कक्षाची स्थापना करणेत आली होती. त्याच धर्तीवर श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य नियोजन व आपत्ती व्यवस्थापन करणेसाठी शिर्डी येथे श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव कामकाजासाठी दि.०१ जानेवारी,२०१६ ते ३१ डिसेंबर,२०१८ या तीन वर्षाचे कालावधीसाठी शताब्दी कक्षाची स्थापना करुन त्यामध्ये खालील अधिका-यांची प्रतिनियुक्ती करणे बाबतचा तसेच त्यासाठी रु.१० कोटी मात्र इतक्या निधीची तरतूद करणेबाबतचा प्रस्ताव दि.२८/१२/२०१५ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

| | |
|---|---|
| अप्पर जिल्हाधिकारी – ०१ | उपजिल्हाधिकारी - ०२ |
| पोलीस उपअधिक्षक - ०१ | उपअभियंता – ०२ |
| नायब तहसिलदार – ०१ | लिपीक - ०२ |

यावर सदर सभेत निर्णय क्रं. ६५५ वरील प्रमाणे संमत करणेत आला होता. याबाबतचे प्रस्तावावर झालेल्या उपरोक्त निर्णय क्रं. ६५५ अन्वये शासनाचे विधी व न्याय विभागाकडे इकडील कार्यालयाचे पत्र. जा. नं. एसएसएसटी/ बांधकाम-शताब्दी/६७९९/२०१६, दि.१०/०३/२०१६ चे पत्रान्वये मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे पत्र- क्रं.सासंवि-१०१६ /४०९ /प्र.क्र.६६/ का१६, दि.१२/०४/२०१६ चे पत्रान्वये महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या कामकाजासाठी शताब्दी कक्ष तसेच आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबतच्या संदर्भाधिन पत्रान्वये सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरुन खालील नमूद मुद्यांची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे.

१) प्रस्तावित शताब्दी कक्षामार्फत सुरुवातीपासून ते शताब्दी महोत्सवाच्या समारोपापर्यंत करण्यात येणा-या कामकाजाचा पदनिहाय आणि विस्तृत तपशिल उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) सदर प्रयोजनाकरीता अपेक्षित तरतूद रु.१० कोटी इतक्या रकमेच्या खर्चाचे विस्तृत विवरण सादर करण्यात यावे. (वेतन, यंत्रणा उभारणी इ. सह)

३) उपअभियंता आणि लिपिक संवर्गातील प्रत्येकी ०२ पदे संस्थान अधिकारी/कर्मचा-यामधून भरणे शक्य आहे अथवा कसे ही बाबत पडताळून पाहण्यात यावी.

४) शताब्दी कक्षाचे कार्यालय संस्थान परिसरात अथवा इतरत्र स्थापन करण्यात येणार आहे? याबाबत तसेच सदर कक्ष कोणत्या उच्चपदस्थ प्राधिका-यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहील याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

याबाबत नमूद करणेत येते की, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या कामकाजासाठी शताब्दी कक्ष तसेच आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी रु.१० कोटी निधीची रक्कम ही प्राथमिक व ढोबळ अंदाजानुसार दर्शविली असून ती ढोबळ स्वरुपाची आहे. त्यासाठी सविस्तर तपशिल तयार करणेत आलेला नाही. संस्थानने शताब्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी सुविधांचे पुर्वतयारीकरीता प्रारुप प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. या सल्लागार संस्थेची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार सदर सल्लागार संस्थेने प्रारुप प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. त्यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून City Command and Control Centre मध्ये खालील बाबींचा समावेश करणेत आलेला आहे.

**A) Video Surveillance**

1) City Command and Control Centre
2) City Surveillance
3) Video Analytics
4) ANPR
5) Critical Infrastructure protection
6) Emergency Help

**B) Call Centre & GPS Based VTS**

1) Emergency Help Points
2) Emergency Response System
3) Variable message Signage
4) GPS Based VTS for Ambulance, Fire Vehicles & Help Response Vehicles

त्यावेळी सदरचे अंदाजपत्रक हे दि.०१ जानेवारी,२०१६ ते ३१ डिसेंबर,२०१८ या तीन वर्षाचे कालावधीसाठी शताब्दी कक्षाची स्थापना करुन त्यामध्ये अप्पर जिल्हाधिकारी– ०१, उपजिल्हाधिकारी– ०२, पोलीस उपअधिक्षक - ०१, उपअभियंता– ०२, नायब तहसिलदार– ०१, लिपीक- ०२ हि पदे प्रतिनियुक्तीवर भरणेबाबत नमूद केले आहे. संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत भाविकांचा ओघ शिर्डीत मोठया प्रमाणात राहिल. त्यामुळे वरीलप्रमाणे ०३ वर्षाचे कालावधीऐवजी दि.०१ जानेवारी, २०१७ ते दि.३१ डिसेंबर, २०१८ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी शताब्दी कक्ष कार्यरत ठेवणे पुरेसे होईल,असे मत आहे.

तरी महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी नमूद केलेल्या उपरोक्त मुद्यांबाबत खालीलप्रमाणे माहिती सादर करता येईल.

| अ.नं. | मुद्दा | पुर्तता/कार्यवाही |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तावित शताब्दी कक्षामार्फत सुरुवातीपासून ते शताब्दी महोत्सवाच्या समारोपापर्यंत करण्यात येणा-या कामकाजाचा पदनिहाय आणि विस्तृत तपशिल उपलब्ध करुन देण्यात यावा. | **अप्पर जिल्हाधिकारी – (पद ०१)**<br>श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव निमित्त स्थापित शताब्दी कक्षाचे मुख्य समन्वयक म्हणून काम करतील.<br>होणा-या गर्दीच्या काळात दैनंदिन गरजेच्या वस्तू उपलब्ध करणे, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेसी संबंधीत कामे आदिबाबत दररोज संनियंत्रण करुन त्याबाबत दिवसातून कमीतकमी दोन वेळा आढावा घेतील. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यांच्या अधिपत्याखालील तसेच इतर प्रशासिनक अधिकारी यांच्या कामाचे पर्यवेक्षण करुन त्यांना आवश्यक सूचना निर्गमित करतील.<br>आवश्यकतेनुसार संबंधीत विभागांच्यासमन्वयकामी वेळोवेळी बैठका घेऊन आवश्यक त्या सूचना/मार्गदर्शन करतील. |
| | | **उपजिल्हाधिकारी – (पद ०१)-**<br>सर्व उपविभागांमधून विशेषतः वाहतुक, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेशी संबंधीत कामांचा व इतर पुरक सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे दैनंदिन आढावा घेऊन संनियंत्रण करतील.<br>आपल्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध सुविधांची(जसे – खाजगी, सरकारी, निमसरकारी दवाखाने अग्निशमन सेवा, वाहनतळे, रक्तपेढया, पाणीपुरवठा, पंपिंग स्टेशन, विद्युत उपकेंद्रे, बसस्थानके मार्ग, इ.) माहिती सहाय्यक समन्वयक यांच्या मदतीने संकलित करतील. व्यवस्थापनकामी व आकस्मिक प्रसंगी या माहितीचा उपयोग करतील.<br>संबंधीत विभाग/यंत्रणा यांचेसह इतर अनुषंगिक विभाग/यंत्रणांशी समन्वय साधून विहीत मुदतीत काम पार पाडणेसाठी नियोजन करतील.<br>आपत्ती व्यवस्थापनाबाबत नियोजन करुन त्यानुसार अंमलबजावणीबाबत कार्यवाही करतील.<br>अप्पर जिल्हाधिकारी यांना कामकाजामध्ये सहाय्य करणे. |
| | | **३) पोलीस उपअधिक्षक - (पद ०१)**<br>शताब्दी काळातीलकायदा व सुव्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन व इतर तदनुषंगिक बाबीस जबाबदार अधिकारी म्हणून काम पाहतील.<br>कार्यक्षेत्रातील वाहनतळ व्यवस्थेचे पर्यवेक्षण करुन संबंधितामार्फत आवश्यक सुधारणा करुन घेणे.<br>कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच आकस्मिक परिस्थितीत नियंत्रणकामी आवश्यक उपाययोजना करतील.<br>परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन आपत्तीजनक परिस्थीतीत इतर ठिकाणाहून मदत उपलब्ध करतील.<br>शिर्डी व परिसरातील संपूर्ण वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व नियंत्रण करतील. तसेच त्यासाठी लगतचे तालुके व जिल्ह्यातील पोलीस विभागाशी समन्वय ठेवतील. |
| | | **उपअभियंता – ( पद ०२)**<br>शिर्डी व परिसरातील रस्ते, पाण्याचा निचरा, इतर स्थापत्य कामे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी पार पाडतील.<br>वेळोवेळी वरीष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार संबंधीत कामाबाबतची जबाबदारी पार पाडतील. |
| | | **५) नायब तहसिलदार – (पद ०१) –**<br>शासकिय/निमशासकिय विभागांशी पत्रव्यवहारव शासकिय बैठकांचे इतिवृत्त तयार करणे.<br>इतिवृत्तातील निर्णयाप्रमाणे संबंधीत विभागांना कार्यवाही करणेबाबत पाठपुरावा करणे.<br>वेळोवेळी वरीष्ठांकडून दिल्या जाणा-या सूचना व आदेशाचे पालन करुन त्यानुसार कार्यवाही करणे. |
| | | **६) लिपीक – (पद ०२) -**<br>टंकलेखन बाबतची कामे व संबधीत विभागांशी पत्रव्यवहार करणे.<br>वेळोवेळी वरीष्ठांनी नेमून दिलेली कामे करणे. |
| ०२ | सदर प्रयोजनाकरीता अपेक्षित तरतूद रु.१० कोटी इतक्या रकमेच्या खर्चाचे विस्तृत विवरण सादर करण्यात यावे. (वेतन, यंत्रणा उभारणी इ. सह) | शताब्दीचे पुर्वतयारी करीता टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. या सल्लागार संस्थेने तयार केलेल्या प्रारुप प्रकल्प अहवालात आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधीत कामांचा समावेश करणेत आलेला आहे त्यामुळे प्रस्तावातील अधिकारी व कर्मचारी वेतन व ऑफीस फर्निचर खर्च वगळता उर्वरीत निधीची |

| | | |
|---|---|---|
| | | तरतूद आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून ऐन वेळी उदभवणा-या प्रसंगी राखीव म्हणून ठेवता येईल.<br>कर्मचारी पगारः- रु.५५.०० लक्ष (अंदाजे प्रारंभिक वेतनानुसार)<br>ऑफीस फर्निचर, रंगकाम इ.- रु. ०५.०० लक्ष<br>आपत्ती व्यवस्थापनाकामी राखीव निधीः- रु. ०९.४० कोटी<br>**एकूणः- रु. १०.००कोटी** |
| ०३ | उपअभियंता आणि लिपिक संवर्गातील प्रत्येकी ०२ पदे संस्थान अधिकारी/कर्मचा-यामधून भरणे शक्य आहे अथवा कसे ही बाबत पडताळून पाहण्यात यावी. | शताब्दी कालावधीत संस्थानचेच कामकाजाचे स्वरुप व्यापक प्रमाणात राहिल त्यामुळे उपअभियंता ०२ हि पदे संस्थान कर्मचा-यांमधून भरणे शक्य नाही. याकरीता सदरची पदे शासनाकडून प्रतीनियुक्तीवर नियुक्त करावी लागतील. तथापी लिपीक संवर्गातील प्रत्येकी ०२ पदांसाठी संस्थान कर्मचारी उपलब्ध करुन देता येतील. |
| ०४ | शताब्दी कक्षाचे कार्यालय संस्थान परिसरात अथवा इतरत्र स्थापन करण्यात येणार आहे? याबाबत तसेच सदर कक्ष कोणत्या उच्चपदस्थ प्राधिका-यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहील याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. | श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या कामकाजाच्या दृष्टीकोनातून शताब्दी कक्षाचे कार्यालय संस्थान परिसरात स्थापन करणे योग्य होईल व सदरचा कक्ष मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे नियंत्रणाखाली स्थपित करता येईल. |

तरी शासनाने कळविलेल्या मुद्यांची माहिती वरीलप्रमाणे शासनास कळविता येईल. त्यासाठी सदरहु माहिती मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेस्तव सादर होणेस विनंती, अशा स्वरुपाची दि. ११/०७/२०१६ रोजीची उपरोक्त संदर्भिय क्रमांक ०३ ची टिपणी मान्यतेस्तव सादर केली होती.

सदर टिपणीवर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी "श्री आहेर सो. बांधकाम विभाग चर्चा करावी" असे निर्देश दिले होते. दिलेल्या निर्देशानुसार सदर टिपणीवर चर्चा झालेनंतर मा. कार्यकारी अधिकारी यांनी "शासनास सादर करावे" असे निर्देश दिले.

दिलेल्या निर्देशानुसार मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना द्यावयाच्या पत्राचा मसूदा तयार करुन इकडील कार्यालयाचे दि.११/०७/२०१६ रोजीचे टिपणीसोबत फेर सादर करणेत आला.

दरम्यानचे कालावधीत महाराष्ट्र शासनाचे दि.०८/०३/२०१७ रोजीचे आदेशाव्दारे श्रीमती रुबल अग्रवाल भा. प्र. से. यांची संस्थानचे कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.

सदर टिपणीवर प्रधान सचिव, विधी व न्याय विभागास सादर करावयाचे प्रस्तावाबाबत मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे नमूद पदांचा प्रस्ताव शासनास फेर सादर करावा अशा मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांच्या सूचना आहेत, असे निर्देश दिलेले आहेत.

उप जिल्हाधिकारी – ०२
पोलीस उपअधिक्षक - ०१
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग -०१
जिल्हा वैद्यिकय अधिकारी /जिल्हा शल्य चिकित्सक - ०१
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग – ०१

मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दिलेल्या सूचनेनुसार मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना सादर करावयाचे प्रस्तावात वरील प्रमाणे दिलेल्या पदांचा समावेश करुन खालीलप्रमाणे त्यांचे कामकाजाचा पदनिहाय तपशिल शासनास सादर करता येईल.

| अ.नं. | मुद्दा | पुर्तता/कार्यवाही |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तावित शताब्दी कक्षामार्फत सुरुवातीपासून ते शताब्दी महोत्सवाच्या समारोपापर्यंत करण्यात येणा-या कामकाजाचा पदनिहाय आणि विस्तृत तपशिल उपलब्ध करुन देण्यात यावा. | **१) उपजिल्हाधिकारी – (पद ०२ )**<br>• सर्व उपविभागांमधून विशेषतः वाहतुक, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेशी संबंधीत कामांचा व इतर पुरक सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे दैनंदिन आढावा घेऊन संनियंत्रण करतील.<br>• आपल्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध सुविधांची(जसे – खाजगी, सरकारी, निमसरकारी दवाखाने अग्निशमन सेवा, वाहनतळे, रक्तपेढया, पाणीपुरवठा, पंपिंग स्टेशन, विद्युत उपकेंद्रे, बसस्थानके मार्ग, इ.) माहिती सहाय्यक समन्वयक यांच्या मदतीने संकलित करतील. व्यवस्थापनकामी व आकस्मिक प्रसंगी या माहितीचा उपयोग करतील. |

| | | |
|---|---|---|
| | | • संबंधीत विभाग/यंत्रणा यांचेसह इतर अनुषंगिक विभाग/यंत्रणांशी समन्व्य साधून विहीत मुदतीत काम पार पाडणेसाठी नियोजन करतील.<br>• शताब्दी कक्षामार्फत करणेत आलेल्या नियोजनानुसार अंमलबजावणीबाबत कार्यवाही करतील.<br>• मा. कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत कामाची जबाबदारी पार पाडतील. |
| | | **२) पोलीस उपअधिक्षक - (पद ०१)**<br>• शताब्दी काळातील कायदा व सुव्यवस्था, शताब्दी कक्षामार्फत करणेत आलेले नियोजन, आपत्ती व्यवस्थापन व इतर तदनुषंगिक बाबीस जबाबदार अधिकारी म्हणून काम पाहतील.<br>• कार्यक्षेत्रातील वाहनतळ व्यवस्थेचे पर्यवेक्षण करुन संबंधितामार्फत आवश्यक सुधारणा करुन घेणे.<br>• कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच आकस्मिक परिस्थितीत नियंत्रणकामी आवश्यक उपाययोजना करतील.<br>• परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन आपत्तीजनक परिस्थीतीत इतर ठिकाणाहून मदत उपलब्ध करतील.<br>• शिर्डी व परिसरातील संपूर्ण वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व नियंत्रण करतील. तसेच त्यासाठी लगतचे तालुके व जिल्ह्यातील पोलीस विभागाशी समन्वय ठेवतील.<br>• मा. कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत कामाची जबाबदारी पार पाडतील. |
| | | **३) कार्यकारीअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग – (पद ०१)**<br>• शिर्डी व परिसरातील रस्ते, पाण्याचा निचरा, इतर स्थापत्य कामे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी पार पाडतील.<br>• मा. कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत कामाची जबाबदारी पार पाडतील. |
| | | **४) उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग – (पद ०१)**<br>• मा. कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत कामाची जबाबदारी पार पाडतील. |
| | | **५) जिल्हा वैद्यकिय अधिकारी /जिल्हा शल्य चिकित्सक-(पद ०१)**<br>• आरोग्य व स्वच्छता सेवेशी निगडीत कामांकरीता मुख्यसमन्वयक म्हणून काम करतील.<br>• आरोग्य सेवेची जबाबदारी असणा-या संबंधीत यंत्रणाकडून आवश्यक कामे अपेक्षित समय सीमेत पार पाडून घेतील.<br>• औषधसाठयाची उपलब्धता व वाटप सुनिश्चित करणे व संक्रमक रोग पसरु नये याबाबत नियोजन व उपाययोजना करणे.<br>• आकस्मिक प्रसंगासाठी आराखडा तयार करणे<br>• कार्यक्षेत्रातील खाजगी इस्पितळे, डॉक्टर्स, वैद्यकिय सेवा पुरविणा-या समाजसेवा संस्था यांच्यात समन्वय साधून गरजेनुरुप त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत नियोजन करणे.<br>• आरोग्य व्यवस्थेसाठी तात्पुरते आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे. त्यांचेसाठी आवश्यक बाबी जसे निवारा, वाहतुक व्यवस्था इ. नियोजन करणे.<br>• त्यांच्या अधिपत्याखालील तसेच इतर प्रशासिनक अधिकारी यांच्या कामाचे पर्यवेक्षण करुन त्यांना आवश्यक सूचना निर्गमित करतील.<br>• आवश्यकतेनुसार संबंधीत विभाांच्या समन्वयकामी वेळोवेळी बैठका घेऊन आवश्यक त्या सूचना/मार्गदर्शन करतील.<br>• मा. कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत कामाची जबाबदारी पार पाडतील. |

| | | |
|---|---|---|
| ०२ | सदर प्रयोजनाकरीता अपेक्षित तरतूद रु.१० कोटी इतक्या रकमेच्या खर्चाचे विस्तृत विवरण सादर करण्यात यावे. (वेतन, यंत्रणा उभारणी इ. सह) | शताब्दीचे पुर्वतयारी करीता टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. या सल्लागार संस्थेने तयार केलेल्या प्रारुप प्रकल्प अहवालात आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधीत कामांचा समावेश करणेत आलेला आहे त्यामुळे प्रस्तावातील अधिकारी व कर्मचारी वेतन व ऑफीस फर्निचर खर्च वगळता उर्वरीत निधीची तरतूद आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून ऐन वेळी उदभवणा-या प्रसंगी राखीव म्हणून ठेवता येईल.<br>• कर्मचारी पगारः- रु.५५.०० लक्ष (अंदाजे प्रारंभिक वेतनानुसार)<br>• ऑफीस फर्निचर, रंगकाम इ.- रु. ०५.०० लक्ष<br>• आपत्ती व्यवस्थापन कामी तसेच शताब्दी कक्षाचे नियोजीत कामासाठी राखीव निधीः- रु.०९.४० कोटी<br>**एकूण:- रु. १०.००कोटी** |
| ०३ | उपअभियंता आणि लिपिक संवर्गातील प्रत्येकी ०२ पदे संस्थान अधिकारी/कर्मचा-यामधून भरणे शक्य आहे अथवा कसे ही बाब पडताळून पाहण्यात यावी. | शताब्दी कालावधीत संस्थान कामकाजाचे स्वरुप व्यापक प्रमाणात राहिल त्यामुळे नव्याने प्रस्तावात नमूद असलेप्रमाणे कार्यकारी अभियंता -०१, उपअभियंता ०१ हि पदे संस्थान कर्मचा-यांमधून भरणे शक्य नाही. याकरीता सदरची पदे शासनाकडून प्रतीनियुक्तीवर नियुक्त करावी लागतील.<br>तथापी लिपीक संवर्गातील पदे नविन प्रस्तावात नमूद केलेली नाही. सदर कामासाठी आवश्यकतेनुसार संस्थान कर्मचारी उपलब्ध करुन देता येतील. |
| ०४ | शताब्दी कक्षाचे कार्यालय संस्थान परिसरात अथवा इतरत्र स्थापन करण्यात येणार आहे? याबाबत तसेच सदर कक्ष कोणत्या उच्चपदस्थ प्राधिका-यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत राहील याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. | श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या कामकाजाच्या दृष्टीकोनातून शताब्दी कक्षाचे कार्यालय संस्थान परिसरात स्थापन करणे योग्य होईल व सदरचा कक्ष मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नियंत्रणाखाली स्थपित करता येईल. |

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य व्यवस्थापन करणेसाठी शताब्दी कक्षाकरीता आवश्यक असलेल्या वर नमूद पदांचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्यासोबत शासनाने मागविलेल्या मुद्यांची वरीलप्रमाणे माहिती कळविता येईल. तरी याप्रमाणे प्रस्ताव मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने दि.०१ एप्रिल, २०१७ ते दि.३१ मार्च, २०१९ या कालावधीकरीता प्रसतावात नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाचे अधिकारी प्रतिनियुक्तीने संस्थानवर घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणाऱ्या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य व्यवस्थापन करणेसाठी शताब्दी कक्षाकरीता आवश्यक असलेल्या नव्याने प्रस्तावित पदांचा प्रस्ताव व शासनाने मागविलेल्या मुद्यांची उपरोक्तप्रमाणे माहिती मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ शताब्दी कक्ष प्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे उर्वरित ३८६ खोल्यांसह नुतनीकरण करणेचे कामासाठी ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थानपन समितीचे सभेतील निर्णय:**

१. निर्णय क्र. ७४५ दिनांक १५/०९/२०१२

२. निर्णय क्र.४४८ दिनांक २१/०६/२०१३

३. निर्णय क्र. ५३३ दिनांक २६/०६/२०१४

**प्रस्तावना:** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारत साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी उपयुक्त व सोयीची असल्याने, या इमारतीमधील भक्तांचे वापरातील ४८६ खोल्यांसह एकूण ५४४ खोल्या सन १९९४-९५ पासून पूर्ण क्षमतेने वापरात आहेत. सदर खोल्या, कार्यालये, गाळे भक्तांचे व मेंटेनन्स विभागांचे वापरात आहेत. सततच्या वापराने खोल्यांचे रंग, एम.एस.लोखंडी फ्रेम-दरवाजे, खिडकी, फरशी, प्रसाधनगृहातील टाईल्स इत्यादी बाबी खराब झालेल्या आहेत. सन १९९९-२००० मध्ये सदर इमारतीचे खोल्यांमधील संडास-बाथरुमचे दुरूस्तीचे काम करून घेण्यात आले आहे. तसेच सदर इमारतीतील दुरुस्ती देखभालीची कामे इकडील विभागामार्फत वेळोवळी करणेत येत असतात.

सन २०१० मध्ये सदर इमारतीतील पहिल्या टप्प्यात १०० खोल्यांचे नुतनिकरणांतर्गत खालीलप्रमाणे कामे करणेत आली असुन याकामी रु.१,७४,९५,१२१/- इतका खर्च आलेला आहे.

१. दरवाजे फ्रेम शटरसह बदलणे व दुरुस्ती करणे.
२. प्लास्टर करणे.
३. टाईल्स् बसविणे.
४. संडास भांडे बदलणे, पी. व्हि. सी. पाईप लाईन बदलणे व इतर प्लंबींग कामे.
५. खोल्यांचे आतिल भिंतीना ६ फुट उंची पर्यंत डॅडो बसविणे.
६. पॅसेजमध्ये ६ फुट उंची पर्यंत टाईल्स बसविणे.
७. डक्टचे टर्बो व्हेंन्टीलेटर वापरुन व्हेंन्टीलेशन करणे व इतर अनुषंगीक कामे करणे.
८. रंगकाम करणे.
९. विद्युतीकरण करणे.

सदर इमारतीचे उर्वरीत एकूण ४४४ खोल्यांपैकी दुस-या टप्प्यातील ए-डी विंगमधील २०० खोल्यांचे नुतनिकरणासाठी रु. ४,१०,३२,६४७/- खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १५/०९/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ७४५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच या कामासाठी आर्किटेक्ट डहाणुकर असोशिएटस्, मुंबई यांची मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक २१/०६/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.४४८ अन्वये नेमणूक करणेबाबत ठरले असुन मंजूर निविदा रकमेवर १.५% फी (अधिक सर्व्हिस टॅक्स व विनामुल्य निवास-भोजनव्यवस्था) देणेस मान्यता देण्यात आली आहे.

तसेच तिस-या टप्प्यातील २०० खोल्यांसह संपूर्ण इमारतीचे नुतनिकरणासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.५३३ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील २०० खोल्यांच्या नुतनिकरणासाठी समितीने मान्यता दिलेली आहे व त्याकामी येणारे खर्चास परवानगी मिळणेसाठी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून, आजतागायत मा. खंडपीठाची सदरहू खर्चास मंजूरी मिळालेली नाही. यामुळे पूर्वीच्या २०० खोल्यांच्या नुतनिकरणासाठी येणा-या खर्चास मा. खंडपीठाची मंजूरी येईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा असे ठरले होते.

उपरोक्त परिच्छेदामधे नमूद केल्यानुसार २०० खोल्यांचे नुतनिकरणाचे खर्चास परवानगी मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अर्ज C.A.No. 13282 of 2013 सादर करणेत आला होता. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे केलेला सिव्हील अर्ज C.A.No. 13282 of 2013 मागे घेण्यात आला आहे.

**प्रस्ताव:** पहिल्या टप्प्यातील १०० खोल्यांचे नुतनीकरणाचे काम सन २०१० मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत खोल्या व इमारतीचे नुतनीकरण करणेसाठी खालील कामे करणे आवश्यक आहे.

१. टॉयलेटचे दरवाजे आर.सी.सी. फ्रेम व पीव्हीसी शटरने बदलणे व मुख्य दरवाजा दुरुस्ती.
२. ॲल्युमिनियम खिडक्या व एम.एस. ग्रील्स बसविणे
३. आवश्यकतेनुसार आतील प्लास्टर.
४. व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे.

५. संडास भांडे बदलणे, पी. व्हि. सी. पाईप लाईन, नळ बदलणे व इतर प्लंबींग कामे.
६. खोल्यांचे आतिल भिंतीना ६ फुट उंची पर्यंत डॅडो बसविणे.
७. पॅसेजमध्ये ६ फुट उंची पर्यंत टाईल्स बसविणे.
८. डक्टचे टर्बो व्हेंन्टीलेटर वापरुन व्हेंन्टीलेशन करणे व इतर अनुषंगीक कामे.
९. लस्टर पेंट वापरून आतील व रिनोव्हा पेंटमध्ये बाहेरील रंगकाम.
१०. टेरेस वॉटरप्रुफिंग
११. जनरल टॉयलेट नुतनीकरण - संडास भांडेबदलणे, पी. व्हि. सी. पाईप लाईन, नळ बदलणे व प्लंबींग कामे
१२. सोलर वॉटर हिटींग सिस्टिम
१३. खोल्यांचे वातानुकुलन व एलईडी टी व्ही बसविणे
१४. सिवरेज ट्रीटमेंट प्लॅन्ट उभारणे
१५. खोल्यांमधील विद्युतीकरण करणे.
१६. ग्रीन मार्बल व कडप्पा वापरुन लगेज रॅक्स करणे.

उपरोक्तप्रमाणे ३८६ खोल्या व इमारतीचे उर्वरीत नुतनीकरण कामांसाठी सन २०१६-१७ चे जिल्हादारसुचीनुसार करणेत आलेल्या अंदाजपत्रकानुसार रु१२,३७,६१,६५९/-मात्र खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/ २०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यानूसार याकामी २०% कपात करुन रु.९,९०,०९,३२७/- इतकी रक्कम येते. तसेच खोल्यांसाठी वातानुकुलीत यंत्रणा व टी.व्ही. बसविणे, विद्यूतीकरण, आर. ओ. सिस्टम, सोलर सिस्टीम, सिवरेज वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट व फर्निचर आदी कामांसाठी संबंधित विभागांमार्फत स्वतंत्र अंदाजपत्रक सादर करून पुढील कार्यवाही करता येईल.

**प्रस्ताव:** तरी याकामासाठी यापूर्वी आर्किटेक्ट डहाणुकर असोशिएटस्, मुंबई यांचेकडून आर्कीटेक्चरल सेवा घेवून अथवा विभागामार्फत सदरचे कामासाठी आयटमरेट पद्धतीने ई-निविदा मागविणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे उर्वरित ३८६ खोल्यांसह नुतनीकरण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५** **साईसृष्टी प्रकल्प बीओटी तत्वावर अथवा संस्थानमार्फत राबविणे तसेच याकामी अनुभवी सल्लागार यांची नेमणूक करणे.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद : खालील प्रमाणे आहे.**

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) -पोटकलम(२)खंड(ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम (१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम (१) खंड (झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१. दिनांक ०५/१२/२०१० निर्णय क्र. १००४(०४)
२. दिनांक २६/०३/२०११ निर्णय क्र. २०१
३. दिनांक २८/१२/२०१५ निर्णय क्र. ६५३
४. दिनांक ३१/०८/२०१६ निर्णय क्र. ६३५
५. दिनांक २२/१२/२०१६ निर्णय क्र.९०९.
६. दिनांक ०९/०३/२०१७ निर्णय क्र.२१७

**प्रस्तावना:** श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांना गर्दीचे प्रमाणात अनेक सोयीसुविधा मंदिर परिसरात पुरविण्यात आलेल्या असुन आणखी वाढीव सुविधा पुरविणेसाठी दर्शनरांग व अनुषंगिक व्यवस्था निर्माण करणे प्रस्तावीत आहे. सध्या समाधीचे दर्शन घेवून बाहेर पडणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी मंदिर परिसरात असते. या गर्दीत दर्शन घेवू इच्छिणा-या भक्तांची भर पडतच असते. यासाठी मंदिर परिसरातील भक्तांची गर्दी अन्यत्र वळविणे आवश्यक आहे. शिर्डीत येणा-या साईभक्तांसाठी नविन आकर्षण केंद्र निर्माण करणे व भक्तांना विरंगुळा मिळणेबरोबरच श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबत माहीती देणेचे दृष्टीने संस्थानमार्फत साईगार्डन थिमपार्क लेजरशो करणे प्रस्तावीत आहे. तसेच श्री साई सच्चरित ग्रंथातील प्रसंगावर आधारीत चलचित्र स्वरुपातील देखावे लाईट व साऊंड इफेक्टसह सादर करणेसाठी 'साईसृष्टी' प्रकल्प प्रस्तावीत आहे. या कामांमध्ये सिव्हील वर्क, इंटेरियर व लॅन्डस्केपिंग वर्क, मुर्त्या, ग्रंथालय, योगा, म्युझियम, उपहारगृह, स्वच्छतागृह, इंटेलिजंट लाईटींग व इलेक्ट्रीकल कामे इत्यादी कामांचा समावेश आहे. याबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदरहु समितीचे निर्णय क्रमांक ६५३ अन्वये खालीलप्रमाणे ठरले आहे.

*".. यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की प्रस्तावीत प्रकल्पात प्रामुख्याने श्री साई सच्चरीत ग्रंथातील प्रसंगावर आधारीत देखावे तसेच मुर्त्या उभारणे अशा कलात्मक स्वरुपाच्या कामांचा समावेश असल्यामुळे तत्कालीन व्यवस्थापन समितीने या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून चित्रपट सृष्टीतील आघाडीचे व सुप्रसिद्ध कला नेपथ्थकार श्री.नितिन देसाई यांची नेमणूक केलेली आहे. तरी आता प्रस्तावीत प्रकल्प साईगार्डनमधील जागेत करणेसाठी श्री.नितिन देसाई यांचेकडून आराखडा व अंदाजपत्रक तयार करून त्यमुसार येणा-या अनुषंगिक खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी."*

सदरचा प्रकल्प साईगार्डन प्रकल्पाचे उर्वरीत जागेत करणेबाबत ठरले आहे. परंतु मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं १९८, १९९, २०० व २०१ मधील सदरहु क्षेत्र हरित क्षेत्रातून (Green zone) वगळून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध सार्वजनिक/निमसार्वजनिक उपक्रमांचे वापरासाठी रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असुन, त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१/०८/२०१६ रोजी झालेल्या सभेतील नि.क्र.६३५ खालीलप्रमाणे आहे.

*" श्री साई सृष्टी प्रकल्पासाठीचे सल्लागार व कला, नेपथ्यकार श्री.नितिन देसाई, मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी सभेस श्री साईसृष्टीचे सादरीकरण दाखविले व पुढीलप्रमाणे माहिती दिली.*

*बाबांच्या समाधी शताब्दी निमित्ताने साईसृष्टी बनविणेत येणार असून या प्रकल्पाचे कार्यक्रम व्यवस्थापन ते स्वत: विनामुल्य करणार आहेत. यामध्ये बाबांची भव्य अशी १०० फुट उंचीची बाबांची मुर्ती राहील व बाजुला वेगवेगळया ५२ गॅलऱ्यांमध्ये साईसच्चरीत्र अध्यायामधील ५२ प्रकारचे हालते देखावे राहतील. त्यामुळे साईभक्तांना दृश्यस्वरुपात बाबांचे चरित्र समजणार आहे तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची छोटया पडद्यावरील मालिकाही निर्माण करण्याचा माणस आहे. साईसृष्टीमध्ये मोठे स्टेज राहील व त्यावर वर्षभर वेगवेगळया नामांकित कलाकारांचे लाईव्ह कार्यक्रम राहतील सर्व साईसृष्टी पहाण्यासाठी भक्तांना कमीत कमी २ तास व जास्तीत जास्त २ दिवसही वेळ लागेल. बाबा भिक्षा मागत असत, या संकल्पनेमधून देशाच्या काना-कोपऱ्यातून समाधी शताब्दी निमित्ताने बाबांचा रथ शिर्डीसाठी निघेल. समाधी शताब्दी निमित्ताने समाधी शताब्दीसाठी ब्रँड ॲम्बसेडर नेमण्यात येईल, इ.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन समितीने असे ठरले की, श्री साईबाबांच्या महासमाधी शताब्दी वर्षाचे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-२०१८, असे संबोधण्यात यावे व या नावाचा लोगो तयार करणेत यावा, त्या लोगोवर पृथ्वी व मंदिरामधील बाबांचा (मुर्तीचा) फोटो व त्यावर चोहोबाजुंने चांदण्यांच्या स्वरुपात उठावदार प्रकाश टाकणेत यावा.*

*समाधी शताब्दी वर्षाची जागतिक पातळीवर प्रसिध्दी देण्यासाठी ब्रॅण्ड ॲम्बीसिडर म्हणून जेष्ठ सिने अभिनेता अमिताभ बच्चन यांना विचारणा करण्यात यावी, ते साईबाबांचे भक्तही आहेत. तसेच दक्षिण भारतीय सिने अभिनेते रजनीकांत,नागार्जुन, बाहुबली फेम प्रभास हे व इतर साईभक्त सिनेअभिनेते कि जे विनामुल्य सेवा देतील त्यांना विचारना करण्यात यावी.*

*बाबांच्या समाधी शताब्दी निमित्ताने साईसृष्टी स्मारक कायमस्वरुपीचे बनविणेत यावे. त्यामध्ये श्री.नितिन देसाई यांनी नमुद केलेप्रमाणे बाबांची १०० फुटी मुर्ती, विविध देखावे व लहान मुलांसाठी टेलीस्कोप गॅलरीव्दारे स्टार्स पहाण्याची व्यवस्थाही ठेवण्यात यावी. बाबांनी आयुष्यभर गोर-गरीब तसेच रोग्यांची सेवा*

*केलेली होती. त्यामुळे सदरहू साईसृष्टीमध्ये बाबांनी लोकांच्या केलेल्या सेवेच्या बाबतीतील देखावे ठेवावेत. तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची सिरीयल तयार करणेसाठी मोठया देणगीदार साईभक्तांची प्रायोजक म्हणून नेमणूक करणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदरहू साईसृष्टी उभारणीकामी येणाऱ्या अंदाजे रु.३६.०९ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.९०९ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. *".. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईसृष्टी प्रकल्प उभारणी कामीच्या अंदाजपत्रकीय खर्चामधील क्वॉटीजन्सीज व सल्लागार फी या रकमा वगळणेत येऊन, उर्वरीत खर्चास मान्यता देण्यात आली. याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्रींच्या समाधि शताब्दी महोत्सव वर्षापूर्वी साईसृष्टी प्रकल्पाचे काम पूर्ण होणे आवश्यक असल्यामुळे तात्काळ ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी. साईसृष्टी प्रकल्पाची थीम बाबांनी केलेल्या सेवेची ठेवण्यात येऊन, लेजर शो भारतातील सर्व संतांच्या वस्तूंचे संग्रहालय, मुलांसाठी दुर्बिनच्या सहाय्याने तारे दाखविणे यासह एक मुख्य व इतर ५३ दालने बनविणेत यावीत. तसेच सर्व समिती सदस्यांसमोर साईसृष्टी प्रकल्पाचे सादरीकरण दाखविणेत येऊन ते अंतिम करणेत यावेत याबाबत साईसृष्टी प्रकल्पाचे सल्लागार श्री. नितीन देसाई, मुंबई यांना कळविण्यात यावे असे ठरले."*

त्यानुसार सल्लागार श्री.नितिन देसाई यांना दिनांक ०३/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये, सर्व समिती सदस्यांसमोर साईसृष्टी प्रकल्पाचे सादरीकरण दाखविणेत येऊन ते अंतिम करणेबाबत कळविणेत आले आहे. त्यानुसार त्यांनी दि.२५/०२/२०१७ रोजी सादरीकरण केले आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२१७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

*"...तसेच साईसृष्टी प्रकल्पामधील प्रस्तावित लेझर शो, प्लॅनोटेरीयम, वॅक्स म्युझीयम हे BOT तत्वावर तयार करणेसाठीचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. "*

उपरोक्त विषयाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभांमध्ये वरीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आले आहेत.

साईसृष्टी प्रकल्पासाठी "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (Build, Operate and Transfer - BOT)" तत्वावर प्रस्ताव मागविणेसाठी, सदरहु प्रकल्पातील लेजरशो, तारांगण, वॅक्स म्युझियम व इतर अनुषंगिक कामांचे सविस्तर स्पेसिफिकेशनसह निविदा कागदपत्रे, आराखडे व अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक असल्याने या कामांसाठी या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी सल्लागार नेमणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव :** तरी साईसृष्टी प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१. मौजे निमगांव को-हाळे गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल संस्थान मालकीचे जमिनीमध्ये सदरहू प्रकल्पाची उभारणी करणे.

२. बीओटी तत्तवावर अथवा संस्थान निधीतून सदर प्रक्ल्पाची उभारणी करणे.

सदरहू प्रकल्पातील लेजर शो, तारांगण, वॅक्स म्युझियम व इतर अनुषंगीक कामांचे सविस्तर स्पेसिफिकेशनसह आराखडे, अंदाजपत्रके व निविदा प्रपत्रे तयार करणेसाठी देश पातळीवर काम करणा-या तज्ञ प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करणे. त्यासाठी ई-प्रस्ताव (e-RFPs) मागविणे.

**निर्णय क्र.२५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईसृष्टी, तारांगण, वॅक्स म्युझीयम असा एकत्रित प्रकल्प राबविणेसाठी, संकल्पना, संरचना आणि बांधणी (Concept, Design & Build) या तत्वावर निविदा मागविण्यात याव्यात. या निविदा (Tender Documents) तयार करणे, प्राप्त निविदांचे मुल्यमापन (Evaluation) करणे तसेच सदरहू काम सुरु झाल्यानंतर देखरेख करणे, झालेल्या कामांची बीले प्रमाणित करणे यासाठी एक विशेष बाब म्हणून भारतातील नामांकित वर्तमानपत्रामध्ये व्यावसायिक दराने जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, सल्लागाराची नेमणूक करणेत यावी.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्ते विकसन करणे कामाचे ठेकेदार कंपनीचे नावात रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि. असा बदल करणे अथवा नव्याने निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

१.नि. क्र. २६३ दि. २४/०४/२००६ — ६. नि. क्र.५४३ दि.२६/०७/२०१३
२. नि. क्र. १६ (ब) दि.१०/०१/२०१० — ७. नि. क्र.१८४ दि.१५/०३/२०१४
३.नि. क्र.५३४ दि.०४/०७/२०१० — ८. नि. क्र.४८० दि.१२/०६/२०१४
४.नि. क्र.१७३ (०७) दि.१९/०२/२०१२ — ९. नि. क्र.३४३ दि.०८/१०/२०१५
५.नि. क्र.७४६ (फ) दि.१५/०९/२०१२ — १०. नि. क्र.६४४ दि.१९/०९/२०१६

**मा. शासन निर्णय:** क्र. सासंवि-२००६/८७६/का.सोळा दि.०४/०९/२०१४

**प्रस्ताविक:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०६ रस्ते संस्थान निधीतुन ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचेमार्फत विकसित करणेत येत आहे. ठेकेदार यांना देणेत आलेले रु.३३,८३,२६,१९९/- मात्रचे कार्यादेश रकमेपैकी रु.२४,०४,१५,७१३/- मात्र (रनिंग बिल व भावफरक बिल क्र. ०९ पर्यंत) अदा करणेत आले आहे. भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या रस्त्यांचे भूसंपादन खर्चासह या प्रकल्पास येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर प्रकल्पासाठी भूसंपादन खर्चासह आजपावेतो रु.७०,०७,८४,४९९/- मात्र इतका खर्च झालेला आहे. सदरहु प्रकल्पाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Name of work: - | Construction Of Flexible And Rigid Pavement For DP And Ring Roads In Shirdi Town. |
|---|---|
| Name of Contractor: - | M/s. Roman Tarmat Ltd. New Mumbai |
| Project Management consultant : - | Unison Project Management Pvt.Ltd., Pune (Upto Jan. 2015) |
| Resolution no. & date: - | Res.No.534 Date 04/07/2010 Rs.33,83,26,199/- |
| Work order-LOA No. & date: | 8498/2010 dated 19/07/2010 |
| Notice to proceed with the work No. & date: | 8837/2010 dated 06/08/2010 |
| Contract Value: - | Rs.33,83,26,199/- (10% below of Rs.37,59,17,999/-) |
| Date of commencement | 06/08/2010 |
| Time for completion: - | Fifteen Months |
| Scheduled date of completion | 06/11/2011 |
| Extended date of completion | March2012, May2013, December2013, April 2014, **June2014** |
| Uptodate work done amount Rs. | Rs. 19,87,38,861/- + 4,46,18,496/- = 24,33,57,357/- |

ठेकेदार यांना देणेत आलेल्या खालील एकूण सहा रस्त्यांपैकी शिर्डी नगरपंचायतीने कामासाठी हस्तांतरीत केलेल्या चार रस्त्यांचे उपलब्ध रुंदीत ठेकेदार यांनी मार्च २०१४ पर्यंत काम पूर्ण केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| रस्ता क्र. | रस्त्याचे नांव/ प्रकार | लांबी(मी.) | रुंदी (मी.) | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|
| ०३ | नांदुर्खी रस्त (नगर-मनमाड रस्ता ते नांदुर्खी शिव) कॉक्रीटीकरण | १८७७ | १८ | सदर रस्त्याचे कॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण असुन चेनेज क्र. १००० ते १२७५ (डावी बाजू), चेनेज क्र.१००० ते १०८० (उजवी बाजू) व १६०० ते १८७७ या भागात लगतचे मालमत्ताधारकांचे हरकतीमुळे दोन्ही बाजूचे रिटेनिंग वॉल, सर्व्हिस लेन व फुटपाथचे काम वगळता उर्वरीत काम पूर्ण आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | विकास योजनेतील १८ मीटर रुंद वळण रस्ता (आरक्षण क्र. ३१ ते नाला क्र. ३४ पर्यन्त) - पश्चिम बाजू | १८४० | १८ | एकूण १८४० मी. लांबीपैकी कनकुरी रस्ता ते नगर-मनमाड रस्ता या दक्षिणेकडील भागातील ९०० मी. रस्त्याचे काम पूर्ण. उर्वरीत रस्त्याचे४६० मी. बी. बी. एम. चे काम पूर्ण झाले असुन राहिलेल्या ४८० मी.पैकी ३२० मी. भागात खडीकरण व १६० मी. भागात जी.एस. बी.चे काम झाले आहे. |
| ०६ | विकास योजनेतील १५ मिटर रुंदीचा रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता ते आरक्षण क्र. ३१ पोहच) | ५६५ | १५ | काम पूर्ण. |
| ०७ | विकास योजनेतील २४ मिटर वळण रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते साई श्रध्दा हौसींग सोसायटी) | ४५० | २४ | काम पूर्ण. |
| ०८ | विकास योजनेतील हॉटेल भाग्य लक्ष्मी समोरील १८ मिटर रुंदीचा रस्ता | ४५० | १८ | काम पूर्ण. |
| ०९ | विकास योजनेतील १८ मिटर रुंदीचा रस्ता (नगर-मनमाड रस्ता ते १८ मिटर रिंग रस्ता)- पुर्व बाजू | ८४० | १८ | लक्ष्मीनगर वसाहत १६५ मी. व त्यालगत ३० मी. तसेच चनेज ८४० लगत २५ मी. हा भाग वगळता उर्वरीत रस्त्याचे काम पूर्ण. |
| ०९अ | रस्ता क्र. ०९ते रस्ता क्र. ०६ या भागातील वळण रस्ता. | १५०० | १८ | भूसंपादनकार्यवाही पुर्ण झालेली नाही. |

वरील रस्त्यांपैकी रस्ता क्र.९ चा लक्ष्मीनगर भाग व रस्ता क्र.९अ या रस्त्यांची भूसंपादन करुन संस्थानकडे शिर्डी नगरपंचायतीमार्फत हस्तांतरीत करणेची कार्यवाही अद्यापही पूर्ण न झाल्याने ठेकेदार यांना विहीत १५ महिने (दि.०५/११/२०११) मुदतीत तसेच वाढीव मुदतीतही सदर काम पुर्ण करता आले नाही. तसेच रस्ता क्र.५ या रस्त्यांचे सुरु असलेल्या कामास लगतच्या मालमत्ताधारकांनी घेतलेल्या हरकतींचे नगरपंचायतीकडून निवारण न झाल्याने व न्यायालयीन बाबींमुळे ठेकेदार यांना वाढीव मुदतीतही सदर काम पुर्ण करता आले नाही. रस्ता क्र.५ या रस्त्याचे एकुण १८०० मी.पैकी सुमारे ९०० मी. काम पुर्ण आहे. उर्वरीत सुमारे ९०० मी. अंतरातील खडीकरण काम पुर्ण असुन डांबरीकरण बाकी आहे. सदर कामातील अडचणी विचारात घेवून मा. व्यवस्थापन समितीचे खालील निर्णयांनुसारठेकेदार यांना मुदतवाढ देण्यात आलेली होती.

| अ.क्र. | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र./ दिनांक | मंजुर मुदतवाढ |
|---|---|---|
| ०१ | नि. क्र. १७३ (७) दि. १९/०२/२०१२ | मार्च २०१२ अखेर |
| ०२ | नि. क्र. ७४६ (फ) दि. १५/०९/२०१२ | मे २०१३ अखेर |
| ०३ | नि. क्र. ५४३ दि. २६/०७/२०१३ | दि. ३१/१२/२०१३ अखेर |
| ०४ | नि. क्र. १८४ दि. १५/०३/२०१४ | एप्रिल २०१४ अखेर |
| ०५ | नि. क्र. ४८० दि. १२/०६/२०१४ | जुन २०१४ अखेर |

शिर्डी नगरपंचायतीकडे पाठपुरावा करूनही सदर रस्ते कामासाठी वेळेत उपलब्ध न झाल्याने रस्त्यांचे काही भागातील काम सुरु करता आले नाही. ठेकेदार यांनी उपलब्ध रस्त्याचे काम दि.३०/०८/२०१५ अखेर केले आहे. ठेकेदार यांना मुदतवाढ देणेबाबत वेळोवेळी प्रस्ताव सादर करणेत आले आहेत. ठेकेदार यांचे निविदेतील दर सन २००८-२००९ चे दरसुचीवर आधारीत आहेत. त्यामुळे ठेकेदार यांनी रस्ता क्र.०५ चे डांबरीकरणातील बाबींसाठी २०% दरवाढ व निविदेनुसार देय Price variation व काम पूर्ण करणेसाठी मुदतवाढ मागितल्याने मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी वेळोवेळी प्रस्ताव सादर करणेत आले आहेत.

दरम्यान मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेतील नि. क्र.६४४ खालीलप्रमाणे झाला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना भूसंपादनासाठी रु.३०,७५,३३,१४५/- (+ प्रस्तावानुसार देय व्याजासह) मात्र वाढीव रक्कम देणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली. प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रस्ता क्र.५ विकसीत करणेसाठी भू-संपादन प्रक्रिया पुर्ण झालेली आहे, परंतु सदरहू कामाच्या खर्चाची रक्कम वाढलेली असल्याने संबंधीत ठेकेदार चालू डीएस.आर. प्रमाणे रस्त्याचे काम पुर्ण करतात का, याची विचारणा करण्यात यावी. तसेच ठेकेदाराने चालू डी.एस.आर. प्रमाणे काम करण्यास असमर्थतता दर्शविल्यास रस्ता क्र.५ सह शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेमधील ज्या रस्त्यांच्या भू-संपादनाची कार्यवाही पुर्ण झालेली आहे, असे सर्व रस्ते विकसीत करणेसाठी फेर ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले."

याबाबत ठेकेदार यांना इकडील दि.१०/१०/२०१६ राजीचे पत्रान्वये प्रचलित डी.एस.आर. प्रमाणे काम करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.१२/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये चालू डी. एस. आर. सन २०१६-१७ चे दराने काम करणेस सहमती दर्शविली असल्याने, ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचे रनिंग बिल क्र.१० पोटी ॲडव्हान्स रु.१२,९९,८००/- मात्र अदा करणेस लेखाशाखा विभागाकडे दि.०९/०२/२०१७ रोजी पाठविले असता, रोखपाल यांनी ठेकेदार यांचे बॅंकेच्या खात्याबाबतचा अद्यावत तपशिल मागविला असता, ठेकेदार यांनी दि.२७/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये, खालीलप्रमाणे कळविले आहे.

'...we had requested you to release our all further payments through RTGS in our Account with Indian Bank, MARGO, Goa Branch as our account with other banks has been closed to this effect we are submitting the me◦morandum and articles of association which contains Gov. of India Ministry of Corporate Affairs Registrar of companies Maharashtra Mumbai's Certificate of change of our company name from **Roman Tarmat Limited** to **Tarmat Limited.**

ठेकेदार यांचे झालेले नांव बदलानुसार प्रशासकिय अधिकारी तथा मुख्यलेखाधिकारी यांचेकडे दि.२७/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी सादर केलेले नविन बॅंक खात्याबाबतचा तपशिल सादर केला असता, त्यावर त्यांनी "..कंपनीचे नांवात झालेले बदलाबाबत रजिष्ट्रार ऑफ कंपनीज्, महाराष्ट्र, मुंबई यांचे प्रमाणपत्राबाबत प्रत्यक्ष किंवा वेबसाईटवरुन खात्री करुन घेऊन कार्यवाही करता येईल असे निर्देश दिले. त्यानुसार वेबसाईटवरुन तसेच संस्थानचे मुंबई कार्यालयाचे प्रतिनीधी यांनी, भारत सरकार-कार्पोरेट कार्य मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयात समक्ष जाऊन माहिती घेतली आहे. त्याबाबत त्यांनी दि.११/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये कंपनीचे नांवात बदल झाला असल्याचे कळवून त्याची प्रमाणीत प्रत इकडील कार्यालयास सादर केली आहे."

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या प्रमाणीत प्रतीचे अवलोकन केले असता, Roman Tarmat Limited ऐवजी Tarmat Limited असा नांव बदल झाला आहे.

**प्रस्ताव**: मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेतील नि. क्र.६४४ निर्णयानुसार ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांनी सदरहू काम चालू डी. एस. आर. दराप्रमाणे काम करणेस सहमती दर्शविलेली आहे. मात्र त्यांनी काम सुरु करणेपुर्वी खालील बाबींवर निर्णय होणेबाबत विनंती केली आहे.

१. कंपनीचे नाव रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि. करून टारमॅट लि. या नावाने सर्व बिले मिळावीत.
२. निविदेतील अट क्र.६०.२ – बिलाची किमान रक्कम रु.२.५० कोटी असणेबाबतची अट शिथिल करून बिलाची किमान रक्कम रु.३५ लक्ष करणे.
३. रनिंग बिल क्र.१० ची रक्कम रु.१७,३३,१४५/- लवकर अदा करणे.
४. दि.०१/०७/२०१४ ते १५/०८/२०१७ अखेर मुदतवाढ मिळणे.

तरी उपरोक्त अ. नं.१ ते ४ बाबींवर निर्णय होणेस तसेच रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम ठेकेदार टारमॅट लि., यांचेकडून करुन घेणेस अथवा याकामी नव्याने निविदा मागविणे, रोमन टारमॅट लि. यांना दि.३०/०८/२०१५ अखेर केलेल्या कामास मुदतवाढ देणे व अंतीम बील अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.२५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्ते विकसन करणे कामाचे ठेकेदार कंपनीचे नावात रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि. असा बदल झालेला असल्याने, त्यांचे विनंतीनुसार त्यांची देयके व अंतीम बीलाची रक्कम टारमॅट लि या नावाने आदा करणेत यावी. तसेच सदरहू ठेकेदाराने कंभमेळा- २०१५ चे कालावधीमध्ये वाहतुकीचे नियोजन व नियंत्रणकरण्याच्या दृष्टीने रस्ता क्र.०५ चे काम केलेले असल्यामुळे त्यांना सदर कामासाठी दि३१.०८.२०१५ अखेर मुदतवाढ**

**देण्यात यावी व या रस्त्याचे (रस्ता क्र.०५) उर्वरीत काम समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर तातडीने करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने अल्प मुदतीच्या ई-निविदा मागविण्यात याव्यात.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ०८ रस्ते विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :**

०१. निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६.
०२. निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०.
०३. निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११.
०४. निर्णय क्र. ७०६ दि. २४/०९/ २०११.
०५. निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४.
०६. निर्णय क्र. ७५० दि. ११/०९/२०१४.
०७. निर्णय क्र. ७९९ दि. ११/०९/२०१४.
०८. निर्णय क्र. ४६७ दि. १०/११/२०१५.
०९. निर्णय क्र. ६५६ दि. २८/१२/२०१५.
१०. निर्णय क्र. ३३ दि. २५/०२/२०१७.

**मा. शासन निर्णय :** मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयक्र.

१. सासंवि/२००६/८७६/(१३१) का.सोळा, दि.०४/०९/२०१४.
२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

**प्रस्तावना**: शिर्डी शहरातील सार्वजनिक सोयीसुविधांचा विस्तार करण्याचे दृष्टीने व ज्यांचा साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पूर्ण करणेसाठी संस्था न व्यवस्थापन शिर्डी नगरपंचायतीस मदत करीत आहे. या विविध पायाभूत सुविधांअंतर्गत शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहरातील रस्ते संस्थान निधीतुन विकसीत करणेस तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०४/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६३ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

**शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणे:** मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार प्रथम प्राधान्य गटातील १०.०६ किलोमीटर लांबीचे एकुण ११ रस्ते संस्थान निधीतून भूसंपादन व विकसीत करणेसाठी येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली असून, सदर प्रकल्पासाठी आजपावेतो रु.७०,०७,८४,७६९/- इतकी रक्कम खर्च झाली आहे. सदरहू प्रकल्पातील रस्ता क्र. ०९ अ भूसंपानासाठी व रस्ता क्र.०८ साठी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वाढीव मोबलदा रक्कम उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी मागणीनुसार सदर प्रकल्पासाठी रु.३०,७५,३३,१४५/- वाढीव खर्च येत आहे. याकामी येणारे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभागाकडे दि.१७/१०/२०१६ अन्वये सादर करणेत आलेला आहे. त्यास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. याबाबत पाठपुरावा करणेत येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०६ अन्वये, भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या खालील १७ रस्त्यांचे नकाशे व अंदाजपत्रके युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांचेमार्फत तयार करुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावे असे ठरले.

| अ. नं. | रस्त्याचे नांव | लांबी(मी.) | रुंदी(मी.) |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ. हेडगेवार नगर येथील रस्ता (दोडिया लगत रस्ता) | ६०० | ५.०० |
| ०२ | १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खी शिव रस्ता) विकसन व १२ चारी बंदीस्त करणे. | १८०० | ५.५० |
| ०३ | शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पूर्व बाजू) | १००० | ३.५० |
| ०४ | शिर्डी-साकुरी शिव रस्ता (पश्चिम बाजू) | १५०० | ३.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | नांदुर्खी शिव रस्ता (नांदुर्खी रस्ता ते साकुरी शिव) दक्षिणोत्तर रस्ता | ९५० | ३.५० |
| ०६ | ५०० रुम भक्तनिवास ते साईश्रध्दा हौसींग सोसायटी रस्ता (न.म. रस्ता ते बिरेगाव शिव ) | १२५० | ९.०० |
| ०७ | पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १२ चारी रस्ता जोडणारा रस्ता) | ४१० | ३.०० |
| ०८ | सन एन् सॅड ते कंम्पोस्ट डेपो पर्यंत रस्ता (एसटीपी- शिर्डी शिव रस्ता) | २५०० | ३.५० |
| ०९ | बिरेगांव नाला रोड (लुटे वस्ती गणेश बंधारा व साकुरी शिव पर्यंत) | ३००० | ४.०० |
| १० | चौफुली रोड ते नविन कंम्पोस्ट डेपो (सर्व्हे नं. १३६चे पुर्वेस राहाता नगरपालिका संयुक्त कंम्पोस्ट डेपो) | १५०० | ३.५० |
| ११ | रज्जाक शेखलगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंतचा रस्ता. | ३५० | ४.५० |
| १२ | श्रीकृष्ण नगर रस्ते | ७०० | ३.५० |
| १३ | सर्व्हे नं. १३४ सर कॉलनीकडे जाणारे रस्ते. | २५० | ३.५० |
| १४ | बन रस्ता (वराह चौकापासून १२ चारीच्या पुर्व बाजूलगत ते सौंदडी देवस्थान पर्यंत) | ८०० | ५.०० |
| १५ | गणेशवाडी मधील रस्ते. | ८०० | ३.०० |
| १६ | शिर्डी शहरातील नगरमनमाड रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | २५०० | ३०.०० |
| १७ | हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा रस्ता (१२ चारी इनामवाडी रस्ता) | १५०० | ३.०० |
| | एकूण लांबी | २१४१० | |

सदर निर्णयानुसार साईभक्त/ नागरीकांचे दैनंदिन वापरातील उपरोक्त १७ रस्ते विकसीत करणेस मान्यता मिळणेकामी इकडील दि.०७/१०/२०११ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे रु.३५ कोटी खर्चाचा प्रस्ताव सादर करणेत आला.सदर प्रस्तावाचे अनुषंगाने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रस्तुत प्रकरणी प्रचलित दरसुचीप्रमाणे सुधारीत खर्चाचा प्रस्ताव मान्येसाठी सादर करणेबाबत दि.०६/०१/२०१४ रोजी निर्देश दिले होते.

सदर निर्देशानुसार सदरहू कामाचे सन २०१३-१४ चे जिल्हा दरसुचीनुसार सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांनी सादर केलेले रु४७,०२,४४,९७८.०० मात्र रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक, शासनास इकडील दि.०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आले. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८ अन्वये मान्यता देणेत आली.

सदर प्रस्तावाबाबत मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२१/०८/२०१४ रोजीचे पत्रान्वये "..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करण्यासाठी येणा-या रु.४७,०२,४४,९७७.०० इतक्या खर्चाचा प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. असे कळविले.

i) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील त्रिसदस्यीय समितीची सदर प्रस्तावास सहमती घेण्यात यावी.

ii) सदर प्रस्तावाबाबत अंतिम आदेश काढण्यापूर्वी सदर प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाची पूर्व मान्यता घेण्यात यावी.

iii) सदर प्रस्तावात प्रस्तावित केलेले व्दितीय प्राधान्य गटातील १७ रस्ते फक्त सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करण्यात यावेत. श्री साईबाबा संस्थानला स्वतंत्रपणे स्वतः संस्थानमार्फत निविदा काढून सदरचे रस्ते विकसित करता येणार नाहीत.

२. सदर रस्ते विकसित करण्यासाठी अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या अंदाजित खर्चापेक्षाजास्त खर्च न होण्याची दक्षता कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर कामाबाबत प्रगती अहवाल वेळोवेळी संबंधित अभियंत्यांकडून प्राप्त करुन शासनास सादर करण्यात यावा.

३. सदर रस्ते विकसित करण्यासाठी लागणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून कामाच्या प्रगतीनुसार संबंधितांना टप्प्या टप्प्याने अदा करुन त्याबाबतचा स्वतंत्र लेखा ठेवून त्याचा अहवाल संस्थानच्या त्या वर्षाच्या वार्षीक अहवालाव्दारे सादर करण्यात यावा. ''

त्यानुसार मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं. ५०७२/ २०१५ सादर करणेत आले होते.

दरम्यान, शिर्डी नगरपंचायत यांनी १७ पैकी ०८ रस्त्यांकरीता सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजने अंतर्गत निधी मंजूर झाला आहे. करीता सदरहू ०८ रस्ते वगळणेत यावेत व उर्वरीत रस्ते

विकसीत करणेबाबत कळविले. (नगरोत्थान योजनेसाठी नगरपंचायतीच्या कर्जाच्या हिश्याची रक्कम संस्थानमार्फत नगरपंचायतीस देणबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.४३५ अन्वये ठरले आहे.)

नगरपंचायतीचे विनंतीनुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.४६७ अन्वये, "..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्दितीय प्राधान्य गटात नमूद केलेल्या १७ रस्त्यापैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले ०८ रस्ते वगळणेत येऊन, उर्वरीत ०९ रस्त्यांची सद्यःस्थिती, निकड, खर्चाची रक्कम यासह सुधारीत खर्चाचा प्रस्ताव तयार करावा तसेच भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०६ रस्त्यांचे भूसंपादन व इतर अनुषंगीक खर्चाबाबतचा सुधारीत तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. "

तसेच मा. त्रिसदस्य समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र .६५६ खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील ०६ रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणे व ०९ रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सुधारीत सविस्तर अंदाजपत्रकासह प्रस्ताव मागविणेत यावा, त्यांचेकडून प्रस्ताव आल्यानंतर मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालयामध्ये सादर करणेत यावा, असे ठरले."*

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने उर्वरीत एकूण १५ रस्त्यांपैकी शिर्डी हद्दीतील नगरमनमाड रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे कामाचा खर्च वगळता इतर १४ रस्त्यांचे खर्चाचा सुधारीत प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केला.

| | | |
|---|---|---|
| **(अ)** | ०६ रस्ते भूसंपादन खर्च | : रु.१६३,५५,२६,२१०.०० |
| | ०६ रस्ते विकसन खर्च | : रु.४३,७२,२७,५४३.०० |
| | **०६ रस्ते एकूण खर्च** | **:** रु.२०७,२७,५३,७५३.०० |
| **(ब)** | ०८ रस्ते विकसन खर्च | : रु.२२,६९,९१,५१०.०० |
| | **एकूण खर्च (अ+ब)** | : **रु.२२९,९७,४५,२६३.००** |

सदरहु प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु होती. दरम्यान दि.२८/०७/२०१६ रोजी पासून मा.व्यवस्थापन समिती अस्तीत्वात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत सिव्हील अर्ज मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेत आली आहे.

तसेच याबाबत मुख्यलेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*"..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नियम क्रमांक २१ (२) नुसार विश्वस्तव्यवस्थेच्या शिल्लक रकमेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या ३०% पेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस अधिनियमात नमूद प्रयोजन व संस्था तसेच शिर्डी नगरपंचायत यांना देता येतो.*

*एकूण वितरणयोग्य निधी रु.५१.४१ कोटी आहे. त्यामुळे सदर रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने निधिच्या उपलब्धतेनुसार करावी लागतील किंवा साई शताब्दी आराखड्यात समाविष्ट असल्यास प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनास सादर करण्यास हरकत नसावी."*

याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र.३३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमूद केलेल्या रस्त्यांपैकी ज्या रस्त्यांचे भू-संपादन करण्याची आवश्यकता नाही, अशा रस्त्यांविषयी तसेच दि.२१/०८/२०१४ रोजीच्या शासन आदेशान्वये मान्यता मिळालेल्या शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्य गटातील १७ रस्त्यांविषयी व शिर्डी नगरपंचायतीला सुवर्ण जयंती नगरोथ्थान महभियान योजनेअंतर्गत मंजूर ८ रस्त्यांविषयीचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

तसेच द्वितीय प्राधान्य गटातील ६ रस्त्यांचे भूसंपादन व विकसन करणे संदर्भातील स्वतंत्र प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात यावा."

शिर्डी नगरपंचायत यांनी १७ पैकी ०८ रस्त्यांकरीता सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजने अंतर्गत निधी मंजूर झाला आहे. करीता ८ रस्ते वगळणेत यावेत व उर्वरीत खाली नमूद केलेले रस्ते विकसीत करणेबाबत कळविले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | रस्त्याचे नांव | लांबी(मी.) | रुंदी(मी.) |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ. हेडगेवार नगरमधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. (दोडीया गल्ली) | ६०० | ०५.०० |
| ०२. | १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खी शीव रस्ता १२ चारी बंदीस्त करणे. | १८०० | ०५.५० |
| ०३. | पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता | ४१० | ०३.०० |
| ०४. | रज्जाक शेख लगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंत रस्ता | ३५० | ०४.५० |
| ०५. | श्रीकृष्ण नगर मधील रस्ते | ७०० | ०३.५० |
| ०६. | सर्व्हे नं. १३४ सर कॉलनी रस्ते. | २५० | ०३.०० |
| ०७. | गणेशवाडी मधील रस्ते. | ८०० | ०३.०० |
| ०८. | हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा- १२ चारी इनामवाडी रस्ता. | १५०० | ०३.०० |

**प्रस्ताव:** मा.व्यवस्थावपन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, द्वितीय प्राधान्य गटातील भूसंपादन करणेची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे विकसन करणेसाठी मा. शासनाने रु.४७,०२,४४,९७७.०० इतक्या खर्चास मान्यता देताना सदरहू काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणेबाबत नमूद केले आहे. १७ रस्त्यांपैकी ०८ रस्ते विकसीत करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीने दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार याकामी रु.२२,६९,९१,५१०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. विकसीत करावयाच्या रस्त्यांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे खर्चाचे अंदाजपत्रकाची रक्कमही कमी झाली आहे. तसे शासनाचे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविता येईल.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वितीय प्राधान्य गटातील विकसीत करावयाच्या रस्त्यांची संख्या कमी झालेली असल्यामुळे याकामी येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकाची रक्कमही कमी झालेली आहे, याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **मंदिर परिसरातील सभाकुंड येथे साईभजन संध्या, किर्तन, प्रवचन इत्यादी दैनंदिन कार्यक्रमांसाठी स्टेज व त्यावर कलर कोटेड पत्र्याचे शेड करणेसाठी आवश्यक मटेरीयल खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम येअन्व (क) खंडच्या (१)"मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** समाधी मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंड येथे उत्सवाचे कालावधीमध्ये कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेत येत असतात. मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त इतर वेळेमध्ये मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम साईभजन संध्या/ किर्तन, प्रवचन इत्यादी आयोजित करणेबाबत मंदिर विभागास आदेशीत केले आहे. त्यास अनुसरुन मंदिर विभागाने त्यांचे कडील दि.०८/१०/२०१६ रोजीचे आदेशाने इकडील विभागाकडून खालील कामे करुन मिळणेबाबत कळविले आहे.

*".. समाधी मंदिराचे उत्तरेकडील भागात असलेल्या सारंजाम बाग येथे उत्तरेकडे तोंड असलेले मोठया आकाराचे स्टेज बांधुन देण्यात यावे तसेच त्यांचे शेजारी कपडे बदलणे, कलाकारांना चहा – पान करणेकामी एक छोटया आकाराची खोली बांधण्यात यावी. मंदिर विभागाचे साहित्य ठेवणे व कार्यक्रमाच्या नोंदी ठेवणेकामी, विद्युत व्यवस्था व ध्वनीक्षेपन, सीसीटीव्ही व्यवस्थाकरीता एकत्रित एक मोठया आकाराची खोली बांधून त्यात पार्टीशन करुन देण्याची व्यवस्था करण्यात यावी."*

समाधी मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंड (पुर्वीचा सरंजामे बाग) येथे कार्यक्रमासाठी यापूर्वी पक्क्या स्वरुपाचे स्टेज बांधणेत आले होते. तसेच या भागात कारंजा बसविणेत आला होता. सदरचा कारंजा व स्टेज काढण्यात येवून या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्यात आले आहेत. मंदिर परिसरातील साईभक्तांना श्रींचे आरतीचा लाभ व्हावा याकरीता या ठिकाणी CCTV मार्फत TV बसविणेत आलेला आहे.

श्री साईबाबांचे समाधी शताब्दी सन२०१७-१८ या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने सभाकुंड येथील परिसर आवश्यक त्यावेळी मोकळा करावा लागेल. याकरीता सदर ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे स्टेज व्यवस्थे ऐवजी एम.एस. अॅगलचे फ्रेममध्ये प्लायवूड बसवून स्टेज तयार करता येईल. म्हणजे सदरहू स्टेज पाहिजे त्यावेळी काढून घेता येईल.

सभाकुंड येथे साईभजन संध्या / किर्तन प्रवचन इत्यादी कार्यक्रमाचे दैनंदिन आयोजन करणेत आलेले आहे. सदर ठिकाणी स्टेजची व्यवस्था नसलेने मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून सदरची व्यवस्था करुन घेणेत येत आहे. परंतू सदर कार्यक्रम हे अखंडपणे सुरु असलेने, कायमस्वरुपी स्टेज व्यवस्था करुन घेणे आवश्यक आहे. सभाकुंड येथील मोकळी जागा ६५फुट X६५ फुट या साईजची असून, सदरहू जागा कमी असल्याने स्टेजकरीता बरीच जागा व्यापली जाईल. त्यासाठी २४X१६ साईजचे स्टेजकरीता सभाकुंड येथील स्टेडीयमच्या ४ फुट रुंदीच्या पॅसेजचा वापर स्टेजकरीता करता येईल. याकरीता स्टेडीयमचे पॅसेज समोरील भिंत काढावी लागेल. तसेच स्टेडीयमचे पश्चिम बाजूकडील स्लॅबचे छत असलेल्या भागाचा वापर ग्रीन रुमकरीता करता येईल. त्यामुळे स्टेजसमोरील भागात जास्त मोकळी जागा राहील व जागेचा वापर साईभक्तांचे बैठक व्यवस्थेसाठी करता येईल. सदरहू स्टेजवर कायमस्वरुपी कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारता येईल. स्टेजसाठी एम.एस. अॅगलमध्ये फ्रेमवर्क व शेडचे स्ट्रक्चरल स्टीलचे फ्रेमवर्क उभारणेचे काम मेकॅनिकल विभागामार्फत करता येईल. स्टेजवरील प्लायवूड बसविणेचे व शेडचे पत्रे बसविणेचे काम इकडील विभागामार्फत करता येईल.

सभाकुंड येथील स्टेजवरील कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणीकामी नगर जिल्हा दर सुची सन २०१६-१७ नुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. स्टेजकरीता एम एस अॅगलचे दर मॅकेनिकल विभागाकडील मंजूर दर धरण्यात आलेले आहेत. तसेच स्टेजवरील प्लायवूड खरेदीसाठी इकडील विभागाचे मंजूर दर धरलेले आहेत. त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | १९ एम एम जाडीचे कमर्शिअल प्लायवूड<br>साईज – ६'X४' = १२ नग | २८८ चौ. फुट | ७०.३७ | २०,२६६.५६ |
| ०२. | स्टेजवर वेलवेट मॅटीन टाकणे. | ३८४ चौ. फुट | ९/- | ३,४५६/- |
| ०३. | स्टेजसाठी एम.एस. अॅगलचे फ्रेमवर्ककरीता आवश्यक मटेरियल.<br>एम.एस. अॅगल –५०X५०X५ – १५० मी. X ३.८० | ५७० किलो | ४५/- | २५,६५०/- |
| ०४ | शेडचे पोल उभारणीकामी खर्चः-<br>खोदकाम, पी सी सी करणे व कॉक्रीट फाऊंडेशन ब्लॉक | - | - | ३,९२३/- |
| ०५. | शेड उभारणीसाठी स्ट्रक्चरल स्टील - | १.२५ मे.टन | ६३.३८० | ७९,२२५/- |
| ०६ | शेडचे छतासाठी व बाजूने कलर कोटेड पत्रे बसविणे. | १००.०४<br>चौ.मी. | ६४१/- | ६४,१२५.६४ |
| ०७ | पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी पन्हाळी बसविणे. | ०८ र. मी. | २६५०/- | २१,२००/- |
| ०८ | स्टेज पाठीमागे ग्रीन रुमचे पार्टीशनकरीता अॅराकॉन पॅनल शिटचे पार्टीशन करणे. | २८.६१ चौ. मी. | १७२१.६० | ४९,२५४.९८ |
| ०९ | स्टेज पाठीमागील भागात एम एस ग्रील बसविणे. | २२.४४ चौ. मी. | १,२५८/- | २८,२२९.५२ |
| | | | **एकुण अपेक्षित खर्च रुपये.** | **२,९५,३३१.००** |

**प्रस्ताव:-** वर नमूद मटेरिअल पैकी स्टेजकरीता एम एस अॅगल, शेडचे स्ट्रक्चरल स्टील व एम एस ग्रीलकरीता आवश्यक मटेरियल मेकॅनिकल विभागामार्फत खरेदी करुन फॅब्रीकेशन करता येईल. तसेच स्टेजवरील प्लायवूड व शेडकरीता कलर कोटेड पत्रे बसविण्यासाठी मटेरियल तसेच ग्रीनरुमचे पार्टीशनकरीता अॅराकॉन पॅनल शिट बसविणेचे काम इकडील विभागामार्फत खरेदी करुन काम करुन घेता येईल. तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीस

तसेच वरीलप्रमाणे येणारे अंदाजे रु.२,९५,३३१/- मात्रचे खर्चास व सदर मटेरीअल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील सभाकुंड येथे साईभजन संध्या, किर्तन, प्रवचन इत्यादी दैनंदिन कार्यक्रमांसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा आवाज येणार नाही व कार्यक्रमांमध्ये व्यत्यय येणार नाही, याकरीता सदरहू ठिकाणी व्हाईट कॅन्व्हासचा मंडप (डोम) उभारणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद–** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक–** उपरोक्त शासन संदर्भान्वये शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा, मदरसा, मक्ताबा (सर्व शिक्षण अभियान सहायित) येथे ६ ते १४ वयोगटातील इ. १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेणा-या व उपस्थित असणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांस प्रत्येक शालेय दिवशी (शाळेच्या सुट्टी व्यतिरिक्त) पोषण मुल्य मोफत आहार देण्यात येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी ही शाळा कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. शासनाचे धोरणानुसार इयत्ता १ ली पासून ते ८ वी पर्यंत ही योजना आहे परंतू आपल्या शाळेत पुर्व प्राथमिक व माध्यमिक विभाग हे वर्ग एकत्रीत भरत असल्याने व मध्यान्ह भोजन संस्थानचे वतीने मोफत देण्यात येणार असल्याने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देण्यात यावे असे नम्र मत आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ज्यु. केजी ते इयत्ता १० वी अंदाजे विद्यार्थी संख्या २६४७ अशी असेल.

पुर्व प्राथमिक विभाग ज्यु.केजी. व सिनी.केजी. वर्ग तुकडी संख्या व विद्यार्थी संख्या माहिती खालीलप्रमाणे.

| वर्ग | तुकडी संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| ज्यु. केजी | ०५ | २५० |
| सिनीयर केजी. | ०५ | २५० |
| एकूण | १० | ५०० |

प्राथमिक व माध्यमिक विभाग इयत्ता १ ली ते १० वी वर्ग तुकडी व विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे.

| वर्ग | तुकडी संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| इयत्ता १ ली | ०५ | २६३ |
| इयत्ता २ री | ०५ | २३६ |
| इयत्ता ३ री | ०५ | २४८ |
| इयत्ता ४ थी | ०५ | २७१ |
| इयत्ता ५ वी | ०६ | ३१० |
| इयत्ता ६ वी | ०६ | २६१ |
| इयत्ता ७ वी | ०३ | १४० |
| इयत्ता ८ वी | ०४ | १७६ |
| इयत्ता ९ वी | ०३ | १३४ |
| इयत्ता १० वी | ०२ | १०८ |
| एकूण | ४४ | २१४७ |

**मागणी-** शासनाचे उपरोक्त धोरणाप्रमाणे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, मध्ये प्रसादालय विभागाचे मदतीने मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात यावी असे नम्र मत आहे याकरीता खालील बाबींचा सकारात्मक विचार व्हावा असे वाटते.

१ मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत तयार केलेल्या आहाराचे वाटप शाळेतच करता येईल मात्र यासाठी शाळेच्या मागील दक्षिणबाजूस असलेल्या मोकळया जागेत सावलीसाठी बांधकाम विभागामार्फत ग्रीन हाऊस बांधून घ्यावे लागेल.

२ मध्यान्ह भोजन कामी लागणारे इंधन, भाजीपाला, इतर साहित्य खरेदी करणे , शिजवून दिल्या जाणा-या आहाराची प्रयोगशाळेतून तपासणी करणे, पोषण आहार शिजविणे आणि भोजनाचा दर्जा व गुणवत्ता राखणे, तसेच सदरचा मध्यान्ह भोजन शाळेच्या आवारात वाहतूक करुन आणणे , ठरविलेल्या वेळेत विद्यार्थ्यांना वाढपी मार्फत वाटप करणे व दैनंदिन वाटप केलेल्या पदार्थांची कार्यालयीन रेकॉर्डच्या नोंदी ठेवणे याबाबतची सर्व कामे प्रसादालय विभागामार्फत अद्यावत ठेवण्यात यावेत.

**३** शाळा सकाळ व दुपार अशी दोन सत्रात भरविण्यात येत असल्याने सकाळ व दुपार अशी दोन वेळा मध्यान्ह भोजन व्यवस्था करावी लागणार आहे. याकरीता प्रसादालय विभागामार्फत सकाळ व दुपारचे वेळी किमान ०६ ठिकाणी भोजन वाढपी स्टॉल लावावे लागतील. तसेच भोजन वाढणेकरीता लहान आकाराच्या स्टिल डिश श्री साईप्रसादालय विभागामार्फत खरेदी कराव्या लागतील. तसेच भोजन झालेनंतर डिश धुणे व ठेवणेकामी ०३ महिला कर्मचारी नेमाव्या लागतील.

| **वर्ग** | **शालेय वेळ** | **भोजन वेळ** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|
| इयत्ता १ ली ते ७ वी | सकाळी ७.१५ ते १२.१५ | सकाळी १०.०० ते १०.३० | १७२९ |
| ज्यु. केजी व सिनी. | दुपारी १२.३० ते ०३.३० | दुपारी ०२.०० ते ०२.३० | ५०० |
| इयत्ता ८ ते १० वी | दुपारी १२.३० ते ५.३० | दुपारी ०२.०० ते ०२.३० | ४१८ |
| एकूण ५४ वर्ग | | एकूण संख्या | **२६४७** |

सदरचे अत्यंत कमी वेळेत भोजन व्यवस्था करावी लागणार असल्याने मनुष्यबळांची संख्या मोठयाप्रमाणावर लागणार आहे. खालील पदार्थांनुसार कोणताही एक पदार्थ प्रतिदीनी पॅकेटमध्ये पार्सल करुन अथवा वाढपी कर्मचा-यांकरवी विद्यार्थ्यांना वाटप करता येईल. सदरचा आहार डिशमध्ये पॅकींग करुन वाटप केला तर दिलेल्या वेळेत वाटप करण्याचे काम चांगल्या रितीने होवू शकेल.

**मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांनाखालीलप्रमाणे प्रतिदिनी पदार्थ देता येतील .**

| **अ.नं.** | **तिखट पदार्थाचे नांव** | **गोड पदार्थ** | **वार** |
|---|---|---|---|
| ०१ | मसाले भात | शिरा | सोमवार |
| ०२ | डाळ खिचडी | बुंदी | मंगळवार |
| ०३ | उपमा | बुंदी लाडू | बुधवार |
| ०४ | मटकी हुसळ | बुंदी | गुरुवार |
| ०५ | फळे | शिरा | शुक्रवार |
| ०६ | पोहा | लापशी | शनिवार |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय प्रशासनाचा भाग म्हणून गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय-** शालेय विद्यार्थी संख्या लक्षात घेता शालेय पोषण आहारासाठी आवश्यक लागणारे साहित्य खरेदी, पोषण आहार तयार करणे, शिजविणे, वाहतूक करणे, वितरण करणे व याबाबतच्या सर्व कार्यालयीन नोंदी ठेवणेबाबतचे सर्व कामे श्री साईप्रसादालयाचे मार्फत करणेत यावे जेणेकरुन याकामी येणा-या खर्चाचा हिशोब ठेवणेस सोयीस्कर होईल असे वाटते. तरी उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या एकूण २६४७ विद्यार्थ्यांसाठी श्री साईप्रसादालय विभागामार्फत प्रत्येक शालेय दिवशी (शाळेच्या सुट्टी व्यतिरिक्त) पोषण मुल्य मोफत आहार देणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यतामिळणेसाठी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.२६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी मधील शालेय विद्यार्थ्यांना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद–** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक–** उपरोक्त शासन संदर्भान्वये शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा, मदरसा, मक्ताबा (सर्व शिक्षण अभियान सहायित ) येथे ६ ते १४ वयोगटातील इ. १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेणा-या व उपस्थित असणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांस प्रत्येक शालेय दिवशी ( शाळेच्या सुट्टी व्यतिरिक्त ) पोषण मुल्य मोफत आहार देण्यात येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी ही शाळा कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. शासनाचे धोरणानुसार इयत्ता १ ली पासून ते ८ वी पर्यंत ही योजना आहे. परंतू आपल्या शाळेत माध्यमिकचे वर्ग असल्याने सदरचा मध्यान्ह भोजन संस्थानचे वतीने देण्यात येणार असल्याने माध्यमिक विभागासाठीही मध्यान्ह भोजन देण्यात यावे असे नम्र मत आहे.आपल्या शाळेत प्राथमिक विभागात एकूण ४५१ विद्यार्थिनी आहेत व माध्यमिक विभाग इयता ९ वी व १०वी एकूण विद्यार्थी संख्या २७० आहे. शाळेची वेळ सकाळी १०.०० ते ४.०० अशी असून खालीलप्रमाणे वर्ग तुकडी व विद्यार्थी तपशिलवार तक्ता आहे.

| **अ.नं.** | **इयत्ता** | **तुकडी** | **विद्यार्थिनी संख्या** | **विद्यार्थिनींची एकुण पटसंख्या** |
|---|---|---|---|---|
| ०१ | इयत्ता ५ वी | अ | ३९ | ८० |
| | इयत्ता ५ वी | ब | ४१ | |
| ०२ | इयत्ता ६ वी | अ | ६२ | **१२०** |
| | इयत्ता ६ वी | ब | ५८ | |
| ०३ | इयत्ता ७ वी | अ | ५९ | **११८** |
| | इयत्ता ७ वी | ब | ५९ | |
| ०४ | इयत्ता ८ वी | अ | ६८ | **१३३** |
| | इयत्ता ८ वी | ब | ६५ | |
| ०५ | इयत्ता ९ वी | अ | ७९ | **१३९** |
| | इयत्ता ९ वी | ब | ६० | |
| ०६ | इयत्ता १० वी | अ | ६३ | **१३१** |
| | इयत्ता १० वी | ब | ६८ | |
| | | | **विद्यार्थिनींची एकुण संख्या -** | **७२१** |

**मागणी-** शासनाचे उपरोक्त धोरणाप्रमाणे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, मध्ये प्रसादालय विभागाचे मदतीने मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात यावी असे नम्र मत आहे याकरीता खालील बाबींचा सकारात्मक विचार व्हावा असे वाटते.

१ मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत तयार केलेल्या आहाराचे वाटप शाळेतच करता येईल मात्र यासाठी शाळेच्या उत्तरबाजूस असलेल्या मोकळया जागेत सावलीसाठी बांधकाम विभागामार्फत ग्रीन हाऊस बांधून घ्यावे लागेल.

२ मध्यान्ह भोजन कामी लागणारे इंधन, भाजीपाला, इतर साहित्य खरेदी करणे, शिजवून दिल्या जाणा-या आहाराची प्रयोगशाळेतून तपासणी करणे, पोषण आहार शिजविणे आणि भोजनाचा दर्जा व गुणवत्ता राखणे, तसेच सदरचा मध्यान्ह भोजन शाळेच्या आवारात वाहतूक करुन आणणे , ठरविलेल्या वेळेत विद्यार्थ्यांना वाढपी मार्फत वाटप करणे व दैनंदिन वाटप केलेल्या पदार्थांची कार्यालयीन रेकॉर्डच्या नोंदी ठेवणे याबाबतची सर्व कामे प्रसादालय विभागामार्फत अद्यावत ठेवण्यात यावेत.

**३** इयत्ता ५ वी ते १०वी चे एकूण १२ वर्ग सकाळचे सत्रात भरविण्यात येणार असून एकूण ७२१ विद्यार्थ्यांचे मध्यान्ह भोजन व्यवस्था करावी लागणार आहे. याकरीता प्रसादालय विभागामार्फत किमान ०६ ठिकाणी भोजन वाढपी स्टॉल लावावे लागतील. तसेच भोजन वाढणेकरीता लहान आकाराच्या स्टिल डिश श्री

साईप्रसादालय विभागामार्फत खरेदी कराव्या लागतील. तसेच भोजन झालेनंतर डिश धुणे व ठेवणेकामी ०३ महिला कर्मचारी नेमाव्या लागतील.

| वर्ग | शालेय वेळ | भोजन वेळ | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| इयत्ता ५वी ते १०वी | सकाळी १०.०० ते ४.०० | सकाळी १२.०० ते १२.३० | ७२१ |

सदरचे अत्यंत कमी वेळेत भोजन व्यवस्था करावी लागणार असल्याने मनुष्यबळांची संख्या मोठयाप्रमाणावर लागणार आहे. खालील पदार्थां नुसार कोणताही एक पदार्थ प्रतिदिनी पॅकेटमध्ये पार्सल करुन अथवा वाढपी कर्मचा-यांकरवी विद्यार्थ्यांना वाटप करता येईल. सदरचा आहार डिशमध्ये पॅकींग करुन वाटप केला तर दिलेल्या वेळेत वाटप करण्याचे काम चांगल्या रितीने होवू शकेल.

**मध्यान्ह भोजनात विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे प्रतिदिनी पदार्थ देता येतील.**

| अ.नं. | तिखट पदार्थाचे नांव | गोड पदार्थ | वार |
|---|---|---|---|
| ०१ | मसाले भात | शिरा | सोमवार |
| ०२ | डाळ खिचडी | बुंदी | मंगळवार |
| ०३ | उपमा | बुंदी लाडू | बुधवार |
| ०४ | मटकी उसळ | बुंदी | गुरुवार |
| ०५ | फळ (Fruit) | शिरा | शुक्रवार |
| ०६ | पोहा | लापशी | शनिवार |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय प्रशासनाचा भाग म्हणून गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय-** शालेय विद्यार्थी संख्या लक्षात शालेय पोषण आहारासाठी आवश्यक लागणारे साहित्य खरेदी, पोषण आहार तयार करणे, शिजविणे, वाहतूक करणे, वितरण करणे व याबाबतच्या सर्व कार्यालयीन नोंदी ठेवणेबाबतचे सर्व कामे श्री साईप्रसादालयाचे मार्फत करणेत यावे जेणेकरुन याकामी येणा-या खर्चाचा हिशोब ठेवणेस सोयीस्कर होईल असे वाटते. तरी उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या एकूण ७२१ विद्यार्थ्यांसाठी श्री साईप्रसादालय विभागामार्फत प्रत्येक शालेय दिवशी (शाळेच्या सुट्टी व्यतिरिक्त) पोषण मोफत आहार देणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३१** **ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटर प्रा.लि., शेंद्रे, सातारा यांचे कर्करुग्णांना श्री साईबाबा संस्थानकडून मदत मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनिय २००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.२४/०७/२०११ रोजीचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र. ५८१.

**प्रास्तविक:-** ऑन्को लाईफ कॅन्सर प्रा.लि.शेंद्रे, सातारा येथे ऑगस्ट २०१५ पासुन कर्क रुगणांसाठी कॅन्सर सेंटर सुरु केलेले आहे. रुग्णांसाठी आधुनिक रेडियशन-थेरपी, किमी थेरपी, ऑपरेशनचे सर्व प्रकारच्या तपासण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. आता पर्यंत अंदाजे ३५०० ते ४००० रुग्णांवर उपचार करणेत आलेले असुन त्यापैकी ७० ते ८०% रुग्ण दारिद्रय रेषेखालील (BPL) आहेत. त्याकरीता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना (RGJAY) उपलब्ध आहेत. तरी काही प्रकारचे कर्करोग या सुविधेच्या यादीत समाविष्ट नसल्याने, अशा प्रकारच्या रुग्णांची आर्थिक परीस्थिती नसल्याने त्यांना उपचार घेणेस खुप कठिण जाते. तरी अशा रुग्णांना श्री साईबाबा संस्थानकडुन आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती केलेली आहे. संदर्भ क्र.१ चे

पत्रान्वये, कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, यांनी याबाबत उचित कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान-** श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास संदर्भ क्र.२ अन्वये शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णांकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८४ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** उपरोक्त नियमावलीचा विचार करता, ऑन्को लाईफ कॅन्सर प्रा.लि.शेंद्रे, सातारा हे हॉस्पीटल प्रा.लि. असल्याने या रुग्णालयाचा संस्थानचे आर्थिक अनुदान नियमावलीमध्ये समावेश करावयाचा झाल्यास, सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा लागेल.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑन्को लाईफ कॅन्सर सेंटर प्रा.लि., शेंद्रे, सातारा हे खाजगी रुग्णालय आहे, तसेच श्रींचे शताब्दी वर्षामध्ये कॅन्सर रुग्णांसाठी संस्थानमार्फत कॅन्सर हॉस्पिटल उभारणेस व्यवस्थापन समितीने मंजूरी दिलेली आहे. या बाबींचा विचार करता, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **स्वानंद सुखनिवासी श्री सदगुरुजोग महाराज संस्थमीत वारकरी शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त अखंड हरीनाम सप्ताहाकरीता शिधा मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** दि.०४.०३.२०१७ रोजीचे पत्रान्वये अखंड हरिनाम सप्ताह शताब्धी महोत्सव सोहळा- राहुरी तालुका वारकरी मंडळाच्या वतीने स्वानंद सुखनिवासी श्री सदगुरुजोग महाराज संस्थापीत वारकरी शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त देवळाली प्रवरा येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन गुरुवार दि.०२.०३.२०१७ ते गुरुवार दि.०९.०३.२०१७ या कालावधीत संपन्न झाला आहे.

सप्ताहास तालुक्यातील सुमारे ७ ते १० हजार भाविक दररोज उपस्थित राहुन महाराष्ट्रातील नामांकीत किर्तनकारांच्या किर्तनांचा श्रवणसुख व अन्नदानाचा आनंद घेतला आहे.

सप्ताह कालावधीमध्ये बुधवार दि.०८.०३.२०१७ रोजी असलेल्या एकादशीकरीता श्रीसाईबाबा संस्थानकडून खालील प्रमाणे शिधा मिळावा आणि सप्ताह काळात होणा-या अन्नदानात सहकार्य करावे अशी विनंती राहुरी तालुका वारकरी मंडळ यांनी केली होती.

| अ.नं. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| ०१ | शाबुदाना | ६ क्विंटल |
| ०२ | शेंगदाने | १५० किलो |
| ०३ | शेंगदाना तेल | १२ डबे |

मा.श्री.चंद्रशेखर कदम साहेब, उपाध्यक्ष, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.२१.०३.२०१७ रोजी ११.२० वाजता लेंडीबागेतील सभागृहात अखंड हरिनाम सप्ताह शताब्धी महोत्सव सोहळा- राहुरी तालुका वारकरी मंडळ यांना वस्तुस्वरुपात (अन्नदानासाठी) मदत करणेबाबत सुचित केले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०१.२००७ चे सभेतील निर्णय क्र.४९ अन्वये शासनाने सुचविलेप्रमाणे संस्थानमार्फत नियम व विनिमय तयार करणेबाबत नियुक्त केलेले श्री सुधाकर वि. जोशी रिटायर्ड आय.एस. अधिकारी यांनी तयार केलेली शिधा वाटपाबाबत नियमावली अर्जाचा विहीत नमुना व शिधा सामुग्री विनियोगाबाबतचे पत्र इत्यादीची माहिती शासनाची मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देण्यात आली होती त्यानुसार सदरची नियमावलीबाबत. महाराष्ट्र शासनाची दि.२७.०१.२०१० रोजी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध प्रश्नाबाबत झालेल्या बैठकीत विषय नं.२८ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

**विषय क्रमांक २८. शिधा स्वरुपात देण्यात येणाऱ्या मदती संबंधातील तयार करण्यात आलेल्या नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**सदर प्रस्ताव बंद करण्यात यावा असे बैठकीत ठरले.**

सदर कार्यक्रम संपन्न झालेले आहे. संस्थानकडून उपरोक्त तक्त्यातील शिधा द्यावा किंवा कसे याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६५** **सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, दि.२७.०१.२०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या संस्थानच्या बैठकीमध्ये शिधा स्वरुपात देण्यात येणाऱ्या मदती बंद करण्यात याव्या, असे शासनाने कळविले असल्यामुळे शिधा स्वरुपात मदत देता येणार नाही, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सदरहू कार्यक्रम संपन्न झालेला आहे, परंतु कार्यक्रमाच्या कालावधीमध्ये सभेची मान्यता मिळाल्यानंतर संस्थानमार्फत शिधा देण्यात येईल, असे संबंधीतांना कळविणेत आलेले होते याकरीता एक विशेष बाब म्हणून स्वानंद सुखनिवासी श्री सदगुरुजोग महाराज संस्थापीत वारकरी शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त अखंड हरीनाम सप्ताहाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कोरडा शिधा देण्यात यावा.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **विठ्ठल रुख्मिनी मंदिर ट्रस्ट, शिर्डी यांना अखंड हरीनाम सप्ताहाकरीता आर्थिक स्वरुपात किंवा वस्तु स्वरुपात (अन्नदानासाठी) मदत मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अ)** श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी यांचे आवक नं.२४७९६ दि.१५.०३.१७ चे पत्रान्वये सालाबाद प्रमाणे हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण साहेळा वर्ष १९ वे दिनांक २ मार्च २०१७ ते दि.०९ मार्च २०१७ या कालावधीत संपन्न झाला आहे. सदर कार्यक्रमासाठी अन्नदान स्वरुपात मदत मिळणेबाबत विनंती केली होती.

**ब)** उपरोक्त संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये श्री.मधुकर शामराव वाबळे व इतर ग्रामस्थ, सुरेगांव, ता. कोपरगांव यांनी स्वानंदसुख निवासी, सद्गुरु जोग महाराज, वारकरी शिक्षणसंस्था, आळंदी (देवाची) शताब्दी महोत्सव व सदगुरु तुकोबाराय बीजोत्सवा निमित्त, ९९ वा अखंड हरिनाम (शताब्दी सप्ताह) दि.०८.०३.२०१७ ते १५.०३.२०१७ या कालावधीत सुरेगांव ता. कोपरगाव येथे कार्यक्रम संपन्न झालेला आहे. सदर कार्यक्रमासाठी रु.२५,०००/- ची आर्थिक किंवा वस्तुस्वरुपात (अन्नदानासाठी) मदत मिळणेबाबतची विनंती केली होती.

मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे साहेब, सदस्य, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी सर्व सुरेगाव, ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास वस्तुस्वरुपात (अन्नदानासाठी) मदत करणेबाबत सुचित केले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०१.२००७ चे सभेतील निर्णय क्र.४९ अन्वये शासनाने सुचविलेप्रमाणे संस्थानमार्फत नियम व विनिमय तयार करणेबाबत नियुक्त केलेले श्री सुधाकर वि. जोशी रिटार्यर्ड आय.एस. अधिकारी यांनी तयार केलेली शिधा वाटपाबाबत नियमावली अर्जाचा विहीत नमुना व शिधा सामुग्री विनियोगाबाबतचे पत्र इत्यादीची माहिती शासनाची मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देण्यात आली होती त्यानुसार सदरची नियमावलीबाबत. महाराष्ट्र शासनाची दि.२७.०१.२०१० रोजी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध प्रश्नाबाबत झालेल्या बैठकीत विषय नं.२८ खालील प्रमाणे पारीत झालेला आहे.

**विषय क्रमांक २८. शिधा स्वरुपात देण्यात येणाऱ्या मदती संबंधातील तयार करण्यात आलेल्या नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**सदर प्रस्ताव बंद करण्यात यावा असे बैठकीत ठरले.**

वरील **"अ"** व **"ब"** मधील कार्यक्रम संपन्न झालेले आहे. सदर कार्यक्रमासाठी रु.२५,०००/- आर्थिक किंवा वस्तुस्वरुपात (अन्नदानासाठी) मदत द्यावी किंवा कसे याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२६६** **सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, दि.२७.०१.२०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या संस्थानच्या बैठकीमध्ये शिधा स्वरुपात देण्यात येणाऱ्या मदती बंद करण्यात याव्या, असे शासनाने कळविले असल्यामुळे शिधा स्वरुपात मदत देता येणार नाही, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त अ व ब मध्ये नमुद केलेले कार्यक्रम संपन्न झालेले आहेत, परंतु कार्यक्रमाच्या कालावधीमध्ये सभेची मान्यता मिळाल्यानंतर संस्थानमार्फत शिधा देण्यात येईल, असे संबंधीतांना कळविणेत आलेले होते याकरीता एक विशेष बाब म्हणून प्रस्तावातील अ व ब मध्ये नमुद केलेल्या संबंधीतांना विचरणा करणेत येऊन, त्यांनी मागणी केल्यास प्रत्येकी रु.२५,०००/- मात्र आर्थिक किंवा वस्तुस्वरुपात (अन्नदानासाठी) मदत देण्यात यावी.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा Royalty Basis वर उपलब्ध करुन देणेसाठी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतुद:**कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.19/09/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.675.

**प्रास्ताविक:-** शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना त्यांचे मोबाईलव्दारे मोबाईलॲप वापरुन विविध सुविधांचा लाभ सुलभतेने घेता यावा यासाठी त्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शिरडी येथे विविध ठिकाणी Wi-fi सुविधा (Royalty Donation Basis)वर उपलब्ध करुन देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 19/09/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 675 नुसार संस्थानचे विहित पध्दतीने ई -निविदा मागविणेस मान्यता देण्यात आल्याने दि.15/11/2016 ते दि.23/02/2017 या कालावधीमध्ये ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये पुरवठाधारकांकडूनप्राप्त झालेल्या तांत्रिक निविदांचा तपशिल पुढीलप्रमाणे

1. Ozone Networks Pvt. Ltd, Haryana
2. Reliance Jio Infocomn Ltd,
3. Inmac Computers Pvt Ltd, Pune
4. R.K. Infratel Limited, Surat
5. Swift Mail Communications Ltd, Noida

माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.24/02/2017 रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, संस्थानचे परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा (Royalty Basis) उपलब्ध करुन देणेसाठी विविध निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडुन प्राप्त झालेल्या ईनिविदांचे तांत्रिक निविदा मा व्यवस्थापन समितीचे दि.25.02.2017 रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या असून अ.नं.03 चे Inmac Computers Pvt Ltd, Pune यांनी अनामत रक्कम व बयाना रक्कम जमा न केल्याने त्यांना अपात्र ठरविणेत आलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे पात्र 04 निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडून प्राप्त झालेल्या ई-निविदांचे व्यावसायिक निविदा उघडणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 28/02/2017 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार सदरच्या व्यावसायीक ई-निविदा दि. 28/02/2017 रोजी मा. खरेदी समितीचे समोर उघडणेत आलेल्या आलेले आहेत. उघडणेत आलेल्या व्यावसायीक निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे

| **Sr. No.** | **Year** | **Company Name** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Ozone Networks Pvt. Ltd, Haryana | R.K. Infratel Limited, Surat | Reliance Jio Infocomn Ltd, | **Swift Mail Communications Ltd, Noida** |
| 1 | Royalty (donation) For 1st Year | 11,00,001/- | 5,000/- | 24,000/- | **32,50,000/-** |
| 2 | Royalty (donation) For 2nd Year | 14,00,001/- | 5,000/- | 24,000/- | **21,95,000/-** |
| 3 | Royalty (donation) For 3rd Year | 18,00,001/- | 5,000/- | 24,000/- | **23,91,000/-** |
| 4 | Royalty (donation) For 4th Year | 24,00,001/- | 5,000/- | 24,000/- | **25,50,000/-** |
| 5 | Royalty (donation) For 5th Year | 30,00,001/- | 5,000/- | 24,000/- | **27,35,000/-** |
| | **Total** | 97,00,005/- | 25,000/- | 1,20,000/- | **1,31,21,000/-** |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे M/S Swift Mail Communications Ltd, Noidaयांनी देऊ केलेली रक्कम (Royalty) हि सर्वाधिक असल्याने प्रक्रियेअंतर्गत सदर सुविधेसाठी त्यांना कार्यादेश देणे अपेक्षित आहे. परंतू M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी त्यांचे दि.१० मार्च, २०१७ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी देऊ केलेली रक्कम ५ वर्षासाठीची प्रकल्प उभारणीचा खर्च असल्याचे कळविलेले आहे. परंतू निविदेमध्ये हि रक्कम प्रत्यक्षात त्यांचेकडून संस्थानला देय असलेली देणगी (Royalty) रक्कम असल्याचे नमुद केले आहे. ई-मेलमध्ये शेवटी त्यांनी सदरचा प्रकल्प उभारणेस निविदेतील अटी व शर्तीनुसार असमर्थता दर्शविलेली आहे. द्वितीय उच्चत्तम दरधारक M/S Ozone Networks Pvt. Ltd, Haryanaयांना दि.२३ मार्च, २०१७ रोजीचे ई-मेलद्वारे दि. २७ मार्च, २०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सदर विषयावर चर्चा करण्याकरीता बोलविणेत आले होते. परंतू त्यांना पाठविलेल्या ई-मेलला प्रतिसाद न दिल्याने कंपनीचे प्रतिनिधी श्री निखील पांडे यांना दुरध्वनीद्वारे वारंवार संपर्क केला असता, त्यांनी कंपनीस सदरचे प्रकल्पामध्ये स्वारस्य नसल्याचे कळविलेले आहे. तसेच तृतिय उच्चत्तम दरधारक M/S Reliance Jio Infocomn Ltd, यांनी त्यांचे निविदेमध्ये या सुविधेचा लाभ घेण्या-या प्रत्येक साईभक्तास फक्त २० MB Dataमोफत देण्याचे नमुद केलेले आहे, परंतू मुळ निविदेमध्ये प्रत्येक साईभक्तास २५० MB Data प्रतिदिन देण्याचे नमुद केलेले आहे. तसेच प्रत्यक्ष चर्चेअंती याद्वारे संकलीत होणारी भक्तांची माहिती संस्थानला देण्यास स्पष्टपणे नकार दिलेला आहे. सबब निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्प उभारणीसाठी M/S Reliance Jio Infocomn Ltd, यांना कार्यादेश देता येणार नाही. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-fiसुविधा (Royalty Basis) वर उपलब्ध करुन देणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदेच्या व्यावसायीक निविदेचा तपशिल व उच्चत्तम दरधारक यांनी प्रकल्प उभरणेस दाखविलेली असमर्थता पाहता सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेच्या मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-fiसुविधा (Royalty Basis) वर उपलब्ध करुन देणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उच्चत्तम दरधारकांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्प उभारणीस असमर्थता दाखविल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-fiसुविधा (Royalty Basis) वर उपलब्ध करुन देणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उच्चत्तम दरधारकांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्प उभारणीस असमर्थता दाखविल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-fi सुविधा (Royalty Basis) उपलब्ध करुन देणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गंत उच्चतम दरधारकांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्प उभारणीस असमर्थता दर्शविल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**<u>आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये वेगवेगळया विषयानुरुप/ प्रसंगानुरुपसंस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने सदस्यांच्या सुचनांवरुनखालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.</u>**

**निर्णय क्र.२६८** श्री साईबाबा संस्थानवर कार्यकारी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांची नेमणूक झालेली असल्यामुळे त्यांचे निवासासाठी सुसज्ज निवासस्थान बांधणेचा प्रस्ताव सादर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.२६९** साईलिला अंक वेळेवर प्रसिध्द होत नाहीत, त्यासाठी संपादक नेमणूकीची कार्यवाही सुरु करणेत यावी.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**निर्णय क्र.२७०** ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी योजना राबविण्यात यावी व या योजनेअंतर्गत दि.०१ जुलै रोजी शिर्डीकडे येणाऱ्या रस्त्यांवर जवळपास २ लाख झाडांची लागवड करण्यात यावी. (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.२७१** साईभक्तांच्या सोयीसाठी साई व्हॅलेट ॲप्लीकेशन विकसीत करणेत यावे. सीसीटीव्ही विभागाकडील रेकॉर्डींगचे प्रत्येक सहा महिन्यांचे फुटेज पाच वर्षापर्यंत जतन करुन ठेवण्यात यावे. तसेच मंदिर परिसराबरोबरच शिर्डी शहरातील सर्व वायरींग अंडरग्राऊंड करणे व पवनचक्क्यांची वीज शासनास देणेसाठीचा सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान/ सीसीटीव्ही कंट्रोलसेल प्रमुख/ विद्युत विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.२७२** पशुंचे अपघात झाल्यावर त्यांना कोणी वाली राहत नाही, अपघातग्रस्त अथवा आजारी पशुला दवाखान्यात घेऊन जाणेकरीता करीता संस्थानमार्फत राबविणेत येत असलेल्या साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये पशु रुग्णवाहिकांसाठी राखीव कोटा ठेवणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**निर्णय क्र.२७३** साईप्रसादालयामध्ये प्रसादभोजन दिनांक ०१ जानेवारी पासून सर्वांसाठी मोफत करण्यात आलेले असल्यामुळे तेथील बुकींगच्या कर्मचाऱ्यांच्या इतर विभागांमध्ये आवश्यकतेनुसार बदल्या करण्यात याव्यात व प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांची मोजणी करणेकरीता इतर पर्यायी व्यवस्था करावी. (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.२७४** श्री रामनवमी उत्सवामध्ये पालखी रोडवरुन श्रींची पालखी व रथ नेला जातो, त्यावेळी पालखी/ रथाच्या दर्शनाकरीता प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण ठेवणेकामी साईभक्तांना वेळोवेळी आवश्यक सुचना करणेसाठी या रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात साऊंड सिस्टीमची व्यवस्था करण्यात यावी. याकामी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.२७५** साईभक्तांना कोणतीही मोफत सेवा-सुविधा कायमस्वरुपी पुरविणेबाबत धोरणात्मक निर्णय घेतेवेळी, त्या निर्णयामुळे संस्थानवर किती आर्थिक बोजा पडेल अथवा भविष्यामध्ये त्यामुळे काय अडचणी येतील. तसेच याकामी निधीची तरतूद करता येईल का, याची संपुर्ण माहिती सभेसमोर सादर करणेत यावी.
(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**निर्णय क्र.२७६** श्री साईबाबा रुग्णालयाच्या धर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयांमधील डॉक्टरांनाही प्रोत्साहन भत्ता सुरु करणेसाठीचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.
(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षीका)

---

**निर्णय क्र.२७७** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त तयार करण्यात आलेल्या कृती आराखडयास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने मंजुरी दिलेली आहे. आजचे सभेत दर्शन रांग व साईसृष्टी हे प्रकल्प प्राधान्याने राबविणेबाबत चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला. तसेच कार्यकारी अधिकारी यांनी दि.१६.०३.२०१७ रोजी संबंधीत विभागांकडून सदर कृती आराखडयातील कामांचा आढावा घेतला असता, कृती आराखडयातील प्राधान्यक्रम व अंदाजित खर्चात काही प्रमाणात फेरबदल करणे आवश्यक आहे, असे निदर्शनात आले. सबब वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने सदर कृती आराखडयातील प्राधान्यक्रमात व अंदाजित खर्चात काही प्रमाणात फेरबदल करुन प्रथम प्राधान्य व द्वितीय प्राधान्य असा एकत्रित रु.३०२३.१७ कोटी मात्र रकमेच्या कृती आराखडयास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.२२३ ते २७७ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०४.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**